## सभापतीस्थानी -माननीय सभापती

## नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावा बाबत

**सभापती** :नियम 289 अन्वयेचा एक प्रस्ताव माझ्याकडे आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम, वि.प.स. यांनी "बेळगाव,कारवार,भालकी,खानापूर परिसरातील मराठी भाषिक मुख्यत्वे राज्य पुर्नररचनेच्या वेळी अन्यायाने कर्नाटक राज्यात घुसविण्यात आला व मराठी जनतेवर अन्याय झाला. गेली 50 वर्षे सीमा भागातील जनता या अन्याया विरोधात लढा देत आहे. सीमा प्रदेश महाराष्ट्रात समाविष्ट करावा यासाठी त्यांचा लढा सुरु आहे परंतु त्यांचा आवाज दडपला जात असून कर्नाटक सरकार सीमा भागातील जनतेवर अन्याय करीत आहे. कानडीची सक्ती होत असून मराठी नामशेष करण्याचे कुटिल कारस्थान सुरु आहे. मराठी भाषिकांच्या दुकानावरील पाटया कानडीत करण्यात आल्या, इतकेच नव्हे तर बेळगांव महानगरपालिकेवरील भगवा ध्वजही खाली उतरविण्यात आला आहे. बेळगांव महानिगरपालिकेच्या महापौर पदाच्या निवडणुकीत मराठी भाषिक उमेदवारांचे अर्ज बाद ठरविण्यात आले.

सीमा भागातील जनतेने 16 एप्रिल, 2010 रोजी मुंबईत आझाद मैदानात धरणे कार्यक्रम आयोजित केला आहे."

आजच्या कामकाज पत्रिकेवर या अनुषंगाने कोणताही विषय नाही त्यामुळे मी हा नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव नाकारीत आहे तरी सुध्दा प्रश्नोत्तराच्या तासानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना बोलावयाचे असेल तर पाच मिनिटात त्यांना त्यांचे विचार मांडण्यास परवानगी देण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक आश्रमशाळांतील**

**कर्मचाऱ्यांचा थकलेला पगार मिळण्याबाबत**

**(1) * 4877 श्री.दिपकराव साळुंखे** : सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य (वि.जा.भ.ज.) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांचा माहे जुलै, 2009 पासून थकलेला पगार मिळावा, शालेय शिक्षण खात्याप्रमाणे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती मिळावी या मागणीसाठी महाराष्ट्र आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघाच्यावतीने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर माहे नोव्हेंबर, 2009 मध्ये वा त्यादरम्यान लाक्षणिक उपोषण केलेले होते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार त्यांच्या मागण्यांबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर श्री.शिवाजीराव मोघे यांच्याकरिता** (1) होय.

(2) सद्य:स्थितीत निधीच्या उपलब्धतेनुसार सोलापूर जिल्ह्यातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे जानेवारी, 2010 पर्यंत वेतन अदा करण्यात आलेले आहे.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती देण्याबाबत वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की,"शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती देण्याबाबत वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे" याबाबतीत माझा प्रश्न असा आहे की, याबाबतीत वित्त विभाग आणि माननीय वित्त मंत्री केव्हा निर्णय घेणार आहेत ? आणि काय निर्णय घेणार आहेत?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, यासंदर्भातील प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविलेला होता तो एकदा परत आलेला आहे. आता पुन्हा या संदर्भातील पाठपुरावा विभागाकडून करण्यात येईल आणि यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

-----

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईच्या आरे कॉलनीतील पाच एकर जागेवर**

**मातीचा बेकायदेशीर भराव टाकल्याबाबत**

**(2) * 5882 श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.नितीन गडकरी, श्री.विनोद तावडे** : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईच्या आरे कॉलनीतील एसआरपी कॅम्पच्या बाजूला पाच एकर जागेत मातीचा बेकायदेशीर भराव टाकण्यात आल्याबाबत दुग्धविकास आयुक्तांनी याची दखल घेत दिनांक 11 फेब्रुवारी, 2010 रोजी आरेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून खुलासा मागविला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर पत्रात डम्पिंग तात्काळ थांबविण्यात यावे अशीही सूचना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या सूचनेची दखल न घेता तेथे डम्पिंग करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, शासनाने याप्रकरणाची चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे ?

**डॉ.नितिन राऊत** : (1) गृहविभागाच्या अधिपत्याखालील फोर्स वन यांच्या जागेमध्ये रस्ताबांधणी करण्याकरिता भराव टाकण्यात येत आहे. सदर भराव आरे दुग्ध वसाहतीच्या हद्दीत टाकू नये अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांनी फोर्स वनच्या वरिष्ठ पोलीस निरिक्षकास दि. 16.3.2010 रोजी दिल्या आहेत. आरे दुग्ध वसाहतीमधील आरे पोलीस ठाणे शेजारी भराव झाल्याबाबत आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास यांनी दि. 11.2.2009 चे पत्रान्वये भराव थांबविण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत यांना सूचना दिल्या व त्यांचा खुलासा मागविला आहे, हे खरे आहे.

(2) होय.

(3) होय.

(4) मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत यांना शासन आदेश दिनांक 24.2.2009 अन्वये निलंबित केले आहे. तसेच सूरक्षा विभागातील 4 कर्मचाऱ्यांनाही निलंबित केले आहे.

...4..

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी प्रश्न क्रमांक एक ला दिलेल्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "दिनांक 11 फेब्रुवारी,2009 रोजी चे पत्रान्वये भराव थांबविण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत यांना सूचना दिल्या व त्यांचा खुलासा मागविला आहे" त्यानंतर प्रश्न क्रमांक 4 ला दिलेल्या उत्तरात असे म्हटले आहे की, "मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत यांना शासन आदेश दिनांक 24 फेब्रुवारी,2009 अन्वये निलंबित केले आहे. तसेच सुरक्षा विभागातील 4 कर्मचाऱ्यांनाही निलंबित केले आहे." सभापती महोदय, दिनांक 24 फेब्रुवारी,2009 ला निलंबित करण्यात आले आहे परंतु डम्पिंग थाबविण्याबाबत तब्बल एका वर्षानंतर दिनांक 16 मार्च,2009 रोजी सूचना दिल्या आहेत.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 5882.... श्री. पांडुरंग फुंडकर.....

डंपींग थांबविण्याच्या सूचना एक वर्ष उशिरा देण्याचे कारण काय ? आधी आपण अधिकाऱ्यांना निलंबित केले. प्रश्न विचारल्यानंतर त्यांना निलंबित केले आणि डंपींग थांबविण्याच्या सूचना एक वर्षानंतर म्हणजे 16 मार्च, 2010 ला दिल्या. एक वर्ष उशिराने सूचना देण्याचे कारण काय ? हे डंपींग करण्याचे काम कोणाचे आहे ? त्या ठिकाणी भराव टाकण्याचे काम कोणी सुरु केले ? त्यासंदर्भात कोणी आदेश दिले ? कोणाच्या अधिपत्याखाली ते काम सुरु आहे ?

डॉ. नितीन राऊत : सभापत महोदय, डंपींग होऊ नये याची काळजी घेणे हे तेथील मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे काम आहे. या अनुषंगाने खात्यामार्फत वारंवार तशा सूचना देण्यात येतात. नेहमी अनेक तक्रारी येत असतात, वर्तमानपत्रामध्ये बातम्या येत असतात त्या अनुषंगाने त्या ठिकाणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविण्यात आले होते. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाला तसेच डंपींग झाल्याच्या तक्रारी आल्यामुळे दक्षता समितीने जी चौकशी केलेली होती त्या आधारावर त्यांना निलंबित करण्यात आले. सन्माननीय सदस्यांनी डंपींगबाबत विचारले. एन.एस.जी.च्या धर्तीवर फोर्स वन हे अत्याधुनिक कमांडो पथक निर्माण करण्यासाठी त्यांना 31.10.2009 ला 98.6 एकर जागा उपलब्ध करुन देण्यात आली. त्या जागेवर सुखसोयी निर्माण करणे तसेच त्यांचे काही बांधकाम सुरु आहे. त्या ठिकाणी रस्ता बांधण्यासाठी त्यांनी भराव टाकला आणि रस्त्याचे बांधकाम सुरु केलेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आले नाही. आधी तेथील कर्मचाऱ्यांना निलंबित केले. त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यावर कारवाई केली आणि डंपींग थांबविण्याच्या सूचना एक वर्षानंतर दिल्या. एक वर्ष उशिरा सूचना देण्याचे कारण काय ? माननीय मंत्रिमहोदयांनी आताच सांगितले की, त्या ठिकाणी गैरव्यवहार झाला. हा गैरव्यवहार कोणत्या प्रकारचा आहे ?

डॉ. नितीन राऊत : सभापती महोदय, मी आधीच सांगितले की, भरावासंबंधी ज्या सूचना असतात त्या वेळोवेळी देण्यात येत असतात. ज्या जुन्या तक्रारी होत्या त्या अनुषंगाने दक्षता अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखालील समितीने त्या ठिकाणी चौकशी केली होती आणि त्या चौकशीच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 5882.... डॉ. नितीन राऊत.....

आधारावर संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आले. त्या तक्रारींचा आणि याचा काही संबंध नाही. ती रेग्युलर प्रोसेसमधील बाब आहे. त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार कळविली होती. 24.2.2009 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निलंबित केले आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो प्रश्न विचारला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, आम्ही त्यासंबंधी सखोल माहिती घेतली आणि त्या माहितीच्या आधारावर कारवाई केलेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो बेसिक प्रश्न विचारला त्याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदय देत नाहीत. आपण 11.2.2009 ला सूचना दिल्या आणि त्यानंतर सुध्दा भराव झाला म्हणून 16.3.2010 ला पुन्हा सूचना दिल्या. म्हणजे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रश्न दिल्यामुळे सूचना देण्यात आल्या. हा प्रश्न आल्यामुळे आपल्याला कळले की त्या ठिकाणी भराव चालू आहे. 11.2.2009 ते 16.3.2010 पर्यंत जो भराव टाकला गेला त्याबद्दल कोणाला निलंबित केले ?

डॉ. नितीन राऊत : सभापती महोदय, खऱ्या अर्थाने या ठिकाणी जो प्रश्न विचारलेला आहे तो फोर्स वन च्या संदर्भात आहे. तो भूखंड फोर्स वन ला दिलेला असल्यामुळे त्या भूखंडाशी आमचा काही संबंध नाही. त्या भूखंडावर जे बांधकाम सुरु असेल त्या बांधकामासाठी जाणाऱ्या गाड्यांना परवानगी देण्याची तरतूद आमच्याकडे आहे. त्या ठिकाणी ते भराव टाकत असतील तर तो गृह खात्याचा प्रश्न आहे. त्यामध्ये आमच्या खात्याचा संबंध येत नाही पण शासनाचा प्रतिनिधी म्हणून मी सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी छोटा कबीरला एक विसर्जन तलाव आहे. त्या ठिकाणी गणेश विसर्जनासाठी जो वाहनतळ करण्यात आला आहे तो अनधिकृतपणे करण्यात आला आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5882..... डॉ.नितीन राऊत...

त्याठिकाणी भराव टाकण्यात आला होता. हायटेक एन्टरप्रायझेस कंपनीने तो भराव टाकला. त्यासंबंधी आयुक्तांनी 11.2.2009 रोजी मेमो देऊन ते काम तात्काळ थांबविण्यात यावे असे म्हटले होते. अशाप्रकारच्या तक्रारी ॲलर्ट सिटिझन्स नॅशनल या संस्थेने आणि न्यूज नेटवर्कचे सहाय्यक संपादक आफ्रीन शेख यांनी केली होती. त्याचप्रमाणे दिनांक 9.2.2009 रोजी मुंबई मिरर या वर्तमानपत्रात अशी बातमी आली होती की, "Chhota Kashmir stretch under 25 feet of debris", त्या माहितीच्या आधारावर कारवाई करण्यात आली.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, डम्पिंग ग्राऊंडचे मटेरियल टाकण्यासाठी ज्या गेटमधून गेले त्या गेटवर त्यांनी पास दाखविले होते काय, डम्पिंगचे मटेरियल कोठून आले होते, ते मटेरियल मातीचे होते की कचरा होता, मातीचे असेल तर त्याची रॉयल्टी भरली होती का ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, आरे वसाहतीच्या नाक्यावरुन गाडया जातात त्याठिकाणी सीसीटीव्ही लावलेला आहे. फोर्स वनच्या गाडया आहेत त्यासंबंधी त्यांनी बघायचे असते. आमच्या विभागाकडे तो नाका आहे, त्यामुळे आम्ही तेथे त्या गाडया कोठून येतात आणि कोणासाठी जातात, आमच्या कार्यक्षेत्राचा त्याचा काही संबंध येत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, उद्या अतिरेकी येतील, तरीही या विभागाचे अधिकारी त्याकडे बघणार नाहीत. ज्यावेळी गेटमधून गाडी जात असते त्यावेळी गेटवर पास दाखविला गेला पाहिजे. अन्यथा, कोणीही आत जाईल हे बरोबर होणार नाही.

डॉ.नितीन राऊत : पूर्ण चौकशीअंतीच गाडया सोडल्या जातात.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा विषय फोर्स वनशी संबंधित आहे. त्यामुळे आमचा काही संबंध नाही. पण उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, "आरे दुग्ध वसाहतीमधील आरे पोलीस ठाणे शेजारी भराव झाल्याबाबत आयुक्त, दुग्धव्यवसाय यांनी दि.11.2.2009 च्या पत्रान्वये भराव थांबविण्याबाबत सीईओला सूचना दिल्या व त्यांचा खुलासा मागितला आहे" म्हणजे भराव झ ाला होता आणि तुमच्या विभागाचा या प्रश्नाशी संबंध नसेल तर मग खुलासा मागविण्याचे कारण काय आहे ? प्रश्न 3 मध्ये असे विचारले होते की, "या सूचनेची दखल न घेता तेथे डम्पिंग करण्यात आले आहे, हे खरे आहे काय, या प्रश्नाला होय असे उत्तर दिले आहे. म्हणजे





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

दुग्धव्यवसाय विभागाच्या सूचनेची दखल न घेता तेथे डम्पिंग करण्यात आले. हे शासनाने मान्य केले आहे.

डॉ.नितीन राऊत : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, मी या प्रश्नाचे उत्तर यापूर्वीच दिलेले आहे. पोलीस स्टेशनच्या शेजारी ज्याला छोटा कबीर म्हणतात त्याठिकाणी तलाव आहे. त्या तलावात गणपती विसर्जन केले जाते. त्याठिकाणी अनधिकृतपणे वाहनतळ उभे करण्याचे काम हायटेक एन्टरप्रायजेस या कंपनीने केले होते, त्याची चौकशी मुख्य दक्षता अधिका-यांनी केली होती. त्या अनुषंगाने मेमो देण्यात येऊन कारवाई करण्यात आली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदय, गणेश विसर्जनाचा मुलामा लावत आहेत. गणेश विसर्जनाचा कालावधी सोडला तर उर्वरित काळात तेथे बोटिंग व इतर व्यवसायिक उद्योग चालतात त्यामुळे तेथे वाहनतळ होण्यासाठी भराव टाकला आहे. त्यामुळे गणेश विसर्जनाचे कारण देण्यात येऊ नये. 2009 मध्ये दुग्धव्यवसाय मंत्र्यांनी फोर्स वन कधी स्थापन केले ? ते तर नंतर स्थापन झाले आहे. फोर्स वन स्थापन होणार आहे ते माहीत असल्यामुळे जमीन आधीच देऊन टाकली होती काय ? आता ती जमीन गेली असेल, पण आपले काही माननीय सभासद तेथे एसआरएसाठी थांबवून ठेवत आहेत, असे वर्तमानपत्रात वाचत आहे. 2009 मध्ये फोर्स वन स्थापन झाले नव्हते. त्यासाठी त्यांनी विभागाने जागा कशी देऊन टाकली ? यामधील काही तरी खरे सांगावे.

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य आमचे मित्र श्री.विनोद तावडे यांनी आता जो प्रश्न विचारला आहे त्याचे दोन भाग आहेत. एक भाग असा आहे की, फोर्स वनने जमीन संपादित केली आहे. दुसरा भाग म्हणजे सीईओंनी केलेली अनियमिता, या दोन्ही प्रश्नासंबंधी आता त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असून त्याची सखोल चौकशी सुरु आहे. त्याठिकाणी बोटिंग केले जाते, तेथे रेस्टॉरंटस आहेत, तेथे कोणाकडून बोटिंगचा व्यवसाय केला जातो, कोणाचे रेस्टॉरंटस आहेत, कोणाला देण्यात आले ? युतीच्या काळात तुमच्या सहका-यांना ते घेतलेले होते. त्यामध्ये अनियमितता तुम्ही केली आहे, त्याची चौकशी करुन आम्हाला तेच रद्द करावयाचे आहे आणि आम्ही ते करणार आहे.

----

यानंतर श्री.शिगम.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भिवंडी शहर व ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जमिनीची बनावट कागदपत्रांद्वारे दलालांकडून होत असलेल्या विक्रीबाबत**

**(३) * ४८५५ श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.मोहन जोशी, श्री.उल्हास पवार, श्री. एस. क्यू. ज़मा :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहर व ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जमिनीची बनावट कागदपत्रांद्वारे तेथील दलालांकडून सर्रास विक्री चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत भिवंडीतील ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे माहे फेब्रुवारी, २०१० च्या पहिल्या आठवडयात तक्रार करुनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने शासन कोणती कारवाई करणार आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, भिवंडी यांनी केलेल्या चौकशीमध्ये सदरहू तक्रारीमध्ये तथ्य नसल्याचे आढळून आल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याचा तसेच तक्रारीकडे दुर्लक्ष करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयप्रकाश छाजेड : भिवंडी ते पडघा या रस्त्यावर हजारो गोडाऊन्स तयार झालेली आहेत. त्यामध्ये विविध प्रकारची रसायने ठेवली जातात. गोडाऊन्सच्या बांधकामामध्ये अनियमितता झालेली आहे. पडघा कुरुंद गावच्या काही नागरिकांनी आपल्या जमिनीची खोटी कागदपत्रे तयार झालेली आहेत अशा प्रकारच्या तक्रारी सरकारकडे आणि पोलीसांकडे केल्या होत्या काय ? असलयास, त्या तक्रारींच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आलेली आहे ? भिवंडी पासून पडघ्यापर्यन्तचा भाग हरित पट्टयामध्ये येतो की पिवळ्या पट्टयामध्ये येतो ? हा भाग हरित पट्टयामध्ये येत असेल तर त्या भागात एन.अे.ची परवानगी कोणी दिली ? तसेच बांधकामास कोणी परवानगी दिली ? बांधकामामध्ये अनियमितता झालेली असेल तर त्याबाबतीत सरकार काय कारवाई करणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : मौजे कुरुंद, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे येथील काही शेतक-यांच्या तक्रारी जिल्हाधिकारी ठाणे यांना प्राप्त झालेल्या आहेत. श्री. अशोक कर्णिक, सचिव, आदिवासी विकास आघाडी, यांच्याकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारीच्या अनुषंगाने उप विभागीय

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिकारी, भिवंडी यांना जिल्हाधिका-यांनी दिनांक २.३.२०१० रोजी चौकशीचे आदेश दिले. सदरहू चौकशीमध्ये कोणत्याही वैयक्तिक शेतक-याची तक्रार आहे असे आढळून आले नाही. त्यामुळे त्याबाबतीत कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही.

श्री. जयप्रकाश छाजेड : भिवंडी पासून पडघ्यापर्यन्त रस्त्याच्या दोन्ही बाजूला बांधकाम झालेले आहे. तो भाग हरित झोन आहे की पिवळा झोन आहे ? तसेच त्या ठिकाणी बांधकाम करण्यास कोणी परवानगी दिली ?

श्री. प्रकाश सोळंके : मूळ प्रश्न हा मौजे कुरुंद गावासंबंधीचा आहे. सन्माननीय सदस्यांनी भिवंडी ते पडघा या रस्त्यावरील बांधकामासंबंधी प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांची काही तक्रार असेल तर ती व्हेरिफाय करुन घेऊ.

श्री. चंद्रकांत छाजेड : त्याठिकाणी हजारो गोडाऊन्स उभी राहिलेली आहेत. गोडाऊन्सच्या बांधकामास कोणी परवानगी दिली ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मूळ प्रश्न हा भिवंडी शहर व ग्रामीण भागातील शेतक-यांच्या जमिनीची बनावट कागदपत्रांद्वारे दलालांकडून होत असलेल्या विक्रीबाबत विचारण्यात आलेला आहे. आता सन्माननीय सदस्य झोन कोणता आहे आणि झालेले बांधकाम बेकायदेशीर आहे किंवा कसे यासंबंधी प्रश्न विचारीत आहेत. सन्माननीय सदस्यांचा हा प्रश्न मूळ प्रश्नापेक्षा वेगळा आहे. तरी देखील तेथील झोन हा नॉन डेव्हलपमेण्ट झोन आहे. तसेच तेथील बांधकामांना काही प्रमाणात परवानग्या दिलेल्या आहेत, ज्यांनी बेकायदेशीर बांधकाम केलेले आहे त्यांच्यावर कारवाई सुरु आहे.

श्री. जयंत प्र. पाटील :जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे कोणत्या तक्रारी प्राप्त झाल्या ? त्या तक्रारींचे स्वरुप काय आहे ? जेव्हा ग्रामस्थांनी तक्रारी केल्या त्यावेळी त्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी तहसीलदारांनी ग्रामस्थांना बोलावले होते काय ?

श्री. प्रकाश सोळंके : ग्रामस्थांनी मुख्यमंत्र्यांपासून पोलीस स्टेशन, सरपंच, ग्रामसेवक यांच्यापर्यन्त तक्रारी केलेल्या आहेत. बनावट कागदपत्रांच्या आधारे खरेदी खत केले जात आहे अशी तक्रार होती. याबाबतीत चौकशी केली असता तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.

----

....नंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 10:50

**इंग्रजी माध्यमातील विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फी पोटी दिलेले अनुदान परत करण्याबाबत**

**(४) * ५२१४ डॉ.दीपक सावंत, श्री.परशुराम उपरकर, श्री.रामदास कदम, श्री.किरण पावसकर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंग्रजी माध्यमातील विनाअनुदानित शाळांमध्ये शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शुल्कापोटी मुंबईतील अनेक शाळांना गेल्या ४-५ वर्षात दिलेल्या लाखो रुपयांचे अनुदान शासनाला परत करा असा तगादा सामाजिक न्याय विभागाने शाळांच्या मागे लावला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शुल्क भरण्याबाबत राज्य शासनाने कोणताही धोरणात्मक निर्णय घेतला नसतानांही विविध शाळांना लाखो रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळांना लाखो रुपयांचे अनुदान चुकून देण्यात आल्याने सदर रक्कम शासनाला तात्काळ परत करावी, असा तगादा सामाजिक न्याय विभागातील अधिकाऱ्यांनी लावल्याने संबंधित शाळा संचालक त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यापुढे मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शुल्क भरण्यास सामाजिक न्याय विभागाने असमर्थता दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शुल्क भरण्याबाबत शासनाने ठोस असा काही निर्णय घेतला आहे काय,

(६) असल्यास, शुल्क भरण्याचा निर्णय नसतांनाही ज्या अधिकाऱ्यांनी शाळांना लाखो रुपये शुल्कापोटी दिले आहेत, त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.सचिन अहिर, श्री. शिवाजीराव मोघे यांच्याकरिता** : (१) समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई यांनी अशा प्रकारचे पत्र पाठविलेले आहे.

(२) इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण व परिक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचे शालेय शिक्षण विभागाचे धोरण नाही. असे असतांनाही समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई यांनी अनुज्ञेय नसतांनाही विविध शाळांना चुकून फीची प्रतिपूर्ती केलेली आहे.

(३) ज्या शाळांना अनुज्ञेय नसतांनाही फीची प्रतिपूर्ती केलेली आहे तेवढीच रक्कम शासकीय कोषागारात भरणा करण्यासंबंधी समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई यांनी कळविलेले आहे.

(४) व (५) मा. सर्वोच्च न्यायालयाने टी.एम.फौडेशन प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार संबंधित शैक्षणिक संस्थांना फी ठरविण्याचे अधिकार दिले असले तरी, त्याची प्रतिपूर्ती किती प्रमाणात करता येईल व किती वित्तीय भार पडेल याचा अभ्यास करण्यासाठी प्रधान सचिव (सामाजिक न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली आहे. सदरहू समितीच्या शिफारशी प्राप्त झाल्यानंतरच त्यावर शासन अंतिम निर्णय घेईल.

(६) चुकून शैक्षणिक शुल्क अदा केलेल्या संबंधीत जबाबदार अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित आहे.

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.५२१४......

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न अनेकदा या सभागृहात चर्चेला आलेला आहे. आपल्या दालनात देखील या संदर्भात एक बैठक झाली होती. परंतु अजूनही या प्रश्नाची तड लागलेली नाही. या प्रश्नाला आता वेगळे स्वरुप प्राप्त झाले आहे. इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या फी पोटी जी रक्कम दिली गेली ती परत मागण्यात येत आहे. वास्तविक शासनाने फी द्यायची होती. उत्तरामध्ये म्हटले आहे की, अधिकाऱ्यांनी चुकून प्रतिपूर्ती केली. माझ्याकडे दिनांक २४.१२.१९७० च्या शासन निर्णयाची प्रत आहे. त्यात म्हटले आहे की, 'मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून कोणतीही फी वसूल करण्यात येऊ नये. याची सर्व शाळांनी जाणीव ठेवावी. अनुसूचित जाती, नवबौध्द आणि इतर विद्यार्थ्यांकडून फी वसूल करण्यात येऊ नये. शासनाचे आदेश स्पष्ट असताना विद्यार्थ्यांकडून ज्या शाळा फी घेत आहेत अशा शाळांवर कारवाई करण्यात येईल.' उत्तरामध्ये म्हटले आहे की, समाजकल्याण अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे ही फी परत मागण्यात आली. प्रश्न असा आहे की, राज्य शासनाचे अनुसूचित जातीच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत कोणते धोरण आहे? शाळांची परिस्थिती आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना अशी झालेली आहे. सभापती महोदय, आपल्याला या विषयाची जाण आहे. आपण या संदर्भात हस्तक्षेप करावा.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी १९७० च्या जी.आर.चा संदर्भ वाचून दाखविला आहे. ही गोष्ट खरी आहे की, १९७० साली शासनाने आदेश काढून अनुसूचित जाती आणि मागासलेल्या भागातील विद्यार्थ्यावर कोणताही आर्थिक बोजा पडू नये म्हणून फी माफीचा निर्णय घेतला. तद्नंतर कोर्टात केस दाखल झाली. त्या केसचा आधार घेऊन त्या त्या स्तरावर विनाअनुदानित किंवा कायम विनाअनुदानित शाळा आहेत त्यांनी परस्पर फी स्ट्रक्चर ठरवून कार्यवाही केली पाहिजे. आजही ही फी देण्यास शासनाचा नकार नाही. परंतु ती फी किती द्यायची हा प्रश्न आहे. मुंबईपुरता ज्यावेळी हा विषय उपस्थित होतो त्यावेळी एका शहरापुरता निर्णय घेता येत नाही. राज्याचे धोरण आपण स्वीकारतो. २००३ साली शालेय शिक्षण विभागाने जी.आर.काढून सांगितले की, त्या त्या खात्याने विशेषकरुन समाजकल्याण खात्याने, नवीन फी स्ट्रक्चर तयार झाल्यामुळे जी फी वाढ झाली आहे त्या संदर्भात किती आर्थिक भार सोसू शकतो या अनुषंगाने त्या विभागाने निर्णय घ्यावा. समाजकल्याण विभागाने तो निर्णय घेणे अपेक्षित

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होते. परंतु त्या विभागाने निर्णय घेतला नाही. काही अधिकाऱ्यांनी त्या जी.आर.चा आधार घेऊन मुंबईतील इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये वाढविलेली अतिरिक्त वाढीव फी भरण्यास सुरुवात केली. हा विचार करीत असताना ही गोष्ट शासनाने उत्तरामध्ये देखील मान्य केली आहे की, याबाबत धोरणात्मक ठरवावे लागेल. हे धोरण एका शहरापुरते ठरवू शकत नाही. एका अधिकाऱ्याने चूक करुन फी भरण्याचे काम केले. राज्यासाठी आपल्याला धोरण ठरवावे लागेल. यासाठी सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे. समितीच्या दोन बैठका झाल्या असून अंतिम निर्णय प्राप्त झाल्यानंतर याबाबत राज्य शासन निश्चितपणे राज्यासाठी धोरण आखेल. परंतु अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये ही सकारात्मक भूमिका राज्य शासनाची राहील.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी व परीक्षा शुल्क त्या त्या शाळांना देण्यात आलेले नाही. त्यातल्या त्यात इंग्रजी माध्यमाच्या ज्या रात्रशाळा आहेत, त्या शाळांमध्ये दिवसा काम करुन जे मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेतात त्या विद्यार्थ्यांची फी शासनाने मागील अनेक वर्षापासून भरलेली नाही.

नंतर एफ.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ........ ता. प्र. क्र. 5214.......

माझा प्रश्न असा आहे की, समितीचा निर्णय आल्यानंतर तो संपूर्ण राज्यासाठी लागू करणार पण बॅक डेटने जेवढ्या शाळांना हे अनुदान मिळणार आहे तेथपासून तो लागू करणार काय ? तसेच किती दिवसात ही प्रतिपूर्ती देण्याचा निर्णय शासन घेणार आहे ?

श्री. सचिन अहिर : महोदय, यासंबंधीचा धोरणात्मक निर्णय घेण्यासाठीच ही समिती नेमलेली असून त्यात शालेय शिक्षण, आदिवासी विभागाचे सचिव या समितीचे सदस्य आहेत तर सदस्य सचिव म्हणून समाजकल्याण विभागाचे सचिव आहेत. मार्च व एप्रिलमध्ये या समितीच्या दोन बैठका झालेल्या असून तिसरी बैठक पुढच्या महिन्यात घेण्यात येईल व लवकरात लवकर त्याचा अहवाल प्राप्त करण्यात येईल. असा अहवाल आल्यानंतर त्यात जो निर्णय असेल तो संपूर्ण राज्यासाठी लागू करावयाचा असेल तर त्यासाठी मंत्रिमंडळाची मान्यता घ्यावी लागणार आहे. कारण हा प्रश्न केवळ मागासवर्गीयांपुरताच मर्यादित राहणार नाही तर आदिवासी विभागासाठी सुध्दा लागू होणार आहे, त्यादृष्टीने असा धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे.

श्री. कपिल पाटील : महोदय, माझे प्रामुख्याने दोन प्रश्न आहेत. एक म्हणजे अशा प्रकारे वसुलीच्या नोटिसा देऊन सरळसरळ भारतीय संविधानाच्या कलम 15 (5) चा भंग केलेला आहे. कारण मागासवर्गीयांसाठी ज्या विशिष्ट तरतुदी करावयाच्या असतात ती राज्यशासनाची जबाबदारी असते. तसे न करता उलट वसुलीच्या नोटिसा देणे हा एक प्रकारे भंगच केला आहे. त्यानंतर आपल्या दालनात झालेल्या बैठकीच्या संदर्भात मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या सभागृहात या विषयावर अनेक वेळा चर्चा झाली आणि दालनात जो निर्णय झाला तो देखील आपणास आठवतच असेल, कारण आपण स्वत: निदेश दिले होते. म्हणजे जी फी पी.टी.ए. ने मान्य केली आहे, त्याला उपसंचालकांनी मान्यता दिली आहे अशी फी वसूल करता येणार नाही असे शासनाने सुध्दा ठरविले आहे. हे असतानाही दिलेली फी परत मागणे हे चुकीचे आहे. त्यामुळे आपल्याला अशी फी वसूल करता येणार नाही. हा प्रश्न फक्त समाजकल्याण विभागाचाच आहे. आदिवासी विभागामार्फत अशी फी दिली जाते. अशी वसुली थांबविण्यात येईल काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5214.....

श्री. शिवाजीराव मोघे : महोदय, यामध्ये कन्फ्युजन झालेले आहे. ते म्हणजे शिक्षण शुल्क, सत्र शुल्क आणि प्रवेश शुल्क हे इंग्रजी माध्यमाच्या शाळांना देण्यासंबंधीचे राज्य शासनाचे धोरणच नाही. उत्तरात म्हटले आहे की, चुकून देण्यात आले पण हा प्रश्न फक्त बृहन्मुंबईपुरताच मर्यादित आहे, राज्यात कोठेही अशा प्रकारची फी दिलेली नाही......अडथळा......शासनाचे धोरण इंग्रजी शाळांसाठी नाही. बृहन्मुंबईमधील एस.सी./एस.टी. च्या विद्यार्थ्यांना मग त्या शाळा अनुदानित, विना अनुदानित अथवा इंग्रजी माध्यमाच्या शाळा असो त्यांना आपण असे शुल्क देत नाही. या समितीचा अहवाल एक महिन्यात अपेक्षित आहे. तो अहवाल येईपर्यंत अशा वसुलीला स्थगिती देण्यात येत आहे. तसेच उत्तरात म्हटले असले तरी अधिकाऱ्यांनी सुध्दा हे जाणीवपूर्वक केलेले नाही तर कन्फ्युजनमुळे जवळपास 46 कोटी रुपये जास्तीचे दिले गेले आहेत. या प्रकरणाला सध्या स्थगिती देण्यात येत आहे, एवढे मी सांगू इच्छितो.

डॉ. दीपक सावंत : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, शैक्षणिक शुल्क ठरविण्याचा अधिकार त्या त्या शाळांना आहे. मान्यताप्राप्त विना अनुदानित, कायम विना अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक शुल्क व इतर शुल्क संबंधित शाळांच्या व्यवस्थापनाने निश्चित करावे असे जी.आर. मध्ये म्हटले आहे. माझा या अनुषंगाने प्रश्न असा आहे की, एक महिन्याच्या आत या समितीचा अहवाल सभागृहासमोर सादर करावा आणि या शाळांकडे जो वसुलीचा तगादा लावला आहे तो एका सर्कुलरच्या माध्यमातून थांबविणार काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : महोदय, जोपर्यंत या समितीचा अहवाल येत नाही तोपर्यंत या वसुलीला स्थगिती देण्यात येत आहे. आम्ही इंग्रजी माध्यमातून शिकत असलेल्या मुलांना ही सवलत देणार नाही असा विषय नाही पण मंत्रिमंडळाने निर्णय घेतला तर अशा शाळांच्या बाबतीत सुध्दा तोच निर्णय लागू करु.

-----------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यात भटक्या विमुक्त जातीच्या शाळा बंद करण्याचे दिलेले आदेश

**(५) * ६४९२ श्री.प्रितमकुमार शेगांवकर** : सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य (वि.जा.भ.ज.) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भटक्या विमुक्त जातीच्या शाळा बंद करण्याचे आदेश सन २००९ मध्ये वा त्यासुमारास देण्यात आले आहेत काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच पुन्हा सदर भटक्या विमुक्त जातीच्या आश्रमशाळा सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.गुलाबराव देवकर, श्री.शिवाजीराव मोघे** : (१) नाही.

(२) सन २००९ मध्ये राज्यातील विजाभज आश्रमशाळा खालील कारणामुळे मान्यता रद्द केलेल्या आहेत.

अ) प्रतिभा शिक्षण प्रसारक मंडळ जुनुना ता.बार्शी, टाकळी या आश्रमशाळेची एकवेळ संधी देऊनही आश्रमशाळा सुरु न केल्यामुळे दि.२/२/२००९ रोजी आश्रमशाळेची मान्यता रद्द केलेली आहे.

ब) ग्रामविकास मंडळ, कारंजा संचालित श्री संत भाकरे महाराज आश्रमशाळा, सारवाडी, ता.कारंजा, जि.वर्धा येथील आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांचा मानसिक व आर्थिक छळ करणे तसेच संस्थेचे सचिव यांनी प्रवेशित मुलीवर लैंगिक अत्याचार करणे तसेच शासनाच्या ध्येयधोरणानुसार आश्रमशाळा चालविली जात नसल्याने व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने शाळेची मान्यता दि.९.६.२००९ अन्वये आदेशान्वये काढुन घेण्यात आली आहे.

क) शिवचैतन्य पारमार्थिक शिक्षण संस्था कामती (खुर्द), जि.सोलापूर या संस्थेची मान्यता खोट्या स्वाक्षरी करुन तुकडी मान्यता व जादाची शिक्षक भरती करुन शासनाचे पैसे हडप केले या कारणावरुन दि.२१/८/२००९ रोजी मान्यता काढली. सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

ड) गोंडवाना मुक्ती मिशन, जि.वर्धा संचलित जयभवानी प्राथमिक आश्रमशाळा, आंजी अंदोरी, ता.देवळी, जि.वर्धा या आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना नियमबाह्य काढून टाकणे, मुलांना मारहाण करणे, मुलांना उपाशी ठेवणे आणि संधी देवूनही कामकाजात सुधारणा न झाल्याने सदर आश्रमशाळेची मान्यता दि.२४.८.२००९ च्या शासन आदेशान्वये काढून घेण्यात आली आहे.

इ) राजश्री शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर संचलित विजाभज लिसीट प्राथमिक आश्रमशाळा, ठाणेगाव, ता.आरमोरी, जि.गडचिरोली या आश्रमशाळेमध्ये विद्यार्थ्यांची हजेरी कमी असणे रेकॉर्ड न ठेवणे शाळेतील विद्यार्थ्यांना सोयीसुविधा न पुरविणे, इत्यादी कारणांमुळे सदरहू शाळेची मान्यता दि.२४.८.२००९ च्या शासन आदेशान्वये काढुन घेण्यात आली आहे.

(३) सदरच्या बंद झालेल्या शाळा सुरु करण्याबाबत कार्यवाही केलेली नाही. परंतु शाळांच्या मान्यता रद्द केल्याने या शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून आसपासच्या आश्रमशाळेतील सदर विद्यार्थ्यांना सामावून घेणेबाबत संबधित विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना आदेश देण्यात आलेले आहेत.

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6492....

श्री.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, पाच भटक्या विमुक्त जातीच्या शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. या पाच शाळा शासन इतर संस्थांना देणार आहे काय ? याबाबत शासन काही कार्यवाही करणार आहे काय ? प्राथमिक व माध्यमिक भटक्या विमुक्त जातीच्या आश्रमशाळा सुरू न करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे काय ? असा निर्णय घेण्याचे कारण काय आहे ? सन 1995 ते 1999 या कालावधीत युती शासनाने 25 भटक्या विमुक्त जातीच्या आश्रमशाळा सुरू करण्यासाठी मान्यता दिली होती. परंतु, 1999 मध्ये आघाडी शासन आल्यानंतर या शाळांची मान्यता रद्द करण्यात आली. अजूनही त्या विनाअनुदानित आश्रमशाळा सुरू आहेत. त्यांना शासन अनुदान देणार आहे काय आणि त्या शाळांना शासन मंजुरी देणार आहे काय ?

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तारांकित प्रश्नांवर जास्तीत जास्त दोनच उपप्रश्न विचारावयाचे असतात. आपण येथे चार उप प्रश्न विचारले आहेत.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या पाच शाळा बंद केल्या आहेत, त्या दुसऱ्या संस्थांना देणार काय ? असा प्रश्न विचारलेला आहे. ह्या शाळा आपण कायम स्वरूपी बंद केलेल्या आहेत. त्यामुळे दुसऱ्या संस्थांना देण्याचा प्रश्नच येत नाही आणि देता येणार नाही. नवीन शाळांना परवानगी न देण्यासंबंधीचा जी.आर. शासनाने दिनांक 31.5.2006 रोजी काढला आहे. त्यामुळे नवीन शाळांना परवानगी देण्याचे काम सध्या बंद आहे. युती शासनाच्या कालावधीमध्ये काही शाळांना परवानगी दिली होती यासंबंधी देखील प्रश्न विचारलेला आहे. त्या शाळा देखील बंद करण्यात आलेल्या आहेत. नवीन शाळा न देण्याचे धोरण 2006 पासून असल्यामुळे शाळांना मान्यता दिलेली नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले ते ऐकून खरोखर धक्का बसला. भटक्या विमुक्त जातींच्या मुलांसाठी अशा शाळांची आवश्यकता आहे की नाही ? हा खरा प्रश्न आहे. नवीन शाळांना परवानगी द्यायची नसेल तर आधीच्या किती शाळा सुरू आहेत ? लेखी उत्तरातील शेवटच्या वाक्यात असे नमूद करण्यात आले आहे की,"सदर विद्यार्थ्यांना सामावून घेणेबाबत संबंधित विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना आदेश देण्यात आलेले आहेत. ..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6492....

डॉ.नीलम गोऱ्हे....

त्यामुळे त्या शाळेमधील विद्यार्थ्यांची कुठेना कुठे तरी व्यवस्था झालेली आहे. पण नवीन शाळा देण्यासंबंधी आपले काय धोरण आहे व सध्या किती शाळा सुरू आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, राज्यामध्ये प्राथमिक 526, माध्यमिक 296, कनिष्ठ महाविद्यालय 125 असे मिळून 947 भटक्या विमुक्त जातीच्या आश्रमशाळा महाराष्ट्रात सुरू आहेत. ज्या शाळांमध्ये अनियमितता आहे, एक दोनदा संधी देऊन देखील त्यात काही सुधारणा होत नाही, त्या शाळा मग बंद पडतात. अशा शाळांमधील विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळेमध्ये ट्रान्सफर करण्याची व्यवस्था असते. शाळेचा दर्जा चांगला नसल्यामुळे मुलांच्या शैक्षणिक दर्जेवर देखील त्याचा परिणाम होतो.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, ग्रामविकास मंडळ,कारंजा संचालित श्री संत भाकरे महाराज आश्रमशाळा,सारवाडी या शाळेत मुलीवर लैंगिक अत्याचार केले आहेत. हा गंभीर आरोप या संस्थेवर आहे. सदर संस्थेविरूद्ध पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल केला आहे काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आलेला आहे असा उल्लेख करण्यात आलेला आहे. यासंबंधातील माहिती घेऊन पटलावर ठेवतो.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, ही गंभीर बाब असल्यामुळे शाळा बंद करण्यात आली आहे. मुलीवर लैंगिक अत्याचार झाला असेल तर निश्चितपणे पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

पोलीस केस झाली नसेल तर ती दाखल करण्यात येईल.

**सभापती** : सभागृहाची भावना लक्षात घेऊन मी हा प्रश्न राखून ठेवत आहे.

..................

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.भारवि 11.05

**सटाणा (जि.नाशिक) तालुक्यात वादळी पावसाने जनावरे मृत झाल्याप्रकरणी द्यावयाची नुकसान भरपाई**

**(६) * ६०८९ डॉ.वसंत पवार, श्री.विक्रम काळे, श्रीमती उषाताई दराडे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यात वादळी पावसाने दगावलेल्या जनावरांची नुकसान भरपाई म्हणून शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या धनादेशावर महसूल अधिकाऱ्यांनी व्हाईटनर लावून रक्कमेत फेरफार केल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०१० रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अधिकाऱ्यांवर पुढे कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश सोळके,श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (१) नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यात फयान चक्रीवादळामुळे दगावलेल्या जनावरांची नुकसान भरपाई म्हणून शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या धनादेशावर शासन निर्णय क्रमांक सीएलएस-२००९/प्र.क्र. २०४/म-३, दिनांक १२.११.२००९ व शासन निर्णय दिनांक १६.११.२००९ मधील मुद्दा क्रमांक ३ नुसार देय रक्कमेत कुठलाही फेरफार करण्यात आलेला नाही. नियमानूसार देय असलेली रक्कम आपदग्रस्तांना अदा करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक ६०८९...

श्री.प्रकाश सोळंके :सभापती महोदय, छापल्याप्रमाणे परंतु या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

पहिल्या उप प्रश्नाचे उत्तर " होय " असे वाचावे आणि दोन तीन आणि चार उपप्रश्नाचे उत्तर " शासन निर्णयाप्रमाणे पूर्ण मदत देण्याबाबत दहा दिवसांच्या आत कार्यवाही करण्यात येईल " असे वाचावे

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात सुधारणी केली असल्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु पहिल्यांदा चुकीचे उत्तर का देण्यात आले ? श्री.प्रकाश सोळंके : उत्तरामध्ये चूक आढळून आल्या नंतर ही चूक दुरुस्त करण्यात आली आहे . आपदग्रस्तांना जास्तीत जास्त मदत मिळावी हा त्या मागचा उद्देश आहे त्यामुळे सकारात्मक उत्तर देण्यात अले आहे.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, फयान वादळामुळे मनुष्य हानी झाली तसेच अनेक जनावरांचा देखील मृत्यू झालेला आहे. त्या जनावरांची नुकसान भरपाई देण्याचे शासनाने मान्य

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ६०८९...डॉ.वसंत पवार..

केलेले आहे. महसूल अधिका-यांनी जे धनादेश काढले होते त्यावर व्हाईटनर लावून रकमेत बदल केलेला आहे. तेव्हा असा बदल करणा-या अधिका-यांच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, नाशिक जिल्हयातील सटाणा आणि बागलाण तालुकयातील तसेच नाशिक जिल्हयातील जनावरांच्या मृत्यूबद्दल सबंधित व्यक्तीला मदत करण्यासबंधीची आतापर्यत किती प्रकरणे शासनाकडे आलेली आहेत आणि गाय, म्हैस, बैल, शेळी व मेढी इत्यादीच्या मृत्यूसंबंधी सारख्या प्रमाणात नुकसान भरपाई देण्यात येणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मदत देण्यासबंधीचा जो जी.आर आहे त्या जी.आर.चा चुकीचा अर्थ खालच्या अधिका-यांनी लावल्यामुळे संबंधित व्यक्तिला पूर्णपणे मदत मिळू शकली नाही. शासन निर्णयाप्रमाणे गाय, म्हैस, किंवा तत्सम दुधाळ जनावरांचा वादळामध्ये जर मृत्यू झाला असेल तर त्यांना दहा हजार रुपये मदत देण्यात येते अणि शेळी मेढीचा मृत्यू झाला असेल तर प्रत्येकी एक हजार रुपये मदत देण्यात येते.परंतु खालच्या अधिका-यांनी जी आर चा चुकीचा अर्थ लावला आणि पंचनामा करीत असतांना कमी नुकसान झालेले आहे असे दाखविले आहे. म्हणून सबंधितांना कमाल मर्यादेप्रमाणे मदत देण्याबाबत आदेश देण्यात आलेला आहे आणि ही कार्यवाही दहा दिवसात पूर्ण करण्यात येईल.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, विदर्भात कडक उन्हाळा सुरु झाला असून उन्हामुळे तसेच पाणी टंचाईमुळे जनावरांना चारा मिळत नाही त्यामुळे अनेक जनावरे मृत्यूमुखी पडत आहेत तेव्हा या विदर्भातील या जनावरांना वाचविण्यासाठी छावणी सुरु केली आहे काय ? आणि चा-याची व्यवस्था केली आहे काय आणि केली नसेल तर किती दिवसात ही व्यवस्था करण्यात येणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : हा वेगळा प्रश्न आहे.

डॉ.वसंत पवार : ज्या महसूल अधिका-यांनी धनादेशावर व्हाईटनर लाऊन खाडाखोड केलेली आहे त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय ?

३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ६०८९.....

श्री.प्रकाश सोळंके : अधिका-यांनी जी.आर.चा चुकीचा अर्थ लावल्यामुळे नुकसान भरपाईची रक्कम कमी दाखवली आहे हे मी मान्य केलेले आहे. आपदग्रस्तांना जास्त रक्कमेची मदत करण्यांसबंधीचा प्रश्न असल्यामुळे त्याप्रमाणे आपदग्रस्तांना मदत करण्यात येईल.त्याचबरोबर या अधिका-यांनी मुद्दाम खाडाखोड केली आहे काय यासंबंधीची चौकशी करुन योग्य असल्यास सबंधिताविरुध्द कारवाई करण्यात येईल.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पुणे शहरातील जात पडताळणीची प्रलंबित प्रकरणे

**(७) * ४६७९ श्री.चंद्रकांत पाटील, श्री.भगवान साळुंखे, श्री.विनोद तावडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात महाविद्यालये सुरु होऊन ६ महिने झाले तरी जात पडताळणीची आठ हजाराहून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(३) तसेच, जात पडताळणी प्रमाणपत्र वेळेत मिळावे, यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे ?

**श्री.सचिन अहिर, श्री.शिवाजीराव मोघे यांच्याकरिता**: (१) व (२) पुणे शहरातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे जाती दावे तपासण्याचे काम विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक-३, पुणे यांचेकडे सोपविण्यात आले असून चौकशीअंती सदर समितीकडे फेब्रुवारी, २०१० अखेर सुमारे १५१९४ प्रकरणे प्रलंबित असल्याचे आढळून आले ही बाब खरे आहे.

(३) जाती दावे पडताळणीसाठी मिळालेल्या दिनांकापासून ३ महिन्याच्या आत निर्णय घेण्यात यावा अशा सूचना देण्यात आल्या असल्या तरी, शैक्षणिक विषयक, निवडणुक विषयक व सेवा विषयक प्रकरणे मोठया प्रमाणावर प्राप्त होतात. परिपूर्ण अर्ज विहीत कालावधीत निकाली काढण्यात येतात परंतु काही प्रकरणे विविध कारणामुळे निर्णयाविना प्रलंबित राहतात.

प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्याबाबत वारंवार बैठका घेऊन आढावा घेण्यात येतो व विहित कालमर्यादेत प्रकरणे निकाली काढण्याबाबत संबंधीत प्राधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतात. जाती पडताळणी समितीच्या कामकाजात अधिक गती, अचुकपणा व पारदर्शीपणा येण्याच्या दृष्टीने समित्यांचे संगणकीकरण करण्यात येत आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, संपूर्ण राज्यात गेल्या अनेक वर्षापासून जात पडताळणी प्रमाणपत्राचा विषय अत्यत चिंतेचा झाला आहे. जात पडताळणीची एकूण १५ हजार १९४ प्रकरणे् प्रलंबित आहेत हे उत्तरामध्ये मान्य करण्यात आलेले आहे.मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, पुणे विभागातील जात पडताळणी प्रमाणपत्र समितीमध्ये अध्यक्ष, सचिव आणि संशोधक ही तीनही महत्वाची पदे मागील काही महिन्यापासून रिक्त आहेत हे खरे आहे काय ? जात पडताळणीची प्रकरणे प्रलंबित राहू नये यासाठी सध्याच्या पध्दतीमध्ये बदल करण्यासंबंधी शासन विचार करणार आहे काय ?

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. 4679...

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाप्रमाणे काही पदे निश्चितपणे रिक्त आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे अतिरिक्त कारभार देण्याचे काम केले आहे. दुसरे असे की, पेंडन्सीची आकडेवारी वाढत चालली आहे ही गोष्ट खरी आहे. याबाबत अनेक वेळा सांगण्यात आले आहे की, वर्षअखेरीस विद्यार्थ्यांची गर्दी वाढते,निवडणुकीचे वर्ष आल्यानंतर उमेदवारांची गर्दी वाढते. आता ग्रामपंचायतीपासून सर्वप्रकारच्या निवडणुकीसाठी कायद्याने बंधनकारक केले आहे.त्यामुळे पेंडन्सीची संख्या राज्यामध्ये मोठया प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे याकरिता निश्चितपणे धोरणात्मक निर्णय घेणे काळाची गरज आहे. आणि म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांसोबत मंत्रिमहोदयांची व आमची सर्वांची चर्चा झाली आहे. याबाबतीत शासन स्तरावर गांभीर्याने विचार सुरु असून काहीतरी धोरणात्मक बदल केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. यापूर्वी विधानपरिषदेमध्ये आदिवासी विभागाच्या चर्चेच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे एक चांगले धोरण अंमलात आणून ही पेंडंसी कमी करण्यासाठी शासन प्रयत्नशील राहणार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी याठिकाणी पुणे जिल्हयाचा उल्लेख करुन 15 हजार 194 प्रकरणे प्रलंबित असल्याचे सांगितले. इतकेच नव्हेतर राज्यातील प्रत्येक जिल्हयामध्ये हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत. याठिकाणी शैक्षणिक प्रवेशाच्या वेळी, निवडणुकीला उभे रहातांना व सेवाविषयक प्रश्नाच्या वेळी प्रमाणपत्र नियोजित वेळेत सादर करण्याबाबत सांगितले. याठिकाणी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा उल्लेख करण्यात आला. अमरावती जिल्हयामध्ये जानेवारी महिन्यामध्ये जवळपास 6 हजार अर्ज दाखल करण्यात आले होते. निवडणूक तोंडावर आलेली असतांनाही तहसीलदारांकडून जात पडताळणी अधिकाऱ्यांकडे ते अर्ज अजूनही ट्रान्सफर करण्यात आले नाहीत. हा विलंब होत असल्यामुळे उमेदवारांना निवडणुकीला उभे रहाण्यापासून वंचित रहावे लागणार आहे. पुणे जिल्हयातील विद्यार्थ्यांना शाळा प्रवेश न मिळाल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे, याला जबाबदार कोण आहे? त्यासाठी शासन काय कारवाई करणार आहे? जातपडताळणी करण्याकरिता उशीर झाल्यामुळे त्यांचे नुकसान होऊ नये याकरिता धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. निवडणुकीला उभे रहातांना जर स्क्रुटीनीच्या वेळी जर जात पडताळणीच्या अर्जाची पावती दाखल केल्यानंतर तीन महिन्याच्या आत प्रमाणपत्र दाखल केले पाहिजे अशाप्रकारची पूर्वीची अट आपण कायम ठेवणार काय?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 4679...

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, कास्ट व्हॅलिडिटी सर्टिफिकेट हे एक महत्वाचे डॉक्युमेंट आहे. दुसरे असे की, याठिकाणी वारंवार निवडणुका होत असतात. त्यामुळे जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्याकरिता बराच वेळ जातो. त्याचप्रमाणे बोगस प्रमाणपत्र सादर केल्यामुळे ती निवडणूक रद्द केली जाते. त्याकरिता आपण कायदा केला आहे की, कास्ट व्हॅलिडिटी प्रमाणपत्र असल्याशिवाय त्याला निवडणुक लढता येणार नाही अशाप्रकारची तरतूद कायद्यात केली आहे. आपल्याला माहीत आहे की, सन 2007-08 मध्ये 2 लाख 98 हजार अर्ज आले होते, त्यापैकी 1 लाख 44 हजार अर्ज निकालात काढले. आणि प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये म्हटल्याप्रमाणे 15194 प्रकरणांपैकी जूनपर्यंत एकही प्रकरण शिल्लक राहणार नाही, सर्व प्रकरणे निकालात काढण्यात येतील. हा तात्पुरता विषय नसल्यामुळे आम्ही यामध्ये दोन गोष्टी करणार आहोत. आम्ही आता या कामाचे संगणकीकरण करणार आहोत. कागदपत्रे जवळ नसल्यामुळे अर्जदाराला वारंवार फेऱ्या माराव्या लागतात, त्यासाठी त्यांना पत्र पाठवावे लागते. संगणकीकरणा मध्ये ही सर्व व्यवस्था केली जाणार असून त्यांना कमी खर्चामध्ये आणि कमी वेळेत प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था होईल. दुसरा प्रस्ताव असा आहे की, दोन जिल्हयांची मिळून एक कमिटी याप्रमाणे राज्यामध्ये 15 कमिटया केल्या आहेत. यापुढील काळात प्रत्येक जिल्हयामध्ये एक कमिटी करण्याचा विचार करीत आहोत. कारण आज अशी परिस्थिती आहे की, ग्रामपंचायतीची निवडणुकीच्यावेळी हजारो अर्ज येतात. त्यामुळे या दोन महत्वाच्या गोष्टी अंमलात आणण्याचा आम्ही विचार करीत आहोत.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनाने उत्तर देतांना म्हटले आहे की, पुणे विभागामध्ये 15194 प्रकरणे प्रलंबित आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा की, या प्रकरणांपैकी एक वर्षापेक्षा अधिक कालावधीची किती प्रकरणे आहेत? दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीची किती प्रकरणे आहेत? आणि तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीची किती प्रकरणे आहेत? ठाणे जिल्हयातील एका शिक्षकाचा मुलगा त्याठिकाणी शिकत आहे त्याने तीन वर्षामध्ये 100 वेळा फेऱ्या मारल्या तरी त्याला प्रमाणपत्र मिळत नाही. तेव्हा आपण एक, दोन व तीन वर्षाची विगतवारी सांगणार काय?

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

ता.प्र.क्र. 4679...

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, पुणे येथील विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक 3 कडे माहे जानेवारी 2009 अखेर 8475 प्रकरणे होती, तसेच, फेब्रुवारी 2010 अखेर 7773 प्रकरणे होती.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4679 . . . .

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, यापूर्वी देखील सदनामध्ये असा प्रश्न उपस्थित झाला होता. माझा पहिला प्रश्न असा आहे की, ठाणे जिल्ह्यामध्ये जात पडताळणीची किती प्रकरणे प्रलंबित आहेत ? तसेच जे लोक पैसे देतात, त्यांना प्रथम जात पडताळणीचा दाखला दिला जातो आणि जे लोक पैसे देत नाहीत, त्यांना कार्यालयामध्ये वारंवार बोलाविले जाते. हा संपूर्ण राज्याचा प्रश्न असल्यामुळे याबाबतीत माननीय मंत्री महोदय काही वेगळा निर्णय घेण्यात येणार आहे का ? म्हणजे यासाठी एखादी समिती स्थापन करुन जेथे-जेथे लोकांना जात पडताळणीचा दाखला ताबडतोब हवा आहे, तो मिळू शकेल. पण आज सहा-सहा, सात-सात महिने हा प्रश्न प्रलंबित आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्रीमती मंदा म्हात्रे :सभापती महोदय, यासाठी एक समिती स्थापन करुन, जी प्रकरणे अडकलेली आहेत, ती लवकरात लवकर निकालामध्ये काढणार आहात का ? जात पडताळणी सर्टीफीकेट लवकर न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे. यासंबंधात काय करणार आहात ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, निवडणुकीच्या वेळी सुध्दा जात पडताळणी प्रमाणपत्र असणे आवश्यक असल्यामुळे, आता या समितीचे काम वाढलेले आहे. यामध्ये महत्वाचा मुद्दा असा आहे आणि आम्ही असे सांगितले आहे की, ज्यांना निवडणूक लढवावयाची आहे, त्यांनी सहा महिने अगोदर जात पडताळणीसाठी अर्ज करावयास पाहिजे. कारण याबाबतीत सर्व कागदपत्रे मागवावी लागतात आणि ती ज्युडिशिअरी इन्क्वायरी असल्यामुळे त्यासाठी वेळ लागतो. पण आपल्याकडे रिझर्वेशन असते की, सरपंचाचे पद कोणाकडे आहे वगैरे. त्यामुळे लोक अर्ज करीत नाहीत. तरी सुध्दा मार्च-एप्रिल पर्यंत निवडणुका होत्या, तर आम्ही फेब्रुवारी महिन्याच्या शेवटपर्यंत जात पडताळणी प्रमाणपत्र दिलेले आहे. आता सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी प्रश्न विचारलेला आहे, तर याबाबतीत आम्ही दोन गोष्टी करणार आहोत. एक म्हणजे सध्या दोन किंवा तीन जिल्ह्यांसाठी समिती आहे, ती एका जिल्ह्यामध्ये आणावयाची. तसेच याचे संगणकीकरण केल्यामुळे जर काही चूक झाली तर ती ताबडतोब समजेल आणि ती चूक लगेच दुरुस्त करता येईल.आमचा असा विचार आहे की, जात पडताळणी सर्टीफीकेट साठी अर्ज दिल्यानंतर दोन महिन्याच्या आत सर्टीफीकेट दिलेच पाहिजे अशा प्रकारची व्यवस्था करण्यात येणार आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पुणे शहरामध्ये 15 हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. माझा प्रश्न असा आहे की, राज्यामध्ये एकंदर किती प्रकरणे प्रलंबित आहेत ? जर जिल्हा पातळीवर जात पडताळणीचे अधिकार दिले तर ही प्रकरणे मुदतीमध्ये पूर्ण करण्यासाठी मुदत घालणार आहात काय ? तसेच माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, जे निवडणुकी साठी उभे रहाणार आहेत, त्यांनी सहा महिने अगोदर याची तयारी केली पाहिजे. आता ग्राम पंचायतीचे वॉर्ड पडल्यानंतर तेथे किती रिझर्वेशन आहेत हे दोन महिने अगोदर समजते आणि मागासलेला उमेदवार असेल तर त्याची आर्थिक कुवत काय आहे ? त्याची पोहोच काय आहे ? त्याचे राजकीय वजन काय आहे ? याचे अवलोकन केले तर निवडणुकीसाठी लवकर प्रमाणपपत्र मिळण्याकरता मुदत घालून, त्या कालावधीमध्ये प्रमाणपत्र मिळण्यासाठी शासन कोणती व्यवस्था करणार आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा पहिला प्रश्न असा आहे की, राज्यामध्ये जात पडताळणीची किती प्रकरणे प्रलंबित आहेत ? माहे फेब्रुवारी 2010 अखेर 1,54,419 इतकी प्रलंबित प्रकरणे आहेत. दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत सांगावयाचे तर कायद्याप्रमाणे मुदत वाढविता येत नाही म्हणून ही बाब कम्प्लसरी केलेली आहे त्यामुळे आता काळजी घ्यावयाची आहे. तसेच रिझर्वेशन काढण्याच्या बाबतीत सांगावयाचे तर ते सहा महिने अगोदर काढता येते. तसे केले तर ज्यांना निवडणुका लढवावयाच्या आहेत, त्यांच्यादृष्टीने ते सोयीचे होईल. त्यामुळे ज्यांना निवडणूका लढवावयाच्या असतील ते अर्ज करु शकतात.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, याठिकाणी अत्यंत क्लिष्ट पध्दतीने जातपडताळणीचे प्रमाणपत्र दिल्यानंतर ते खोटे आहे असे म्हटले जाते आणि मग पुन्हा तेथे निवडणुका लावल्या जातात. अशा वेळी संबंधितांना सदरहू सर्टीफीकेट ज्या समितीने दिलेले आहे, त्या समितीला दोषी धरण्यात येईल काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, जी जात पडताळणी समिती आहे, त्याला चॅलेंज करण्यासाठी हाय कोर्टामध्ये रिट पिटीशनच दाखल करावा लागतो. एवढे या समितीचे महत्व आहे. समजा जर कोणाला याबाबतीत काही शंका आली तर ते हाय कोर्टामध्ये रिट पिटीशन देऊन न्याय मिळवू शकतात.

-----

16-04-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) J-3

APR/ SBT/ MMP/ 11:15

**आदिवासी विभागाचा निधी इतर खात्यांकडे वळविण्यात आल्याबाबत**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(8) * 4401** **श्री.जयंत प्र.पाटील, श्री.कपिल पाटील** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विभागाचा सुमारे साडे आठ हजार कोटी रुपयांचा निधी जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम व सार्वजनिक आरोग्य इत्यादी खात्यांकडे वळविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(2) असल्यास, आदिवासी समाजातील 8 लाख 25 हजार मुले शिक्षणावाचून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, केंद्र शासनाने आदिवासी विभागाला इंग्रजी शाळांसाठी 360 कोटी रुपये मंजूर केले असता फक्त 36 कोटींचा निधी मिळाला हे ही खरे आहे काय ?

**श्री. बबनराव पाचपुते** : (1) हे खरे नाही.

(2) हे खरे नाही.

(3) हे खरे नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी एक पत्रकार परिषद घेतली होती आणि त्यामध्ये असे जाहीर केले होते की, आदिवासी समाजासाठी आलेला पैसा इतर खात्यांकडे वळविण्यात आलेला आहे. या संदर्भात पहिल्या उत्तरामध्ये "हे खरे नाही" असे उत्तर देण्यात आले आहे. माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारची पत्रकार परिषद झाली होती काय ? तसेच या पत्रकार परिषदेमध्ये माननीय मंत्री महोदयांनी अशा प्रकारचे म्हणणे मांडले होते काय? जर माननीय मंत्री महोदयांनी अशा प्रकारचे म्हणणे मांडले असेल तर ते कोणत्या माहितीच्या आधारावर मांडलेले आहे? याठिकाणी जवळजवळ 480 कोटी रुपये लॅप्स् झालेले आहेत. आदिवासी विभागाचा पैसा मुद्दाम लॅप्स करुन तो इतरत्र वळविण्याचे जे तंत्र आहे, ते थांबविण्याचे काम शासन करणार आहे काय ?

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ SBT/ प्रथम सौ. रणदिवे... 11:20

ता.प्र.क्र.4401..

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या ठिकाणी तीन-चार प्रश्न एकत्रित विचारण्यात आले आहेत. त्या सगळया प्रश्नांची उत्तरे तुटकतुटक नाही तर एकत्रित द्यावी लागणार आहेत. येथे पत्रकार परिषद झाली होती. ती पत्रकार परिषद झाल्यानंतर वर्तमानपत्रात जे छापून आले होते. त्या विषयी याठिकाणी प्रश्न विचारण्यात आला आहे. "आदिवासींचे 7943 कोटी रुपये गायब" अशा प्रकारची बातमी वर्तमानपत्रात आली होती. त्याबाबत पत्रकार परिषद घेण्यात आली होती त्यावेळेस सांगितले होते की, जे छापलेले आहे, तशी परिस्थिती झालेली नाही. काही पैसे अखर्चित झाल्यानंतर आदिवासी भागात जी कामे झालेली आहेत किंवा नवीन करावयाची आहेत त्यासाठी हे पैसे वळविलेले होते. ही गोष्ट खरी आहे. यासंदर्भात वेगळा अर्थ काढून आदिवासींचे पैसे इकडे-तिकडे वळविण्यात आले आहेत असे झालेले नाही. दर वर्षी आदिवासी विभागाला जे पैसे मिळतात ते पैसे त्या पध्दतीने खर्च केले जातात आणि शिल्लक राहिले तर आदिवासी विभागातच तेथील लोकप्रतिनिधीनी जी कामे सांगितलेली आहेत त्यासाठी ते पैसे दिले जातात. अशा प्रकारे पैसे दिलेलो आहेत त्यमुळे हे पैसे दुसऱ्या खात्याकडे वळविलेले आहेत किंवा आदिवासी विभागाच्या बाहेर पैसे दिलेले आहेत अशी गोष्ट झालेली नाही.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, ......

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न खालच्या सभागृहामध्ये विचारला गेला असता त्या ठिकाणी देखील हेच उत्तर देण्यात आलेले आहे. सभापती महोदय, खालच्या सभागृहाचे प्रोसिडिंग माझ्याकडे आहे.

**सभापती** : मी आपल्याला उप प्रश्न विचारावयाला परवानगी देईन.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, नऊ टक्के रक्कम शासन आदिवासी विकासासाठी राखून ठेवते, ती संपूर्ण रक्कम खर्च झाली काय? हा स्पेसिफिक प्रश्न याठिकाणी विचारण्यात आलेला आहे. ती रक्कम खर्च झाली असेल तर कुठल्या कुठल्या कामासाठी किती निधी वर्षभरात खर्च झाला याची माहिती माननीय मंत्रिमहोदय देतील काय? माझा दुसरा प्रश्न असा की, प्रश्न क्रमांक 2 मध्ये असे म्हटले आहे की, आदिवासी समाजातील 8 लाख 25 हजार मुले शिक्षणावाचून वंचित आहेत, हे खरे आहे काय? याला "हे खरे नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. मग किती विद्यार्थी वंचित आहेत याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावी.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4401...

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हे जे पैसे आलेले आहेत ते नियतवेळेत आलेले आहेत. जसे पैसे उपलब्ध झालेले आहेत तसा खर्च झालेला आहे. सभापती महोदय, माझ्याकडे 1994 पासून ते आतापर्यंतची सर्व आकडेवारी आहे. साधारणत: पहिल्या दोन वर्षात 1995 साली 55 कोटी रुपये शिल्लक राहिले होते त्यानंतर ते आदिवासींच्या रस्त्यांसाठी वळविलेले आहेत. त्यानंतर दर वर्षी थोडे थोडे करुन 1413 कोटी रुपये 1993-1994 पासून आतापर्यंत वेगवेगळया कामाचे शिल्लक राहिले पण हे पैसे आदिवासी विभागामध्ये अतिदुर्गम भागातील रस्त्यांच्या कामासाठी आणि इरिगेशनच्या कामासाठी वळविलेले होते ही गोष्ट खरी आहे. त्याचबरोबर अनुदानित आणि बिगर अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये साधारणपणे 4 लाख 32 हजार विद्यार्थी शिकत आहेत. याशिवाय जिल्हापरिषदांच्या शाळांमध्ये सुध्दा आदिवासीच्या मुलांची शिक्षणाची सोय होते. आदिवासींची लोकसंख्या महाराष्ट्रात 87 लाख आहे.या लोकसंख्येनुसार वय वर्षे 6 ते 18 वर्षाची मुले किती असतील याचा अंदाज तयार केलेला आहे. त्यामुळे नक्की आकडा शासनाकडे नाही. पण सर्व शाळांच्या शिक्षकांना असे आदेश दिलेले आहेत की, यावर्षी जूनमध्ये वय वर्षे 6 ते 8 पर्यंतची जेवढी मुले त्या गावाच्या परिसरात असतील त्या सर्व मुलांना शाळेमध्ये भरती करण्यात यावे. सभापती महोदय, अशा प्रकारे आदिवासींच्या मुलांना शाळेत भरती करण्यासाठी व गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी अनुदान ठेवलेले आहे. आदिवासींच्या मुलांना शिक्षण मिळालेच पाहिजे अशा प्रकारचे बंधन घालण्यात आलेले आहे. किती मुले आहेत आणि किती मुले नाहीत हा विषय महत्वाचा नाही तर त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे हा विषय महत्वाचा आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, फक्त दोन टक्के आदिवासी मुले इयत्ता बारावी पर्यंत शिकतात ही गोष्ट खरी आहे काय? प्रश्न क्रमांक 3 मध्ये असे म्हटले आहे की,"आदिवासी विभागाला इंग्रजी शाळांसाठी 360 कोटी रुपये मंजूर केले आहेत आणि फक्त 36 कोटी रुपये निधी मिळाला आहे हे खरे आहे काय"? या प्रश्नाला हे खरे नाही असे उत्तर देण्यात आलेले आहे. आदिवासी विभागामध्ये किती इंग्रजी माध्यमाच्या शाळा कार्यरत आहेत आणि या इंग्रजी माध्यमाच्या शाळांना किती निधी देण्यात आला आहे?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4401...

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, आदिवासींची फक्त 2500 मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकतात . आपल्याकडे चार एकलव्य शाळा आहेत. यावर्षी पुन्हा 12 एकलव्य शाळा सुरु करण्यात येत आहेत. साधारणत: 66 तालुक्यामध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करण्याचा शासनाचा संकल्प आहे. त्याचबरोबर इयत्ता अकरावी आणि बारावीच्या जिल्हा स्तरावर इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करावयाच्या आहेत. यासाठी बजेट लागते......

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय वेगळे उत्तर देत आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 4401.....

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्याचे मी उत्तर देत आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांचा प्रश्न वेगळा आहे. सन्माननीय सदस्यांनी इंग्रजी शाळांच्या संदर्भात प्रश्न विचारला. या शाळा सुरु करण्यासाठी केंद्र सरकारचे एकूण बजेट 360 कोटी रुपयांचे आहे आणि त्यातील 36 कोटी रुपये मिळालेले आहेत. बाकीच्या पैशाची व्यवस्था आपल्या नियतव्ययातून आपण करणार आहोत. जागेची पाहणी आणि जागेची उपलब्धता पाहून या शाळा सुरु करणार आहोत. सन्माननीय सदस्यांनी इयत्ता बारावीपर्यंत 2 टक्के विद्यार्थी पोहोचतात असे जे सांगितले तशी परिस्थिती नाही. पण गळतीचे प्रमाण 48 टक्के आहे ही वस्तुस्थिती आहे. गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये जास्त सानुग्रह अनुदान वाढवून द्यावयाचे आहे. ते वाढविण्यासाठी कॅबिनेटसमोर प्रस्ताव ठेवलेला आहे. दोन बैठकीत तो मंजूर होईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी लेखी प्रश्नाला 'हे खरे नाही' असे उत्तर दिलेले आहे परंतु सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी आणि सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, 1413 कोटी रुपये खर्च केले गेले नाहीत आणि ते पैसे इतरत्र वळविले. ते पैसे आम्ही आदिवासी क्षेत्रात इतर खात्यांना दिले. याचा अर्थ अन्य खात्यामार्फत रस्त्यांसाठी आणि इतर कामांसाठी जो निधी त्या ठिकाणी येऊ शकत होता तो येऊ दिला नाही आणि आदिवासींचा निधी इतरत्र वळविला. आदिवासींचे पैसे एका ताटीतून दुसऱ्या वाटीत घालावयाचे या पध्दतीने हे केलेले आहे. म्हणजे शासन आदिवासींच्या पैशाचा प्रचंड अपहार करीत आहे. शाळाबाह्य विद्यार्थी किती आहेत याबाबत दुसरा प्रश्न विचारला होता त्याला लेखी उत्तर देताना 'हे खरे नाही' असे उत्तर दिले आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी जो प्रश्न विचारला त्या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी 'नाही' असे उत्तर दिले आणि आता उत्तर देताना माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, 48 टक्के विद्यार्थ्यांची गळती झालेली आहे. म्हणजे शाळाबाह्य विद्यार्थी आहेत. या राज्यातील आदिवासींच्या पैशाचा अशा प्रकारे अपहार करण्याचा, त्यांना विकासापासून वंचित ठेवण्याचा शासन

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रयत्न करीत असेल तर ही गंभीर बाब आहे. माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरातून ही बाब सभागृहासमोर आलेली आहे. म्हणून या शासनाला समज देण्याची आवश्यकता आहे. आदिवासी विकास विभागाच्या पैशाची ही चोरी आहे, हा दरोडा आहे. या शाळाबाह्य मुलांना शिक्षणातून उद्ध्वस्त करावयाचे, त्यांना बाहेर काढण्याचे कारस्थान चालू आहे. अन्य विभाग तुमचे पैसे वापरावयास लावतात. त्या अन्य विभागांना ताबडतोब लगाम घालण्याची आवश्यकता आहे. तो लगाम शासन घालणार काय ?

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी चोरी आणि दरोडा असे शब्द वापरलेले आहे...

**सभापती** : ते शब्द मी कामकाजातून काढून टाकत आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी आदिवासींबद्दल जोरात चांगल्या भावना व्यक्त केल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला तेव्हा मी बोललो नाही. त्यांनी चोरी, दरोडा असे शब्द वापरले.

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**सभापती** : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची भावना एवढीच आहे की, आदिवासी विकास विभागाला उपलब्ध असणारे जे बजेट आहे किंवा ज्या तरतुदी आहेत त्या संपूर्ण त्यांच्यासाठीच वापरल्या पाहिजेत. आपण पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, 1413 कोटी रुपयांची काही कारणाकरिता तरतूद केली होती ती आदिवासी विभागातच दुसऱ्या कामांकरिता आपण वर्ग केली. सन्माननीय सदस्यांची एवढीच भावना आहे की, ती संपूर्ण तरतूद आदिवासींकरिताच वापरण्यात आली पाहिजे. त्यादृष्टीने आता आपण जे सांगितले ते या प्रश्नाच्या अनुषंगाने दिलेल्या उत्तरात सांगितले असते तर एवढे प्रश्न या ठिकाणी उपस्थित झाले नसते.

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/ KGS/ ST/

ता. प्र. क्र. 4401.....

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, जास्त माहिती सांगणे गैर नाही आणि माहिती लपवून ठेवावयाची नाही म्हणून मी ही माहिती देत आहे. मी 'होय' किंवा 'नाही' असे उत्तर दिले असते पण माझा माहिती दडविण्याचा हेतू नव्हता. आदिवासींना 1993-94 पासून स्वतंत्र बजेट सुरु झालेले आहे. त्यामध्ये अनेक हेड्स आहेत. 45 ते 46 हेड्स आहेत त्यातील काही हेड्सवर खर्च होतो तर काही हेड्सवर खर्च होत नाही. या सगळ्यांचा अभ्यास करुन शेवटी किती पैसे शिल्लक राहिले याबाबतीत प्रत्येक वर्षाची आकडेवारी माझ्याकडे आहे. हे 1413 कोटी एका वर्षाचे नाहीत. यामध्ये 1994-95 मधील 55 कोटी रुपये आहेत. 1997 मधील 53 कोटी रुपये आहेत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4401... श्री.बबनराव पाचपुते...

सन 1998 मध्ये 41 कोटी इतका निधी एका ठिकाणी आदिवासी विभागामध्येच होता....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय, दिशाभूल करणारे उत्तर देत आहेत...

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हा पैसा अखर्चित राहिल्यानंतर त्याच आदिवासी विभागाच्या अंतर्गत असलेल्या रस्त्याच्या कामासाठी, पाटबंधारेच्या कामासाठी व इतर कामासाठी दिला जातो, हा पैसा दुसरीकडे जात नाही. आपल्या विभागातील कामांसाठीच वापरला आहे, हा पैसा सरेंडर होऊ देत नाही ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी विद्यार्थ्यांच्या गळतीबाबत प्रश्न विचारला आहे, ही गळती अनेक वर्षापूसन सुरु आहे. गळती रोखण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजनांची मी माहिती दिली आहे आणि त्यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य पाहिजे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, लेखी उत्तर बरोबर नसल्यामुळे मी सुरुवातीलाच हरकत घेतली होती. खालच्या सभागृहामध्ये दिनांक 4 एप्रिल रोजी हा प्रश्न उपस्थित झाला होता त्यावेळी सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दुरुस्त करुन सभागृहात दिलगिरी व्यक्त केली होती. त्या उत्तराची प्रत माझ्याकडे आहे, त्याठिकाणी तब्बल 35 मिनिटे हा प्रश्न चालू होता. तेथे दि.4 एप्रिल रोजी चर्चिला गेला, आज 16 रोजी आपण चर्चा करीत आहोत. दरम्यानच्या काळात शासनाने सुधारित उत्तर देणे आवश्यक होते. त्या सभागृहाच्या कामकाजाचे प्रोसिडिंग माझ्याजवळ आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, खालच्या सभागृहामध्ये हेच उत्तर दिलेले आहे आणि त्याच उत्तराची मी पुनरावृत्ती केलेली आहे. परंतु याठिकाणी जे उपप्रश्न विचारण्यात आले आहेत त्या प्रश्नांबाबत सन्माननीय सदस्यांना अपेक्षित उत्तर पाहिजे आहे, तथापि, मी यासंबंधीची वस्तुस्थिती सांगितलेली आहे, मी कोणतीही माहिती दडवून ठेवलेली नाही.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याची सूचना</u>

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "बेळगांव, कारवार, भालकी, खानापूर परिसरातील मराठी भाषिक मुख्यत्वे करुन राज्य पूर्वरचनेच्या वेळी अन्यायाने कर्नाटक राज्यात घुसविण्यात आला व मराठी जनतेवर अन्याय झाला. गेली 50 वर्षे सीमा भागातील जनता या अन्यायाविरोधात लढा देत आहे. सीमा प्रदेश महाराष्ट्रात समाविष्ट करावा यासाठी त्यांचा लढा सुरु आहे, परंतु त्यांचा आवाज दडपला जात असून कर्नाटक सरकार सीमा भागातील जनतेवर अन्याय करीत आहे. कानडीची सक्ती होत असून मराठी नामशेष करण्याचे कुटील कारस्थान सुरु आहे. मराठी भाषिकांच्या दुकानावरील पाटया कानडीत करण्यात आल्या, इतकेच नव्हे तर बेळगांव महानगरपालिकेवरील भगवा ध्वजही खाली उतरविण्यात आला आहे. बेळगांव महानगरपालिकेच्या महापौर पदाच्या निवडणुकीत मराठी भाषिक उमेदवारांचे अर्ज बाद ठरविण्यात आले. सीमा भागातील जनतेने 16 एप्रिल, 2010 रोजी मुंबईत आझाद मैदानात धरणे कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे" या विषयासंबंधी नियम 289 ची सूचना दिली होती. मी यासंदर्भात असा निर्णय दिला होता की, सन्माननीय सदस्यांना या विषयाबाबत 5 मिनिटे बोलण्याची परवानगी देईन. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी आपले म्हणजे 5 मिनिटामध्ये मांडावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा विषय अतिशय महत्वाचा आहे. एका बाजूला आपण महाराष्ट्रात सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. दुस-या बाजूला बेळगांव, कारवार, निपाणी, भालकी यासह 865 मराठी भाषिक गावे आहेत. महाराष्ट्र सरकार आमच्यासाठी काय करीत आहे याकडे त्या गावातील लोकांचे लक्ष आहे. आज 5 हजार सीमा बांधव आझाद मैदानामध्ये उपोषणाला बसले आहेत. इतक्या महत्वाच्या प्रश्नावर केवळ 5 मिनिटात बोललो तर तो त्यांच्यावर अन्याय होईल. मला वाटते की, सभागृहामध्ये या महत्वाच्या विषयापेक्षा अन्य कोणताही विषय महत्वाचा असू शकत नाही. त्यामुळे आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून या सभागृहामध्ये या विषयी चर्चा व्हावी. सभापती महोदय, दिनांक 11 मार्च, 1960 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री कै.यशवंतराव चव्हाण यांनी सभागृहात जो प्रस्ताव मांडला होता त्याची प्रत माझ्याजवळ आहे. हा विषय महत्वाचा असल्यामुळे केवळ 5 मिनिटात हा विषय मांडता येणार नाही. आझाद मैदानामध्ये 5 हजार सीमा बांधव उपोषणाला बसले असल्यामुळे या विषयावर चर्चा करण्यात यावी.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ ST/ 11:35

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, बेळगावच्या महापौर पदाच्या अनुषंगाने मराठी भाषिक उमेदवारावर झालेल्या अन्यायाच्या संदर्भात देखील अशाच पध्दतीचा प्रस्ताव या सदनामध्ये आला होता आणि त्यावेळी मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना, गट नेत्यांना तसेच सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी परवानगी दिली होती आणि त्यांनी आपले विचार या ठिकाणी मांडले होते. हा विषय सर्वोच्च न्यायालयासमोर असल्याने या विषयाच्या अनुषंगाने अनेक गोष्टींची या ठिकाणी विस्ताराने चर्चा करणे हे सर्वोच्च न्यायालयासमोर असलेल्या प्रश्नाच्या दृष्टीने योग्य होईल असे नाही. म्हणून काल मी आपणास सांगितले की, नियम 97 अन्वये या विषयावरील चर्चेला परवानगी देता येणार नाही. तसेच 289 अन्वये प्रस्ताव मांडता येणार नाही. तरीही मी सन्माननीय सदस्यांना 5 मिनिटे बोलण्याची परवानगी देत आहे. तसेच अन्य कोणी सन्माननीय सदस्य बोलणार असतील तर त्यांनाही मी एक-एक दोन-दोन मिनिटे बोलण्याची परवानगी देतो.

श्री. रामदास कदम : या विषयावर केवळ 5 मिनिटे बोलणे संयुक्तिक होणार नाही. बेळगावमधून 5 हजार लोक आले आहेत. महाराष्ट्राच्या 10 कोटी जनतेकडून त्यांच्या काही अपेक्षा आहेत.

डॉ. दीपक सावंत : 5 मिनिटामध्ये या विषयाला न्याय मिळणार नाही.

**सभापती** : हा विषय महाराष्ट्रातील आम जनतेच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा आणि महत्वाचा आहे. सीमा भागातील मराठी भाषिकांच्या दृष्टीने देखील हा प्रश्न महत्वाचा आहे. म्हणून एक महिन्यापूर्वी या सदनामध्ये दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यानंतर 10 मिनिटाकरिता सदनाचे कामकाजही स्थगित करण्यात आले होते. ही एक महिन्यपूर्वीची बाब आहे. आज मुंबईमध्ये आझाद मैदानावर जे धरणे धरलेले आहे त्यानुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. त्या सूचनेच्या संदर्भात मी सांगितले आहे की, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये सदर विषय नसल्यामुळे ती सूचना स्वीकारता येणार नाही. परंतु सन्माननीय सदस्यांना मी 5 मिनिटे बोलण्यासाठी परवानगी देईन, तसेच अन्य कोणा सन्माननीय सदस्यांना बोलायचे असेल तर त्यांना देखील मी परवानगी देईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सीमा भागातील लोक हे आपल्या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांना साकडे घालायला आलेले आहेत की, आमच्या बरोबर दिल्लीला चला आणि

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

आमचे गा-हाणे तेथे मांडा. एक महिन्यापूर्वी महापौराच्या निवडणुकीचा विषय होता. अशा प्रकारच्या सततच्या होणा-या अन्यायामुळे ते आज येथे आलेले आहेत. त्यांनी या विधान मंडळाला, माननीय मुख्यमंत्र्यांना, मंत्रिमंडळाला आपणा सर्वांना साकडे घातलेले आहे. सभापती महोदय, आजच्या अशासकीय कामकाजावरील चर्चा पुढे ढकलली तरी त्यामुळे काही फरक पडणार नाही. आज सीमाबांधव महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या सदस्यांना, मंत्रिमंडळाला, माननीय मुख्यमंत्र्यांना साद घालायला आलेले आहेत. त्यांच्यावर होणा-या अनयायाला वाचा फोडण्यासाठी आपण चर्चेची परवानगी द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सीमाभागातील मराठी भाषिकांवर सातत्याने अन्याय होत आहे. एक महिन्यापूर्वी महापौराच्या निवडणुकीच्या निमित्ताने जो अन्याय झाला त्यावर या सभागृहामध्ये चर्चा झाली. त्या भागातील 50 हजार लोक आज आझाद मैदानावर धरणे धरुन बसलेले आहेत. आपल्या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या सोबत दिल्लीला यावे असे त्यांनी साकडे घातलेले आहे. हा अत्यंत भावनात्मक विषय आहे. 5 मिनिटामध्ये या विषयाला न्याय देता येणार नाही. आपले कामकाज राखून ठेवून निदान 1 तासाची वेळ या विषयावरील चर्चेसाठी दिली तर या विषयाला न्याय दिल्यासारखे होईल.

श्री. नारायण राणे : सन्माननीय सदस्य श्री. रामदासजी कदम यांनी सीमाभागातील बांधवांच्या समस्या आणि महाराष्ट्राच्या अस्मितेच्या एका महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी या ठिकाणी चर्चेसाठी जी परवानगी मागितली आहे त्याचर्चेला परवानगी द्यावी की न द्यावी हा माननीय सभापती महोदय, आपला अधिकार आहे. त्याबाबतीत मला काही बोलायचे नाही. हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे याबद्दल कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्य जो विषय या ठिकाणी मांडू इच्छित आहेत त्या विषयाशी आम्ही सर्व सहमत आहोत. त्या विषयी कोणाचेही दुमत नाही. आज सीमा भागातील मराठी बांधवांनी आझाद मैदानामध्ये धरणे धरलेले आहे. सीमा भागातील मराठी बांधवांना महाराष्ट्रात यावयाचे आहे.

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ......

ही त्यांची जी भावना आहे त्यासाठी आतापर्यंत महाराष्ट्र शासनाने अनेकदा प्रयत्न केले. आजही सुप्रीम कोर्टामध्ये आपण खटला लढवित आहोत. असे असताना एक महिन्यापूर्वी या सदनामध्ये या संदर्भात चर्चा झाली. एकदा सदनामध्ये चर्चा झाल्यानंतर त्याच अधिवेशनात किंवा सहा महिन्यात अशी चर्चा पुन्हा घेत नाही. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम जो विषय या सभागृहात मांडू पहात आहेत त्या विषयाशी या विधीमंडळातील दोन्ही सभागृहातील सर्व पक्षांचे एकमत आहे, दुमत असण्याचे काही कारण नाही. बेळगाव, कारवारची नेतेमंडळी आझाद मैदानात धरणे कार्यक्रमासाठी आली आहेत, महाराष्ट्र राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्यासमवेत दिल्लीला जावे अशी त्यांची भावना आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना त्यांच्या भावना कळवेन आणि त्यांच्यासोबत दिल्लीला जाण्यासाठी आमची काही हरकत नाही. त्यांचा प्रश्न हा महाराष्ट्राचा आणि आमचाही प्रश्न आहे. म्हणून त्यांच्यासमवेत दिल्लीला जायला माननीय मुख्यमंत्री तयार होतील. मी त्यांना सांगेन. आम्ही त्यांच्यासोबत जायला तयार आहोत. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम जे विचार, जो विषय आणि ज्या भावना व्यक्त करतात त्याच्याशी या सदनातील सर्व सन्माननीय सदस्य सहमत आहेत एवढेच मला सांगावयाचे आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे या अनुषंगाने याठिकाणी आपल्या भावना व्यक्त करतील. अत्यंत महत्वाच्या विषयाच्या अनुषंगाने आपण आपल्या भावना व्यक्त कराव्यात. त्याचबरोबर माननीय विरोधी पक्षनेते असतील किंवा अन्य गटनेते असतील किंवा सत्तारुढ पक्षातील सदस्य वा मंत्री असतील त्यांना सुध्दा मी या अनुषंगाने पाच-पाच मिनिटाची वेळ देईन. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी आपले विचार दहा मिनिटात मांडावेत.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना दहा मिनिटात विचार मांडण्याची अनुमती दिली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनाही दहा मिनिटांची वेळ द्यावी आणि इतर कोणी सन्माननीय सदस्यांनी विचार मांडण्याची आवश्यकता नाही. सर्वांच्याच या भावना आहेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आम्ही कामकाजाच्या निमित्ताने रात्री 10-11 वाजेपर्यंत याठिकाणी बसतो......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ज्यांना विचार मांडावयाचे आहेत त्यांना आपण बोलू द्यावे. आपण त्या संदर्भात निर्णय घ्यावा.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सन्माननीय सभापती महोदय, या सभागृहामध्ये एकमताचे ठराव मान्य करुन आपण अनेकदा पाठविलेले आहेत. हा विषय कोणत्याही पक्षाचा नाही याची मला पूर्णपणे जाणीव आहे. दिनांक 11 मार्च, 1970 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांनी जे विचार मांडले ते मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो. त्यांनी म्हटले होते की, हा प्रश्न एखाद्या पक्षाचा आहे असे मी मानत नाही. आज तेथील जनतेची इच्छा काय आहे हे हिंदुस्थानच्या सरकारच्या नजरेस आणून देणे हे आपले कर्तव्य आहे आणि याबाबत सीमा भागातील जनतेच्या इच्छेची तीव्रता त्यांच्या लक्षात येईल. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या आणि जनतेच्या मनामध्ये जी भावना निर्माण झाली आहे ती अगदी योग्य आहे असे भारत सरकारला वाटले पाहिजे आणि या समितीच्या कामाचा वेग वाढविण्याचे प्रयत्न केले गेले पाहिजेत. अशा भावना दिनांक 11 मार्च, 1970 रोजी तत्कालीन माननीय मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांनी व्यक्त केल्या आहेत.

सभापती महोदय, मला थोडेसे दु:ख होते. आम्ही रात्री 10-10, 11-11 वाजेपर्यंत या सभागृहाच्या कामकाजासाठी याठिकाणी बसतो. अशा वेळेला बेळगाव, कारवार, धारवाड आणि निपाणीसह 865 मराठी गावे महाराष्ट्रात सामील झाली पाहिजेत यासाठी धरणे आंदोलन सुरु आहे. आपण स्वातंत्र्यामध्ये दिवस काढतो आहोत. सुवर्ण महोत्सवी वर्ष आपण साजरे करीत आहोत. मला असे वाटते की, जोपर्यंत महाराष्ट्र पूर्ण होऊ शकत नाही तोपर्यंत महाराष्ट्राचा सुवर्ण महोत्सव साजरा करु शकत नाही. हा अर्धवट महाराष्ट्र आहे. म्हणून त्यांच्या ज्या भावना आहेत, त्या भावनांशी आम्ही सगळे सहमत आहोत हे दाखवून देणे तसेच याठिकाणी सीमा भागातील जनतेने 16 एप्रिल, 2010 रोजी आझाद मैदान येथे धरणे कार्यक्रम आयोजित केला आहे. बेळगावचे 40 नगरसेवक आणि आमदार धरणे कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. सीमा प्रश्नाबाबत महाराष्ट्राच्या विधीमंडळामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा या प्रश्नाबाबत निर्णय होत नाही तोपर्यंत बेळगाव, कारवार, धारवाड, निपाणीसह 865 मराठी गावे केंद्रशासित व्हावीत असा ठराव हे सभागृह मंजूर करीत आहे.

नंतर पी.1....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .......

असा प्रस्ताव देखील मी आपल्या अनुमतीने मांडत आहे. हा प्रस्ताव एवढ्यासाठी केंद्रात गेला पाहिजे की, सभागृहाच्या भावना व राज्यातील 10 कोटी जनतेच्या सुध्दा याच भावना आहेत की, जोपर्यंत हा अन्याय दूर होत नाही, जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होत नाही तोपर्यंत या 865 मराठी भाषिक गावांचा भाग केंद्रशासित प्रदेश व्हावा असा प्रस्ताव आपल्या सभागृहाने मंजूर करावा अशी मी भावना व्यक्त करीत आहे. माननीय राज्यपालांच्या प्रत्येक अभिभाषणातून दरवर्षीच या प्रश्नाचा उल्लेख झाल्याचे पहायला मिळते. म्हणजे माननीय राज्यपालांना देखील या बाबीची निकड व्हावी हे यावरुन समजते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी सन 1946 साली बेळगांव येथे जे साहित्य सम्मेलन भरले होते त्या सम्मेलनात सुध्दा असा ठराव मंजूर झाला होता. तथापि सन 1946 पासून बेळगांवचा भाग हा महाराष्ट्राबाहेरच आपण पाहतो. गेल्या 52 वर्षात या भागातील मराठी संस्कृती नष्ट करण्याचा प्रयतन तेथील राज्यकर्त्यांनी चालविला आहे याबद्दलची अनेक उदाहरणे मी देणार आहे. सन 1946 मध्ये बेळगांव येथे ज्येष्ठ पत्रकार बाबासाहेब माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मराठी साहित्य सम्मेलनात संयुक्त महाराष्ट्र हा ठराव मंजूर झाला होता. त्यात महाराष्ट्र एकीकरण समितीची स्थापना देखील झाली होती. त्यानंतर हा सीमा भाग महाराष्ट्र राज्यात येण्यासाठी कॉ. डांगे, एस.एम. जोशी, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, साहित्यिक धुरी, य.दि.फडके, वि.वा.शिरवाडकर/कुसुमाग्रज, सेनापती बापट असोत या सर्वांनीच प्रयत्न केले पण दुर्दैवाने आजपर्यंत त्याला यश आले नाही. सन 1946 ते 1951 पर्यंत या महाराष्ट्र एकीकरण समितीच्या एकूण 6 परिषदा झाल्या. राज्य पुनर्रचनेच्या बाबतीत शिफारशी करण्यासाठी सन 1948 साली न्यायमूर्ती डार कमिशन नेमण्यात आले. हा इतिहास नवीन पिढीला माहीत नाही, संयुक्त महाराष्ट्रासाठी 105 हुतात्मे कोण होते हे सुध्दा माहीत नाही, म्हणून इयत्ता चौथी ते दहावीपर्यंतच्या इतिहासाच्या पुस्तकात सीमा प्रश्नाबाबतचा धडा अभ्यासासाठी ठेवावा अशी मागणी केली होती. ही मागणी मुख्यमंत्र्यांनी मान्य केली होती पण दुर्दैवाने यावर्षीच्या कुठल्याही पुस्तकात त्यासंबंधीचा अंतर्भाव दिसत नाही, याबाबत विचार व्हावा म्हणून मी पुन्हा आपल्या माध्यमातून आठवण करुन देऊ इच्छितो. कारण संयुक्त महाराष्ट्रासंबंधीचा संपूर्ण इतिहास हा

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

नवीन पिढीला सुध्दा ज्ञात झाला पाहिजे याबाबत प्रयत्न होणे आवश्यक आहे. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून नंतर पुन्हा जे.व्ही.पी. समिती नेमण्यात आली होती. त्यात जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल आणि पट्टाभिसीतारामय्या असे तीन लोक सदस्य होते. त्यानंतर फाजल अली कमिशनची नेमणूक करण्यात आली होती. एक गोष्ट या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, या फाजल अली कमिशनच्या फाजिलपणामुळेच हा प्रश्न रखडला असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. या कमिशनचा अहवाल वाचला तर त्यात बेळगांव हे एक कापूस व्यापाराचे केंद्र आहे अशा प्रकारे दिशाभूल करणारा मजकूर दिलेला आहे त्यामुळे हा प्रश्न लांबला, अन्यथा कधीच हा निर्णय होऊ शकला असता.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

दिनांक 17 जानेवारी 1956 साली केंद्र शासनाने जाहीर केले की, बेळगाव, कारवार, निपाणी, भालकी, खानापूर,हा सीमाभाग महाराष्ट्रात घेतला जाणार नाही. त्याच्या दुसऱ्या दिवसापासून बेळगाव शहर पेटून उठले होते. त्या दिवशी चार जण शहीद झाले. मारुती बेळगावकर, मधु बारेकर, लक्ष्मण गावडे आणि महादेव बारागडी अशी या शहीदांची नावे आहेत. 1 नोव्हेंबर 1958 साली पुन्हा सत्याग्रह झाला. आज देखील बेळगाव मध्ये हा दिवस काळा दिन म्हणून पाळला जातो. त्या दिवशी 16 हजार स्त्री-पुरूषांनी भाग घेतला होता. जवळ जवळ 4 महिने ही सर्व मंडळी अटकेत होती. त्यानंतर केंद्र शासनाकडून चौ सदस्य समिती नेमली गेली. 1960 साली तत्कालीन गृहमंत्री श्री.गोविंदवल्लभ पंत यांनी पुढाकार घेऊन श्री.ह.वि.पारसकर, श्री.एम.डी.भट, श्री.चन्नया व श्री.मळीभट अशी चौ सदस्य समिती नियुक्त केली. श्री.ह.वि.पागसकर आहेत त्यांनी त्यांच्या अहवालात स्पष्ट म्हटले आहे की, खेडे हे घटक माना आणि सीमा बांधवांना न्याय द्यावा. पण त्यांचा अहवाल त्यावेळी बासनात गुंडाळून ठेवण्यात आला. त्यानंतर महाजन आयोग नेमला. त्यावेळी महाजन आयोगाने कर्नाटक धार्जिणा अहवाल दिला. महाजन अहवालाची चिरफाड तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अंतुले यांनी केली होती. त्यांनी यासंबंधातील एक पुस्तिका काढली होती. त्या पुस्तिकेच्या माध्यमातून हा अहवाल महाराष्ट्र द्वेष्टा कसा आहे हे त्यांनी दाखवून दिले. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.वसंतराव नाईक यांनी 10 नोव्हेंबर 1967 रोजी विधानसभेत महाजन आयोगाच्या विरोधात ठराव मांडला होता. त्यातील 2-3 ओळी मी येथे वाचून दाखवितो. महाराष्ट्र, म्हैसूर, केरळ यांच्या सीमावादासाठी नेमलेल्या महाजन अयोगाच्या अहवालात वस्तुस्थितीचा यथायोग्य विचार करण्यात आलेला नाही. लोकशाही मार्गाने व्यक्त केलेल्या जनतेच्या इच्छेकडे पूर्णपणे डोळेझाक करण्यात आली आहे. भाषिक तत्त्वाच्या मतांचा अनादर करण्यात आलेला आहे. अशा पद्धतीचा उल्लेख त्यावेळी म्हणजे 1967 साली श्री.वसंतराव नाईक यांनी केलेला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम......

सभापती महोदय, 17 जानेवारी 1956 साली सीमा प्रश्न आंदोलन झाले त्यात मारूती बेळगाव, मधु बांदेकर, लक्ष्मण गावडे, महादेव बारागडी, दिनांक 19 जानेवारी 1956 रोजी जे आंदोलन झाले त्यात सौ.कमलाबाई मोहिते, सन 1956 मध्ये हिंडळगा जेलमध्ये नागण्णा होसुरकर आणि बाळू निळजकर, 1959 मध्ये बेळ्ळुरी जेलमध्ये आप्पा चौगुले असे एकूण आठ जण हुतात्मे झाले. 1960 मध्ये पुणे येथे कॉंग्रेस कार्यकारिणीवर अधिवेशनावर मोर्चा निघाला. 1963 साली महाराष्ट्र विधानसभेवर मोर्चा आला. 1964 मध्ये मुंबई येथे भरलेल्या कॉंग्रेस कार्यकारिणीच्या अधिवेशनावर मोर्चा आला. 1965 साली सेनापती बापट,पुंडलिक कातकडे,बळवंतराव साईनाथ, 20 मे रोजी आमरण उपोषणाला बसले होते. त्यावेळी मोठ्या प्रमाणावर लाठीचार्ज झाला होता. 6 फेब्रुवारी 1969 रोजी शिवसेनाप्रमुख माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखाली महाजन अहवालाच्या विरोधात मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर आंदोलन झाले. यात स्वत: शिवसेना प्रमुख , श्री.मनोहर जोशी, दत्ताजी साळवी यांना अटक झाली व तुरुंगात टाकण्यात आले. त्यावेळी शिवसेनेने 67 हुतात्मे दिले. माझ्याकडे त्यांची नावे आहेत. 1969 साली श्री.तावडे यांनी यासंबंधातील पुस्तिका छापली. त्यात हुतात्म्यांची नावे दिली आहेत.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम ..

माननीय शिवसेना प्रमुखांनी सुध्दा या आंदोलनामध्ये मोठया प्रमाणावर सहभाग घेतला होता हे यावरुन स्पष्ट होत आहे.सभापती महोदय, 1986 साली बेळगाव येथील बिगर कानडी विद्यार्थ्यांना नोक-यातून डावलण्याचा निर्णय घेण्यात आला होता आणि त्याची अंमलबजावणी आज देखील सुरु आहे. मराठी शाळांना दुय्यम स्थान देण्याचे काम आज देखील कर्नाटकमध्ये चालूच आहे.मराठी वाचनालयांचे अनुदान बंद करण्याचे काम कर्नाटक सरकारने केले आहे.त्याचबरोबर बसच्या पाटयावरुन मराठी हटविण्याचे काम कर्नाटक सरकारने केले आहे.दुकानावरील मराठीचे बोर्ड काढण्याचे आणि त्या ठिकाणी कन्नड बोर्ड लावण्याचे काम कर्नाटक सरकारने केले आहे.त्याचबरोबर सरकारी कागदपत्रे फक्त कन्नड भाषेतूनच उपलब्ध करुन दिली जात आहेत एवढेच नव्हे तर शासनाचा जो जी.आर निघेल तो फक्त कन्नडमध्येच असावा , हिंदी वा इंग्रजीतून नसावा अशा प्रकारचा निर्णय कर्नाटक सरकारने घेतला आहे. कन्नड मधील एका जी.आर.ची प्रत माझ्याकडे आहे. सभापती महोदय,या विषयाचे गांभीर्य मी आपल्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.अशा प्रकारे शासन निर्णय फक्त कन्नड भाषेतूनच काढणे हा संविधानाचा अवमान आहे. भाषावार प्रांत रचना होत असतांना काही तत्वे निश्चित करण्यात आली होती . त्या भागातील सापेक्ष भाषिक, भाषिक बहुसंख्या,खेडे हे घटक आणि त्या भागातील लोकांची इच्छा अशी तत्वे त्यावेळी निश्चित करण्यात आलेली होती व त्या तत्वाप्रमाणे पंजाब आणि हरियाणा या दोन राज्यांना न्याय मिळू शकतो. या दोन राज्यामध्ये याच तत्वानुसार विभागणी करण्यात आली होती. पंजाब आणि हरियाणा या दोन राज्यामध्ये अशा प्रकारचा निर्णय होऊन दुर्देवाने आज महाराष्ट्रातील सीमा भागातील बांधवांना मात्र न्याय मिळत नाही याचे आश्चर्य वाटते.सभापती महोदय, कर्नाटकमध्ये राजधानी व्यतिरिक्त इतर ठिकाणी विधानसभेचे अधिवेशन घें्तले जात नव्हते परंतु आता बेळगावमध्ये अधिवेशन घेण्यास सुरुवात केलेली आहे. विशेषत: बेळगाव हे नाव कन्नड मधून "बेळगावी " करण्याचा निर्णय देखील कर्नाटक सरकारने घेतला आहे.तसेच बेळगावला उपराजधानी करण्याचा निर्णय देखील घेतला जात आहे. या ठिकाणी मघाशी असा उल्लेख करण्यात आला होता की, 40 नगरसेवक असतांनासुध्दा लोकशाहीचा गळा घोटून त्या ठिकाणी कन्नडी महापौर केला जात आहे. एक गोष्ट मला आपल्या मार्फत सभागृहाला सांगावयाची आहे की, त्या ठिकाणी महापौर पदासाठी मतदान करीत असतांना आमदार आणि खासदारांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम ..

देखील मतदान करण्याचा अधिकार दिला आहे. अशा प्रकारे मराठी माणसाची गळचेपी केली जाते हे यावरुन स्पष्ट होत आहे.

सभापती महोदय, एक बाब मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.माझ्याकडे अखिल कर्नाटक मराठी डी.एड. कॉलेज असोसिएशनमधील एका मराठी मुलाचा रिझल्ट आहे.95 टक्के मार्क्स मिळून सुध्दा तो मराठी असल्यामुळे त्याला नापास करण्यात आलेले आहे.मराठी मुलांना कशा प्रकारे उद्ध्वस्त केले जात आहे याचे हे जीवंत उदाहरण आहे. या रिझल्टची प्रत माझ्याकडे आहे. त्या ठिकाणी मराठी शाळेत कन्नड शिक्षक नेमण्यात येत आहेत. या संदर्भात बोलत असतांना मी आपला अधिक वेळ न घेता एकच विनंती करु इच्छितो की, बेळगाव, कारवार, निपाणी, धारवाडसह 865 मराठी भाषिक गावे आहेत त्या ठिकाणी 25 लाख लोक राहत असून त्यांचे आपल्याकडे लक्ष आहे. तुम्हाला स्वातंत्र्य मिळाले परंतु आज देखील आम्ही पारतंत्र्यांत आहोत. अशा प्रकारची भावना त्यांच्या मनामध्ये आहे. त्यामुळे जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होत नाही तोपर्यंत बेळगाव,कारवार,धारवाड, निपाणीसह 865 मराठी भाषिक गावे ही केन्द्र शासीत व्हावीत असा ठराव या सभागृहाने मंजूर करावा अशी विनती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.जयहिंद, जय महाराष्ट्र.

--------

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या माध्यमातून सीमा भागातील मराठी भाषिकांचे धरणे आझाद मैदानामध्ये सुरु आहेत त्याला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यांच्या भावना समजून घेऊन सीमा भागातील जनता ही एकटी नसून संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या सोबत आहे ही भावना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हा प्रस्ताव याठिकाणी त्यांनी मांडला आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे या सभागृहामध्ये या विषयावर अनेक वेळा चर्चा झाली आहे. गेल्या 50 वर्षापासून हा सीमा वादाचा प्रश्न लोंबकळत पडला आहे. अनेक सरकारे बदलली तरी अजूनपर्यंत त्यावर निर्णय होत नाही. प्रत्येक अधिवेशनाच्या प्रारंभी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये या विषयाचा उल्लेख असतो.आता तर असे झाले आहे की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये बेळगाव, कारवारचा विषय आला म्हणजे माननीय राज्यपालांचे अभिभाषण संपले अशापध्दतीची एक गंमत होऊन गेली आहे. बेळगाव,कारवार आणि निपाणी यामध्ये डांगचा संयुक्त महाराष्ट्रामध्ये समावेश व्हावा असा एक प्रस्ताव होता. परंतु दुर्दैवाने तो प्रस्ताव मान्य होऊ शकलेला नाही. गेल्या 50 वर्षापासून सीमा भागातील मराठी भाषिक मंडळी महाराष्ट्रामध्ये येण्यासाठी हा लढा देत आहेत. आज त्यांनी या मुंबईमध्ये धरणे धरण्याचे कारण असे घडले की, त्याठिकाणी बेळगावच्या महापौरांची निवडणूक घेण्यात आली. त्या निवडणुकीमध्ये जे नाटय घडले त्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाला.त्यामधून त्यांच्या भावना अधिक तीव्र झाल्या. या शहरामध्ये कर्नाटकचे मुख्यमंत्री श्री. येडीयुरप्पा आले असतांना आमच्या पक्षाचे शिष्टमंडळ त्यांना जाऊन भेटले. आणि महापौराच्या निवडणुकीमध्ये जो गैरप्रकार झाला आहे त्याच्या चौकशीची मागणी केली. त्यावेळी त्यांनी आम्हाला शब्द दिला. त्याचप्रमाणे आम्ही त्यांना अशीही विनंती केली की, सीमावर्ती भागामध्ये जे मराठी भाषिक रहातात त्यांना आपण सन्मानाने वागविले पाहिजे, त्यांचा अवमान होणार नाही, त्यांच्यावर अन्याय होणार नाही या पध्दतीची वागणूक दिली गेली पाहिजे. अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली व त्यांनी ती मान्य केली आहे. परंतु तरीसुध्दा मराठी भाषिकांवर सतत अन्याय सुरु आहे. या देशामध्ये अनेक सरकारे आली आणि गेली. केंद्रामध्ये आली, राज्यामध्ये आली परंतु हा प्रश्न सुटू शकलेला नाही. या सभागृहाचे नेते आता सभागृहामध्ये उपस्थित झाले आहेत म्हणून मी त्यांना आठवण करुन देतो की, वेश पालटून ते त्या सीमा भागामध्ये गेले होते.त्यावेळी त्यांनी त्या भागामध्ये प्रचंड आंदोलन उभे केले होते. गेली 50 वर्षे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

श्री. पांडुरंग फुंडकर...

तेथील जनता लढा लढत आहे, म्हणून या सभागृहाच्या भावना त्यांच्या सोबत आहेत. मी आता फार वेळ बोलणार नाही. परंतु भाषा ही संस्कृतीची वाहक आहे, ती मराठी भाषाच आज पुसून टाकण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यामुळे मराठी संस्कृती नष्ट होणार आहे. त्याकरिता सीमा भागातील लोकांची आंदोलने झाली, मोर्चे निघाले. व त्यांनी आपली ताकद त्याठिकाणी दाखविली. अशा या सीमा भागातील जनतेच्या आंदोलनाबद्दल संवेदना व्यक्त करणे ही संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांना श्रध्दांजली व्यक्त करणे होय.

सभापती महोदय, हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रंलबित असल्यामुळे त्यावर अधिक भाष्य करणे बरोबर नाही.परंतु या सभागृहाच्या माध्यमातून एकच संदेश जाणे गरजेचे आहे की, या सीमा भागातील मराठी भाषिक जनता आज एकटी नाही. संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या पाठीशी आहे.याठिकाणी माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी भावना व्यक्त केल्या आहेत की, सर्वोच्च न्यायालयामधून निकाल येण्यास वेळ लागत असेल तर जोपर्यंत निकाल लागत नाही तोपर्यंत ही सर्व गावे केंद्रशासित करावीत अशी त्यांनी मागणी केली आहे. त्यांच्या या मागणीचे मी समर्थन करतो.आणि विनंती करतो की, सीमा भागातील जनतेने आझाद मैदान येथे धरण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या सभागृहाचे नेते प्रत्यक्षपणे त्या आंदोलनामध्ये सहभागी झाले होते, आणि वेळ प्रसंगी त्यांनी त्याठिकाणी रक्तही सांडले आहे.म्हणून मी आपणास विनंती करतो की, आपल्या सभागृहाचे सर्वपक्षीय संयुक्त शिष्टमंडळ जर त्याठिकाणी जाऊन सीमा भागातील मराठी बांधवांना भेटले...

( अपूर्ण - यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

आणि त्यांना विश्वास दिला की, तुम्ही एकटे नाही. तुम्ही आम्हाला माननीय पंतप्रधान यांच्याकडे जाण्यासाठी बरोबर यावयास सांगितले तरी देखील आम्ही तुमच्या सोबत येण्यास तयार आहोत. तुम्ही एकटे नाही तर संपूर्ण महाराष्ट्र हा तुमच्या पाठिशी आहे अशा प्रकारची त्यांना जर हिंमत दिली तर मला असे वाटते की, महाराष्ट्राच्या भावना या निश्चितपणे त्यांच्यासोबत आहेत असा एक चांगल्या प्रकारचा मॅसेज सीमा भागातील लोकांसमोर जाईल. धन्यवाद.

----

. . . .टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदासजी कदम आणि माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब यांनी येथे जे विचार मांडलेले आहेत, त्या विचारांशी आम्ही सर्वजण सहमत आहोत. दि.1 नोव्हेंबर 1956 रोजी राज्य पुनर्रचना झाली आणि तेव्हापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. मी या विधीमंडळामध्ये 1985 पासून म्हणजे जवळजवळ 25 वर्षे काम करीत आहे आणि जवळजवळ 25 वर्षे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामधील शेवटचा परिच्छेद हा सीमा भाषिकांच्या संदर्भातील असतो आणि त्यांच्या भाषणामध्ये हा संदर्भ आला की सर्वसाधारणपणे सन्माननीय सदस्य असे समजतात की, आता माननीय राज्यपालांचे अभिभाषण संपत आलेले आहे.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : या राज्यातील दोन राज्यपाल हे तेथीलच माननीय मुख्यमंत्री होते.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, हा प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात जशी शासनाची जबाबदारी आहे, त्याप्रमाणे या सभागृहातील दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांची देखील एक नैतिक जबाबदारी आहे असे मी मानतो. बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालखी अशी अनेक म्हणजे 865 गावे आहेत. त्याठिकाणी भाषिक गळचेपी होत आहे, सामाजिक गळचेपी होत आहे आणि सांस्कृतिक गळचेपी देखील होत आहे. आपण सुप्रीम कोर्टामध्ये जो प्रश्न मांडलेला आहे, तो सीमेच्या संदर्भातील आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळसाहेब, आपण शिवसेनेचे आमदार असताना, एकटे आमदार असूनही कर्नाटकमध्ये लढा लढून विधानसभेमध्ये आलात, तेव्हा विधानसभेतील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी, सर्वांनी तुमचे स्वागत केले होते. माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळसाहेब, आपण त्याठिकाणी गेलात आणि महाराष्ट्राची भूमिका, मराठी माणसाची भूमिका तेथे मांडली.त्याच पध्दतीने माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरदचंद्रजी पवार साहेब सुध्दा तेथे बंदी असताना देखील ड्रायव्हर म्हणून तेथे गेले आणि त्यांनी तेथील चळवळीमध्ये भाग घेतला. दोन वर्षापूर्वी या राज्याचे गृहमंत्री माननीय श्री.आर.आर.पाटील यांची बेळगाव येथे प्रचंड मोठी ऐतिहासिक सभा झाली होती. हे सर्व होत आहे, पण प्रश्न सुटत नाही. हा प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत शासनाने लक्ष घातले पाहिजे ही विनंती करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सुप्रीम कोर्टामध्ये सहा वर्षापासून ही केस आहे. मग या केसचे हिअरींग का होत नाही ? माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणेसाहेब, आपण जेव्हा या राज्याचे माननीय

. . . .टी-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुख्यमंत्री होता, त्यावेळी देखील माझ्या माहितीप्रमाणे आपण एक शिष्टमंडळ नेले होते. पण गेल्या सहा वर्षामध्ये जर सर्वोच्य न्यायालयामध्ये ही केस बोर्डावर येत नाही, याचे हिअरींग होत नाही, याचा निर्णय होत नाही. माझी शासनाला दुसरी विनंती आहे की, ही केस आहे, ती तशीच असू देत. पण याठिकाणी जे प्रश्न मांडण्यात आलेले आहेत, त्याच्या संदर्भात देखील आपल्याला विचार करावा लागेल. 1986 मध्ये बिगर कानडी विद्यार्थ्यांवर कानडी भाषेची सक्ती करण्यात आली. अशा प्रकारे बिगर कानडी विद्यार्थ्यांवर कानडीची सक्ती करीत असताना, तेथे त्यांना मराठी भाषा देखील शिकावयास दिली पाहिजे. आपण हे विषय कुठे घेणार ? मराठी शाळांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. मराठी वाचनालयाचे अनुदान बंद करणे, सन्माननीय सदस्य श्री.रामदासजी कदम यांनी सांगितल्याप्रमाणे बसच्या पाठिमागे जर मराठी अक्षरे असतील तर ती पुसून काढणे, या दृष्टीकोनातून आपण केंद्र शासनाकडे न्याय मागू शकतो की नाही ? सुप्रीम कोटामधून लवकर न्याय देण्यात यावा अशी मागणी करीत असताना, तेथील मराठी माणसाला देखील न्याय मिळाला पाहिजे पण जोपर्यंत सुप्रीम कोर्टाचा निर्णय लागत नाही. त्यादृष्टीकोनातून देखील प्रयत्न करणे अत्यंत महत्वाचे आहे. शहराचे नाव बदलून टाकले म्हणजे "बेळगाव"चे "बेळगावी" असे नाव केले. आता कन्नड लोकांचे सबंध कर्नाटकातील आणि हिंदुस्थानातील अधिवेशन बोलवत आहेत. त्या शहराला उप राजधानीचा दर्जा द्यावयाचा आहे. हे सर्वकाही राजकीय आहे. आपल्या पदरामध्ये बेळगाव कशा प्रकारे पदरात पाडून घेता येईल यासंदर्भातील ही राजकीय कारवाई आहे. माझी शासनाला विनंती आहे आणि याठिकाणी सभागृहाचे सन्माननीय नेते देखील उपस्थित आहेत. मघाशी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, या प्रश्नाच्या बाबतीत सर्वपक्षीय शिष्टमंडळ घेऊन जाऊ आणि त्यांना दिलासा देऊ की, महाराष्ट्र एक आहे आणि महाराष्ट्रातील सर्व पक्ष हे सीमा भागातील आपले जे मराठी बांधव आहेत, त्यांच्या सोबत आहेत अशा प्रकारचे एक चित्र निर्माण करुन, तेथील मराठी लोकांमध्ये एक आत्मविश्वास निर्माण करणे ही आज काळाची गरज आहे. मध्यंतरी काही विषय उपस्थित झालेले होते की, सीमा भागातील विद्यार्थी आहेत, त्यांच्या साठी इंजिनिअरींग कॉलेजमध्ये, वैद्यकीय कॉलेजमध्ये आरक्षण निर्माण करणे.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुणलाल गुजराथी ...

ते आरक्षण झाले असेल मला त्याची पूर्ण कल्पना नाही. पण त्या सीमा भागातील मराठी वासियांना असे वाटले पाहिजे की, महाराष्ट्रातील 11 कोटी जनता ही आपल्यासोबत आहे, अशा पध्दतीचा आत्मविश्वास निर्माण करणे तसेच या ज्या बाबी दोन-तीन महिन्यात घडलेल्या आहेत त्या संदर्भात केंद्र शासनाकडे जाऊन न्याय मागणे, सर्वोच्च न्यायालयात ही केस पेण्डिंग आहे तिचा निर्णय लवकर होणे या तीन बाबी झाल्या तर आपण आपले काही तरी कर्तव्य केले असे होईल. सभापती महोदय, सीमा भागातील सर्व जनतेला आपण सर्वांनी एकमुखी पाठिंबा द्यावा अशा पध्दतीची विनंती मी याठिकाणी करतो. धन्यवाद

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलले ) : सभापती महोदय, बेळगाव-कारवारच्या सीमा भागातील बांधव या महाराष्ट्राच्या भूमीमध्ये मोठया अपेक्षेने आलेले आहेत. ते अन्यायामध्ये चिरडले जात असताना महाराष्ट्र एकसंघ आमच्या मागे उभा राहू इच्छितो आता त्यानी कृतीने या लढयात आमच्यासोबत उतरावे या अपेक्षेने ते येथे आलेले आहेत.

सभापती महोदय, या विषयाच्या चर्चेला मान्यता देत असताना हा विषय न्यायालयात असल्या कारणाने अनेक बंधने निर्माण होतात अशा प्रकारचे सुतोवाच केले गेले. न्यायालयात प्रकरण असतानाच कर्नाटक सरकारला बंधने पाळण्याची कुठलीही गरज वाटत नाही. घटनेच्या कलम 19 प्रमाणे या देशातील प्रत्येक नागरिकाला सार्वभोमत्व बहाल केलेले असताना ते तिकडच्या मराठी माणसाला उपभोगता येत नाही. सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण असताना सुध्दा घटनेची उघड उघड पायमल्ली करण्याची दुर्बुध्दी तिकडच्या सरकारला आठवते. काहीही झाले तरी कानडी वरवंटा फिरवायचा आणि इकडच्या मराठी माणसाला नेस्तनाबूत करुन उदध्वस्त करायचे अशी भूमिका कर्नाटक सरकार घेते. सभापती महोदय, या ठिकाणी जो उल्ल्ेख झाला, इतक्या बेशरमपणाने तिकडचे सरकार अधिकृतरित्या वागते. तेथील पूर्वीच्या महापौराच्या तोंडाला काळे फासण्याचा पराक्रम त्यांनी करुन दाखविला, केवळ तो मराठी होता म्हणून. तेव्हाही हे प्रकरण न्यायालयात प्रविष्ट होते. सभापती महोदय, बेळगावमधून निवडून आलेल्या आमदारांनी कर्नाटकच्या विधिमंडळात मराठीत बोलण्याचा प्रयत्न केला त्यावेळी फक्त त्याला मारायचे काय ते बाकी ठेवले. त्याला धक्के मारुन त्या विधिमंडळातून बाहेर काढण्याचे कर्तृत्व दाखविणारे हे कानडी दादागिरीचे प्रकरण संपूर्ण देशाने अनुभवले महाराष्ट्राने सुध्दा त्यावेळी वेगवेगळया माध्यमातून निषेध व्यक्त केला. उघडरित्या लोकशाहीला कालिमा फासून आमच्या दबावाखाली आम्ही हे करु देणार नाही अशा प्रकारची हडेलहप्पी ते सरकार करीत असताना केंद्र सरकार मात्र शांत बसलेले आहे. महाराष्ट्रात युती शासन असताना जरासे काही झाले की, हे शासन बरखास्त करण्याचा बडगा उगारण्याचे काम त्यावेळी केलेले होते. हेच केंद्र शासन मात्र कर्नाटकाच्या सरकारला आणि कर्नाटकच्या माननीय मुख्यमंत्र्यांना साधी समजसुध्दा देत नाही. एवढे केंद्र सरकार महाराष्ट्राकडे आकसाने पहात आहे, अशा प्रकारची आमची धारणा होत चाललेली आहे. सभापती महोदय, हे सर्व होत असताना सर्वोच्च न्यायालयाला काय झाले आहे ते कळत नाही. खरे म्हणजे न्यायालयावर

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

बोलू नये अशा प्रकारचे संकेत आहेत. मी याठिकाणी धार्मिक बोलू इच्छित नाही पण एखाद्या दोन प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने केवळ पब्लिक क्राय हा शब्द वापरला आणि पब्लिक क्रायच्या नावाखाली न्यायनिवाडा देण्यात आला. त्यावेळी बेळगाव-कारवारच्या दहा लाख मराठी बांधवाचां, आणि महाराष्ट्रातील दहा कोटी मराठी बांधवानी निर्माण केलेला पब्लिक क्राय सर्वोच्च न्यायालयाला दिसत नाही काय? हा प्रश्न या माध्यमातून शासनाने उपस्थित केला पाहिजे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी याठिकाणी जो प्रस्ताव आणलेला आहे तो प्रस्ताव या शासनाकडून आला पाहिजे. बेळगाव-कारवार करिता सर्वात जास्त जर कोणी शोसले असेल तर ते आदरणीय भुजबळ आज येथे बसलेले आहेत आणि ते या सभागृहाचे नेते आहेत. त्यांनी असा एक प्रस्ताव मांडावा आणि केंद्र शासनाला विचारावे की, कर्नाटक सरकार बेळगाव-कारवारमध्ये मराठी माणसाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण करणार असेल तर बेळगावचे सरकार तातडीने बरखास्त करण्याची पाऊले उचलली गेली पाहिजेत किंवा तो प्रदेश केंद्र शासित करावा. या दोन घटनेप्रमाणे ठराव करुन केंद्र शासनाला पाठविणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा ते उपोषणाला बसलेले आहेत आपण सर्वपक्षीय येथून जाऊन त्यांना भेटू आणि त्यांना दिलासा देऊ याच्या पलीकडे काही होणार नसेल तर त्यांच्या भेटीला जाण्याचे नाटक करु नये असे मला वाटते.

.... यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यांचा सन्मानच करावयाचा असेल तर माझी एक सूचना आहे. आदरणीय श्री. उद्धवजी ठाकरे शिवसेनेच्या वतीने त्यांना भेटावयास जाणार आहेतच पण सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जी सूचना केली आहे की, आज ही चर्चा झाल्यानंतर सभागृहाचे कामकाज तहकुब करावे आणि सभापती या नात्याने आपल्या नेतृत्वाखाली सर्व पक्षीय सदस्यांना घेऊन आपल्या भावना कळविण्याकरिता आपण गेलात तर ते जास्त उचित ठरेल आणि त्यामध्ये फार मोठे संसदीय बळ असेल अशी मी सूचना करतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, आज या ठिकाणी आझाद मैदानामध्ये सीमा भागातील लोकांनी धरण्याचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. ज्यावेळी राज्यांची विभाजने होतात किंवा राज्यांच्या पुनर्रचना होतात त्यावेळेला बहुसंख्य आणि अल्पसंख्य अशा प्रकारचे प्रश्न निर्माण होतात. जर्मनीच्या विभाजनाच्या वेळेला सुध्दा ते झाले. खुद्द भारताच्या विभाजनाच्या वेळेला सुध्दा ते झाले. जो काही भाग बहुसंख्य लोकांच्या हाती जातो त्या ठिकाणी काही लोक अल्पसंख्य राहतात. दुसऱ्या ठिकाणी सुध्दा बहुसंख्य आणि अल्पसंख्य अशा प्रकारचे प्रश्न निर्माण होतात. भारतामध्ये 1956 च्या राज्य पुनर्रचना कायद्याने भाषिक तत्वावर ज्यावेळेला राज्यांची पुनर्रचना केली त्यावेळेला जवळजवळ सर्व राज्यांमध्ये लहान मोठ्या प्रमाणामध्ये हे प्रश्न निर्माण झाले. लोकशाही मध्ये सत्ता ही बहुसंख्य समुहाच्या हाती राहणार पण बहुसंख्य असलेल्या सत्ताधारकांनी सांस्कृतिक जीवनाविषयी, अल्पसंख्यांकाविषयी, त्यांच्या जीवन जगण्याच्या पध्दती विषयी, त्यांच्या शिक्षण व्यवस्थेविषयी, त्यांच्या भाषेविषयी सहानुभूतीचे धोरण ठेवले. त्या ठिकाणी ॲसिमिलेशन म्हणजे संस्कृतीची एकमेकामध्ये जी सरमिसळ होणे आहे ते सहज झाले. खुद्द महाराष्ट्रामध्ये मी ज्या भागामध्ये काम करतो त्या ठिकाणी सौंसर, भैसदई, मुलताई हे भाग सुध्दा मध्यप्रदेशात गेले. एखाद्या ठिकाणी आपोआप एखादी शाळा बंद होणे हा भाग वेगळा पण जाणूनबुजून एखादी शाळा बंद करतो अशी जर भूमिका कोणी घेतली तर त्याची रिॲक्शन येते. हा प्रश्न त्या भागामध्ये तेवढा तीव्र नाही. पण बेळगाव-कारवारच्या सीमा भागामध्ये हा प्रश्न गेली 60 वर्षे तेथील लोकांनी प्रभावीपणे बहुसंख्यांकांची सत्ता असताना सुध्दा टिकवून ठेवला आहे आणि स्वतंत्र भारताच्या इतिहासामध्ये 50-60 वर्षे एखाद्या अल्पसंख्य समुहाने आपली सामाजिक इहा टिकवून ठेवण्याचे दुसरे उदाहरण कोणते असेल असे मला व्यक्तीश: वाटत नाही. गेल्यावेळी जो प्रकार झाला त्यामुळे आज या ठिकाणी धरणे धरुन बसलेले आहेत. जीवन जगण्याची पध्दती, भाषा आणि संस्कृती यावर होणारे हल्ले सत्ताधारक बहुसंख्य लोकांच्या दांडगाईमुळे आपली एकंदर संस्कृतीच संपुष्टात येते की काय या प्रकारच्या भीतीतून हे जे वेगळेपण त्यांनी टिकवून ठेवले आहे त्याला न्याय मिळण्याची जी गरज आहे त्यात आज मुख्यत्वे माननीय महसूल मंत्र्यांनी शासनाच्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

प्रा. बी. टी. देशमुख .....

वतीने सुध्दा अतिशय स्पष्ट शब्दामध्ये ही भावना मांडलेली आहे आणि महाराष्ट्राची अशी भावना आहे. आज या धरणे कार्यक्रमाच्या निमित्ताने ही भावना स्पष्टपणाने आपल्या सभागृहाच्या मार्फत त्यांच्यापर्यंत कळविली गेली पाहिजे अशी मी आपल्याला या निमित्ताने विनंती करतो.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

श्री. जयप्रकाश छाजेड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदासजी कदम यांनी सीमा भागातील जवळपास पाच हजार बांधव त्यांच्या व्यथा व्यक्त करण्यासाठी, भावना व्यक्त करण्यासाठी आणि या राज्याचा पाठिंबा मागण्यासाठी आज मुंबईमध्ये आलेले आहे त्याबाबतचा विषय या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. गेल्या महिना दीड महिन्यापूर्वी बेळगाव महापौराच्या निवडणुकीमध्ये ज्या पध्दतीने लोकशाही मूल्ये पायदळी तुडविली गेली आणि बहुमत असताना सुध्दा मराठी माणसाला महापौर होऊ दिले जाणार नाही अशी भूमिका घेतली, त्यांना फॉर्म भरु दिले नाहीत आणि त्यातून लोकशाही मूल्ये कशा पध्दतीने पायदळी तुडविले जातात हे संपूर्ण देशाने अनुभवले. त्यानंतर या भागातील भावना अतिशय तीव्र झाल्या. गेली अनेक वर्षे सीमा भागातील मराठी बांधव महाराष्ट्रामध्ये येण्यासाठी प्रयत्नशील आहेत. सुप्रीम कोर्टामध्ये जी केस चालू आहे त्या केसचा निकाल लागलेला नाही. मराठी मुलांना शिकण्यासाठी असलेली शाळा बंद करणे, मराठी वाचनालये बंद करणे, मराठी बोर्ड काढणे याचा साधासरळ अर्थ असा आहे की, त्या भागातील मराठी संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न ते शासन करीत आहे. हे बांधव विश्वासाने या ठिकाणी आलेले आहेत आणि हे सभागृह कोणतेही राजकीय विचार मांडण्यापेक्षा सीमा भागातील बांधवांबरोबर आहे

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड...

असा एक विश्वास या सभागृहामार्फत, या शासनामार्फत सीमा बांधवांना देण्यासाठी या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आणि आम्ही सर्वांनी मांडलेले विचार एक आहेत. राज्यातील जनतेने त्या भागातील जनतेला दिलेला विश्वास आहे. माझी शासनाला एकच विनंती आहे की, सुप्रीम कोर्टात जी केस सुरु आहे त्याचा निर्णय लवकर लावून घेऊन सीमा बांधवांना विश्वास देण्याचा प्रयत्न करावा आणि आज त्यांच्यावर जे अत्याचार चालू आहेत ते संपवावे. या प्रश्नासाठी सर्व पक्षीय शिष्टमंडळ न्यावयाचे असेल तर ते न्यावे, या राज्याचे माननीय मुख्यमंत्री त्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करतील अशी मला खात्री आहे. सभागृहामार्फत सीमा बांधवांना त्यांच्या लढयाविषयी विश्वास द्यावा अशी मी विनंती करतो.

----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, बेळगांव महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या वेळी तेथे जो प्रकार झाला होता त्यासंबंधी मी या सभागृहामध्ये ठराव मांडून विचार व्यक्त केले होते, त्या विचारांची मी पुनरावृत्ती करणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी आज मांडलेल्या सूचनेला माझ्या पक्षाच्यावतीने पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, या सदनामध्ये आणि खालच्या सदनामध्ये अनेक वर्षांपासून या विषयी ठराव मांडले जातात, पण प्रत्यक्षात कृती काही होत नाही. त्यामुळे बेळगांवची जनता आता हतबल झाली आहे. तेथील चौथ्या पिढीत सीमा भागाचा प्रश्न सुटणार नाही अशी भावना निर्माण झाली आहे. मी या प्रश्नासंबंधी बेळगांवला गेलो होतो. तेथील नवीन पिढी आता असे म्हणत आहे की, आम्ही महाराष्ट्रात येऊ असे आम्हाला वाटत नाही. सभापती महोदय, ही भावना बदलण्याची खरी गरज आहे. कर्नाटक राज्यामध्ये सर्वपक्षाकडून दबाव आणला जात आहे, त्या राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे, या सरकारकडून तेथील मराठी भाषिक जनतेवर अत्याचार होत आहेत. बेळगांव शहरामध्ये व खेडयापाडयामध्ये मराठी भाषिकांवर ज्या पध्दतीने दबाव आणला जात आहे तो पाहता आपल्या राज्यामध्ये तसा दबाव निर्माण केला जात नाही, एकी दिसत नाही. आपण येथे केवळ ठराव करीत बसतो, प्रत्यक्षात कृती काही करीत नाही. उलटपक्षी कर्नाटकचे मुख्यमंत्री मुंबईमध्ये येऊन त्या राज्यात उद्योगधंदे कसे येतील यादृष्टीकोनातून पत्रकार परिषद घेतात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बेंगलोरला गेले असताना त्यांना तेथे येऊ देणार नाही अशी एकी कर्नाटकची जनता दाखविते, हे चित्र बदलण्याची गरज आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी देखील यासाठी लढा दिलेला आहे. आम्ही सुध्दा अनेक वेळा या प्रश्नासाठी तुरुंगात गेलो आहे. म्हणून आज केवळ ठराव न करता राज्य शासनाने ठोस भूमिका घेऊन एक वेगळा दबाव कर्नाटक सरकारवर आणण्याची गरज आहे एवढेच मी यानिमित्ताने सांगतो.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

श्री.छगन भुजबळ ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, सीमा बांधवांनी या प्रश्नासाठी जो लढा दिलेला आहे त्याबद्दल या सभागृहामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. अर्थातच शासन आणि मी स्वत: या भावनांपासून वेगळा आहे अशातील भाग नाही. हा लढा संयुक्त महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना सुध्दा चालू आहे. या महोत्सवाला एक काळी किनार सुध्दा आहे. 50 वर्षे होऊन सुध्दा आपला संपूर्ण महाराष्ट्र होऊ शकला नाही. 50 वर्षामध्ये अनेक लढे उभे राहिले. शिवसेनेने लढा दिला, त्यात 69 हुतात्मे झाले. वेगवेगळया पक्षाने महाराष्ट्रात आंदोलने केली त्याप्रमाणे बेळगांवतही केली. या सभागृहातील आणि खालच्या सभागृहातील व महाराष्ट्रातील ज्येष्ठ, श्रेष्ठ नेत्यांनी बेळगांवमध्ये जाऊन तसेच या महाराष्ट्रात प्रचंड कष्ट उपसले,

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. छगन भुजबळ....

मेहनत घेतली, तुरुंगात गेले, रक्त सांडले, कित्येक हुतात्मे या महाराष्ट्रातून वेळोवेळी या चळवळीसाठी देण्यात आले. कदाचित एवढा प्रदीघ चालणारा लढा हा जगातील एकमेवाद्वितीय असा लढा ठरावा. हा लढा अजून सुरु ठेवल्याबद्दल खरे तर बेळगाव, कारवार, बिदर, निपाणी या सगळया परिसरातील लोकांचे धैर्य आणि त्यांचे मराठीचे प्रेम, महाराष्ट्राचे प्रेम, चिवटपणा या सगळयांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे असे मला वाटते. या लढ्याला न्याया देण्यासाठी अनेक आश्वासने दिली गेली. ती पंतप्रधानांकडून दिली गेली, विविध केन्द्रीय मंत्र्यांकडून दिली गेली. परंतु काही दिवसानंतर या आश्वासनाचा काहीही उपयोग झाला नाही. या राज्यामध्ये वेगवेगळया पक्षाची सरकारे आली. पण ही सगळी सरकारे येऊन सुध्दा कोठलेही सरकार परिणामकारकरित्या या प्रश्नाची सोडवणूक करु शकले नाही. त्यामुळे कोठल्या पक्षाला दोष देणे हा मुद्दा नाही. अनेक वेळेला विविध पक्षाची सरकारे बदलल्या नंतर तेथील बेळगाव, कारवार मधील लोकांच्या मनामध्ये असा विचार आला की, आता तरी हा प्रश्न सुटेल, आता तरी हा प्रश्न सुटेल. त्यांच्या आशा पल्लवित झाल्या. परंतु दुर्दैवाची बाब ही की, काही घडले नाही. तिन्ही ठिकाणी सर्व पक्षाची सरकारे आली. केन्द्रामध्ये आली, महाराष्ट्रामध्ये आली आणि कर्नाटकामध्येही आली आणि गेली. परंतु काही झाले नाही. त्यामुळे प्रचंड खेदाची, प्रचंड दु:खाची भावना त्या परिसरातील लोकांची असणे हे अतिशय स्वाभाविक आहे. तरी पण त्यांनी अजूनही आशा सोडलेली नाही. पिढयान् पिढया या लढ्यामध्ये गारद झाल्या. एका पिढीने स्वत:चा श्वास सोडल्यानंतर दुस-या पिढीकडे लढा दिला. ती पिढीसुध्दा आता वार्धक्याकडे झुकायला लागली आहे. हे सगळे प्रकरण सुप्रिम कोर्टात आपण मांडल्यानंतर आता तरी निदान कोर्टाचा निकाल येईपर्यन्त शांतता राहील असे वाटले होते. पण असे काहीही घडत नाही. कुठेतरी तेथे विधान भवन बांधण्याचा निर्णय होतो, तर कधी महापौराला काळे फासण्याचा प्रकार होतो, तर कधी मराठी महापौर येऊच नये यासाठी कालबाह्य निर्णय घेतले जातात. काल मला तेथील काही नेते भेटले. त्यांनी सांतिले की माध्यमिक संस्थांमधील 10-12 हजार मुले परीक्षेला बसलेली होती. त्यांचा जाणीवपूर्वक दोन/तीन टक्के रिझल्ट लावला गेला. आज एवढ्या प्रचंड प्रमाणावर विद्यार्थ्यावर अन्याय करण्याचे काम सुध्दा सुरु केले आहे. त्यांच्या भावनांचा कडेलोट व्हायला लागला. हा राजकारणाचा विषय म्हटला तरी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. छगन भुजबळ....

विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये इतर प्रांतामध्ये अशा रीतीने दुर्दैवी प्रकार घडावा...सभापती महोदय, दुर्दैवी या शब्दा ऐवजी दुसरा शब्द सापडत नाही. दुर्दैवी हा शब्द सुध्दा फिका पडेल अशी वेळ आलेली आहे. का ? कारण केवळ त्यांची मातृभाषा मराठी आहे हा त्यांचा दोष आहे. या महाराष्ट्रामध्ये विविध मातृभाषा आहेत. परंतु अशारीतीने आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक दडपण कोणी केले नाही. काही मर्यादेपर्यन्त हा लढा लढाला गेला. पण त्या ठिकाणी सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक या सगळयाच्या बाबतीत या प्रकरणाची छाप पडलेली दिसते आणि त्यातून अन्याय होत आहे अशा भावना आहेत. केवळ भावनाच नाहीत तर हे खरे आहे, सत्य आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ......

सभापती महोदय, सीमा भागातील जे नेते आहेत, नगरसेवक आहेत ते आज मुंबईतील आझाद मैदानात धरणे धरुन बसले आहेत. आपण सर्वच सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकली आहेत, मी काही सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकली. मी त्याठिकाणी जाणार आहे. माननीय मुख्यमंत्री जाणार आहेत. त्याचबरोबर आपले वेगवेगळे जे नेते आहेत, आपण एकत्रितरित्या जाऊ या. त्याचबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा या सगळ्या गोष्टींची वाचा फोडण्यासाठी माननीय पंतप्रधानांकडे, केंद्रीय मंत्र्यांकडे शिष्टमंडळ घेऊन जाण्याच्या संदर्भात आपण एकत्रित बसून निर्णय घेऊ या. या माध्यमातून सीमा भागातील जनतेला आपण दिलासा देऊ आणि त्याचबरोबर त्यांच्यावर अन्याय करणाऱ्या ज्या काही शक्ती असतील त्यांना सुध्दा दाखवून देऊ की, तुम्ही अन्याय करीत रहाल आणि महाराष्ट्राची जनता केवळ तुमच्या अन्यायाकडे डोळे बंद करुन पहात राहील असा भाग नाही, अशी सूचना त्यांच्याकडे गेली पाहिजे यादृष्टीने जी जी पावले आवश्यक आहेत ती उचलली पाहिजेत. त्या संदर्भात दोन्ही सभागृहाच्या पक्षांमध्ये भेदभाव नाही. आमच्या सगळ्यांचे एकमत आहे. या सभागृहात, विधीमंडळात काम करणारे, विधीमंडळाच्या बाहेर असलेले नेते या सगळ्यांचा समावेश करुन, ज्यामध्ये खासदार असतील, मंत्री असतील, या सगळ्यांचा समावेश करुन निश्चितरित्या बैठक घेऊन आपल्याला पुढची पावले काय उचलली पाहिजेत या संदर्भात निश्चितपणे निर्णय घेऊ असे याठिकाणी मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो. धन्यवाद.

**सभापती** : गेली 50 वर्षे सीमा भागातील मराठी भाषिक यातना भोगत आहेत, या पध्दतीने संघर्ष करीत आहेत. या अनुषंगाने गेली 50 वर्षे सीमा भागातील मराठी भाषिक सातत्याने अनेक पध्दतीचे लढे देत आहेत, त्यांच्या संपूर्ण लढ्यामध्ये महाराष्ट्रातील सर्व जनता, तुम्ही, आम्ही सर्व पक्षीय सर्व कार्यकर्ते सातत्याने त्यांच्या पाठीशी उभे आहोत. महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये सातत्याने या अनुषंगाने अनेकवेळा आपल्या भावना आपण व्यक्त केल्या. त्याठिकाणच्या मराठी भाषिकांना ज्या पध्दतीने कानडी भाषेची सक्ती केली जाते, मराठी भाषा नामशेष करण्याचे प्रयत्न होत आहेत या अनुषंगाने महाराष्ट्र विधानपरिषद आणि आपण सर्व सीमा भागातील मराठी भाषिकांच्या या लढ्यात त्यांच्या पाठीशी सातत्याने खंबीरपणे उभे आहोत. आज आझाद मैदान येथे ज्या पध्दतीने त्यांनी धरणे धरले आहे त्या धरणे कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुध्दा त्यांच्या पाठीशी संपूर्ण

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

महाराष्ट्राची जनता आहे, महाराष्ट्र विधानपरिषद आहे. मला खात्री आहे की, महाराष्ट्राचे सन्माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय उपमुख्यमंत्री, सर्व पक्षांचे सर्व नेते या आझाद मैदानामध्ये धरणे धरुन बसलेल्या आपल्या बांधवांना भेटायला जरुर जातील. देशाचे सन्माननीय पंतप्रधान आणि सन्माननीय गृहमंत्री यांनाही त्या अनुषंगाने भेटतील. याठिकाणी आपण ज्या भावना व्यक्त केल्या, या दोन्ही बाजूच्या भावना आहेत त्या ठराव रुपाने मी याठिकाणी मांडतो आणि सदनाचे कामकाज 15 मिनिटांसाठी तहकूब करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.34 ते 12.49 पर्यंत स्थगित झाली)

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. भोगले....... 12:45

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी "रत्नागिरी जिल्ह्यातील निवळी ग्रामपंचायतीच्या हद्दीत नदीवर (बावनदी) मुंबई गोवा महामार्गालगत एमआयडीसीच्या जॅकवेलच्या वरच्या बाजूस एमआयडीसी मार्फतच मुख्यत: जेएसडब्ल्यू कंपनीच्या वापरासाठी कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्याचे काम सुरु असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "राज्यातील गृहनिर्माण योजनेचा लाभ पोलीस, सरकारी कर्मचारी आणि गिरणी कामगारांना घरे मिळण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी "पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गाच्या दोन्ही बाजूला पिंपळोली-ताजे आणि उर्से या गावाच्या हद्दीत रस्ते विकास महामंडळ आणि वन खात्याची हजारो एकर वन जमीन असून सदर जमिनीची 7/12 उताऱ्यावर तशी स्पष्ट नोंद असतानाही लोणावळा, वडगांव येथील दुय्यम निबंधकाच्या संगनमताने काही बड्या विकासकांनी सुमारे 2800 एकर जमीन हडप केल्याचे नुकतेच उघडकीस आल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील यांनी "रायगड जिल्ह्यातील मुरुड, जंजीरा व राजपुरी हे पर्यटन क्षेत्र असून हजारोंच्या संख्येने पर्यटक व शैक्षणिक

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

सहली येत असतात. डोंगरी ते राजपुरी येथील डोंगरावरुन नेहमी अचानक मोठे दगड पडण्याच्या घटना घडत असल्यामुळे जिवीत हानी होण्याची परिस्थिती निर्माण होणे, त्यामुळे हा रस्ता पर्यटकांना व स्थानिक लोकांना भितीदायक असल्यामुळे पावसाळ्यापूर्वी संरक्षित उभारुन धोक्यापासून संरक्षण करण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "राज्यशासनाने वसई-विरार महापालिका क्षेत्रातील 53 पैकी 35 गावे वगळल्याची अधिसूचना दि. 5.4.2010 रोजी जाहीर केल्यामुळे त्या त्या नगरपरिषदा व ग्रामपंचायतींच्या क्षेत्रातील सर्व विकास कामे ठप्प झालेली असून नागरिकांच्या दैनंदिन गरजा भागविण्याबाबत व पावसाळ्याच्या तोंडावर नागरी समस्यांची दाद मागण्याबाबत तेथील नागरिकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटनाकरिता केंद्राकडून 169 कोटी प्राप्त होऊन कोकण किनारपट्टीवरील पर्यटनाला वाव असताना खर्च न करणे, त्यांचे नियोजन न करणे, त्यामुळे निधी अखर्चित राहिल्यामुळे सदर निधी अन्यत्र वळता केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "सांताक्रुझ (प.) येथील खोतवाडीतील काजूसिंग वर्मा चाळीत कमलेश तमारिया यांचे दोन मजली गारमेंटच्या गोदामास शॉर्टसर्किटमुळे दि. 15.4.2010 रोजी लागलेल्या आगीत 3 कामगारांचा होरपळून झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

....3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "मुंबई मिरर या वर्तमानपत्राकडे दि. 6 मार्च, 2010 रोजी झालेल्या इयत्ता 12 वी च्या बुक किपींग अँन्ड अकाऊंटन्सी या विषयाची एका विद्यार्थ्याची सोडवलेली उत्तर पत्रिका सापडल्याबाबत, अशा प्रकारच्या उत्तर पत्रिका बारकोड पेपर काढून त्या जागी पुस्तकाच्या माध्यमातून सोडविलेली उत्तर पत्रिका धुसविण्याचा प्रकार करणारे रॅकेट असल्याची व्यक्त झालेली भिती." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी "शिवणगांव फाटा, वर्धारोड, नागपूर येथील शांतीनिकेतन ज्ञानपीठ कॉन्व्हेंट या शाळेने आपली स.11.00 ते सायं 5.00 ही असलेली वेळ विद्यार्थी व पालकांना विश्वासात न घेता ती सकाळपासून सुरु केल्याने सकाळची वेळ गैरसोयीची असल्याने ती पूर्ववत 11 ते 5 करावी अशी मागणी पालक वर्गाने शिक्षण विभाग, संचालक शालेय शिक्षण विभाग, पुणे यांना दि. 5.4.2010 रोजी निवेदन दिल्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी माझ्या दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

यानंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**म.वि.प.93 च्या निवेदनाबाबत.**

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, 93 च्या सूचनेवरील निवेदने सुरू होण्याच्या अगोदर सहसंचालक , उच्च शिक्षण मुंबई यांनी स्वत:च शासन निर्णय काढले आहेत आणि वेगळा प्रकार त्यांचा सुरू आहे. यासंबंधातील 93 ची सूचना मी पहिल्या आठवड्यात दिली होती. यासंबंधी मी काल देखील सभागृहाचे लक्ष वेधले होते. त्यावेळी आज निवेदन करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. पण आजही ते निवेदन आलेले नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, निवेदन करणे शासनाला अडचणीचे असेल.

**सभापती** : मी आपणास सांगू इच्छितो की, अडचणीचे असले आणि नसले तरी पीठासीन अधिकाऱ्यांनी निदेश दिल्यानंतर निवेदन आले पाहिजे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या संबंधातील निवेदन किमान सोमवारी तरी शासनातर्फे निवेदन झाले पाहिजे.

**सभापती** : शासनाने याबाबत सोमवारी कुठल्याही परिस्थितीत निवेदन करावे.

.........

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वर आणि दिवे आगर या पर्यटन क्षेत्राची विकास कामे अत्यंत अपुरी व निकृष्ट दर्जाची असणे

**मु. शी.** : रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वर आणि दिवे आगर या पर्यटन क्षेत्राची विकास कामे अत्यंत अपुरी व निकृष्ट दर्जाची असणे याबाबत सर्वश्री गुरूमुख जगवानी,विनोद तावडे,संजय केळकर, चंद्रकात पाटील,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.विजयकुमार गावित (पर्यटन मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरूमुख जगवानी,विनोद तावडे,संजय केळकर,चंद्रकात पाटील यांनी "रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वर आणि दिवे आगर या पर्यटन क्षेत्राची विकास कामे अत्यंत अपुरी व निकृष्ट दर्जाची असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, रायगड जिह्यामध्ये हरिहरेश्वर आणि दिवे आगर ही दोन्ही महत्त्वाची पर्यटन क्षेत्र आहेत. येथे लाखो लोक भेट देत असतात. येथे सविस्तर उत्तर दिलेले असले तरी माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. 21 कोटी रूपये शासनाने दोन्ही क्षेत्राच्या विकासाकरिता दिलेले आहे. त्यापैकी नेमका किती निधी येथील कामावर खर्च झालेला आहे व किती निधी देणे बाकी आहे? परिसराच्या सुशोभिकरणासाठी 1.67 लाख रूपये दिले आहेत, तर स्मशानाच्या परिसरासाठी चौथरा बांधला आहे, त्यासाठी 5.71 लाख रूपये देण्यात आलेले आहेत. आपण जागेवर गेलात तर ते काम झाल्याचे दिसून येत नाही. या कामामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. येथे निकृष्ट दर्जाचे काम झालेले आहे हे दिसते आहे. त्यामुळे या सगळ्या कामाची चौकशी करणे गरजेचे आहे. तेव्हा येथील कामावर किती निधी खर्च केला व किती निधी येणे बाकी आहे आणि या कामाची चौकशी शासन करणार आहे काय ? असे माझे मुख्य प्रश्न आहेत.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, हरिहरेश्वर आणि दिवे आगार या पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी रू.21.5 कोटी इतक्या रकमेच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे. सुरूवातीला हे काम आपण जिल्हा परिषदेला दिले होते. त्यानंतर हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केले. त्यामुळे काम पूर्ण करण्याला थोडा निश्चितपणे वेळ झालेला आहे.हरिहरेश्वर येथे रूपये 2.89 कोटी चे काम पूर्ण केले आहे. येथे सुरूवातीला रूपये 4.80 कोटीचे काम सुचविले होते. तसेच दिवे आगर येथील कामासाठी रूपये 3.00 कोटी इतका निधी वितरित केला आहे. येथे रूपये 5.10 कोटीचे काम झालेले आहे. पुढच्या काळामध्ये आपल्याला एकत्रितपणे रूपये 11.00 कोटी वितरित करावयाचे आहे. यापैकी आपण सप्टेंबर मध्ये सव्वा कोटी रूपये वितरित केले आहेत. उर्वरित निधी जानेवारीमध्ये रिलिज करण्याचे आदेश दिलेले आहेत. थोड्या दिवसात चेक मिळेल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, काही कामे निकृष्ट दर्जाची झालेली आहेत, एक दोन कामे पूर्ण झाली आहेत, बाकीची कामे पूर्ण व्हायची आहेत. याबाबत आम्ही आमच्या अधिकाऱ्यांमार्फत निश्चितच चौकशी करू. जर ते काम निकृष्ट दर्जाचे झाले असेल तर ते पुन्हा करण्यासंबंधीचे आदेश देण्यात येतील.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते :सभापती महोदय,श्री हरिहरेश्वर आणि दिवेआगार ही दोन्हीही पर्यटन तसेच तीर्थक्षेत्रे आहेत त्यांच्या विकासाच्या संदर्भात नियम 93 अन्वये सूचना देण्यात आली होती आणि त्या अनुषंगाने करण्यात आलेल्या निवेदनात असे म्हटलेले आहे की,जागा उपलब्ध नसल्यामुळे सात कामे सुरु होऊ शकलेली नाहीत. मला माननीय मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की, जागा उपलब्ध होत नाही म्हणून ही कामे बंद करता येणार नाहीत किवा रद्द करता येणार नाही तेव्हा शासन काही पर्यायी जागेची व्यवस्था करणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावीत :सभापती महोदय, त्या ठिकाणी कामे होऊ शकणार नाहीत म्हणून पर्यायी कामे सुचविण्यात आलेली आहेत आणि त्या कामासाठीच निधी उपलब्ध करुन दिला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : हे काम जिल्हा परिषदेकडून बांधकाम खात्याकडे का वर्ग करण्यात आले ? या कामाचे ठेकेदार कोण आहेत ? हरिहरेश्वर येथील विकास कामासाठी माननीय खासदार श्री.सुरेश कलमाडी यांच्या खासदार फंडातून किती निधी देण्यात आला होता ? त्याचबरोबर कोणत्या आमदारांनी या भागातील कामासाठी किती निधी दिला होता ? ज्या कामासाठी निधीचे वाटप करण्यात आले होते तो निधी त्याच कामासाठी खर्च करण्यात आला होता काय ? खासदार निधीतून जे काम करण्यात आले होते त्या कामावर पुन्हा पर्यटन खात्यातील पैसे खर्ची पडले होते हे खरे आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, सबंधित ठेकेदाराचे नाव आता माझ्याकडे नाही त्यामुळे हे नाव मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. राज्याच्या पर्यटन विकास विभागासाठी जी तरतूद करण्यात येत असते त्यातून या कामासाठी निधी देण्यात आला होता .माननीय खासदार वा आमदार निधीतून या कामासाठी निधी दिला गेला नाही.अशा प्रकारे जेथे काम होत नाही तेथील कामे बदलून दुसरी कामे घेण्यात येत आहे. जिल्हा परिषदेला ही कामे करण्याबाबत आदेश दिले होते परंतु वेळेवर कामे करीत नसल्याचे असे दिसून आल्यामुळे तत्कालीन मंत्र्यांनी बैठक घेऊन हे काम वर्ग करण्यासबंधीचे निर्देश दिले होते .

-----

<u>(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )</u>

**पृ. शी.** : खामगाव शहरातील पाणीपुरवठयाची पाईपलाईन फुटल्यामुळे आठ दिवस पाणीपुरवठा खंडीत होणे

**मु. शी.** : खामगाव शहरातील पाणीपुरवठयाची पाईपलाईन फुटल्यामुळे आठ दिवस पाणीपुरवठा खंडीत होणे. याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.छगन भुजबळ ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता यांनी ."खामगाव शहरातील पाणीपुरवठयाची पाईपलाईन फुटल्यामुळे आठ दिवस पाणीपुरवठा खंडीत होणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.भारवि 13.00

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,नियम 93 अन्वये सूचना देण्यामागचा माझा मूळ उद्देश वेगळा होता. त्या ठिकणच्या रस्त्याला खड्डा पडला होता आणि पाईप लाईन फुटल्यामुळे ट्रक त्या ठिकाणी फसला होता त्यामुळे रस्त्यावरील वाहतूक बंद झाली त्याचबरोबर खामगाव शहराचा पाणीपुरवठा देखील बंद झाला होता . या रस्त्याचे काम करीत असतांना पाईप लाईन दुसरीकडे शिफट करावयास पाहिजे होती. परंतु ती दुसरीकडे शिफट न करता या रस्त्यावरील वाहतूक सुरु झाली होती त्यामुळे खडयात ट्रक फसला होता .त्या ठिकाणच्या रस्त्याचे आणि पाईप लाईनचे काम किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय,या रस्त्याचे काम 98 टक्के पूर्ण झालेले असून किरकोळ काम राहिलेले आहे ते सुध्दा लवकर पूर्ण होईल. त्या रस्त्यापैकी 500 मिटर्स भागामधून जल प्राधिकरणाची पाईपलाईन गेली असून त्यातील 250 मिटर्स पाईपलाईन हटविण्यात आली आहे पुढची पाईप लाईन हटवत असतांना मध्ये एक पक्के घर आले होते व ते हटविण्याच्या बाबतीत वाद सुरु झाल्यामुळे पुढील पाईप लाईन हटवता आली नाही. त्या ठिकाणी पाईप लाईन लीक झाली होती त्यामुळे खड्डा पडला आणि वाहतुकीची अडचण निर्माण झाली होती ताबडतोब तेथे दुरुस्ती करण्यात आली तसेच तेथील पक्के घर हटविण्यात येऊन उर्वरित काम देखील लवकरच पूर्ण करण्यात येईल.

श्री.गोपीकिसन बाजोरिया :सभापती महोदय,काही काम अपूर्ण असतांनासुध्दा पथकर वसूल करण्यासबंधी अगोदरच परवानगी देण्यात आली होती. 100टक्के काम पूर्ण केल्यानंतर पथकर वसूल करण्यास सुरुवात करावी अशी टेंडरमध्ये अट टाकण्यात आली होती काय आणि टेडरपूर्वी 9.7 किलोमिटर्स रस्त्याच्या कामासाठी शासनाकडून गेल्या दोन वर्षापासून किती पैसे खर्च करण्यात आले होते.?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय,बी.ओ.टी. तत्वावर हे काम देण्यात आलेले असल्यामुळे शासनाकडून पैसे खर्च करण्याचा प्रश्न येत नाही. बी.ओ.टी.तत्वावरील कोणतेही काम 98 टक्के पूर्ण झाल्यानंतर टोल वसूल करण्याची परवानगी शासन देत असते . काही वेळा तेथे रेल्वेचा पूल असतो किंवा काही वेळा जमीन संपादन करण्याच्या बाबतीत अडचण येत असते त्यामुळे काम पूर्ण करण्यास जास्त वेळ लागत असतो .

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ...

त्यामुळे नुकसान होऊ नये म्हणून 98 टक्के काम पूर्ण झाले पाहिजे अशी अट आहे. याठिकाणी 4 लहान पूल, 1 मोठा पूल आणि 15 मोऱ्या आहेत. अशाप्रकारे ही 20 कामे पूर्ण झाल्यानंतर व तो रस्ता पूर्ण झाल्यानंतर टोल वसूली करण्यास परवानगी दिली आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे मध्येच पक्की वास्तू आल्यामुळे ही पाईप लाईन हटविता येत नव्हती. त्याठिकाणी पाण्याची गळती झाल्यामुळे खड्डा पडला. आता ती पाईप लाईन दुरुस्त करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. उरलेले काम तात्काळ पूर्ण करण्यास सुरुवात झालेली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: तापमानातील वाढीमुळे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये हापूस आंब्याचे झालेले नुकसान

मु.शी.: तापमानातील वाढीमुळे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये हापूस आंब्याचे झालेले नुकसान याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील,कपिल पाटील यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. रणजित कांबळे (फलोत्पादन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी "तापमानातील वाढीमुळे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये हापूस आंब्याचे झालेले नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून,आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच विमतरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : याठिकाणी सोबत जोडलेले निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, तापमानामुळे आंब्याची 15टक्के गळती झाल्याचे मंत्रिमहोदयांनी निवेदनामध्ये मान्य केले आहे. कोकणामध्ये आंब्याच्या झालेल्या गळतीचा सर्व्हे शासनाने केला काय? त्या प्रमाणे आंबा बागायतदारांना नुकसान भरपाई देण्याचा शासन निर्णय घेईल काय?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, तीन ठिकाणी सर्व्हे घेण्यात आला आहे. आंबा संशोधन केंद्र, रामेश्वर, तालुका देवगड, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला आणि देवगड तालुक्यातील अनेक कास्तकारांच्या शेतामध्ये जाऊन तपासणी करण्यात आली आहे. वेगवेगळया ठिकाणी आंबा गळतीचे प्रमाण वेगवेगळे आहे. सरासरी प्रमाण 5 ते 20 टक्क्याच्या आतील आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाले तर आपण त्यांना मदत करतो. परंतु याठिकाणी सरासरी नुकसान हे 18 ते 20 टक्क्यापर्यंत असल्यामुळे त्यांना मदत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, विद्यापीठाच्या जमिनीवरील गळतीचे प्रमाण हे 15 ते 20 टक्के आहे. सर्वसामान्य शेतकऱ्याच्या जमिनीवरील गळतीचे प्रमाण हे 50 टक्क्याच्या वर आहे. त्याचा आपण सर्व्हे केलेला नाही. त्यामुळे त्यांना आपण ताबडतोब नुकसान भरपाई देणार काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, फक्त 3 आणि 4 तारखेला या दोन दिवसामध्ये तापमानामध्ये वाढ झाली. त्यावेळी तापमान जवळपास 36 डिग्री होते....

(अडथळा)

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, कोकणामध्ये तापमानामध्ये अचानक वाढ झाल्यामुळे आंबा, काजू वगैरे पिकांवर त्याचा परिणाम झाला ही वस्तुस्थिती खरी आहे. याठिकाणी सन्माननीय राज्यमंत्री बरोबर माहिती देत आहेत. भविष्यात तापमानामध्ये वाढ झाल्यामुळे या पिकांवर परिणाम होईल त्यावेळी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल मागवून घेऊन त्यानंतर मदत देण्याचा विचार केला जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: हुतात्मा राजगुरु स्मारकाच्या बांधकामात झालेला भ्रष्टाचार

**मु.शी.**: हुतात्मा राजगुरु स्मारकाच्या बांधकामात झालेला भ्रष्टाचार याबाबत **डॉ**. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "हुतात्मा राजगुरु स्मारकाच्या बांधकामात झालेला भ्रष्टाचार" याविषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून,आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच विमतरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:10

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, निवेदनाच्या हुतात्मका राजगुरु स्मारकाच्या संबंधातील हा विषय आहे. 2001 मध्ये हा विषय उपस्थित झाला होता की, हे स्मारक पुरातत्व विभागाकडे देण्यात यावे आणि जे संरक्षित स्मारक म्हणून जतन करण्यात यावे. आता 2010 वर्ष सुरु आहे. निवेदनातील दुसऱ्या परिच्छेदामध्ये म्हटल्याप्रमाणे याकरता लागणारा निधी दि.31-03-2008 रोजी दिला आणि त्यांनतर तीन महिने तो तसाच बँकेमध्ये पडून राहिला. मग ते पैसे अदा करण्यात आलेले आहेत. हुतात्मा राजगुरु स्मारकाच्या विषयावरुन राजगुरुनगरमध्ये बंद पाळण्यात आला. लोकांच्या अशा अपेक्षा आहेत की, हे स्मारक वास्तुशास्त्राप्रमाणे जसे असावयास पाहिजे, तसे ते नाही. शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, एका कर्मचाऱ्याची वेतनवाढ थांबविण्याची कार्यवाही केलेली आहे. या स्मारकाच्या कामामध्ये एवढा विंलब का लागत आहे याची चौकशी व्हावी अशीच ग्रामस्थांची मागणी आहे. शासनाने याबाबतीत कमिटी नेमलेली आहे, हे ठीक आहे, पण ही कमिटी फक्त सल्लागार समिती आहे. यासाठी का विलंब लागत आहे ? तसेच तेथील लोकांची जी नाराजी आहे ती समजून घेऊन, ती दूर करण्यासाठी या कामामध्ये जो विलंब झालेला आहे, त्याची आपण संपूर्ण चौकशी करणार आहात काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, यामध्ये दोन भाग आहेत. एक म्हणजे लोकांच्या अपेक्षेप्रमाणे काम झाले पाहिजे. यासाठी त्यावर नियंत्रण असले पाहिजे आणि त्याबाबतीत तेथे एक्सपर्ट ओपिनियन असले पाहिजे. यासाठी ही समिती आहे. दुसरा भाग म्हणजे बँकेमध्ये काही कालावधीसाठी पैसे ठेवण्यात आलेले होते, याबाबतीत फायनान्शिअल ईरेग्युलॅरिटी झालेली असून, अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच कामाच्या बाबतीत सांगावयाचे तर लोकांच्या भावनेनुसार दोन-तीन वेळा कामामध्ये बदल करण्यात आला आहे. यासाठी पैसा उपलब्ध आहे, काम सुरु आहे. मध्यंतरी लोकांच्या भावना लक्षात घेऊन हे काम थांबविण्यात आले होते. आता ते काम पूर्ण होईल एवढेच मला येथे सांगावयाचे आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, विधानसभेमध्ये माननीय मंत्री महोदयांनी आठ दिवसापूर्वी याच विषयाच्या संदर्भात उत्तर दिलेले आहे आणि त्यामध्ये माननीय मंत्री महोदयांनी याची चौकशी करण्याचे मान्य केलेले आहे आणि विधान परिषदेमध्ये याबाबत उत्तर देताना ही बाब का मान्य करीत नाही ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय,शासनाने समिती गठीत केलेली आहे,ती दिनांक

. . . .2 डी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . . .

दि.07-04-2010 नंतर दि.13-04-2010 रोजी दुसऱ्यांदा समितीने भेट दिलेली असून, संबंधितांकडून झ ालेल्या कामाबाबतचा अहवाल एक महिन्याच्या आत सादर करावा अशा सूचना दिलेल्या आहेत.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . 2डी-3





**पृ. शी.** : सावंतवाडी तालुक्यातील उषा इस्पात कंपनीने

शेतकऱ्यांकडून कमी जास्त दराने घेतलेल्या जमिनी

**मु.शी.** : सावंतवाडी तालुक्यातील उषा इस्पात कंपनीने शेतकऱ्यांकडून कमी जास्त दराने घेतलेल्या जमिनी याबाबत सर्वश्री.परशुराम उपरकर,किरण पावसकर वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर यांनी "सावंतवाडी तालुक्यातील उषा इस्पात कंपनीने शेतकऱ्यांकडून कमी जास्त दराने घेतलेल्या जमिनी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 डी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "सदरच्या जमिनी उत्तम पॉवर स्टील ॲण्ड पॉवर लि.यांनी लिलावात विकत घेतलेली आहे.

आय.डी.बी.आय.ने कर्जापोटी जेव्हा या जमिनीचा लिलाव केला, त्यावेळी ती जमीन खरेदी केला होता की करार केला होता ? दुसरा प्रश्न असा आहे की, उत्तम पॉवर स्टील ॲण पॉवर लि.यांनी 1095 हेक्टर जमीन खरेदी केली असून कुळवहिवाटीबाबत महसूल व दिवाणी न्यायालयात प्रलंबित असलेल्या व स्थगिती असलेल्या प्रकरणी संबंधित 7/12 वर शेरे ठेवण्यात आलेले आहेत. तसेच वनसंज्ञा असलेल्या जमिनीबाबतचे शेरे 7/12 सदरी कायम ठेवण्यात आलेले आहेत. या जमिनीच्या बाबतीत अशी स्थिती असताना या जमिनी खरेदी होऊ शकतात काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, उषा इस्पात कंपनीच्या मालकीची असलेली जमीन ही आय.डी.बी.आय.मार्फत कर्जापोटी लिलावापोटी घेतलेली जमीन आहे. ही जमीन मालकीची असल्या शिवाय त्यांना ती जमीन खरेदी करता येणार नाही आणि आय.डी.बी.आय.च्या कर्जापोटी हा लिलाव झालेला आहे हे सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर आहे. दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत सांगावयाचे तर उत्तम स्टीलने 1095 हेक्टर जमीन खरेदी केलेली आहे. परंतु अजूनपर्यंत ती त्यांच्या नावावर झालेली नाही. त्यांच्या नावावर 183 हेक्टर जमीन झालेली आहे. वनसंज्ञा असलेल्या ज्या जमिनी आहेत, त्या जमिनींची शेतकऱ्यांच्या 7:12 वर वनसंज्ञा म्हणून त्यांची नोंद आहे. अद्याप या जमिनी उत्तम स्टील ॲण्ड पॉवर लि.या उद्योजकाच्या नावावर झालेल्या नाहीत.

-----

. . . .2 डी-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : अभियांत्रिकीच्या थेट व्दितीय वर्षात प्रवेश देताना विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय

**मु.शी.** : अभियांत्रिकीच्या थेट व्दितीय वर्षात प्रवेश देताना

विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय याबाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राजेश टोपे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री चंद्रकांत पाटील, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "अभियांत्रिकीच्या थेट व्दितीय वर्षात प्रवेश देताना विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 डी-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, याठिकाणी निवेदनामध्ये जे उत्तर देण्यात आलेले आहे, ते वस्तुस्थितीला धरुन नाही. महाराष्ट्रात 18 स्वायत्त पॉलिटेक्नीक आहेत आणि 333 तंत्रनिकेतने राज्य शासनाच्या अखत्यारितील आहेत. 18 स्वायत्त महाविद्यालयाबाबत सांगावयाचे तर प्रत्येक महाविद्यालयांची परीक्षा वेगळी होते आणि 333 महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांची परीक्षा

बोर्डातर्फे एकत्रितपणे घेतली जाते. या प्रत्येक महाविद्यालयांमधील प्राध्यापक पेपर सेट करतो आणि तोच चेक करतो. 18 महाविद्यालयांमध्ये हायएस्ट पर्सेंटेज हे 95 टक्के आणि लोएस्ट पर्सेंटेज हे 89 टक्के असते आणि 333 महाविद्यालयांमध्ये हायएस्ट पर्सेंटेज 85 टक्क्याला असतो. त्यामुळे सेकंड इअर इंजिनिअरींगच्या जवळजवळ सगळया जागा 18 महाविद्यालयांकडे जातात. त्यामुळे काही ना काही थोडी विभागणी करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, याठिकाणी ही वस्तुस्थिती आहे की, 18 स्वायत्त पॉलिटेक्नीक आहेत, त्यामध्ये 9 एडेड आणि 9 शासनाच्या आहेत. याठिकाणी मी सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगू इच्छितो की, आपण म्हणता त्याप्रमाणे याचे सिलॅबस जवळजवळ 80 टक्क्याच्यावर सारखे असते. त्याचबरोबर परीक्षा कमिटीवर सुध्दा महाराष्ट्र स्टेट टेक्नीकल बोर्डाचे मेंबर असतात आणि त्याचबरोबर समकक्षता सुध्दा दिलेली असते. यात महत्वाचा मुद्दा एवढाच आहे की, दहावी किंवा बारावी पास झाल्यानंतर जे प्रवेश दिले जातात, त्यावेळी फार हायर पर्सेंटेजची मुले त्या कॉलेजेसमध्ये जातात आणि स्वाभाविकपणे त्यांचा रिझल्ट देखील चांगला लागतो आणि दुसऱ्या वर्षासाठी सुध्दा त्यांना जास्त ॲडमिशन्स् मिळतात. हे विद्यार्थी खरच हुशार आहेत, चांगले आहेत. याठिकाणी सिलॅबस देखील सारखे आहे. त्यात कुठेही काहीही फरक नाही. पण जर आपण कोट्यामध्ये फरक केला तर या विद्यार्थ्यांचा हक्क डावलला जाईल. पण तरीही सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटीलसाहेबांचे जे म्हणणे आहे, त्यासंदर्भात आम्ही विचार करु. परंतु माझे स्वत:चे स्पष्ट मत असे आहे की, जर आपण यामध्ये काही बदल केला तर हुशार मुलांची संधी डावलली जाईल.

-----

यानंतर कु.थोरात . . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MMP/ प्रथम सौ. रणदिवे.... 13:15

**औचित्याचे मुद्दे**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एका महत्वाच्या विषयावर या ठिकाणी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती महोदय, कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्हयामध्ये प्रामुख्याने फौऊंड्री उद्योगाला रोज 100 ते 150 ट्रक वाळू लागते ती प्रामुख्याने कणकवलीमधून येत होती. अलीकडच्या काही दिवसामध्ये ही वाळू कणकवलीमधून येणे तेथील तहसील कार्यालयाने बंद केल्यामुळे कोल्हापूर, सांगली, साताऱ्यामधील फौऊंड्री उद्योग अडचणीत आलेला आहे. मी सभागृहाचे या औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधू इच्छितो की, जर कणकवली तहसीलदाराने ही वाळू पुन्हा एकदा सुरु केली नाही तर कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातील फौऊंड्री उद्योग धोक्यात येईल.

---

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी दुसरा औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एका महत्वाच्या विषयावर या ठिकाणी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती महोदय, प्रतापगडच्या पायथ्याशी अफझलखानाची कबर आहे. त्या कबरीजवळचे सर्व अनधिकृत बांधकाम काढून घ्यावे असा हायकोर्टाने एकदा निर्णय दिला. पुन्हा एकदा हायकोर्टात शासनाने अर्ज केला तोही हायकोर्टाने फेटाळला आहे. हाय कोर्टाने दोन वेळा शासनाचा अर्ज फेटाळल्यानंतर आता सरकारने अफझलखानाच्या कबरीजवळचे अनधिकृत बांधकाम काढून घ्यावे याकडे या औचित्याच्या मुद्याच्याद्वारे सभागृहाचे लक्ष वेधीत आहे.

---

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी तिसरा औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एका महत्वाच्या विषयावर या ठिकाणी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, गायीच्या हत्येच्या विरोधात महाराष्ट्रात कायदा झालेला असताना वारंवार ठिकठिकाणी गायीच्या हत्येचे प्रकार घडत आहेत म्हणून शासनाने याबाबत नव्याने निवेदन काढून गायीच्या हत्येला प्रतिबंध करावा, असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एका महत्वाच्या विषयावर याठिकाणी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, या राज्यातील ज्या शैक्षणिक संस्था आहेत या सर्व शैक्षणिक संस्था धर्मादाय आयुक्तांकडे मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्टखाली नोंदणीकृत आहेत. या शैक्षणिक संस्था शिक्षणक्षेत्रामध्ये काम करीत आहेत. सध्या शासनाने वीज दरामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे त्याचा परिणाम या शाळांवर होणार आहे. एक तर शासनाने या शाळांना मिळणारे वेतनेत्तर अनुदान बंद केले आहे. पुढच्या महिन्यापासून वाणिज्यिक पध्दतीने वीज देयके वसूल करण्यात येतील. अशा सर्व शाळांना वीज वितरण कंपनीच्या नोटिसेस आलेल्या आहेत. सभापती महोदय,त्याचा विपरीत परिणाम या शाळांवर व संस्थावर होणार आहे. म्हणून आता पर्यंत ज्या पध्दतीने घरगुती वापराच्या दराने देयक दिली जात होती त्याच दराने या शाळांना वीज देयके देण्यात यावीत. वाणिज्यिक पध्दतीचा अवंलब या शाळांसाठी करण्यात येऊ नये, अशा प्रकारचा औचित्याचा मुद्दा या माध्यमातून मी मांडत आहे.

---

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एका महत्वाच्या विषयावर या ठिकाणी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

...3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त.....

सभापती महोदय,भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील शिवाजीपार्क येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे यासाठी राज्य शासनाच्या पुढाकाराने इंडिया युनायटेड मिल नं.6 (इंदूमिल) ची जमीन संपादित करण्यासाठी राज्य शासनाच्या नगरविकास विभाग व केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाची दिनांक 8 मार्च, 2010 रोजी माननीय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त समिती नेमण्यात आली तसेच चैत्यभूमी विकास प्राधिकरण गठीत करण्यासाठी माननीय मुख्य सचिव यांच्या कार्यालयात दिनांक 6 मार्च,2010 रोजी सचिव स्तरावर बैठक घेऊन माननीय मुख्य सचिवांनी याबाबतचे जी.आर काढण्याचे आदेश देऊनही अद्याप जी.आर. न काढणे, त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक उभारणीसाठी राज्य शासनाची अनुकुलता असतानाही होत असलेला विलंब, या विषयांचे गांभीर्य लक्षात घेता माननीय मुख्यमंत्री साहेबांनी याकडे स्वत: लक्ष घालून माननीय केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री श्री. दयानिधी मारन यांच्याशी त्वरित जमीन संपादन करण्यासाठी चर्चा करुन मार्ग काढणे तसेच चैत्यभूमी विकास प्राधिकरण तातडीने गठीत करण्यासाठी जी.आर.काढून विलंब टाळावा याकरिता मी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे. कृपया स्वीकृत करावा, ही विनंती. धन्यवाद.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, औचित्याचे मुद्दे सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना माडता येतात काय ? सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. ते रोज त्या ठिकाणी भेटतात. त्यामुळे त्यांनी दररोज या ठिकाणी प्रश्न मांडून वेळ घेणे बरोबर वाटत नाही. औचित्याचे मुद्दे कोणी मांडावेत याचा आपण विचार करावा.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, संसदीय प्रणालीमध्ये आदरणीय श्री. नारायण राणे साहेब हे आमचे आदर्श आहेत. ते विरोधी पक्षात होते तेव्हाही आणि आता सत्ताधारी पक्षात आहेत तेव्हाही ते आमचे आदर्श आहेत. मी त्यांना नम्रपणे हात जोडून विनंती करतो की, माझ्या प्रत्येक सूचनेच्या बाबतीत त्यांनी अशा पध्दतीने टोमणा मारु नये. त्यांनी सकारात्मक भूमिका घ्यावी. जी भूमिका मी मांडलेली आहे ती मनापासून मांडलेली आहे. माझी भूमिका चुकीची असेल तर मला सल्ला द्यावा परंतु प्रत्येक वेळी असे करता ते बरोबर नाही. मी आपल्याला विनंती करतो.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एका महत्वाच्या विषयावर या ठिकाणी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती महोदय, ठाण्यामध्ये 3 एप्रिलपासून आजच्या तारखेपर्यंत वकिलांचा संप चालू आहे त्यामुळे तेथील कोर्टामध्ये अनेक कामे रखडलेली आहेत. अनेक केसेस प्रलंबित आहेत. 14 दिवस होऊन सुध्दा त्या ठिकाणचा संप मिटलेला नाही. त्या ठिकाणी वकिलांची संख्या 2 हजार पर्यंत आहे. 1996 पर्यंत संपूर्ण जिल्ह्याचे जिल्हा आणि सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालय ठाण्याला एका विस्तृत इमारतीमध्ये होते. ठाण्याची इमारत इतकी मोठी आहे की, त्या ठिकाणी अजूनही अनेक प्रकारची कामे होऊ शकतात. त्या ठिकाणी अपघात प्राधिकरण किंवा कौटुंबिक न्यायालय सुरु होऊ शकते. परंतु आज न्यायालयाचे विभाजन झाल्यामुळे, पालघर, कल्याण, भिवंडी या ठिकाणी विभाजन झाल्यामुळे वकिलांचा बहिष्कार सुरु आहे. त्यांच्या अनेक प्रकारच्या मागण्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

श्री. संजय केळकर .....

आहेत. त्यांच्या बहिष्काराचा आजचा पंधरावा दिवस आहे. त्यामुळे या महत्वाच्या विषयाकडे मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे. शासनाने यामध्ये हस्तक्षेप करुन वकिलांचा जो बहिष्कार सुरु आहे, वकिलांचा जो संप सुरु आहे त्याबाबतीत तोडगा काढावा अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो.

---

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. भारतीय जनगणना 2011 ची पूर्वतयारी सुरु असून या कामी केवळ शिक्षकांनाच गुंतविले जात आहे. सध्या सर्व प्रकारच्या परीक्षा सुरु असून उत्तरपत्रिका तपासणे, गुणपत्रके तयार करणे, अंतिम निकालपत्रके तयार करणे इत्यादी कामांमध्ये शिक्षकवर्ग मग्न आहेत. मे महिन्यामध्ये विविध विषयांच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम तयार केला जात आहे. उन्हाळी सुट्टीमध्ये काही शिक्षकांनी आपापल्या गावी जाण्यासाठी तिकिटे आरक्षित केली असून मुलामुलींच्या विवाहासारखे कौटुंबिक कार्यक्रमही ठरविले आहेत. या औचित्याच्या मुद्याव्दारे मी शासनास अशी विनंती करीत आहे की, जनगणनेच्या कामामध्ये उन्हाळी सुट्टीत शिक्षकांना मुभा द्यावी किंवा जनगणनेचे काम जून महिन्यानंतर करावे.

---

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती मधू जैन यांनी औचित्याचे 2 मुद्दे दिलेले आहेत. एक औचित्याचा मुद्दा जळगाव जिल्ह्यातील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्ग असणाऱ्या 202 महाविद्यालयापैकी 100 महिविद्यालयात प्राचार्य नसल्याने तेथील शैक्षणिक गुणवत्त्ेबाबत निर्माण झालेला प्रश्न यासंदर्भात दिलेला आहे तसेच याच विषयाच्या संदर्भात विशेष उल्लेखही दिलेला आहे. या विषयाच्या संदर्भात औचित्याचा मुद्दा मांडावयाचा की, विशेष उल्लेख मांडावयाचा हे सन्माननीय सदस्यांनी थोड्या वेळात ठरवावे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**.....

सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील छत्रपती शिवाजी महाराजांचे सिंधुदुर्ग किल्ला व विजयदुर्ग किल्ला असे दोन किल्ले आहेत. या दोन्ही किल्ल्यावर अनुक्रमे प्रेरणा उत्सव समिती व किल्ला उत्सव समिती या दोन संस्था किल्ला महोत्सव दरवर्षी साजरे करीत असतात. या दोन्ही उत्सव समितींना हा उत्सव साजरा करण्याकरिता प्रोत्साहन देण्याकरिता शासनाच्यावतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून भरघोस मदत करण्यात यावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

----

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. कोकणातील मातृभाषा 'मालवणी' ही मालवणी सम्राट कै.मच्छिंद्रनाथ कांबळी यांनी सातासमुद्रापलिकडे ही भाषा पोहोचविली असून त्यांचा वारसा पुढे चालविण्याकरिता मालवण तालुक्यातील फ्रेंडस क्लब यांनी "मालवणी साहित्य संमेलन" यावर्षी भरविण्याचे ठरविलेले आहे. अशा मालवणी भाषेचे जतन करण्याकरिता व या संमेलनाकरिता मुख्यमंत्री फंडातून आर्थिक सहाय्य तसेच आमदार स्थानिक विकास निधीतून आर्थिक सहाय्य करण्यासाठी शासनाकडून परवानगी मिळावी अशी मी विनंती या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

----

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. 20 जानेवारी, 2010 रोजी दादर येथील गोल्ड मोहोर या मिलला आग लागली होती. त्यावेळी हा घातपाताचा दाट संशय व्यक्त करण्यात आला होता. आता न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या अहवालात आगीसाठी

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.......

रॉकेलचा वापर झाल्याचे उघड झालेले आहे. या मिलला हेरिटेजचा दर्जा असल्यामुळे तिला तोडणे शक्य नव्हते म्हणून तिला आग लावण्याचा प्रकार झाला आहे. आग लागल्यानंतर भोईवाडा पोलीस स्टेशनमध्ये 10 दिवसानंतर एफआयआर नोंदविण्यात आला. या गुन्हयामध्ये तीन कामगारांना अटक करण्यात आली आहे. परंतु याप्रकरणातील हर्षद पटेल, गौरव पटेल या लोकांना अटकपूर्व जामीन देण्यात आलेला आहे. एका हेरिटेज मिलला आग लावण्याचा हा प्रकार नवीन नसून यासाठी संबंधितांवर शासनाकडे कडक कारवाई करावी. त्या जागेवर ज्यांना मॉल बांधावयाचा आहे अशा लोकांवर कडक कारवाई झाली पाहिजे. असे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मत मांडत आहे.

----

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. शासनाच्या नियमानुसार प्रथम कामगारांची देणी द्यावी व नंतर जमिनीचा विकास व्हावा असे शासनाचे धोरण असतानाही मुंबईतील अंधेरी (पूर्व) येथील मे.मिस्त्री प्रभुदास मानजी इंजिनिअरिंग प्रा.लि.या कंपनीच्या मालकाने खोटे कागदपत्र दाखवून आयुक्तांकडे ना हरकत प्रमाणपत्र मिळविलेले आहे. कामगारांची अजूनही देणी दिलेली नाहीत, कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळलेली आहे. पण त्याविषयी पुष्कळशा कंपन्यांमध्ये महाराष्ट्रातील उद्योगधंदे बंद होत आहेत. अशा पध्दतीने खोटी कागदपत्रे सादर करुन कामगार आयुक्तांकडून ना हरकत प्रमाणपत्र दिले जात आहे. खोटया कागदपत्राच्या आधारावर विकासकाला विकास करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिले जात आहे. या कंपनीला देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात यावे अशी विनंती मी औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

----

3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, दलितांचे कैवारी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन व भाषणे या मालिकेतील खंड क्रमांक 22 (चित्रमय चरित्र) मोठया थाटात प्रकाशित करण्याचा कार्यक्रम त्यांच्या जयंती दिवशी म्हणजे दिनांक 14 एप्रिल, 2010 रोजी शासनातर्फे पार पाडण्यात आला. या कार्यक्रमाला ज्येष्ठ व वरिष्ठ मागासवर्गीय लोकप्रतिनिधींना व इतर मागासवर्गीय नेत्यांना निमंत्रित करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे राज्यातील सर्व दलित वर्गातील जनतेच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत, नेत्यांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोषाची भावना निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, मी खालील महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा मांडत आहे. राज्यात दलित बौध्द समाजाची उन्नती व समन्वय साधण्यासाठी राज्यातील अनेक मंडळी तन्मयतेने काम करीत असताना त्यांना दलित मित्र पुरस्कार देण्याची प्रथा होती. परंतु गेल्या चार वर्षापासून या पुरस्कारच्या बाबतीत शासनाने कोणतीही दखल घेतलेली नसल्यामुळे या राज्यातील बौध्द, दलित बांधवामध्ये असंतोष पसरलेला आहे.

राज्य शासनाला नटनट्यांकडे जाऊन त्यांना पुरस्कार देण्यास वेळ आहे. अमिताभ बच्चन अथवा शाहरुख खान यांना पुरस्कार द्यायला वेळ आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी औचित्याच्या मुद्यावर बोलावे.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, गेल्या चार वर्षापासून दलित मित्र पुरस्कार देण्यास शासनाला वेळ नाही. परवा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती झाली. आमच्या तमाम दलित, बौध्द बांधवांना वाटले होते की डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने तरी हा दलित मित्र पुरस्कार जाहीर करण्यात येईल. परंतु तो जाहीर करण्यात आला नाही. तेव्हा सभापती महोदय, मी आपल्या वतीने शासनाला विनंती करतो की, चार वर्षानंतर आता तरी हा पुरस्कार द्यावा.

----

**उपसभापती** : या नंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. हा मुद्दा थोडा वेगळया स्वरुपाचा असल्यामुळे तो मांडण्यासाठी मला तीन-चार मिनिटे वेळ द्यावा अशी मी आपणास विनंती करते.

सभापती महोदय, सौंदर्य सेवेच्या नावावर आज मुंबईमध्ये लक्षावधी रुपयांच्या शस्त्रक्रिया करुन घेतल्या जात आहे. त्यामध्ये लोकांची फसवणूक होत आहे. तसेच देहाला इजा करुन घेण्याचे फॅडही वाढलेले आहे. या संदर्भात माझा औचित्याचा मुद्दा आहे. या विषयाकडे शासनाचे आणि या सभागृहाचे कोणत्या आयुधाच्या माध्यमातून लक्ष वेधायचे असा मला प्रश्न पडला होता.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे....)

सभापती महोदय, आपण असे पाहतो की, प्रत्येक व्यक्तीला आपण चांगले दिसावे, सुंदर दिसावे असे वाटते. त्यासाठी आहार, उपचार, सौदर्यविषयक सेवा देणारी अनेक ब्युटी पार्लर चालविली जात आहेत. त्याकडे मुंबईतील श्रीमंत वर्ग, नव-श्रीमंत, अनेक महिला व पुरुष, परदेशातील नागरिक आकर्षित होऊन सौंदर्य शस्त्रक्रिया करुन घेत आहेत. टाईम्स ऑफ इंडिया या दैनिकामध्ये श्रीमती प्रतिभा मसंद यांनी यासंबंधीचा तपशील दिलेला आहे. नाकाची शस्त्रक्रीया - 25 हजार ते 1 लाख रु, केस कृत्रीमरीत्या पुर्नजीवित करणे - दीड लाख ते 4 लाख रु., कानाचे आकार बदलणे - 50,000 ते 75,000 रु. पापण्यांच्या सुरकुत्या बदलणे 70,000 ते 80,000 रु. डाग इ., चेहरा आकर बदलणे 50,000 ते 2 लाख रु. इतर अवयावांचे आकार कमी जास्त करणे इत्यादी बदल करण्यासाठी शेकडो ग्राहक जात आहेत. अशा शस्त्रक्रियांमुळे रक्तस्त्राव होणे, संवेदनशीलता बदलणे असे साईड इफेक्टस होतात आणि काही वेळा तर रुग्णाचा मृत्यू देखील होतो. कॉस्मॉटॉलॉजिस्ट - सौंदर्य सेवा वैद्यकीय तज्ज्ञ हे ग्राहकांना योग्य ती माहिती देत नाहीत म्हणून या सौदर्यसेवा वैद्यकीय तज्ज्ञांच्या शस्त्रक्रियांवर निगराणी करणे व ग्राहकांना योग्य ती माहिती देऊन वेळीच सावध करणे, खासकरुन शस्त्रक्रियाविरहीत सौंदर्यसेवा करणा-या ब्युटी पार्लर्सना या जागृतीत सहभागी करुन घ्यावे, जेणेकरुन लोकांना एक मार्गदर्शन मिळेल. यासाठी सरकारने आरोग्य विभागामार्फत एक दक्षता समिती तयार करावी यासाठी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधित आहे.

----

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती मधु जैन यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती मधु जैन : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यभरात आदिवासी वसतिगृहातील मुलींवर होणा-या अत्याचारांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. ता. शिंदखेडा व पळासदरे, ता मालेगाव येथील आश्रमशाळेतील अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाले, शिक्षण क्षेत्राला हादरा देणा-या आणि माणुसकीला काळीमा फासणा-या ह्या घटना आहेत. आदिवासी जिल्ह्यांमध्ये आदिवासी मुलींवरच अत्याचार होण्याच्या ह्या पहिल्याच घटना नाहीत. तरी

..3..



MSS/ SBT/ KGS/ MMP/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 13:30

(श्रीमती मधु जैन..

387 मुली आज महाराष्ट्रात बलात्काराच्या शिकार झाल्या आहेत. बलात्कार कोणी केले हे लक्षात आल्यावर सुध्दा आरोपींना कठोर शिक्षा होत नाही. जळगावात गेल्या दीड ते दोन महिन्यात अशा प्रकारच्या तीन ते चार घटना उघडकीस आल्या आहेत. अत्यंत घृणास्पद ठरणा-या घटनेचा वेळीच निषेध केला नाही तर भविष्यात अशा घटनांना आळा बसणे अशक्य होऊन बसेल. आदिवासी आश्रमशाळा आणि वसतिगृहे हे शासनाच्या खास अनुदानातून केवळ आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी चालविली जातात. परंतु संस्थाचालक केवळ अनुदान लाटून विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण, सोयीसुविधा मिळत आहेत की नाही याकडे दुर्लक्ष करतात, रावेर येथे तर मुलीवरील अत्याचारात तेथील गृहपाल महिलेचाच हात होता आणि पळासदरे येथे तर शिक्षकानेच अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचे आढळून आले आहे. शासन यंत्रणाही अशा गंभीर प्रकरणांना नेहमीच्या सुस्तीत हाताळते. अशा वारंवार घडणा-या घटनांना आळा घालण्यासाठी संबंधित दोषीवर शासनाने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. संस्थाचालकांवरही याबाबत निर्बंध घालून त्यांच्यावरील नियंत्रण वाढविले पाहिजे. आदिवासी विद्यार्थीनीच्या नियमित आरोग्य तपासण्या करुन नोंदीचे रेकॉर्ड जतन करुन मागताचक्षणी हजर करण्याची सक्ती केली पाहिजे. अशा प्रकारांना आळा घालण्याकरिता शासनाने करावयाची उपाययोजना याबाबत मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

----

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. माननीय सदस्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद हे मराठवाड्यातील पहिले विद्यापीठ आहे. त्या विद्यापीठाचे नामकरण व्हावे यासाठी मोठा संघर्ष झाला. परंतु काल डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची वेबसाईट चोरीला गेली. विद्यापीठाच्या रजिस्ट्रारनी पोलीस तक्रार दाखल केली. गुन्हेगारांनी एकप्रकारे आव्हान दिले आहे. विद्यापीठाला नव्हे तर गृहखात्याला आव्हान दिले आहे. विद्यापीठाची वेबसाईट चोरीला गेल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात खळबळ माजली आहे. याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करावी अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

-------

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. माननीय सदस्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, काल या सभागृहामध्ये आपण चेअरवर असताना मराठी चित्रपटाविषयी चर्चा झाली होती. मुंबईतील मल्टिप्लेक्स थिएटरमध्ये मराठी चित्रपट दाखविले जात नाहीत. दाखविले गेले तरी प्राईम टाईममध्ये न दाखविता सकाळी 7.00 वाजता किंवा रात्रौ 10.00 नंतर दाखविले जातात. विधीमंडळापासून दोन मिनिटाच्या अंतरावर असलेल्या आयनॉक्स थिएटरमध्ये गेल्या एक वर्षापासून एकही मराठी चित्रपट दाखविला गेला नाही अशी माझी माहिती आहे. ज्या मंत्रालयातून राज्याचा कारभार चालविला जातो त्या मंत्रालयाजवळ हे थिएटर आहे. आयनॉक्ససारखी अशी अनेक थिएटर्स आहेत, ज्यांनी एक वर्षापासून एकही मराठी चित्रपट प्रदर्शित केलेला नाही. मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करतो की, अशा थिएटर्सवर कारवाई करावी. त्याचबरोबर मराठी चित्रपट प्राईम टाईममध्ये प्रदर्शित होतील यादृष्टीने दक्षता घ्यावी.

--------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोकआयुक्त यांनी माननीय राज्यपालांना प्रस्तुत केलेले दिनांक 20 जानेवारी, 2000; 18 जुलै, 2001; 29 ऑक्टोबर, 2002 व 14 जानेवारी, 2008 चे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवते.

**उपसभापती** : लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे विशेष अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : माऊली मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, देवळाली, ता.करमाळा, जि.सोलापूर या संस्थेचे संस्थापक चेअरमन यांनी बोगस बँक हमी पत्र सादर करणे

**मु.शी.**: माऊली मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, देवळाली, ता.करमाळा, जि.सोलापूर या संस्थेचे संस्थापक चेअरमन यांनी बोगस बँक हमी पत्र सादर करणे यासंबंधी सर्वश्री पाशा पटेल, गुरुमुख जगवानी, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"माऊली मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित देवळाली, ता. करमाळा, जि. सोलापूर या संस्थेच्या संस्थापक चेअरमन रामचंद्र रोहिदास शिंदे व सचिव पुष्पा रोहिदास शिंदे ऊर्फ मनाली शशीकांत गवळी, रा. श्रीरामनगर, आर.सी.मार्ग, चेंबूर,मुंबई तसेच संचालक मंडळावर बँक ऑफ बडोदा अकलुज, जि.सोलापूरचे बोगस हमी पत्र जोडल्याप्रकरणी जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी सदर बझार पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविला असणे, सदर संस्थेच्या संचालक मंडळावर ज्या नागरिकांचे सदस्यत्व दाखविण्यात आलेले असणे हे नागरिक या मंडळाचे सभासद नसल्याचे त्यांनी म्हटले असणे, सदर संस्थेची शासनामार्फत पोलीस चौकशी सुरु असणे, परंतु संस्थेच्या संस्थापक चेअरमन व सचिव यांनी राजीनामे देऊन संस्था व इतर व्यक्तीस विकणे, तसेच संस्थेच्या नवीन संचालक मंडळातील एकही सदस्य या कार्यक्षेत्रातील रहिवासी नसून नवीन संचाले मंडळाच्या यादीवर देवळाली ता.करमाळा या गावाचे रहिवासी दाखविण्यात आले असणे, नवीन संचालक मंडळाद्वारे समाजकल्याण विभागामार्फत अनुदान मिळण्याकरिता पुन्हा अर्ज ही केला असणे, संचालक मंडळाने १२५ शेअर्सचे पैसे हडप करणे, यामुळे नागरिकांमध्ये शासनाविषयी पसरलेला असंतोष व रोष, याबाबत तातडीने चौकशी करुन करावयाची कारवाई, व शासनाची प्रतिक्रिया."

..४..

श्री.सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, सदरचे जातीचा दाखला कोल्हापूर जिल्हयातील आहेत. मात्र सोलापूर जिल्हयातील त्यांच्या रहिवासाबद्दलचे इतर कोणतेही पुरावे प्राप्त झालेले नाही. त्यामुळे या संस्थेच्या कार्यक्षेत्रातील रहिवासी आहेत की नाहीत याबाबतची चौकशी करण्यात येत आहे. ही चौकशी नेमकी किती दिवसात करण्यात येईल? नवीन संचालक मंडळाने अद्याप संचालनालयाकडे मंजूर अर्थसहाय्याची मागणी केलेली नाही. मागणी केली तर किती दिवसात अर्थसहाय्य देणार आहात? संचालक मंडळाने 125 शेअर्सचे पैसे हडप केल्याबद्दल कोणतीही माहिती उपलब्ध नाही. जिल्हा उपनिबंधक, सोलापूर यांचा सविस्तर अहवाल मागविण्यात येत आहे असे म्हटले आहे. हा अहवाल किती दिवसात येईल?

नंतर 2जे.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे 15 दिवसात, दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर अहवाल आल्यानंतर यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल आणि तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर एक महिन्यात यासंबंधीचा निर्णय घेतला जाईल.

श्री. केशवराव मानकर : महोदय, या माध्यमातून शासनाचे 1 कोटी रुपये वाचलेले आहेत त्याबद्दल मी आपले व शासनाचेही आभार मानतो. एस.टी. ची जी बोगस औद्योगिक वसाहत आहे त्या संस्थेचे रजिस्ट्रेशन रद्द करुन तिला काळ्या यादीत टाकणार काय ?

श्री. सचिन अहिर : महोदय, मी अगोदरच सांगितल्याप्रमाणे याप्रकरणी चौकशी केली असून त्यात दोषी आढळून आलेल्या संस्थांवर कारवाई केली आहे. अशा प्रकारे अनेक संस्थांमध्ये संचालकांनीच हा गैरव्यवहार केलेला आहे. या संस्थेचे संचालक मंडळ आता बदलले असून त्याची चौकशी केल्यानंतर दोषी व्यक्तिवर कारवाई केली जाईल.

------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : नोव्हेंबर, 2009 मध्ये कोकणात आलेल्या फयान वादळात झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत

**मु. शी**. : नोव्हेंबर, 2009 मध्ये कोकणात आलेल्या फयान वादळात झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत यासंबंधी सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, राजन तेली, हेमंत टाकले, सुभाष चव्हाण, परशुराम उपरकर, किरण पावसकर, ॲड.अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नोव्हेंबर, 2009 मध्ये वादळामुळे सिंधुदूर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे व मच्छिमारांचे लाखो रुपयांचे नुकसान होणे, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई शासनाकडून प्राप्त होणे, परंतु मच्छिमारांना अद्यापही मदत न मिळणे, या वादळात मच्छिमारांचे जाळी व होड्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होणे, काही रापण संघांना मदत देण्यात येणे, परंतु 57 रापण संघांना अद्यापही मदत न मिळणे, शासन रापण संघांना जाळी खरेदीच्या पावत्या सादर करण्याची जाचक अट बंधनकारक करणे, जुन्या पावत्या सादर करणे मच्छिमारांना शक्य नसणे, त्यामुळे संबंधित मच्छिमारांमध्ये शासनाविरुध्द निर्माण झालेली संतापाची भावना, लोकप्रतिनिधींनी ही जाचक अट काढून टाकण्याबाबत कृषि राज्यमंत्र्यांकडे लेखी निवेदन देणे, याप्रकरणी शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका."

डॉ. नितीन राऊत (मत्स्यव्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

....3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : महोदय, नोव्हेंबर, 2009 मध्ये कोकणात जे वादळ आले होते त्यामुळे मच्छिमारांचे नुकसान झाले व शासनाने मदतही केली होती परंतु 400 ते 450 लोकांचे अर्ज अजुनही प्रलंबित आहेत. तसेच ही मदत देत असताना शासनाने ज्या अटी घातलेल्या आहेत त्या अत्यंत जाचक आहेत, या अटी रद्द कराव्यात अशी माझी विनंती आहे. तसेच ज्यांचे अर्ज प्रलंबित आहेत, ज्यांना मदत मिळाली नाही त्यांना अशा जाचक अटी रद्द करुन ताबडतोब मदत देण्याचा निर्णय शासन घेणार काय ?

डॉ. नितीन राऊत : महोदय, ज्यावेळेस कोकणात फयान नावाचे वादळ समुद्रात आले होते त्यात नुकसान झालेल्या मच्छिमारांना मदत करण्यासंबंधीची पाहणी करण्यासाठी माननीय महसूल मंत्री गेले होते तसेच विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती नेमून वस्तुस्थितीची पाहणी करण्यात आली होती. ज्यांचे ज्यांचे नुकसान झाले त्या त्या लोकांना शासनाच्या 19 नोव्हेंबर, 2009 च्या परिपत्रकानुसार मदतही करण्यात आली आहे. तसेच यामध्ये ज्या जाचक अटी घालण्यात आल्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, अशी मदत करीत असताना शासनाचे जे नियम आहेत त्यानुसारच जिल्हाधिकारी प्रचलित आदेशानुसार पंचनामे केले जातात. म्हणून ज्यांचे ज्यांचे अर्ज आलेले आहेत त्या सर्वांनाच मदत केली आहे. एक मदत तर अशीही देण्यात आली की श्री. भगत रामचंद्र कोचरे यांनी 10 हजाराची मागणी केली परंतु पंचनाम्यात त्याचे नुकसान जास्त झाल्याचे आढळून आल्यामुळे त्या माणसाला 47500 रुपये एवढी मदत केली आहे. अशा प्रकारे ज्या ज्या लोकांनी अर्ज केले होते, ज्यांनी अटी पूर्ण केल्या त्या सर्वांनाच मदत करण्यात आली आहे. तसेच जाचक अटीबाबत सांगावयाचे झाल्यास कोणत्याही जाचक अटी नाहीत तर आम्ही एखादा पुरावा मागितला पण संबंधित व्यक्ती किंवा मच्छिमार हे कोणत्याही सहकारी संस्थेचे सभासद असावेत, बँकेकडून कर्ज तरी घेतलेले असावे अशा प्रकारचा एखादा तरी पुरावा सादर करणे आवश्यक असते. काही लोकांनी अशा कंपन्यांचे पुरावे सादर केले की त्याच कंपन्यांनी लिहून पाठविले की आम्ही अशा प्रकारच्या पावत्या दिलेल्या नाहीत अथवा त्यांची नोंदही आमच्याकडे नाही, अशी पत्रेही त्यां कंपन्यांची आमच्याकडे आली, ती पत्रे मी पटलावर ठेवतो. त्याचबरोबर जी कंपनी सन 2008 मार्चपूर्वीच बंद झाली त्याच कंपनीचे पुरावे म्हणून सादर केले आहेत....

यानंतर श्री. भारवि ....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत ....

शासनाची मच्छिमारांना मदत करण्याची भूमिका आहे. नियमानुसार आजही प्रत्येकाला मदत केली जाणार आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले की, पावत्या कंपनीने दिल्याच नाहीत. वास्तविक पाहता जाळ्यांना व्हॅट नाही. त्यामुळे पावत्यांची अटच येत नाही. डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी माझ्याच 93 च्या सूचनेला उत्तर देताना असे सांगितले होते की, नैसर्गिक आपत्तीच्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई देण्याचा शासन विचार करीत आहे. त्याचे काय झाले ? मत्स्य अधिकारी, बंदर अधिकारी, संस्थेचा चेअरमन आणि ग्रामसेवक अशा पाच जणांचा उपस्थितीत पंचनामे झालेले आहेत. या पाच जणांनी पंचनामे केल्यानंतर देखील लोक वंचित राहिलेले आहेत. त्यांना नुकसान भरपाई मिळणार काय ? तसेच रूपये 2.77 कोटी अखर्चित राहिलेले आहेत. त्याचे वाटप परत सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये करण्यात येईल काय ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, ज्या लोकांनी अर्ज सादर केला आहे, त्यांच्या कागदपत्रांची तपासणी कोणी केली हे सन्माननीय सदस्यांनी स्वत:हून सांगितले आहे. त्यांचे अर्ज योग्य असतील तर त्यांना अनुदान दिले जाईल.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सदर लक्षवेधी ही दुसऱ्यांदा येत आहे. या अगोदर देखील आली होती. आता सन्माननीय सदस्यांनी येथे प्रश्न विचारला आहे, त्याप्रमाणे त्याला उत्तर देण्यात आले आहे. पुनर्वसन विभागाने परवानगी न दिल्यामुळे वाटप करण्यात आले नाही असे वृत्त टी व्ही वर दाखविण्यात आले होते. फयानमध्ये सापडलेल्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी एक समिती नेमली होती. त्या समितीचा मी प्रमुख होतो. फयान वादळ येऊन गेल्यानंतर दोन महिन्यामध्ये ज्यांचे ज्यांचे नुकसान झाले होते, त्यांचे पंचनामे झाले आम्ही केले. तिथल्या स्थानिक लोकांना बोलाविले. अजूनही कोणाचे नुकसान झाले असेल तर ते सांगावे. सगळ्यांना बोलाविल्यानंतर, पंचनामे झाल्यानंतर झालेल्या नुकसानीबद्दल पैसे दिलेले आहेत. आमच्या विभागाचे स्पष्ट मत आहे की, जाळ्यांनी मच्छिमार मासेमारी करीत असतील तर जाळे घेतल्याचा कोणताही पुरावा द्यावा. मासेमारी करतात याचा एक तरी पुरावा द्यावा किंवा संबंधित मच्छिमाऱ्याने तो मच्छिमार आहे हे सिद्ध करावे. ते झाल्यानंतर आम्ही मदत करू. ..2

श्री.नारायण राणे....

पण काही तरी पुरावा पाहिजे. नाही तर कोणी येईल आणि सांगेल की मी मच्छिमार आहे, मला पैसे द्यावे. शेवटी पुरावा हा पाहिजेच. म्हणूनच आम्ही अधिकाऱ्याला प्राधिकृत केले की, तो मच्छिमार आहे हे सिद्ध करावे आणि मदत द्यावी. या दोन अटी घालून संबंधित विभागाला पैसे वाटपाला परवानगी दिली होती. आमची कोणतीही जाचक अट नव्हती. पावतीची अट आपल्याला काढताच येणार नाही. काही तरी सिद्ध करायला पाहिजे. तो मच्छिमार आहे हे कुठे तरी सिद्ध व्हायला हवे. सिद्ध होत नसेल तर उद्या सगळे मदतीसाठी लाईन लावतील. आम्ही जवळपास 950 लोकांना मदत केली आहे. कोणीही वंचित राहिलेला नाही. जाळ्याचे नुकसान बघून रूपये 25 हजार ऐवजी रूपये 50 हजार देण्याचा निर्णय आम्हीच केला आहे. रक्कम आम्ही दुप्पट केली. येथे सन्माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले ते बरोबर आहे. परंतु याचा फेर विचार करण्याची गरज नाही. पुनर्वसन विभागाने कोणताही प्रस्ताव नाकारलेला नाही. उलट 19 नोव्हेंबर 2009 चा जी.आर.स्पष्ट आहे. त्यात फिशरीज अधिकारी यांनी लाभार्थी मच्छिमार आहेत की नाही हे पडताळावे आणि मदत द्यावी असे नमूद आहे. त्यामुळे जी रक्कम शिल्लक राहिली आहे ती परत करण्याचा प्रश्नच नाही. दुसरे म्हणजे अजूनही कोणी पुरावा दाखविला तर त्यांचा देखील विचार जरूर करण्यात येईल.

.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : "सुवर्ण महोत्सवी वर्षात महाराष्ट्रात मराठी भाषेच्या विकासाकडे दुर्लक्ष होणे"

**मु. शी**. : "सुवणे महोत्सवी वर्षात महाराष्ट्रात मराठी भाषेच्या विकासाकडे दुर्लक्ष होणे यासंबंधी सर्वश्री संजय दत्ता,चरणसिंग सप्रा,प्रतापसिंह मोहिते-पाटील,जैनुद्दीन जव्हेरी ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महाराज, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या महाराष्ट्रात मराठी भाषेच्या विकासाकडे दुर्लक्ष झाल्याचे आढळून येणे, राज्याचे भाषाविषयक धोरण ठरविणारे भाषा संचालकच उपलब्ध नसणे, संचालनालयाची दुरावस्था झाल्याचे आढळून येणे, मराठीच्या विकासासाठी मिळणाऱ्या निधीतील बहुतांश निधीची रक्कम मराठी ऐवजी संचालनालयाच्या खर्चासाठी वापरली जात असल्याचे आढळून येणे, संचालनालयाला सन २००९-१० साठी मिळालेल्या ३ कोटी २५ लाख ९५ हजार रुपये निधीपैकी ३ कोटी रुपये निधी कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च करण्यात येणे व सन २०१०-११ या वर्षासाठी ४ कोटी १ लाख ३५ हजार रुपयांच्या निधीची मागणी करण्यात येणे, या निधीपैंकी ३ कोटी ४१ लाख रुपये निधी हा कर्मचाऱ्यांच्याच वेतनावर खर्च होणार असून उर्वरित अल्पसा निधी मराठीच्या विकासासाठी शिल्लक राहणार असल्याचे आढळून येणे, मराठी भाषेच्या समृध्दीसाठी अधिक निधी मिळावा, अनुवादकांची रिक्त पदे तातडीने भरली जावीत, कोषांच्या पुनर्मुद्रणाचे काम वेळेत पूर्ण व्हावे व भाषा सल्लागारे मंडळाच्या बैठका वेळेवर घेण्यात याव्यात असे असतानाही यापैकी काहीही होत नसल्याचे आढळून येणे, त्यामुळे या भाषा संचालयनामध्ये निर्माण होत असलेली नाराजी, सबब, भाषा संचालनालयाच्या विकासासाठी शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...४

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ ST/ KGS/ प्रथम श्री.भारवि 13.50

निवेदनानंतर -

श्री.संजय दत्त : सभापती महोदय,लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने या महत्वाच्या विषयाकडे लक्ष वेधण्याची मला संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. मराठी भाषेचा विकास करुन शासनाच्या प्रशासकीय कारभारात मराठीचा कार्यक्षमपणे वापर करण्याच्या दृष्टीने भाषा संचालनालय हे कार्यालय मूळातच कार्यक्षम असले पाहिजे. महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असतांना आज या विभागावर मरणकळा आलेली आहे. ही विटंबना आहे. या निवेदनात असे म्हटलेले आहेकी," भाषा संचालकाचे पद 30 सप्टेंबर 2002 पासून रिक्त आहे." तेव्हा पासून एम.पी.एस.सी.कडे वा शासनाकडे या पदासाठी लायक उपलब्ध नसल्याचे या निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे.सभापती महोदय, मला माननीय मंत्रीमहोदयांना असा स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचा आहे की, या भाषा संचालनालयाचा अतिरिक्त कारभार गेल्या आठ वर्षा पासून ज्या उपसंचालकाकडे दिला होता व ज्यांनी गेल्या आठ वर्षापासून या कारभाराची धुरा सांभाळली त्यांनाच या पदावर का नियुक्त करण्यात आले नाही ? सदर पदाचे सेवा प्रवेश नियम सुधारित का करण्यात आले नाहीत ? मराठीच्या विकासासाठी मिळणा-या निधीतील बहुतांशी रक्कम मराठी ऐवजी संचालनालयाच्या खर्चासाठी वापरली जात आहे याचे मी आपल्याला एक उदाहरण देतो. 2009-2010 रोजी 3 कोटी 25 लाख 95 हजार रुपयापैकी वेतनावर 2 कोटी 74 लाख 28 हजार रुपये खर्च झालेले आहेत असे निवेदनात म्हटलेले आहे. या निमित्ताने मला माननीय मंत्री महोदयांना दुसरा स्पेसिफिक प्रश्न असा विचारावयाचा आहे की,मराठीच्या विकासासाठी या संचालनालयातर्फे कोणती उपाययोजना करण्यात आली होती व मागील पाच वर्षात त्यानी कोणते काम केले होते ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, भाषा संचालकांची नियुक्ती करण्यासाठी सेवा नियमामध्ये बदल करणे आवश्यक असून त्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.......................

श्री.संजय दत्त : 8 - 9 वर्षे होऊन गेली आहेत.

श्रीमती फौजिया खान:: आता ही कार्यवाही सुरु केली आहे आणि महाराष्ट्र लोक सेवा आयोगाकडून दोन वेळा जाहिरात देऊनसुध्दा भाषा संचालकासाठी योग्य उमेदवार मिळालेला नाही म्हणून सेवा प्रवेश नियमामध्ये बदल करण्यास सुरुवात केली आहे. या संदर्भात सचिवांबरोबर नुकतीच एक बैठक घेण्यात आली होती आणि त्या बैठकीत असे ठरविण्यात आले आहे की, या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान...

साठी माननीय राज्यपालांची मान्यता घेण्याची प्रक्रिया चालू करण्यात यावी परंतु महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला ड्राफट रिक्रुटमेन्ट रुल्स पाठविण्यात यावेत आणि त्यांच्याकडील प्रक्रिया पूर्ण करुन घेण्यात यावी. माननीय सदस्यांनी खर्चाच्या बाबतीत एक प्रश्न उपस्थित केला आहे. मी सन्माननीय सदस्यांना सागू इच्छिते की, दुस-या विभागाला मदत करण्याचा या संचालनालयाचा उद्देश आहे. या संचालनालयाच्या कामाचे स्वरुप पाहिले तरी हयुमन रिसोर्सेस सबंधीचे काम जास्त आहे असे आपल्याला दिसून येईल. मार्गदर्शक पुस्तिका तयार करणे,शास्त्रीय व तांत्रिक परिभाषिक कोष तयार करणे , अनुवाद करणे, विभागीय नियम तयार करणे इत्यादी कामे या संचालनालयाकडून करुन घेण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आलेले आहे आणि ही सगळी कामे हयुमन रिसोर्सेसवरच अवलंबून आहेत त्यामुळे प्रशाकीय खर्च जास्त होत असतो.सन्माननीय सदस्यांना जर काही सुधारणा सुचवावयाची असेल तर ती त्यांनी सुचवावी या कामासाठी शासन निधी कमी पडू देणार नाही एवढेच मी सागू इच्छिते.

श्री.कपिल पाटील :सभापती महोदय,मागील अधिवेशनामध्ये या सबंधीचा प्रश्न उपस्थित झाला होता. एम.पी.एस.सी.कडून पात्र उमेदवार मिळत नाही म्हणून सेवा नियम बदलण्यात येणार आहेत काय असा प्रश्न मी त्यावेळी विचारला होता. त्यावेळी सेवा नियम बदलण्यात येतील आणि विद्यापीठाकडून पात्र उमेदवार घेण्यात येईल असे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिले होते.नियम बदलण्यामध्ये इतका विलंब होण्याची कारणे काय आहेत ? कोणत्याही व्यक्तिला प्रमोशन देऊन त्या ठिकाणचे पद भरण्यात येऊ नये.तर विद्यापीठातील पात्र उमेदवाराची त्या ठिकाणी नियुक्ती करण्यात यावी. परिभाषा कोष निर्माण करणे हे महत्वाचे काम असते. याबाबतीत मी मागच्यावेळी देखील विचारले होते. राज्याचा जो परिभाषा कोष आहे त्यातील भाषा कोणालाही कळत नाही त्यामुळे त्याचे सुलभीकरण करणे, तो सर्व समावेशक करणे , प्रचलित शब्दांचा त्यात समावेश करणे आवश्यक आहे. इंग्रजीने अनेक शब्द स्वीकारलेले आहेत त्याप्रमाणे आपल्या परिभाषा कोषाचे दर वर्षी पुनर्रचना करुन नवा शब्दकोष तयार करण्याची जबाबदारी शासन पूर्ण करणार आहे काय ?

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे याठिकाणी जाणुनबुजून विलंब झालेला नाही. सेवा नियम बदलाची प्रक्रिया माननीय राज्यपालांपर्यंत जाते. त्यामुळे त्याबाबत टप्प्या टप्प्याने काम सुरु आहे. तरीसुध्दा पुढील 15 दिवसात ड्राफ्ट रिक्रुटमेंट रुल्स एम.पी.एस.सी.डे त्यांच्या रिक्विझिशनप्रमाणे पाठविण्यात येतील. दुसरे असे की, मराठी भाषेच्या प्रसाराचे काम वेगवेगळया डिपार्टमेंटमार्फत सुरु आहे. त्यामध्ये भाषा संचालनालय व राज्य मराठी विकास संस्था ही सामान्य प्रशासन विभागाच्या अंतर्गत येते, ग्रंथालय संचालनालय हे हायर एज्युकेशन डिपार्टमेंट अंतर्गत येते, लोक साहित्य समिती ही शालेय शिक्षण विभागांतर्गत येते, साहित्य अकादमी, पु.ल.देशपांडे अकादमी ही सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत येते. या सर्वांचा इंटिग्रेटेड विचार करणे आवश्यक आहे.त्याप्रमाणे शासन विचार करीत आहे. आणि इंटिग्रेटेड ॲप्रोच करुन एक धोरण ठरविण्यात येणार आहे. आपण सांगितलेल्या सर्व ऑब्जेक्टिव्हजप्रमाणे एक धोरण तयार करुन एकाच अम्ब्रेलाखाली सर्वांना आणण्याचे काम सांस्कृतिक विभागामार्फत करता आले तर चांगले होईल. या सर्व गोष्टी करणे शासनाच्या विचाराधीन आहेत. त्यासाठी पाऊले उचलण्यात आली असून त्यामधून अनेक प्रश्न सुटू शकतील.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, याठिकाणी भाषा संचालकाचे पद गेली दहा वर्षे भरले नाही. अनुवादकाची मराठी 15 पदे रिक्त आहेत. भाषा सल्लागार समिती स्थापन करण्यात आलेली नाही. भाषा संचालकाचे पद भरण्यासाठी कोणती अर्हता आवश्यक होती? गेली नऊ वर्षे लायक व्यक्ती आपल्याला मिळाली नाही काय? भाषा संचालकाचे पद आपण किती दिवसात भरणार आहात? तसेच, मराठी 15 अनुवादकांची पदे किती दिवसात भरणार आहात? भाषा सल्लागार समिती किती दिवसात स्थापन करणार? त्या समितीमध्ये किती सदस्य असणार आहेत?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, अनुवादकांची 10 पदे भरावयाची आहेत, बाकीची पदे भरली आहेत. 10 पदांचे रिक्विझिशन एम.पी.एस.सी.कडे पाठविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे एक महिन्याच्या आत सल्लागार समिती स्थापन करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. या समितीवर 10 सदस्य आहेत.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मघाशी एका महत्वाच्या विषयावर चर्चा करीत असतांना माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी कर्नाटक सरकारचा जी.आर. कानडी भाषेमध्ये निघत असल्याचे याठिकाणी दाखविले आहे. आणि दुसऱ्या भाषेमध्ये आम्ही जी.आर. काढणार नाही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

श्री. हेमंत टकले....

अशाप्रकारची कर्नाटक सरकारची माहिती त्यांनी दिली. एखाद्या राज्याचे भाषाविषयक धोरण असेल, इतर राज्यांचे सोडा परंतु कर्नाटक राज्यामध्ये या धोरणाची अंमलबजावणी होत असेल तर त्याची पुनरावृत्ती आपल्या राज्यामध्ये करण्यास हरकत नाही असे मला वाटते. मराठी भाषेविषयी शासन खरोखर गंभीर आहे? जर आपल्या राज्यामध्ये 8 ते 9 वर्षे पदे रिक्त रहात असतील, आणि शासकीय व्यवहारामध्ये "अधिक मराठी, सोपी मराठी" अशाप्रकारचे ब्रीदवाक्य आपल्याला वापरात आणावयाचे असेल तर आपल्याला केवळ चौकटीमध्ये राहून विचार करुन चालणार नाही. या चौकटीच्या बाहेर पडून मराठीचा अभ्यास करणारे विद्यापीठामध्ये अनेक तज्ज्ञ आहेत. या समितीमध्ये नियम करीत असतांना अशा तज्ज्ञ लोकांना समितीवर घेणे गरजेचे आहे.आपल्याकडे सचिव पातळीवर समित्या नेमण्यात येतात त्यामध्ये मराठी भाषिक किती असतात याबद्दल साशंकता आहे. याबाबत विचार करीत असतांना गांभीर्याने ही पदे भरीत असतांना जर अर्हतेमध्ये बसत नसतील तर तात्पुरत्या स्वरुपामध्ये विद्यापीठाकडून कुणाला तरी बोलावून हे काम सातत्याने चालू राहीले तर त्यामध्ये गुणात्मक वाढ होईल यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ ST/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:00

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, ही फार चांगली सूचना आहे. मी आता सांगितले की, शासन एक कॉम्प्रिहेन्सिव्ह पॉलिसी करण्याच्या बाबतीत विचार करीत आहोत आणि सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत, त्या सगळया सूचनांचा आपण त्यामध्ये अंतर्भाव करु.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देऊ इच्छितो. कारण त्यांनी या विषयाच्या बाबतीत सकारात्मक भूमिका घेतली असून निर्णय घेण्याच्या बाबती कालमर्यादाही ठरविलेली आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

----

. . . .2 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रायगड जिल्ह्यातील सावित्री बाणकोट खाडीतून मोठ्या प्रमाणात होत असलेले रेतीचे उत्खनन

**मु. शी.** : रायगड जिल्ह्यातील सावित्री बाणकोट खाडीतून मोठया प्रमाणात होत असलेले रेतीचे उत्खनन यासंबंधी श्री.रामदास कदम, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रायगड जिल्हयातील सावित्री बाणकोट खाडीतून मोठया प्रमाणात बेकायदेशीरपणे रेतीचे उत्खनन होत असल्याचे माहे मार्च, 2010 मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास येणे, नियमानुसार रात्रीच्या वेळी उत्खनन न करण्याचे आदेश असतानाही काही ट्रेलर चालक नियम डावलून बेकायदेशीर रेतीचा उपसा करत असून प्रत्येक ट्रेलर किमान 24 तासामध्ये 400 ब्रास रेती उत्खनन करीत असणे, त्यामुळे ठेकेदारास प्रचंड रॉयल्टी मिळत असणे, परिणामी शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असूनही याकडे शासनाचे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, शासनाकडून ठेकेदारांस पाठिशी घालण्याचा होत असलेला प्रयत्न, बेकायदेशीर होणाऱ्या रेतीच्या उत्खननास आळा घालण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 एन-3



APR/ ST/ KGS/ 14:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, याठिकाणी निवेदनामध्ये सविस्तर उत्तर देण्यात आलेले आहे. फक्त एकाच मुद्याबाबत मला विचारावयाचे आहे की, याठिकाणी बेकायदेशीरपणे रेतीचे उत्खनन करताना अनेक लोकांना पकडलेले आहे, त्यांचे ट्रेलर देखील पकडलले आहेत आणि त्यांच्यावर कारवाई देखील केलेली आहे. पण त्यांनी किती वाळू काढली ? शासनाचा किती महसूल बुडवला आहे? संबंधितांकडून सदरहू महसूल वसूल केला जाईल काय ? याबाबतीत मी जी माहिती काढलेली आहे, त्यानुसार काही ठिकाणी खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांच्या संगनमताने अशा प्रकारे सूर्यास्तानंतर वाळू काढली जाते. तेव्हा भविष्यामध्ये अशा प्रकारे रात्रीच्या वेळेस जर कोणी वाळू काढली आणि शासनाचा महसूल बुडवला तर संबंधित अधिकाऱ्याला देखील दोषी समजणार आहात काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदासजी कदम यांनी जो प्रश्न विचारलेला आहे की, रात्रीच्या वेळेला ट्रेलरच्या माध्यमातून बेकायदेशीरपणे वाळू काढणाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ? तसेच याचे क्षेत्र किती आहे ? याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो आणि विश्वास देऊ इच्छितो की, त्यासंबधातील कारवाई सुरु केलेली आहे. काही पथक तेथे गस्त घालत असून, काही ट्रेलरही पकडलेले आहेत. म्हणून रात्रीच्या वेळेला बेकायदेशीररित्या अशा प्रकारे वाळू काढणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल आणि त्यांचे ड्रेझरही जप्त केले जातील. कोणत्याही प्रकारे बेकायदेशीररित्या वाळू काढली जाणार नाही याची शासन काळजी घेईल.

----

. . . .2 एन-4

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

16-04-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) NN-4

APR/ ST/ KGS/ 14:00

**पृ.शी.** : पुणे जिल्ह्यामध्ये पाच लाख सीएफएल दिवे गत पंधरा

महिन्यापासून गोदामामध्ये पडून असणे

**मु.शी.** : पुणे जिल्ह्यामध्ये पाच लाख सीएफएल दिवे गत पंधरा महिन्यापासून गोदामामध्ये पडून असणे यासंबंधी सर्वश्री विक्रम काळे, रमेश शेंडगे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे जिल्ह्यातील वीजग्राहकांना सवलतीच्या दरामध्ये वितरीत करण्यासाठी देण्यात आलेले पाच लाख सीएफएल दिवे गत पंधरा महिने गोदामात पडून असणे, युएनडीपी कार्यक्रमांतर्गत एका कंपनीच्या सहाय्याने सीएफएल दिवे वितरीत करण्याची योजना वीज वाचविण्याच्या दृष्टीने जाहिर करुन सदर योजनेची अंमलबजावणी न होणे, त्यामुळे ग्रामीण भागातील वीज ग्राहकांना भारनियमाचा त्रास मोठ्या प्रमाणात सहन करावा लागणे, सबब गोदामात पडून असलेले सीएफएल दिवे तातडीने वितरीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विजय वडेट्टीवार (ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 एन-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, पुणे जिल्ह्यातील पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये घरगुती वीज ग्राहकांसाठी जवळपास 5 लाख सीएफएल बल्ब खरेदी करण्यात आलेले आहेत. ही

योजना न राबविल्याने 5 लाख सीएफएल बल्ब कंपनी परत घेऊन गेलेली आहे, म्हणजेच ही योजना कोणती होती ? ही योजना फक्त पुणे जिल्ह्यासाठीच होती का ? महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांसाठी ही योजना नव्हती काय ? तसेच करार संपल्यानंतर विद्युत कंपनीने पुरवठ्याचा स्वीकार का केला ? याबाबतीत तांत्रिक तपासणी न करता ज्यांनी 5 लाख दिवे घेतले, अशा अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ? तसेच 5 लाख दिवे परत नेल्याने राज्य शासनाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे आपण या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करणार आहात काय ? असा माझा महत्वाचा प्रश्न आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, खरे म्हणजे एकतर ही योजना राबविताना ब्युरो ऑफ एनर्जी एफीशिअन्सी केंद्र सरकार आणि महावितरण कंपनी आणि ओसराम लिमिटेड, दिल्ली या तिघांनी मिळून 2007 मध्ये सामंजस्य करार केला होता आणि याबाबतचा रितसर करार 2008 मध्ये करण्यात आला. सीएफएल बल्बच्या बाबतीत ज्या पुरवठ्याच्या बाबतीत हा करारनामा होता आणि मेसर्स ओसवाल कंपनीने हा करारनामा केल्यानंतर 2008 मध्ये साधारणत: वितरण विभागाला बल्बचा जो पुरवठा केला आहे, ते खरेदी केलेले नाहीत. संबंधितांनी बल्बचा पुरवठा करीत असताना कमी . . . .

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, हे बल्ब खरेदी केलेले नाहीत. मग त्यांनी ते दान केलेले आहेत काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, होय, दानच दिलेले आहेत. माझे वाक्य पूर्ण होऊ द्यावे. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा. महाराष्ट्रातील ग्रामीण भागासाठी सीएफएल दिव्यांच्या बाबतीत करारनामा झाल्यानंतर जुने बल्ब काढून घ्यावयाचे आणि हे बल्ब लावावयाचे. यासाठी या बल्बची किंमत 15 रुपये प्रमाणे मेसर्स ओसवाल यांनी ग्राहकांकडून वसूल करावयाची आहे. यासाठी शासनाच्या तिजोरीतून एकही रुपया खर्च केलेला नाही.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)**

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार..

दुसरी गोष्ट अशी की, हे बल्ब डिसेंबर, 2008 च्या आत शासनाकडे पुरवायला पाहिजे होते. परंतु त्यांनी हे बल्ब डिसेंबर, 2008 ते डिसेंबर, 2009 पर्यंत पोहचवले आहेत. त्यावेळेस भारतीय मानकामध्ये बदल झाला. या बल्बची चाचणी करण्यात आली त्यावेळेस या बल्बच्या पॉवर फॅक्टरमधील फ्रिक्वेन्सी 0.6 होती ती 0.85 आढळून आली. हारमोनिक्स 30 टक्के पाहिजे होते ते 79 टक्के आढळून आले. फ्रिक्वेन्सी 0.5 हारमोनिक्स हे 10 टक्के पाहिजे होते ते 51 टक्के आढळून आले. त्यावेळी या कंपनीला असे कळविण्यता आले की, देण्यात आलेल्या स्पेसिफिकेशन्स प्रमाणे हे बल्ब नाहीत. सभापती महोदय, हे बल्ब वापरले असते तर विद्यार्थ्यांच्या डोळयावर त्याचा विपरीत परिणाम झाला असता. सभापती महोदय, हे संपूर्ण बल्ब कंपनीने परत नेलेले आहेत. आता शासनाकडे कुठल्याही प्रकारचे बल्ब उपलब्ध नाहीत.

ॲड. वंदना चव्हाण : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे जे सीएफएल बल्ब पुरविले गेले होते त्याच्या मोबदल्यात कार्बन क्रेडीटस्मध्ये त्या कंपनीला पैसे देण्यात आलले होते, ही गोष्ट खरी आहे काय? कार्बन क्रेडिटच्या अनुषंगाने कंपनीला ऑलरेडी पैसे मिळालेले आहेत त्यामुळे त्यांनी हे बल्ब दिलेले आहेत. सभापती महोदय, आपला साधा बल्ब खराब होतो त्यावेळी आपण तो कचऱ्यात टाकून देतो. पण सीएफएल बल्ब असा टाकला तर त्यामधून मर्क्युरीचे लिकेज होते आणि ते ग्राऊंड वॉटच्यादृष्टीने अत्यंत घातक आहे. यासाठी शासनाने काही रुल्स ॲण्ड रेग्युलेशन्स केलेले आहेत काय?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले होते की, जुने आयएसआय स्पेसिफिकेशन होते त्याप्रमाणे ते बरोबर होते परंतु नंतर बल्ब देण्यासाठी जो कालावधी लावला त्यावेळी करारनाम्याचा कालावधी संपलेला होता.

ॲड. वंदना चव्हाण : विजेचा वापर कमी केला तर त्याबद्दल त्यांना दुसरीकडून पैसे मिळतात. अशा प्रकारे या ओसराम कंपनीला दुसऱ्या लोकांनी ऑलरेडी पैसे दिलेले आहेत म्हणून यांना ते बल्ब फ्री देणे शक्य झाले पण ते बल्ब फ्री देऊन सुध्दा त्यांचा उपयोग झाला नाही. पण कंपनीला मात्र पैसे मिळाले आहेत असे माझे म्हणणे आहे.

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, कार्बन क्रेडिटचे कंपनीला पैसे मिळणार होते परंतु या कंपनीला एकही रुपया मिळाला नाही कारण त्यांनी कराराच्या अटी व शर्ती पाळलेल्या नाहीत. कराराप्रमाणे मुदतीत माल दिला नाही. कराराप्रमाणे स्पेसिफिकेशन्सप्रमाणे माल उपलब्ध नव्हता. पण ग्लोबल वार्मिंगच्या स्पर्धेमध्ये उतरता येऊन भविष्यामध्ये त्याचा फार मोठा फायदा होणार होता ही वस्तुस्थिती आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, मोठया प्रमाणात बल्ब परत करण्यात आले आहेत. सन्माननीय सदस्या ॲड. चव्हाण यांनी सांगितले की, कार्बन क्रेडिटच्या बदल्यात हे बल्ब देण्यात येणार होते. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, कार्बन क्रेडिट मिळालेले नाही, कुठल्याही प्रकारचे पैसे मिळालेले नाहीत. कुठल्याही अटी मान्य केलेल्या नाहीत. शर्तींचा भंग झालेला आहे. अशा कंपनीला शासन काळया यादीत टाकणार काय?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, कार्बन क्रेडिटचा वापर झाल्यानंतर आणि कंपनीचे प्रमाणपत्र दिल्यानंतर पैसे दिले जातात. तत्पुर्वी..

डॉ. दीपक सावंत : कार्बन क्रेडिट वापरायचे नसते.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, आपण बल्बचा वापर झाल्यानंतर सर्टिफिकेट देतो. आपण वापरच केला नाही त्यामुळे सर्टिफिकेट देण्याचा प्रश्न येत नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, कार्बन क्रेडिटचा अर्थ माननीय मंत्रिमहोदयांनी समजावून सांगावा. माननीय मंत्रिमहोदय वापर झाला नाही असे सांगत आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कार्बन क्रेडिटचे पैसे कोण देतात ? हायड्रॉलिक प्रोजेक्टमधून जी वीज निर्मिती करतात त्या ठिकाणी कोळसा जाळून कार्बन निर्माण करीत नाहीत म्हणून त्यांचे कार्बन क्रेडिट जमा होते. त्याला कार्बन क्रेडिट म्हणतात. कार्बनचे उत्सर्जन केले नाही त्याबद्दल ते कार्बन क्रेडिट असते. त्याचे पैसे शासन देत नाही. यासंदर्भातील जागतिक संघटनेकडून डॉलरच्या स्वरुपामध्ये पैसे दिले जातात. शासनाचा त्याच्याशी काही संबंध नाही. जागतिक पर्यावरणाच्या दृष्टीने हायड्रॉलिक प्रोजेक्ट्सला जास्तीत जास्त प्रोत्साहन देणे हा त्यामागे उद्देश आहे. यामध्ये कोट्यवधी रुपये येतात. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांनी पैसे दिले नाहीत असे सांगू नये.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्ण ऐकून घेतल नाही. कार्बन क्रेडिटमुळे ग्लोबल वॉर्मिन्ग कमी होण्यास मदत होते. त्याचा फायदा कंपनी युनायटेड नेशन्समध्ये उचलते. सन्माननीय सदस्यांचा जो मूळ प्रश्न होता त्याबाबत सांगू इच्छितो की, आपण बल्बचा वापरच केला नाही. आपण बल्बची पुन्हा तपासणी केली. बल्बचा वापरच केला नाही त्यामुळे त्यांना कोणतेही सर्टिफिकेट देण्याचा प्रश्न नाही. त्यांनी सगळे बल्ब उचलून नेले. मी बल्बच्या वापराबाबत सांगत आहे आणि सन्माननीय सदस्य कार्बनच्या वापराबाबत सांगत आहेत...

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

ॲड. अनिल परब : त्यांनी अटी व शर्तीचा भंग केलेला आहे त्यामुळे त्यांना काळ्या यादीत टाकणार काय ?

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या ठिकाणी प्रश्नाचे उत्तर येत नाही त्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

..2...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्य आम्हाला राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेस यांचे भांडण बघावयाचे नाही. प्रश्न विचारणारे सदस्य राष्ट्रवारी कॉंग्रेसचे आहेत आणि उत्तर देणारे मंत्रिमहोदय कॉंग्रेसचे आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्य लक्षवेधी सूचना राखून ठेवा अशी मागणी करीत आहेत. नेहमी ते तसे बोलत नाहीत.

डॉ. दीपक सावंत : त्यांना काळ्या यादीत टाकणार काय याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, ज्यावेळी सामंजस्य करार झाला त्यावेळी आयएसआय च्या स्पेसिफिकेशनप्रमाणे ते बरोबर होते परंतु ते मुदतीत बल्ब पुरवठा करु शकले नाहीत. त्यामध्ये त्यांनी विलंब केला. 2009 मध्ये बल्ब प्राप्त झाले. भारतीय मानकामध्ये डिसेंबर, 2009 मध्ये बदल झाल्यानंतर पुन्हा सगळ्या बल्बचे टेस्टिंग करुन घेतले. ते बल्ब स्पेसिफिकेशनमध्ये बसत नव्हते म्हणून त्यांना पत्र दिले की, हे बल्ब स्पेसिफिकेशनमध्ये बसत नसल्यामुळे परत घेऊन जावे. ते बल्ब परत केले. यामध्ये शासनाला एक रुपयाचाही भुर्दंड बसलेला नाही. शासनाने ते बल्ब परत केल्यामुळे त्यांना कोणताही मोबदला दिलेला नाही. त्यामुळे त्यांना काळ्या यादीत टाकण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही.

----

**लक्षवेधी सूचना क्रमांक 6 पुढे ढकलण्याबाबत**

**तालिका सभापती** ( श्री. रमेश शेंडगे ) : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत अनुक्रमांक 6 वर दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेबाबत सुधारित निवेदन येणार असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे. यानंतर विशेष उल्लेख घेण्यात येतील.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लोणार सरोवर या वैज्ञानिक पर्यटन केंद्राकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष

**मु. शी.** : लोणार सरोवर या वैज्ञानिक पर्यटन केंद्राकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□ीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

बुलढाणा जिल्हयातील लोणार हे जागतिक ठिकाण असून त्याठिकाणी अग्नीजन्य खडकात अशनिपातामुळे (उल्कापातामुळे) अंदाजे 52,000 वर्षांपूर्वी एक फार मोठे विवर (जमिनीतील खड्डा) तयार झाला आहे हा अंडाकृती खड्डा तयार झाल्यामुळे तेथे एक नैसर्गिक सरोसर तयार झाले आहे. या जलाशयाभोवती दाट वनराई असून गोड पाण्याचे झरे आहेत, मधमाशांचे पोळ, दुर्मिळ जीव जिवाणू आहेत. पाण्यात किरणोत्सार प्रतिबंधक जिवाणूचे अस्तित्व आहे. त्याचप्रमाणे या विवरात चुंबकिय दगड आढळतात तर टेकटाईलसारखे परग्रहावर आढळणारे स्फटीकही सापडतात असे विवर व पाणी मौल्यवान आहे, त्यामुळे हया लोणारला पौराणिक महत्व आले आहे. तसेच हया ठिकाणी असलेली मंदिरे प्रेक्षणीय आहेत. परंतु हया ठिकाणी जाण्यासाठी एस.टी.नाही, येथे जाण्याकरिता नामफलक व माहिती फलक नाही, पुरातत्व खात्याची उपमंडल लोणारला आहेत. परंतु मंदिराकडे व स्वच्छतेकडे पुरातत्व खात्याचे नगरपालिकेचे दुर्लक्ष होत आहे. येथे लाखो भाविक व हजारो वैज्ञानिक पर्यटक येतात अशा हया जागतिक किर्तीचे वैज्ञानिक पर्यटन केंद्राचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे यासाठी एक पर्यावरण रक्षण चळवळ उभारणे आवश्यक आहे. याप्रकरणी लक्ष वेधण्यासाठी मी विशेष उल्लेखांची सूचना देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

NTK/ ST/ KGS/

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयातील लोणार हे जागतिक ठिकाण असून त्याठिकाणी अग्नीजन्य घटक उल्कापातामुळे 52,000 वर्षापूर्वी विवर तयार झाले. पर्यावरणाच्या संदर्भात जालना येथे मराठी वैज्ञानिक परिषदेने डिसेंबर महिन्यामध्ये एक लोणार विवर संवर्धन परिषद आयोजित केली होती आणि अनेक संशोधक अनेक वेगवेगळया माध्यमांचेप्रतिनिधी हया परिषदेत सहभागी झ ााले होते. डॉ.सुधाकर बुगदाणे, उपाध्यक्ष हे त्या सरोवराशी संबंधित आहेत. या विवराकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. या विवरणमध्ये प्रेक्षणीय मंदिरे आहेत, त्याला पौराणिक महत्व आहे. त्या पाण्यात किरणोस्तर प्रतिबंधक जिवाणूंचे अस्तित्व आहे. मधमाशांची पोळी, दुर्मिळ जीव जिवाणू आहेत, असे असले तरी तेथे प्रचंड अस्वच्छता आहे, जागतिक किर्तीचे वैज्ञानिक पर्यटन केंद्रासाठी निधी उपलब्ध झाला असला तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही. म्हणून लोणार पर्यावरणाची चळवळ उभी राहणे आवश्यक आहे. डिसेंबर महिन्यामध्ये मी या विषयाची विशेष उल्लेखाची सूचना मांडली होती. त्याला अद्याप उत्तर आलेले नाही. विशेष उल्लेखाच्या सूचनांना विभागाकडून उत्तरे येत नाहीत यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो शब्दप्रयोग केला होता तो मी करणार नाही. (अडथळा) सभापती महोदय, विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे सातत्याने लक्ष वेधणे आणि संधी मिळेल तेव्हा बोलणे या पलिकडे काही अंमलबजावणी होत नसेल तर आपण तालिका सभापती म्हणून या विशेष उल्लेखाच्या सूचनांच्या संदर्भात शासनाने त्वरित पावले उचलावीत असे मी या विशेष उल्लेखाद्वारे सांगत आहे.

**तालिका सभापती ( श्री.रमेश शेंडगे )** : मंत्री महोदयांनी याची नोंद घ्यावी.

-----

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

**पृ. शी.** : कणकवली येथे तांत्रिक पदाच्या लेखी परीक्षेसाठी केवळ एमसीव्हीसीच्या उमेदवारांना अर्ज न पाठविणे

**मु. शी.** : कणकवली येथे तांत्रिक पदाच्या लेखी परीक्षेसाठी केवळ एमसीव्हीसीच्या उमेदवारांना अर्ज न पाठविणे याबाबत श्री.राजन तेली, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सिंधुदुर्ग जिल्हयातील कणकवली येथे एप्रिल, 2010 दरम्यान घेण्यात येणा-या तांत्रिक पदाच्या लेखी परीक्षेसाठी केवळ एमसीव्हीसी अभ्यासक्रम केलेल्या उमेदवारांनाच अर्ज पाठविण्यात आले नाहीत. केवळ आयटीआय अभ्यासक्रम केलेल्या उमेदवारांना अर्ज देण्यात आले हा अभ्यासक्रम शिकविणा-या संस्थांनी एमसीव्हीसी अभ्यासक्रम हा आयटीआय अभ्यासक्रमाशी समकक्ष आहे. असे मान्य केलेले आहे. परंतु एस.टी.महामंडळाच्या अधिका-यांनी हे दोन्ही अभ्यासक्रम समकक्ष नसल्याच्या कारणावरुन या विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेचे अर्ज पाठविले नाहीत असे जाहीर केले. अधिका-यांच्या बेजबाबदार भूमिकेमुळे या विद्यार्थ्यांचे नुकसान झाले असून त्यांना न्याय मिळण्याची गरज आहे. या सार्वजनिक महत्वाच्या विषयाकडे मी शासनाचे लक्ष वेधत आहे.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अकृषिकची परवानगी देणा-या अधिका-यांकडून नागरिकांना होणारा त्रास

**मु. शी.** : अकृषिकची परवानगी देणा-या अधिका-यांकडून नागरिकांना होणारा त्रास याबाबत श्री.सुभाष चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"शासनाच्या सध्याच्या धोरणाप्रमाणे राज्याच्या ग्रामीण भागात निवासी वापरासाठी अकृषिक (NA) ची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. परंतु अकृषिक (NA) च्या परवानगीसाठी शासनाच्या जाचक अटी व NA चा परवाना देणा-या अधिका-यांकडून होणारा छळ, शेकडो कागदपत्रांची पूर्तता इत्यादी बाबींचा विशेष विचार करुन, या योजनेची व्याप्ती वाढवून ग्रामीण भागात कोणत्याही अकृषिक (NA) (उदा.घरांचे बांधकाम/छोटी हॉटेल्स, छोटी छोटी दुकाने, पिठाची गिरणी, इत्यादी वापरांसाठी) परवानगीची आवश्यकता नाही असे धोरण शासनाने राबविण्याचा निर्णय घ्यावा व या सार्वजनिकदृष्टया व सामाजिकदृष्टया महत्वाच्या बाबींकडे या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो."

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 14:20

**पृ.शी.** : सी.बी.एस.ई, आय.बी.च्या शाळांवर शासनाने आणावयाचे नियंत्रण

**मु.शी.** : सी.बी.एस.ई, आय.बी.च्या शाळांवर शासनाने आणावयाचे नियंत्रण याबाबत श्री. भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

आपल्या राज्यात गेल्या काही वर्षापासून आंतरराष्ट्रीय शाळा, सी.बी.एस.ई.च्या केंद्रीय शाळा, आय.बी.च्या शाळा इत्यादी प्रकारच्या शाळांची संख्या लक्षणीय स्वरुपात वाढली आहे. या शाळांवर राज्य शासनाचे कोणतेही नियंत्रण असत नाही. या शाळांतून मनमानी पध्दतीने भरमसाठ फी गोळा करण्यापासून अनेक प्रकारचे गैरप्रकार सुरु असतात. या विशेष उल्लेखाद्वारे मी राज्य शासनास विनंती करीत आहे की या शाळांवर राज्य शासनाचे नियंत्रण आणण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना तातडीने करावी. तसेच यापुढे या प्रकारच्या नवीन शाळांना महाराष्ट्रामध्ये प्रवेश देण्यास मनाई करावी. सदर विषय अतिमहत्वाचा व सार्वजनिक हिताचा असल्याने तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे सादर करीत आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुलुंड येथील 35 ई शिधावाटप कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**मु.शी.** मुलुंड येथील 35 ई शिधावाटप कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत श्री. चरणसिंग सप्रा, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. चरणसिंग सप्रा यानी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. चरणसिंग सप्रा (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

मुलुंड मुंबई येथील पश्चिमेस असलेल्या 35 ई या शिधावाटप कार्यालयात गेल्या अनेक महिन्यापासून 60 टक्के अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे असून या कार्यालयात कर्मचा-यांची संख्या अपुरी आहे. अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे या शिधावाटप कार्यालयात शिधापत्रिकेच्या कामाकरिता येणा-या नागरिकांना वारंवार येऊनही त्यांची कामे पूर्ण होत नाहीत. कर्मचा-यांना रजा घेणे सुध्दा शक्य होत नाही. शिधापत्रिकेची कामे वेळेवर पूर्ण होत नसल्याने अनेक सर्वसाधारण व गरीब नागरिकांना शिधापत्रिकेवर मिळणा-या वस्तू मिळत नाहीत, ब-याच सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र असंतोष व संतापाची भावना निर्माण होत आहे. सबब सदरहू शिधावाटप कार्यालयात असलेला अपुरा कर्मचारी वर्ग त्वरित भरण्याची नितांत आवश्यकता आहे. या सार्वजनिकदृष्टया महत्वाच्या बाबीकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : भंडारा जिल्ह्यातील कटंगी मध्यम प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**मु.शी.** : भंडारा जिल्ह्यातील कटंगी मध्यम प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत श्री. केशवराव मानकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यानी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"जिल्ह्यातील कटंगी मध्यम प्रकल्पात कटंगी, पाथरी, पिंडकेपार, हिवरटोला, शाईटोला या गावातील जवळ जवळ 700 हेक्टर आर. ही अत्यंत सुपीक जमीन सन 1994 पासून शासनाने प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रासाठी संपादित करणे, जमिनीचा मोबदला म्हणून सरासरी 30 हजार रुपये प्रती एकर प्रमाणे सन 2003 ला 80 टक्के, तसेच सन 2006ला 20 टक्के याप्रमाणे देण्यात येणे, सदर संपादनाचे कार्य मध्यम पाटबंधारे विभाग आणि विशेष भूअर्जन (बा.व.ई.) जिल्हाधिकारी कार्यालय क्र. 10 ने मामला क्र 11 अ/65/99-2000 अन्वये करणे, याप्रमाणे अधिकाराचा वापर करुन अधिका-यांनी जबरीने शेतक-यांच्या शेतातील झाडे व पिकांची नासधूस करणे, परंतु संपादनाला 12 वर्षाचा कालावधी लोटूनही संबंधित प्रकल्पग्रस्तांना अद्याप सिंचन विहिरींचा मोबदला आणि जमिनीचे भूभाडे (पीक नुकसान भरपाई) प्राप्त न होणे, या संदर्भात प्रकल्पग्रस्तांनी शासनाकडे वारंवार केलेली निवेदने, मोर्चे, वृत्तपत्रातून लक्षवेधण्याचा केलेला प्रयत्न, परंतु शासनाचे याकडे झालेले दुर्लक्ष लक्षात घेता 10 एप्रिल 2010 रोजी गोरेगांव येथे पाच हजार प्रकल्पग्रस्तांनी केलेले आंदोलन, या प्रकल्पग्रस्तांना ताबडतोब न्याय देऊन त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्याची आवश्यकता.

सभापती महोदय, या संदर्भात शेतक-यांनी महामहीम राष्ट्रपतींकडे देखील अर्ज केलेला आहे. त्यांना ताबडतोबीने न्याय देण्याची व्यवस्था करावी. "

--

..4..



**पृ.शी.** : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत असणा-या 100 महाविद्यालयात प्राचार्य नसणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.** : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत असणा-या 100 महाविद्यालयात प्राचार्य नसणे याबाबत श्रीमती मधु जैन यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्रीमती मधु जैन यानी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मधु जैन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडते.

"जळगाव जिल्ह्यातील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत असणा-या 202 महाविद्यालयापैकी 100 महाविद्यालयात प्राचार्य नसल्याने तेथील शैक्षणिक गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या क्षेत्रात 202 महाविद्यालये आहेत. यात जळगाव, धुळे, नंदूरबार यांचा समावेश असून अभियांत्रिकी महाविद्यालयांचाही समावेश आहे. शिक्षणाचा दर्जा सुधारावा यासाठी जास्तीत जास्त महाविद्यालयांना परवानगी देण्यात येते. परंतु महाविद्यालयात प्राचार्य, प्राध्यापक नसल्याने 10 हजार विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात आले आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत येणा-या 12 अभियांत्रिकी महाविद्यालयात अजूनपर्यन्त प्राचार्यच मिळालेला नाही. 202 महाविद्यालयात 2383 प्राध्यापकांची पदे आहेत. यातील फक्त 1719 पदे म्हणजे शेकडा 72 टक्के पदे भरली गेली आहे. मात्र 664 पदे अजूनही रिक्त आहेत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.मधु जैन.......

प्राध्यापक नसल्याने संबंधित विषयाच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष होत आहे. एकच प्राध्यापक सात ते आठ वर्गांवर विषय शिकवितो अशी स्थिती आहे. याकडे कुलगुरुंसह शिक्षण विभागाचे दुर्लक्ष होत आहे. अनेकवेळा निवेदने देऊनही उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कारभारात पारदर्शकता आलेली नाही. उच्च न्यायालयाने 31 मे पर्यंत पदे भरण्याचे आदेश दिले असताना सुध्दा उच्च न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली होत आहे. दुर्लक्षित अशा आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यादृष्टीने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना करण्यात आले. परंतु ते उद्दीष्ट पूर्ण होत नाही. ज्या महाविद्यालयांना प्राचार्य व प्राध्यापक मिळत नाहीत त्यांची मान्यता रद्द करण्यात आली पाहिजे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळेल. यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे म्हणून मी या विषयावर विशेष उल्लेखाच्या सूचना मांडली आहे.

--------

**तालिका सभापती** (श्री.रमेश शेंडगे) : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. दुपारी 3.00 वाजता सभागृहाची बैठक पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.26 ते 3.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे )**

**पृ.शी.** : राज्यातील शेतकरी विविध समस्यांमुळे अडचणीत येणे

**पृ.शी.** : राज्यातील शेतकरी विविध समस्यांमुळे अडचणीत येणे या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, पाशा पटेल, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, श्री. केशव मानकर, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री संजय केळकर, परशुराम उपरकर, चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरु.....

**तालिका सभापती** : आता नियम 260 अन्वयेच्या चर्चेचे उत्तर सुरु होईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, सभागृहाचे कामकाज त्वरित थांबवावे अशी विनंती मी आपल्याला करणार आहे. बेळगांव-कारवार या सीमा भागाबाबत आज सकाळीच सभागृहात चर्चा झाली. दोन्ही बाजूने आपले मुद्दे उपस्थित केले, अतिशय आनंदाचे वातावरण होते की या भागातील पाच हजार नगरसेवक आपल्याकडे दाद मागण्यासाठी आले आहेत आणि ही विधानपरिषद किमान बेळगांव-कारवारच्या भावनांशी एकरुप होऊन त्यांच्या मागे एकमुखाने उभे आहोत. सर्वात आनंदाची बाब म्हणजे सभागृहातील चर्चेनंतर माननीय माजी विरोधी पक्षनेते श्री. रामदास कदम यांनी आपले विचार मांडले तसेच हा प्रश्न केवळ व्यक्तिगत न ठेवता आपण देखील या प्रस्तावाचा सन्मान केला आणि एकमुखाने हा ठराव मंजूर केला. यामागे फार उच्च प्रतीची भावना होती. मी स्वत: देखील, आपल्या नेतृत्वाखाली संपूर्ण सभागृहातील सदस्य या लोकांना भेटण्यासाठी जावे आणि एक चांगला पायंडा पाडावा अशी विनंती केली होती. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी सुध्दा त्या विनंतीला मान देऊन तशी सूचना केली होती. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या. अशा प्रकारे सर्वांनी एकमताने या ठरावावर आपले विचार व्यक्त केले. मी आणि माननीय विरोधी पक्षनेते माननीय सभापतींना भेटून विनंती केली होती की आपण किमान अर्धा तास तरी सभागृहाचे कामकाज थांबवावे आणि जेवढे सोबत येतील तेवढ्यांना घेऊन सीमा भागातील लोकांना आझाद

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

मैदानात भेटण्यासाठी जाऊ. त्यावेळेस त्यांनी माननीय अध्यक्षांना फोन लावला. माननीय अध्यक्ष म्हणाले की मी माननीय मुख्यमंत्र्यांशी बोलतो. अशा प्रकारे सर्वांना आपण एकत्र मानतो आणि याच भावनेतून विधिमंडळाचा एकमुखी पाठिंबा म्हणून एकत्रित जाण्याचा विचार करतो. ज्यावेळेस माननीय मुख्यमंत्री जातात त्यावेळी तो सरकारचा पाठिंबा असतो. विधिमंडळाचे सदस्य ज्यावेळेस जातात त्यावेळेस मात्र राज्यातील संपूर्ण जनतेचा, सर्वपक्षीय पाठिंबा असतो आणि त्याचा प्रतिध्वनी सुध्दा तसाच उमटतो की महाराष्ट्राची एकमुखी राजकीय इच्छाशक्ती आपल्या पाठिमागे उभी आहे, हा त्यातील संदेश असतो. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी मघाशी मला एक चिठ्ठी दाखविली. त्यात म्हटले होते की, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मला फोन केला व आपण सोबतच जाऊ असे सांगितले. खरे म्हणजे सीमा बांधव दोन तीन दिवसांपूर्वी रंगशारदा सभागृहात माननीय उध्दवजी ठाकरे यांना भेटण्यासाठी आले होते, त्यावेळेस आम्ही सुध्दा उपस्थित होतो. त्यांनी सर्वांनाच निमंत्रण दिले. परंतु माननीय उध्दवजी ठाकरे जातील ते एक पक्ष प्रमुख म्हणून जातील आणि विधिमंडळातील सदस्य जातील तो एक राज्यातील जनतेचा एकमुखी पाठिंबा, सर्वपक्षीय ताकद असा संदेश जाईल. मघाशी माननीय विरोधी पक्षनेते संभाजीनगरला गेले. मी त्यांना विचारले की, आपल्याला सीमा बांधवांना भेटायला जाण्यासंबंधीचा निरोप आला नाही काय ते म्हणाले नाही, मला तसा निरोप आला नाही. शेवटी तो त्यांचा अधिकार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांची इच्छा आहे, त्यांनी जावे, जाण्याबद्दल प्रश्न नाही परंतु आम्ही सुध्दा आमच्या भावना व्यक्त करण्यासाठी जाऊन आलो असतो. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई हे गट नेते म्हणून जाऊन आले, माननीय विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव खडसे यांच्याबाबत मला माहीत नाही. पण ज्यावेळेस सभागृहात एकमुखी भावना तयार करुन आपण भाषण करतो आणि कृती मात्र व्यक्तिगत स्वरुपाची करतो, हे उचित नाही. अशा प्रकारे ही व्यक्तिगत राजकीय इच्छाशक्तीच बेळगांव-कारवारला मनापासून बळ देऊ शकत नाही यातून "बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी" अशी परिस्थिती निर्माण होते याचा मला खेद वाटतो.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिवाकर रावते....

बेळगाव,कारवारचा प्रश्न गेल्या 50 वर्षापासून का सुटत नाही. कोर्टात असे काय निर्माण झाले आहे ? सर्वपक्षीय नेतृत्त्व माननीय मुख्यमंत्र्यांनी का केले नाही ? हे मला समजू शकले नाही. बेळगाव,कारवारचा आवाज बुलंद करायचा असेल तर भविष्यात किमान अशा चुका होऊ नये असे मला वाटते. बेळगाव मधील जनता महाराष्ट्रातील राजकीय इच्छा शक्तीच्या बळावर गेली तीन पिढ्या लढत आहेत. त्यांचे बळ अशाने खचून जाऊ नये म्हणून मी ही बाब आपल्या निदर्शनास आणून देत आहे. मी या सर्व प्रकाराचा खेद करतो. धन्यवाद.

**तालिका सभापती** (श्री.रमेश शेंडगे) : आता सन्माननीय मंत्री महोदय नियम 260 च्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा जो प्रकार झाला आहे,त्यासंबंधी आपण सभागृहाला अवगत करावे.

**तालिका सभापती** : या प्रश्नासंबंधी आपण सकाळी सभागृहाचे कामकाज चर्चा होऊन तहकूब केले होते. आता चर्चेला उत्तर होऊ द्यावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, विषयाचे गांभीर्य शासनाला नसल्यामुळे आपण सभागृह तहकूब करावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही आमचे म्हणणे मांडल्यानंतर कामकाज सुरू झाले की,विषय संपतो. या प्रश्नाबाबत माननीय मुख्यमंत्री असे का वागले हे आम्हाला समजले पाहिजे.

**तालिका सभापती** :माननीय सभापतींनी सकाळी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटाकरिता स्थगित केले होते. तहकुबीनंतर आपले कामकाज व्यवस्थितपणे पूर्ववत सुरू झालेले आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,सभागृहाच्या एकमुखी आवाजाला माननीय मुख्यमंत्र्यांनी अवमानित केले असे मी म्हणणार नाही. मी पुन्हा सांगतो. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी ठराव मांडला होता. त्या भावनेला संपूर्ण सभागृहाने सन्मानित केले. तेव्हा आम्ही अशी विनंती केली आपल्या नेतृत्त्वाखाली सर्वजण त्यांना भेटायला जाऊ या. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

म्हणून आम्ही माननीय सभापतींकडे जाऊन बसलो. त्यांनी माननीय अध्यक्षांना फोन लावला. मा.अध्यक्ष, मा.सभापती, मा.मुख्यमंत्री मा.विरोधी पक्ष नेते, सर्व पक्षाचे मा.गट नेते या सर्वांनी त्या लोकांना भेटण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रातील विधिमंडळाचा बुलंद आवाज त्यांच्या पाठिशी उभा आहे असे चित्र निर्माण करीत असताना आम्हाला आता असे कळले की, माननीय मुख्यमंत्री एकाएकी त्यांना भेटायला गेले आहेत. आम्हाला असा निरोप देण्यात आला होता की, आम्ही जेव्हा निघू तेव्हा आपल्याला कळवू. आम्हाला कोणताही निरोप आला नाही. मला वाटले मला निरोप आला नसेल. मला वाटले माननीय विरोधी पक्ष नेत्यांना निरोप आला असेल म्हणून मी त्यांना विचारले. त्यांनी सांगितले की, मलाही कोणी बोलाविले नाही. वाट पाहून ते शेवटी त्यांच्या कामाला निघून गेले. याबाबत त्यांचा दूरध्वनी मला आला होता. हा काय प्रकार आहे ? या सदनामध्ये बोलायचे एक आणि कृती करायची वेगळी, हे काही बरोबर नाही. ही सीमा बांधवांची अवहेलना आहे.

**उप सभापती** : श्री.रावते साहेब सन्माननीय मुख्यमंत्री विधान भवनात असताना माझ्याकडे देखील बसले होते. त्यावेळी महाराष्ट्र एकीकरण समितीचे लोक त्यांना बोलवायला आले होते. त्यानंतर ते गेले. मुख्यमंत्री संज्ञा ही अशी आहे की, ती संपूर्ण राज्याचे प्रतिनिधीत्त्व करत असते. त्यामुळे मुख्यमंत्री या संज्ञेकडे कोणी पक्षीय भावनाने पाहण्याची आवश्यकता नाही. आपण सर्वांनी सभागृहामध्ये एकमुखाने ठराव मंजूर केला. सगळ्यांच्यावतीने ते तेथे गेले अशी भावना आपण सर्वांनी एकमुखी बाळगली तर ते सर्वात जास्त उचित ठरेल. विरोधी पक्षाला बोलाविले नाही अशातला काही प्रकार नव्हता. तसा आपण गैरसमज करून घेऊ नये. त्यामुळे मला असे वाटते की, आपण सभागृहाचे कामकाज सुरू करावे. मी एकच सांगितले की, मुख्यमंत्री हे कुठल्या एका पक्षाचे नसतात. कारण नसताना आपण संकुचित भावना बाळगू नये.

यानंतर श्री गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, व्यापक दृष्टीकोन माननीय मुख्यमंत्र्यांनी घ्यावयास पाहिजे होता माननीय मुख्यमंत्र्यांची संकुचित भावना आहे असे यावरुन दिसत आहे.आम्ही या ठिकाणी सीमा प्रश्नाच्या बाबतीत प्रस्ताव मांडण्यासंबंधी सतत हट्ट धरला होता त्याप्रमाणे आज तो प्रस्ताव मांडला आणि सर्वानी त्याला अनुमोदन दिले त्याबद्दल मला आनंद वाटला तशाच प्रकारची व्यापक भूमिका माननीय मुख्यमंत्र्यांनी घ्ेतली असती तर मला आणखी आनंद वाटला असता. माननीय मुख्यमंत्र्याबरोबर विधिमंडळातील सदस्य तेथे गेले असते तर संपूर्ण देशात एक वेगळा संदेश गेला असता व तो संदेश केन्द्रापर्यत पोहोचला असता. त्यामुळे कर्नाटक सरकारसुध्दा हादरले असते. तसे होणे आवश्यक आहे व त्यासाठीच आपल्या सर्वाचा उपद्व्याप सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी जी भावना मांडली आहे ती चुकीची नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी व्यापक दृष्टीकोन घ्यावयास पाहिजे होता. आमचे संकुचित विचार नाहीत तर माननीय मुख्यमंत्र्यांचे संकुचित विचार आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सीमा प्रश्नावर आमचे काही योगदान आहे, त्या प्रश्नावर आम्ही काही गमावले आहे, तसेच आम्ही फटके देखील खाल्ले आहेत. इतकेच नव्हे तर आम्ही तुरुंगवाससुध्दा भोगला आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी यावर बोलत असतांना सांगितले की, त्या प्रश्नावर श्री.नारायण राणे आणि इतरांनी आंदोलन केले होते. सर्वानी सोसले असल्यामुळे त्यांनी तशा प्रकारच्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यामुळे हा पक्षीय मुद्दा नाही. सीमा प्रश्नाच्या संदर्भात आपण प्रस्ताव मांडला आणि एकमताने पारित केला होता . माननीय मुख्यमंत्र्यानी काय करावे हे सांगण्याचा मला अधिकार नाही. राज्याचा प्रमुख म्हणून राज्यातील पूर्ण राजकीय इच्छा शक्ती माझ्यामागे उभी आहे आणि सीमा प्रश्नासबंधी मी जेव्हा लढेन तेव्हा संपूर्ण विरोधी पक्ष माझ्या मागे आहे अशा प्रकारची भावना माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडण्यासाठी सर्वानी एकत्रितपणे तेथे जाण्याचे ठरले होते.तशा प्रकारचा मला निरोप दिला होता परंतु माननीय मुख्यमंत्री त्यांना भेटावयास गेले आहे. त्यांना जाऊ द्यावे. तो विषय त्यांचा आहे . सरकार त्यांना भेटावयास गेले आहे तेव्हा सरकारकडे जर हिंमत असती तर त्यांनी आतापर्यत कधीच दगड मारुन पाणी काढले असते. परतु सरकारमध्ये हिंमतच नाही हाच सरकारमधील दोष आहे. त्यामुळे आम्हाला येथे बोलावे लागते , ठराव मांडावा लागतो, विचारावे लागते त्यानंतर येथे भाषणे केली

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

जातात ही बाब काही बरोबर नाही.सीमा प्रश्नासबंधीचे प्रकरण कोर्टात सुरु आहे असेच आतापर्यंत सागण्यात येत होते. महाराष्ट्रातील केन्द्रीय गृहमंत्री श्री.शिवराज पाटील चाकुरकर यांनी आपल्या विरोधात सुप्रीम कोर्टात प्रतिज्ञापत्र केले होते त्यामुळे शिष्टमंडळ न्यावे लागले होते आणि प्रतिज्ञापत्रात सुधारणा करावी लागली होती . सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांचा एकटयाचा हा प्रश्न नाही. सभागृहात हा प्रस्ताव मांडण्यात आल्यानंतर , सगळयांनी आपल्या भावना व्यक्त केल्यानंतर ,सर्व विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्याना घेऊन तेथे जाऊ असे सांगितल्यानंतर त्याप्रमाणे केले गेले नाही. म्हणून खेद व्यक्त करण्याकरिता मी एवढेच सागितले की जे काही घडले ते बरोबर झालेले नाही.याबाबतीत सरकार म्हणून कोण खुलासा करणार आहेत. ?

सभापती महोदय,सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांच्याशी मी फोनवरुन बोललो होतो त्यावेळी त्यांनी सांगितले की , मला सुध्दा बोलाविण्यात आले नाही.

श्री.विजय वड्ेटीवार (बसून) : माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर येथे नव्हते.

श्री.रामदास कदम : विधिमंडळाच्या बाहेर कोणीही गेलेले नाही. मी येथे आहे त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते देखील येथेच आहेत.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, सभात्याग करतो असे बोलावयाला सुध्दा मला वाईट वाटते म्हणून आम्ही खेद व्यक्त करतो आणि पाच मिनिटासाठी सभागृहाबाहेर जातो.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य सभागृहाबाहेर जातात )

-------

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील शेतकरी विविध समस्यांमुळे अडचणीत येणे

**मु.शी.**: राज्यातील शेतकरी विविध समस्यांमुळे अडचणीत येणे याविषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, पाशा पटेल, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, श्री. केशवराव मानकर, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री संजय केळकर, परशुराम उपरकर, चंद्रकांत पाटील, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे चालू)

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सभापती महोदय, काल या सभागृहामध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व अन्य माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा उपस्थित केली. त्या चर्चेमध्ये "शेती" या विषयासंबंधी काही महत्वाचे मुद्दे उपस्थित करण्यात आले. विशेषत: विदर्भातील शेतीच्या प्रश्नांच्या संदर्भात या सभागृहामध्ये अत्यंत सविस्तरपणे चर्चा झाली. मी यानिमित्ताने सांगू इच्छितो की, महाराष्ट्रातील शेतीच्या संदर्भात चर्चा करीत असतांना एक गोष्ट प्रामुख्याने विचारात घ्यावी लागेल की, महाराष्ट्रातील शेती ही मान्सूनवर आधारीत आहे. एकंदरीत राज्याचे 16 ते 17 टक्के सिंचन धरणातील पाण्यावर आधारीत असल्यामुळे आणि राज्यातील धरणांमध्ये होणारा पाण्याचा साठा सुध्दा मान्सूनवर अवलंबून आहे. या व्यतिरिक्त 85 टक्के क्षेत्राचे भवितव्य मान्सूनच्या पाण्यावर अवलंबून आहे.त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या शेतीची दुसरी प्रतिकूलता अशी आहे की, 47 टक्के शेतजमीन जमीन हलक्या प्रतीची आहे. आणि म्हणून मान्सूनवर आधारीत शेती व हलक्या जमिनीचा पोत या प्रतिकूलतेमुळे वेगवेगळया पध्दतीची शेती व्यवस्था पहावयास मिळते. सन 2001 हे वर्ष पाहिले तर त्या वर्षी मान्सून नॉर्मल राहिला आहे. सन 2002-03, 2003-04, 2004-05 आणि 2005-06 ही वर्षे मान्सूनच्या दृष्टीने दुष्काळी वर्षे राहिली आहेत. या कालावधीमध्ये संपूर्ण महाराष्ट्रामध्ये टंचाईची परिस्थिती होती. या कालखंडामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला, रोजगार हमी योजनेची कामे निर्माण झाली. त्यानंतर सन 2005 व 2006 या वर्षी अतिवृष्टी झाली, त्यानंतर सन 2007 हे वर्ष नॉर्मल राहिले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, काल या प्रस्तावावर चर्चा करीत असतांना मला एक उपसूचना मांडावयाची होती. तेव्हा सदर प्रस्तावाला एक उपसूचना मांडण्यासाठी आपण मला परवानगी द्यावी ही विनंती.

"ज्याप्रमाणे वीजेचे भाव कमी किंवा जास्त करण्यासंदर्भात शासनाने वीज नियामक मंडळ नावाचे एक व्यासपीठ निर्माण केले आहे. त्याप्रमाणे शेती मालाचे भाव ठरविण्याच्या बाबतीत शासनाकडे कोणतीही व्यवस्था नाही. त्यामुळे शेतकरी किंवा शेतकऱ्यांच्या संघटनेला त्याबाबतीत आपले विचार व्यक्त करता येत नाहीत. याकरिता राज्य सरकारने याबाबत एक स्वतंत्र व्यासपीठ किंवा मंडळ स्थापन करावे. जेणेकरुन सर्व संबंधितांना त्याठिकाणी आपली मते मांडता येतील. त्या संदर्भात शासनाने निर्णय घ्यावा अशी मी आपल्या अनुमतीने उपसूचना मांडतो."

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी आयुष्यभर शेतीच्या प्रश्नासाठी काम केले असल्यामुळे माझे उत्तराचे भाषण संपल्यानंतर त्यांना उपप्रश्नाच्या वेळी ही सूचना करता आली असती.

सभापती महोदय, अशाप्रकारे मागील प्रत्येक वर्ष पाहिले तर वेगवेगळया पध्दतीने मान्सूनचा लहरीपणा महाराष्ट्राला आणि महाराष्ट्रातील शेतीला पहावयास मिळाला आहे. सन 2007 हे मान्सूनचे नॉर्मल वर्ष राहिले आहे. सन 2008 मध्ये कमी - अधिक प्रमाणात पाऊस पडला. गेल्या वर्षी सन 2009 मध्ये सुध्दा मान्सूनच्या लहरीपणाचा परिणाम शेती उत्पादनावर झालेला दिसतो. आणि म्हणून महाराष्ट्रातील शेतीची उत्पादकता कमी असण्याच्या अनेक अडचणी आहेत. त्याकरिता आपण खूप चांगले काम केले, चांगल्या पध्दतीने जमिनीची मशागत केली, चांगले बियाणे वापरले, चांगल्या खताचा वापर केलातरी मान्सूनने आपल्याला धोका दिला तर आपण केलेले सर्व कष्ट वाया जाते. त्यामुळे शेतीचे उत्पन्न घटते, शेती अडचणीत येते हा इतिहास आपण प्रत्येक वेळी पहात आलो आहोत.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी महाराष्ट्राच्या शेती उत्पादकतेच्या संदर्भात चर्चा उपस्थित केली. म्हणून मला सांगावे लागत आहे की, महाराष्ट्रातील शेती उत्पादकता ही कायम अडचणीची राहिली आहे. सभापती महोदय, सन 2007-08 हे नॉर्मल वर्ष असतांना वेळोवेळी शेतीसाठी आवश्यक तेवढा पाऊस पडला. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर या राज्याने शेतीच्या उत्पादनामध्ये सर्वोच्च उच्चांक मोडलेला दिसतो. अशी प्रतिकूल परिस्थिती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. बाळासाहेब थोरात...

असतांना शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी आपले प्रयत्न होत राहिले आहेत. आणि म्हणून या प्रतिकूलतेमध्ये आपली उत्पादकता कशी वाढेल याचा विचार करीत असतांना...

(अपूर्ण - यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात . . ..

यावर्षी दोन-तीन गोष्टी प्रामुख्याने दिसत आहेत की, 2007-2008 मध्ये खूप चांगल्या प्रकारची उत्पादकता सर्व क्षेत्रात दिसून येत आहे. जगाच्या मानाने आपल्या देशातील उत्पादकता कमी आहे आणि देशाच्या मानाने आपण सध्या यामध्ये कमी आहोत हे नाकारता येणार नाही. परंतु 2007-2008 हे वर्ष आपली शेती पावसावर आधारित असताना सुध्दा उत्पादकतेच्या बाबतीत बरे गेले असे म्हणावे लागेल आणि 2009-2010 या वर्षामध्ये आपल्याला चांगल्या प्रकारचे चित्र दिसत आहे. गेल्या वर्षी सुध्दा पावसाने अडचणी निर्माण केल्या. मध्यंतरी आपल्या राज्याला फयान वादळाचा खूप मोठा फटका बसला.विशेषत: हा फटका संपूर्ण कोकण, गोंदिया, भंडारा आणि सह्याद्रीच्या रागांमध्ये बसला.परंतु काही ठिकाणी पाण्याची उपलब्धता झाली आणि त्याचा परिणाम म्हणून आम्हाला रब्बीच्या पिकाच्या उत्पादनामध्ये निश्चितपणे वाढ झाल्याचे दिसत आहे.तूरडाळी मध्ये 24 टक्क्याची वाढ झाल्याचे दिसत आहे. फयान वादळानंतर पावसाचा जो आधार मिळाला त्यामुळे कापसाच्या पिकाचे उत्पादन मोठया प्रमाणात वाढल्याचे दिसत आहे. कोकण, गोंदिया, भंडारा व सह्याद्रीच्या रागांमध्ये या भागामध्ये फयान वादळाचा फटका बसला असताना, उर्वरित महाराष्ट्रात एक चांगल्या प्रकारचा पिकाला आधार मिळाल्याचे दिसत आहे. त्यामुळे उत्पादनातील जी एकंदर वाढ आहे ती कापूस, तूरडाळ या पिकांच्या बाबतीत दिसत आहे. ज्वारीच्या बाबतीत असेच आहे आणि फयानच्या वादळानंतर ज्वारीचे क्षेत्र एकदम बदलून गेले आणि आपल्याला त्याच्या उत्पादनामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. हे सांगण्याचा माझा उद्देश एवढाच आहे की, रब्बीच्या पिकांना खूप चांगल्या प्रकारचा फायदा झाला आहे. राज्यातील काही भागामध्ये खूप त्रास झाला तर काही भागामध्ये चांगला फायदा झाला. धरणांच्या बाबतीत सांगावयाचे तर आजही उस्मानाबाद, लातूर या परिसरातील छोटे-मोठे बंधारे हे काही प्रमाणात भरलेले दिसत आहेत. याचे कारण म्हणजे फयान वादळामुळे हा फायदा झालेला आहे. त्याचे हे एक कारण आहे. कधी नव्हेतर आपल्याला नवीन पध्दतीने कापसाची तिसरी वेचणी मिळालेली आहे, अशा प्रकारे आपल्याला निश्चितपणे फायदा झालेला आहे. मी इतर विषयांमध्ये जात नाही. पण याठिकाणी जे मुलभूत प्रश्न उपस्थित केलेले आहेत, त्यांच्या संदर्भात मी येथे चर्चा करु इच्छितो.

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेते आदरणीय श्री.पांडुरंगजी फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते आणि काही अन्य सन्माननीय सदस्यांनी खते,बियाणे आणि

. . . .2 एक्स-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात . . ..

कीटकनाशकांच्या संदर्भातील एक महत्वाचा प्रश्न उपस्थित केला. या सदनामध्ये मागील पाच वर्षाच्या काळामध्ये सातत्याने खताच्या, बियाणाच्या आणि कीटकनाशकांच्या गुण प्रतीच्या संदर्भात चर्चा झाली आहे. आपण मागील पाच वर्षामध्ये मोठा ड्राईव्ह घेण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि त्याबाबत खत असेल, बियाणे असेल किंवा कीटकनाशक असेल, त्यांचे जास्तीतजास्त नमुने घेणे, जास्तीतजास्त तपासणी करणे आणि त्यामध्ये ज्यांची गुणप्रत कमी असेल, त्यांच्यावर कोर्ट केसेस दाखल करणे, त्यांचे लायसन्स् निलंबित करणे या सगळया गोष्टी आम्ही केलेल्या आहेत. मागच्या वेळी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनी काही प्रश्न विचारले होते आणि याबाबतीत काय कार्यवाही झाली ? असाही एक प्रश्न होता. त्यासंबंधात जे काही फाईंडींग आलेले आहेत, ते मी मुद्दाम आपल्याला सांगू इच्छितो. कारण आपण त्याबाबतीत प्रश्न उपस्थित केला होता. दरवर्षी खताच्या बाबतीत ज्या केसेस दाखल होतात, त्याबाबत सांगावयाचे तर बियाणांच्या बाबतीत 100 केसेस, 50 केसेस कीटकनाशकांच्या बाबतीत आणि 30 केसेस खतांच्या बाबतीत आपण दाखल करतो. परंतु यासंबंधातील गंमतीदार जे फाईंडींग आहे, ते मी मुद्दाम आपल्याला सांगू इच्छितो की, एकंदर याबाबतीत प्रलंबित केसेस किती आहेत याची माहिती घेतली तेव्हा असे निदर्शनास आले की, कोर्टामध्ये खताच्या संदर्भात 1571 केसेस प्रलंबित आहेत. बियाणांच्या बाबतीत 572 केसेस प्रलंबित आहेत आणि कीटकनाशकांच्या बाबतीत 375 केसेस प्रलंबित आहेत. या सर्व केसेस कधी पासून प्रलंबित आहेत याचीही माहिती घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा असे लक्षात आले की, आजही 1989 सालातील एक केस प्रलंबित आहे. तसेच आम्ही आतापर्यंत किती केसेसचा निकाल लागलेला आहे याची माहिती घेण्याचा प्रयत्न केला तर असे दिसून आले की, खूप कमी निकाल लागलेले आहेत. त्यामध्ये शासनाच्या बाजूने कमी निकाल लागलेले आहेत. मागच्या वर्षी 13 निकाल आपल्या बाजूने लागलेले आहेत.

**(सभापतीस्थानी - माननीय तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)**

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात....

मी अत्यंत मोकळेपणाने काही गोष्टी मुद्दाम याठिकाणी सांगतो कारण या निमित्ताने काही गोष्टी नवीन कराव्यात असे मला वाटते, या उद्देशाने मी या गोष्टी या ठिकाणी सांगत आहे. कायद्यामध्ये जी तरतूद आहे त्याचा परिणाम त्यांना होणारा दंड सुध्दा अत्यंत कमी असतो, ही वस्तुस्थिती या निमित्ताने मी याठिकाणी सांगू इच्छितो. सभापती महोदय, या सगळयाचा परिणाम म्हणून शिक्षा सौम्य होत आहेत. केसेस दाखल केल्याचा जो परिणाम आपल्याला साधायला पाहिजे होता तो आपण साधू शकत नाही ही वस्तुस्थिती या निमित्ताने लक्षात येत आहे. साधारणत: सरकारच्या बाजूने निकाल कमी लागण्याची जी कारणे आहेत त्यामध्ये विलंबाने निकाल लागतात हे एक कारण आहे. इतक्या वर्षानंतर तो अधिकारी बदलून जातो. परिस्थितीमध्ये सगळा बदल होतो. त्याचबरोबर अनेक कर्मचारी सेवानिवृत्त होत असतात. या केसेस कोर्टात चालतात त्यावेळी सरकारी वकील बाजू मांडण्यासाठी असतो पण या सरकारी वकिलाला दुसरेच काम जास्त असते त्यामुळे त्या कामाचा परिणाम यावर होतो. काही कायदेशीर प्रक्रियेतील त्रुटी निश्चितपणे आहेत. तसेच केसेस दाखल करताना आणखी काही काळजी घेण्याची आवश्यकता आहे. या सर्व गोष्टीचा विचार करता याबाबतीत काही धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक वाटते. थिंक टँक समितीची निश्चितपणे निर्मिती करीत आहोत. केंद्रा कडून आपल्या काय अपेक्षा आहेत हे आपण सातत्याने कळवत आलेलो आहोत. परंतु आता त्याला पाच वर्षे झालेली आहेत. बदलत्या परिस्थिती बरोबर केंद्रा कडून आणखी काय अपेक्षा केल्या पाहिजे हे त्यांना कळविले पाहिजे. नवीन कायदा करणे, कायद्यातील तरतुदी बदलणे या आपल्या सगळया अपेक्षा या चर्चेच्या निमित्ताने केंद्र शासनाला कळविण्याची गरज आहे. शासनाच्या विरोधात गेलेल्या केसेच्या त्रुटींचा अभ्यास करणे एवढेच नाही तर लवकर निकाल लावण्याकरिता पाठपुरावा करणे आणि यापेक्षा मला जास्त महत्वाचे वाटते ते म्हणजे या करिता स्वतंत्र कायदा कक्ष कृषी विभागाला करता येईल काय? याचा विचार सुध्दा करण्याची आवश्यकता आहे. कारण मी असे पाहिलेले आहे की, शिक्षण विभागामध्ये यासाठी एक स्वतंत्र विभाग आहे. कारण त्यांच्याकडे मोठया प्रमाणात कोर्ट केसेस चालू असतात. त्यामुळे शिक्षण विभागात कायद्याच्या संदर्भात मार्गदर्शन करणारा, अभ्यास करणारा आणि सहभाग घेणारा एक स्वतंत्र कक्ष आहे. स्वतंत्र अशा प्रकारचा विधी कक्ष निर्माण करुन या केसेसचा कशा रीतीने

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

चांगल्या पध्दतीने निकाल लागेल आणि शासनाची बाजू कशी यशस्वी होईल याबाबतीत लवकरच शासनाच्या वतीने निर्णय घेण्यात येईल. या निमित्ताने एक चांगल्या पध्दतीचे फलीत आहे की, याबाबतीतील निर्णय लवकरात लवकर घेण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

सभापती महोदय, आणखी दोन-तीन गोष्टी आहेत. त्या म्हणजे बाजारात येणाऱ्या औषधांच्या संदर्भात चर्चा होत असते. याबाबतीत मी यापूर्वी सुध्दा उत्तर दिलेले आहे. त्याबाबतीत मी याठिकाणी पुन्हा एकदा सांगेन. एकंदर पेस्टिसाईड कायद्याच्या कक्षेत येणारे आणि कायद्याच्या कक्षेत न येणारे असे दोन भाग झालेले आहेत. अलीकडच्या दोन वर्षामध्ये सेंद्रियच्या नावाखाली किंवा जैविकाच्या नावाखाली मोठया प्रमाणावर निरनिराळे पेस्टिसाईडस येत आहेत. त्यामध्ये किटकनाशके आहेत किंवा वाढीकरिता मदत करणारे संजीवक अशा प्रकारचे आहेत. याला सुध्दा कायद्याच्या कक्षेत आणणे मला आवश्यक वाटते. सहसा दुकानात कायद्याच्या कक्षेतील आपल्याला काही स्टॉक दिसतो त्याच्यापेक्षा तिप्पट स्टॉक हा दुसरा दिसायला लागला आहे. या सगळयाचा अभ्यास करुन त्याला कायद्याच्या कक्षेत कसे आणता येईल तसेच उत्पादकाकडून तपासणीची पध्दत, लेबलवर घटकाची नोंद करणे, विद्यापीठाकडे जाऊन त्याची तपासणी करुन घेणे या गोष्टी केल्या जातील याची ग्वाही मी या निमित्ताने देत आहे.

सभापती महोदय, चर्चेच्या दरम्यान सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी वर्धमान फर्टिलायझरच्या बाबतीत गुन्हा दाखल केलेला नाही अशा प्रकारची साताऱ्याची केस सांगितलेली आहे. त्या केसच्या संदर्भातील पूर्णपणे तपासणी पंधरा दिवसात करुन घेण्यात घेईल आणि त्याचे उत्तर देण्याची व्यवस्था केली जाईल असे मी या निमित्ताने सांगतो.

यानंतर श्री.बरवड....

अस्सुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात .....

नैसर्गिक आपत्तीच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी सांगितले. नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना जी मदत व्हावयास पाहिजे त्याची चर्चा या ठिकाणी करण्यात आली. नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भात मदत करण्यासाठी राज्य सरकारने गेल्या पाच वर्षामध्ये जी रक्कम मंजूर केलेली आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, मागच्या पाच वर्षामध्ये माननीय श्री. जयंत पाटील वित्तमंत्री असताना त्यांच्याकडून खूप मदत घेण्याचा प्रयत्न केला. मागच्या पाच वर्षामध्ये 3333 कोटी रुपयांची मंजुरी नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भात घेतली. त्यापैकी 3250 कोटी रुपयांचे वाटप करु शकलो आहोत. 83 कोटी रुपयांचे देणे बाकी आहे. रिमोट सेन्सींगच्या संदर्भात अट घातलेली आहे परंतु त्यामध्ये काही अडचणी आहेत. त्या दूर करुन आपल्याला ही रक्कम शेतकऱ्यांना कशी देता येईल हे पाहण्यात येईल. आपण 3250 कोटी रुपये वाटप केलेले आहेत. नैसर्गिक आपत्तीमध्ये किती मदत करावी याबाबतीत मागची पाच वर्षे हे सगळ्यात मोठे उदाहरण आहे. हे एक अपवादात्मक उदाहरण आहे. रिमोट सेन्सींगच्या संदर्भात सांगावयाचे तर आता पुढे जेव्हा नैसर्गिक आपत्ती येईल त्यावेळी कृषी विभागाने पंचनामा केल्यानंतर रिमोट सेन्सींगच्या सहाय्याने त्यांची पडताळणी केली जावी असा निर्णय घेतला पण मध्ये काही अपवाद केले. कारण त्या निर्णयामुळे काही गोष्टी अडचणीच्या ठरल्या आहेत. त्या अडचणी दूर करण्याचा आमचा प्रयत्न आहे. शेवटी शेतकरी अडचणीमध्ये असताना त्याला सातत्याने काही ना काही अडचणी चालूच असतात. कधी दुष्काळाचे संकट येते तर कधी रोगराईचे संकट येते तर कधी गारपीट होते. या सगळ्या संकटातून त्याची वाटचाल चालू असते. गेल्या पाच वर्षामध्ये कृषी विभाग माझ्याकडे असल्यामुळे त्यामध्ये काम करीत असताना असे दिसून आले की, नैसर्गिक आपत्तीचे इव्हेंट्स मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. यामध्ये ग्लोबल वार्मिंगचा परिपाक दिसतो. गारपीट, वादळी वारे याच्याही पलीकडे जाऊन निरनिराळ्या रोगराई वाढलेल्या आहेत. तपमानामध्ये बदल दिसावयास लागले आहेत. या सगळ्यांचा परिणाम असा होतो की, या शेतकऱ्यांना आपल्याला मदत करावी लागते आणि ती मदत केलेली आहे. कापसावर लाल्या रोग आला त्यासंदर्भात दिलासा देण्यासाठी मदत करण्याचा आपण प्रयत्न केला. सोयाबीनवर अळी आली त्यासंदर्भात मदत करण्याचा प्रयत्न केला.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. बाळासाहेब थोरात .....

नैसर्गिक आपत्तीमध्ये आपण मदत केलेली आहे. परंतु एकंदरीत चित्र असे दिसते की, शेतकरी अडचणीत येत राहतो आणि अडचण आल्यानंतर पुन्हा मदतीकरिता सरकारकडे मदत मागण्याचा कार्यक्रम सुरु झालेला असतो. याला शास्त्रोक्त उपाय असला पाहिजे. कोणत्या परिस्थितीमध्ये सरकारकडे यावे आणि मदत मागितल्यावर दिली जावी यापेक्षा शास्त्रोक्त पध्दतीने पुढे कशी वाटचाल करता येईल यादृष्टीने आपण प्रयत्न करीत आहोत. पीक विमा योजना असली तरी ज्या ठिकाणी अडचण येईल त्या ठिकाणी मदत झाली पाहिजे. आपल्याकडे राष्ट्रीय पीक विमा योजना आहे. राष्ट्रीय पीक विमा योजना अधिकाधिक सर्वंकष आहे असे मी मानत नाही. त्या योजनेमध्ये सर्कलनिहाय आणि पीक निहाय क्षेत्र निश्चित केले जाते. जो जादा पिकाचा झोन आहे तेवढ्यापुरत्या पिकाला संरक्षण देतो. अजूनही शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा जो प्रिमियम असतो तो भरण्याची सवय लागलेली नाही असे चित्र दिसते. मी ज्या ज्या ठिकाणी जातो त्या त्या ठिकाणी शेतकऱ्यांना सांगत असतो की, आपण मशागतीकरिता खर्च करतो, पाण्याकरिता खर्च करतो, बियाणाकरिता खर्च करतो, खताकरिता खर्च करतो त्यामध्ये विम्याचे हप्ते भरण्याची आणखी एक सवय लावून घ्यावी. काही भागामध्ये फायदा होईल नाही तर तोटा होईल. प्रत्येक वेळी फायदा होईलच असे नाही पण प्रत्येक वेळी विम्याचे हप्ते भरण्याची पध्दत स्वीकारली पाहिजे. मी लातूर जिल्ह्याचे उदाहरण देईन. त्यांनी पीक विम्याची रक्कम भरण्याचा एक सवयीचा भाग करुन घेतला. अनेक चांगल्या प्रकारचे फायदे त्यांना मिळाले आणि हे महाराष्ट्राला सांगण्याचा माझा सातत्याने प्रयत्न राहिलेला आहे. परंतु ही पीक विमा योजना सर्वंकष नाही. एकंदर या पीक विमा योजनेच्या बाबतीत आतापर्यंत जी भरपाई देण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यामध्ये बऱ्यापध्दतीने मदत केलेली आहे. अनेक शेतकऱ्यांना मदत झालेली आहे हे नाकारता येणार नाही. या ठिकाण्ी हवामान पीक योजनेचा उल्लेख करण्यात आला. याबाबतीत मी एकच सांगेन की,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.....

राष्ट्रीय पीक विमा योजना आहे त्या योजनेतील त्रुटी दूर करण्याचा सातत्याने प्रयत्न चाललेला असतो. या क्षेत्रामध्ये निरनिराळया संस्था काम करीत आहेत, त्या प्रयोग करीत आहेत. बरसात विमा योजना येऊन गेली. हवामान अंदाज विमा योजना होती त्यामध्ये काही जिल्हयांनी भाग घेतला होता. हे प्रायोगिक तत्वावर होते. या योजनेचे मूल्यमापन झाले होते, त्यापैकी राज्याचा 6 कोटी 95 लाख रुपयांचा हप्ता होता तो आता ट्रेझरीत जमा केलेला आहे. त्यामुळे दोन आठवडयात ती रक्कम मिळून जाईल. हा एक प्रयोग आहे, प्रयत्न आहे, पण एक सर्वंकष विमा योजना शासनाच्या हाताशी नाही. तसा प्रयत्न करावा लागेल. पण प्रयत्न करीत असताना एवढा मोठा आर्थिक भार येत आहे आणि व्यक्तिगत स्वरुपात त्याचे कसे सर्वेक्षण करावयाचे, कशा पध्दतीने मूल्यमापन करावयाचे, पीकनिहाय कसे करावयाचे यासंबंधीच्या अडचणी असल्या तरी एक शाश्वत उपाय शोधण्यासाठी एक चांगली विमा योजना पुढे आणणे आवश्यक आहे असे मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, आमचे मित्र आणि सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांचे विचार मी मागील 5 वर्षांपासून ऐकत आलो आहे. तो विचार घेऊन ते राज्यात व देशपातळीवर आग्रही भूमिका घेऊन काम करीत असतात. शेतक-यांना आधारभूत किंमत मिळाली पाहिजे. पिकाच्या उत्पादन खर्चावर आधारित किंमत मिळाली पाहिजे अशी त्यांची आग्रही भूमिका असते. हा त्यांनी चांगला अभ्यासाचा विषय म्हणून पुढे आणलेला आहे ते मी नाकारीत नाही. सभापती महोदय, केंद्रीय कृषी मूल्य आयोगामार्फत आधारभूत किंमत ठरविली जाते. त्यासाठी त्यांनी काही निकष ठरवून दिलेले आहेत. विद्यापीठाकडून व विभागाकडून अभ्यास करुन त्या निकषानुसार आधारभूत किंमत निश्चित केली जाते. यामध्ये निरनिराळे प्रकार धरण्यात आलेले आहेत. ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. केंद्राच्या निकषानुसार भाव निश्चित केले जातात. परंतु महाराष्ट्र शासनाच्यावतीने केंद्राला अशी शिफारस केली जाते की, आमच्या राज्याचा उत्पादन खर्च इतका आहे, नफा इतका आहे त्याच्या आधारे प्रत्येक क्विंटलला आधारभूत किंमत मिळावी. परंतु केंद्रीय कृषी मूल्य आयोग देशाच्या पातळीचा विचार करतात. मग

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

श्री.बाळासाहेब थोरात....

पंजाब असेल, उत्तर प्रदेश असेल, ज्या राज्यात उत्पादकता जास्त आहे ती राज्ये विचारात घेऊन आधारभूत किंमत ठरवितात. आपली उत्पादकता कमी आहे, त्या राज्यांची उत्पादकता जादा आहे, त्यामुळे त्यांना उत्पादन खर्च कमी येतो, आधारभूत किंमत ठरविताना या राज्यांचा विचार केला जातो, त्यामुळे महाराष्ट्रातील शेतक-यांवर अन्याय होतो हे मी नाकारीत नाही. सन 2005-06 व सन 2009-10 या दोन वर्षांचा तुलनात्मक विचार करता जी वाढ करण्यात आलेली आहे त्यानुसार सन 2005-06 मध्ये भातासाठी 570 रुपये इतकी आधारभूत किंमत दिली होती, आता ती 1000 रुपये झ ालेली आहे म्हणजे त्यात 75 टक्के वाढ करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे ज्वारी, बाजरीसाठी 60 टक्के वाढ झालेली आहे, मूगासाठी 82 टक्के वाढ झालेली आहे, इतर पिकांसाठी 60-62 टक्के वाढ करण्यात आलेली आहे, लांब धाग्याच्या कापसासाठी 2010 रुपयांपासून 3000 रुपयांपर्यंत वाढ केलेली आहे. म्हणजे जवळपास 50 टक्के वाढ झालेली आहे. मागील सर्व वर्षांचा विचार करता यावर्षी भरीव वाढ दिलेली आहे. त्याचा फायदा शेतक-यांना झाला असेल, परंतु महाराष्ट्राबाबत मी सुरुवातीलाच सांगितले की, आपली उत्पादकता कमी असल्यामुळे उत्पादन खर्च जास्त येतो त्यामुळे राज्यातील शेतकरी अडचणीत असतो. त्यामुळे सातत्याने राज्याने मागणी केलेली आहे की, ऊसाच्या लेव्हीच्या साखरेचा विषय असायचा, त्यांनी लेव्हीमध्ये झोन केले होते. ज्यांनी ऊसाची सरासरी उत्पादकता कमी आहे, ज्यांची रिकव्हरी कमी आहे त्या उत्तर प्रदेश राज्याला केंद्राने जादा दर दिला होता. महाराष्ट्रातील झोनला लेव्हीचा दर कमी असायचा.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 15:40

(श्री. बाळासाहेब थोरात...

सभापती महोदय, अनेक वर्षापासून महाराष्ट्राचा सातत्याने असा आग्रह राहिलेला आहे की, आधारभूत किंमत देत असताना झोन असले पाहिजेत. आमच्या शेतक-यांचा कोणताही दोष नसताना उत्पादकता कमी येत असेल, नैसर्गिक कारणामुळे ती कमी येत असेल तर ज्या प्रमाणे उत्तर प्रदेशला मदत केली त्याप्रमाणे महाराष्ट्राला देखील मदत केली पाहिजे. मागचे रेकॉर्ड पाहिले तर 20 वर्षापूर्वी याच पध्दतीची मागणी केलेली दिसते. अनेक वर्षापासून केन्द्राकडे ही मागणी केलेली आहे. उत्पादकतेच्या प्रमाणात प्रत्येक झोनची वेगळी आधारभूत किंमत काढावी असा आग्रह केन्द्र सरकारकडे धरलेला आहे. या प्रश्नासंबंधी नेहमी आम्ही या कमिटीच्या अध्यक्षांबरोबर चर्चा करीत असतो. त्या कमिटीकडे सुध्दा सातत्याने हीच विनंती करीत आहोत. परंतु त्यांनी तशा प्रकारचा निर्णय अद्याप घेतलेला नाही. 20 वर्षापासून आग्रह धरुन सुध्दा हे झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. मालाला आधारभूत किंमत मिळाली पाहिजे, शेतक-याच्या मालाला जादा भाव मिळाला पाहिजे हे जरी खरे असले तरी माझे मत असे आहे की, हे सगळे करीत असताना दुस-या बाजूला जोपर्यन्त आपण शेतीची उत्पादकता वाढवत नाही तोपर्यन्त शेती परवडणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. उत्पादकता वाढीचा कार्यक्रम हा सर्वात महत्वाचा कार्यक्रम आहे. एकरी दोन क्विंटल कापूस घेतला आणि त्याला 4 हजार रुपये भाव मागितला तर तो परवडणार नाही. परंतु तोच कापूस आपण 11-12 क्विंटल पर्यन्त नेला तर परवडेल. मला सांगायला अभिमान वाटतो की, शेतक-याने जमिनीची चांगली मशागत करुन, चांगले प्रशिक्षण घेऊन कापसाची उत्पादकता वाढविलेली आहे. शेतकरी एकरी 35 ते 40 क्विंटल कापूस घेत आहेत. मला गेवराई येथे कृषी परिसंवादाला बोलाविले होते. त्याठिकाणी व्यासपीठाच्या मागे असा बोर्ड लावलेला होता की, एकरी 50 क्विंटल कापूस काढण्याकरिता परिसंवाद. शेतक-यांची एका बाजूला अशा प्रकारची तयारी आहे. पण शेवटी पिकाला पाणी असावे लागते. केवळ पावसावर हे शक्य नाही. उत्पादकता वाढीसाठी पाणी असावे लागते. जोपर्यन्त उत्पादकता वाढवित नाही तोपर्यन्त आपल्या शेतक-याला शेती परवडणार नाही ही वस्तुस्थिती आहे. कृषी विभाग माझ्याकडे आल्यापासून मागील तीन वर्षा पासून महापीक अभियानाच्या माध्यमातून उत्पादकता वाढविण्यावर भर देण्यात आलेला आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. बाळासाहेब थोरात....

नैसर्गिक पध्दतीने ही वाढ कशी करता येईल याचा प्रयत्न मागील 5 वर्षात केलेला आहे.

महाराष्ट्रामध्ये पाण्याचा खरा ताण आहे. मला विदर्भातील शेतकरी भेटले. विदर्भामध्ये 900 मि.लि.पाऊस पडतो. मग 900 मि.मी. पाऊस पडत असताना अडचण काय आहे ? या ठिकाणी 900 मि.मी.पाऊस पडत असताना देखील तीन चार टक्केच सिंचन क्षमता आहे. दोन पावसामध्ये जे अंतर पडते त्यामुळे उत्पादकता घटते. पेरणी केल्यानंतर रोप थोडे वर आल्यानंतर 30-35 दिवस पाण्याचा ताण पडला तर उत्पादकता घटते, रोपाची वाढ खुंटते. ही गोष्ट लक्षात आल्यानंतर उत्पादकता वाढीचा कार्यक्रम हाती घेतला. जलसंधारणाच्या कार्यक्रमामध्ये आम्ही बदल केला. मराठवाडा पाणलोट मिशन आणि मराठवाडा पाणलोट मिशन असे दोन कार्यक्रम घेतले. मशिनद्वारे कामे करण्यास सुरुवात केली. कमी खर्चामध्ये गतिमान आणि चांगली कामे झाली. उत्पादकता वाढीमध्ये सर्वात महत्वाचे काम म्हणजे दोन पावसात अंतर पडले की पाण्याची व्यवस्था करणे हे होय. त्यासाठी 3 लाख शेततळी बांधण्याचा कार्यक्रम आम्ही घेतलेला आहे. दोन वर्षात 40 हजार शेततळी करु शकतो.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

38,000 शेततळी तयार झाली आहेत. यशोगाथेचा परिणाम दिसू लागला आहे. मराठवाडा आणि विदर्भात पहावयास मिळत आहे. पाणी आले तरच पीक वाचविता येईल, उत्पादकता वाढविता येईल. हा कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजना आणि रोजगार हमी योजनेतून घेतला आहे. यावर्षी आम्ही दोन्ही योजना मिळून 1 लाख शेततळी महाराष्ट्रातील संपूर्ण तालुक्यांमध्ये, प्रत्येक तालुक्यात 200 शेततळी याप्रमाणे कार्यक्रम हाती घेतला आहे. हा अत्यंत महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे. शेतकऱ्यांना आधार द्यावयाचा असेल तर एका संरक्षित पाण्याचा आधार दिला पाहिजे, त्यादृष्टीने कार्यक्रम घेतला आहे.

सभापती महोदय, बियाणांच्या नुतनीकरणाचा कार्यक्रम, माती परीक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. हे सगळे कार्यक्रम शेती उत्पादकता वाढीसाठी घेतले आहेत. नियोजन आयोगाने आपल्या कार्यक्रमांचे कौतुक केले आहे. इतर राज्यांनी सुध्दा हे कार्यक्रम स्वीकारावेत, त्यामध्ये माती परीक्षणाचा कार्यक्रम इतर राज्यांनी सुध्दा हाती घ्यावा असे नियोजन आयोगाने म्हटले आहे. बियाणांच्या नूतनीकरणाचा कार्यक्रम देशातील इतर राज्यांनी हाती घ्यावा असे सांगितले आहे. दुसरा मुद्दा शेतीशाळा हा आहे. शेतावर जायचे, शेतकऱ्यांनी एकत्र बसायचे. त्यांच्यातील एका शेतकऱ्याला प्रशिक्षण द्यायचे, अधिकारी तेथे असणार आहेत. या सगळ्यांची चर्चा घडवून आणायची आणि उत्पादकता वाढीचा कार्यक्रम राबवायचा. पाण्याबाबत ग्लोबल वॉर्मिंगच्या परिणामाची दूरदृष्टी ठेवून नियोजन करावे लागेल. पाणी येईल त्यावेळी साठवणे आणि वापरणे यासाठी जलसंधारणाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. वसुंधरा संस्था स्थापन केली आहे. यावर्षी पाणलोटाचा कार्यक्रम घेत आहोत. त्यासाठी आपल्याला 1200 कोटी रुपये याच वर्षात खर्च करण्यासाठी दिले आहेत. पुढील वर्षी वेगळे 1200 कोटी याप्रमाणे तीन टप्प्यात 1200, 1200 कोटी रुपये मिळणार असून पाणलोटाच्या, जलसंधारणाच्या कार्यक्रमाला या निमित्ताने महत्व देत आहोत. शेवटी पाण्याशिवाय शेती होऊ शकत नाही. तो आधार निर्माण करण्याचे काम करीत आहोत.

सभापती महोदय, मालगुजारी तलावाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून तो कार्यक्रम हाती घेतला आहे. 1083 तलावांच्या दुरुस्तीसाठी 40 कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. 592 तलावांची दुरुस्ती 2008-09 मध्ये व 172 तलावांची दुरुस्ती 2009-10 मध्ये केली आहे. एकूण 764 तलावांची





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.....

दुरुस्ती झाली असून आणखी हा कार्यक्रम घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून या कार्यक्रमाला गती देण्याचा प्रयत्न राहील ही ग्वाही आजच्या निमित्ताने देतो.

सभापती महोदय, याठिकाणी खताच्या संदर्भात चर्चा झाली. खताची गुणवत्ता आणि खताचा पुरवठा हे वेगळे विषय आहेत. पुरवठ्याच्या संदर्भात मी सांगेन की, खताबाबत केंद्र सरकारने काही बदल केलेले आहेत. आता जे काही अनुदान देणार आहे ते मूल्यद्रव्यावर म्हणजे न्यूट्रिशन बेसवर दिले जाणार आहे. युरिया खतावर त्यांनी कंट्रोल ठेवला आहे. इतर खतावरील कंट्रोल काढून टाकला आहे. हे दोन महत्वाचे बदल आहेत. मधला संधी काळ होता. जे काही निर्णय घेतले जात होते त्यामुळे पुरवठा कमी झाला असेल परंतु आता पुरवठ्याला सुरुवात झाली आहे. जी कल्पना मागील वर्षी पुढे आली होती पुन्हा तसे झालेले नाही. कंपन्यांना सबसिडी मिळणार आहे. शेतकऱ्यांना सबसिडी द्यायची म्हणजे कशी द्यायची? त्या संदर्भात अनेक प्रश्न आहेत. तो विचार त्यामध्ये आहे. त्या संदर्भातील चर्चा सचिवांबरोबर दिल्लीला गेलो असताना केली आहे. त्यातील अडचणी पाहता यावर्षी तसे काही होणार नाही. स्वत: सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय पंतप्रधानांना पत्र लिहिले. मध्यंतरीच्या भेटीमध्ये माननीय पंतप्रधानांबरोबर बोलले आहेत. माननीय रेल्वे मंत्र्यांशी बोलले आहेत. रॅकचा पुरवठा महत्वाचा आहे. आपल्याकडे स्वत:चे बंदर नाही ही सगळ्यात मोठी त्रुटी खताच्या पुरवठ्यामध्ये आहे. कांडला बंदरातून खत आणावे लागते. ती सोपी गोष्ट नाही. रॅक उपलब्ध होणे महत्वाचे आहे. त्यासाठी रेल्वे मंत्र्यांबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांनी संपर्क केल्यानंतर चांगल्या पध्दतीने रॅक मिळत आहेत. खतांचा पुरवठा चांगल्या पध्दतीने होत आहे. मागील वर्षी बफर स्टॉकिंग केले होते. खताचा पुरवठा मार्चमध्ये होत होता.

नंतर 3डी.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ ST/ पूर्वी श्री. भोगले ...... 15:50

श्री. बाळासाहेब थोरात .......

यावर्षी नवीन धोरणामुळे जरी प्रश्न निर्माण झाला तरी खताचा पुरवठा इतका स्मुथ होतो की, तशी अडचण येणार नाही असे मला वाटते, फक्त नवीन धोरणाचा दरावर किती परिणाम होतो हे आपल्याला पहावे लागेल परंतु आम्ही पूर्णपणे प्रयत्न करीत आहोत. त्यानंतर कॉम्प्लेक्स खत म्हणजे 26:26:10 च्या बाबतीत सांगू इच्छितो की, मागील वर्षी या खताचा पुरवठा कमी होता परंतु यावर्षी हा पुरवठा पुरेशा प्रमाणात देण्याचेही मान्य केले आहे. माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी विदर्भ पॅकेजच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. त्या अनुषंगाने मला असे स्पष्टीकरण करावयाचे आहे की, मागील पाच वर्षात पंतप्रधान पॅकेज आणि दुसरे राज्यशासनाचे पॅकेज असे दोन पॅकेज विदर्भासाठी दिले होते. यामध्ये एक पॅकेज 150 कोटीचे असे होते की, 60 हजार कुटुंबांना प्रत्येकी 25 हजार रुपयाप्रमाणे देण्यात आले. त्यात अनेक बाबींच्या संदर्भात मदत करण्यात आली होती. परंतु या पॅकेजचा व्याप एवढा मोठा होता की त्यासंदर्भात काही तक्रारीही आल्या म्हणून शासनाच्या कृषी विभागाने रेड्डी समिती नेमली होती. या समितीचा अहवाल प्राप्त झाला व त्यात जे दोषी आढळून आले त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. त्यातील 7 प्रकरणात विभागीय चौकशी सुरु असून यातून जे फाईंडिंग होईल त्याच्या आधारावर सुध्दा कारवाई करण्यात येईल. आकोटसारख्या ठिकाणी जे दोषी आढळून आले त्यांच्यावर फौजदारी केसेस दाखल केल्या व तीन तीन महिने हे दोषी जेलमध्ये राहिले. अशा प्रकारे चुकीच्या पध्दतीने ज्या संस्था वागल्या त्यांच्यावर कारवाई शासनाने केली आणि त्यांना काळ्या यादीत टाकण्याचे कामही आपण केले आहे. एवढेच नव्हे तर यापुढील काळात चांगल्या प्रकारे व गुणवत्तेचे साहित्य पुरविण्याचा प्रयत्न झाला हेही मी सांगू इच्छितो. त्यानंतर विदर्भातील या सहा जिल्ह्यांमध्ये 1300 विहिरी देण्याचा एक मोठा कार्यक्रम सुध्दा होता त्यामध्ये काही वेळ गेला ही वस्तुस्थिती आहे पण त्या कार्यक्रमाला गती कशी देता येईल यासाठी शासन प्रयत्नशील आहे, हे देखील या निमित्ताने मी सांगू इच्छितो. मी खालच्या सभागृहात उत्तर देताना सांगितले की, अशा विहिरींसाठी सध्या जी 1 लाखाची मदत दिली जाते त्यात वाढ करण्याचा विचार शासन करीत आहे असे सांगून या कार्यक्रमात आणखी सुसूत्रता कशी आणता येईल याचाही प्रयत्न शासन करणार आहे अशी ग्वाही मी देत आहे. असे अनेक प्रश्न उपस्थित केले त्यामुळे चांगल्या प्रकारे हा विभाग पुढे नेता येईल याचीही मी ग्वाही देतो आणि माझे भाषण संपवितो.

-------

( ......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल : महोदय, महत्वाची गोष्ट अशी की, केंद्रशासनाने कोणता भाव द्यावा हा विषय केंद्रशासनाचा आहे आणि राज्यशासनाने कोणता भाव द्यावा हा आपल्या राज्याचा विषय आहे. माझा प्रश्न असा आहे की, मला शेतीच्या उत्पादनासाठी किती खर्च येतो हे गृहित धरणे आवश्यक आहे. ज्या पध्दतीची क्रुर चेष्टा शेतकऱ्याबरोबर चालू आहे ते योग्य नाही. कारण शेतमालाला जो खर्च प्रत्यक्षात येतो तो न धरता दुसराच खर्च गृहित धरण्यात येतो. म्हणून माझी विनंती आहे की, मी जो प्रत्यक्षात खर्च करतो तो गृहित धरणार काय ? त्याचबरोबर आपण सांगत आहात की, पाण्याशिवाय शेतीला दुसरे काही नाही. जमिनीतील पाणी खोल चालले, वरुन पडणारे पाणी आणि खालून येणारे पाणी त्याची जी परिस्थिती आहे ती पाहता लोकांना जगविणे महत्वाचे आहे. परंतु जी सबसिडी आपण देत आहात ती फक्त 25 टक्केच आहे त्यात वाढ करुन 100 टक्के सबसिडी दिली पाहिजे. तसेच ही सबसिडी देताना दोन हेक्टरचाच निकष का लावण्यात येतो ? सर्वात महत्वाचे म्हणजे पाण्याचे दुर्भिक्ष्य येणार असेल आणि शासन भूजल विधेयक आणून जमिनीतील पाणी काढावयाचे नाही असा प्रयत्न करीत आहे. या अनुषंगाने मी असे सांगणार आहे की, पाण्यावर आपण अशा प्रकारे बंदी आणणार आहात. ही बातमी कालच पेपरला वाचली तेव्हा माझ्या मनात चर्र झालं. समजा माझा आता मारलेला बोअर खोल असेल आणि हे विधेयक आल्यानंतर तर तो निम्मा बुजावा लागणार आहे, अशा परिस्थितीत जगावे की मरावे असाच प्रश्न मला पडणार आहे. अशा वेळेस शेतकऱ्याची परिस्थिती काय होणार आहे ? याचा विचार शासनाने करावा.

यानंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल....

अशा परिस्थितीमध्ये शासन वेगळा विचार करणार आहे काय ? आम्हाला बोलायला संधी मिळण्यासाठी शासन मंडळ निर्माण करणार आहे काय ? या 2-3 गोष्टींवर माननीय मंत्रिमहोदयांनी आम्हाला मार्गदर्शन करावे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, एखादी समिती असावी. तेथे थिंक टँक सारखी चर्चा व्हावी असे सन्माननीय सदस्यांना वाटते. या सूचनेचा निश्चित विचार केला जाईल. दुसऱ्या प्रश्न पाणी वापरासंबंधीचा होता. यासंबंधी मी असे सांगेन की, मी हजारो कोटी रूपयांचा पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम सांगितला. कितीही पाणलोट केले आणि पाणी जिरविण्याचा प्रयत्न केला तर परंतु, जो पर्यंत बोअरवेलमधील पाणी हॉर्सपॉवर पंपाने खेचू तो पर्यंत हे पाणी आपल्याला कमीच पडणार आहे, पुरणार नाही ही वस्तुस्थिती आहे. पाणलोट केले. तथापि जे धनदांडगे असतात त्यांनी बोअरवेल घेतली तर ते 100 गरिबांचे विहिरीचे पाणी संपवून टाकतात. म्हणजे बोअर हा भांडवलशाही असतो. तो समतावादी नसतो या मताचा मी आहे. बोअर हा पाण्याचा कार्यक्रमाला लागलेला कॅन्सर आहे, असे देखील माझे मत आहे. त्यामुळे याबाबतीत निर्णय व्हावा असे मला वाटणे साहजिकच आहे. पाण्याचा वापर करायचा असेल तर त्याचा राजमार्ग ठिंबक सिंचन हा आहे. यामध्ये दोन गोष्टी आहे. यात 50 टक्के वाटा शेतकऱ्याचा असतो. 10 टक्के आपला आणि 40 टक्के वाटा केंद्र शासनाचा असतो. शेतकऱ्यांना मिळणारे एकरी अनुदान आपण पहिले तर ते 35 टक्क्यापर्यंत मिळते ही वस्तुस्थिती मी नाकारीत नाही. केंद्राने किंमतीच्या काही मर्यादा घालून दिलेला आहे. त्याचा तो परिणाम आहे. यामध्ये केंद्राने काही तरी बदल करावा म्हणून मी श्री.शरद पवार साहेबांशी देखील चर्चा केली. मी माननीय मुख्यमंत्र्यांना देखील विनंती केली की, आपला वाटा राज्य शासनाने उचलावा. पाण्याचा, खताचा,विजेचा,मातीच्या पोताचा फायदा आहे की राष्ट्रीय उत्पन्नात भर टाकणारे काम असल्यामुळे आपले पुढचे नियोजन हे ठिबकने पाणी वापरणे असे असले पाहिजे. म्हणून 75 टक्क्यांपर्यंत आपण जावे आणि 25 टक्क्यापर्यंत शेतकऱ्यांनी जावे इथ पर्यंत आग्रह हा माझ्या विभागाचा राहिलेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी विधान सभेत सुद्धा जास्तीतजास्त मदत करण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन दिलेले आहे. त्यामुळे हा प्रयत्न आहेच. आपण थिंक टँक करणार आहोत. त्यात त्यांनी पाण्याचा किती वापर व्हावा यासंबंधातील आपले विचार मांडले तर अधिक चांगले होईल. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.प्रकाश शेंडगे) : सर्व माननीय मंत्रिमहोदयांची उत्तरे पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे राईट ऑफ रिप्लाय देतील. आता सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांनी प्रश्न विचारावा.

श्री.अरूण गुजराथी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी अभ्यासपूर्ण उत्तर दिले. पण बियांणांच्या संदर्भात त्यांच्या भाषणामध्ये उल्लेख नव्हता. भेसळ बियाणे बाजारात येत आहे त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. यासंबंधातील कायदा येतो आहे हे गेल्या 10 वर्षापासून ऐकतो आहे. पण भेसळ बियाणे प्रतिबंधक संबंधातील कायदा अजून पर्यंत आलेला नाही. त्याच प्रमाणे उच्च श्रेणीचे बियाणे तयार करून कमी मुदतीत येणारे पीक, कमी पावसामध्ये येणारे पीक याचे संशोधन वेगवेगळ्या कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून शासन करणार आहे काय ?

यानंतर श्री.गायकवाड ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माती, पाणी आणि बियाणे हे शेतीचे मुलभूत घटक आहेत.त्या पैकी एका मुलभूत घटकाच्या सदंर्भात सन्माननीय सदस्य अरुण गुजराथी यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. बियाण्यांच्यामध्ये अनेक मोठया कंपन्यांचा सहभाग असतो आणि एखाद्या ठिकाणी चुकीचे काही घडत नाही असे मी म्हणणार नाही परंतु त्या बाबतीत कडक कारवाई करण्यासंबंधी शासन दक्ष असते. हा केन्द्र सरकाराशी निगडीत कायदा आहे आणि राज्याचा कायदा असावा यासाठी 2002 साली राज्य सरकारने प्रयत्न केला होता परंतु केन्द्र सरकारकडून असे उत्तर देण्यात आले होते की, या संबंधी राज्याला कायदा करता येणार नाही आणि केन्द्र सरकार नवीन कायदा लवकरच करणार आहे.त्याचबरोबर राज्य सरकारने पाच वर्षापूर्वी केन्द्र सरकारला काही सूचना केल्या होत्या केन्द्र सरकारकडून ज्या काही अपेक्षा आहेत त्या बाबतीत पुन्हा त्यांना सूचना केल्या जातील. तसेच आपल्या राज्यात बियाण्यांचा सर्वात चांगला कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा उपस्थित केला की काळाच्या आघोत ज्या बियाण्यांची गरज असेल ते बियाणे तयार करण्यास विद्यापीठांना सांगावयास पाहिजे. देशामध्ये क्रिएसेक्स नावाची एक संस्था असून ती बियाण्यांच्या क्षेत्रात चांगले काम करीत आहे त्याचप्रमाणे आपल्याकडील कृषी विद्यापीठांचा देखील चांगले बियाणे तयार करण्याचा प्रयत्न असतो आपण त्यांना फारसे अनुदान देऊ शकत नाही परंतु आयसीएसआर कडून, केन्द्र सरकारकडून त्यांना चांगल्या प्रकारचे अनुदान मिळत असते त्याना आणखी आर्थिक मदत देण्याची आवश्यकता आहे तरच त्यांच्याकडून अधिक चांगले काम होऊ शकेल तेव्हा त्या दृष्टीने देखील प्रयत्न केले जातील असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार (उर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये शेतक-यांनी उत्पादन केलेल्या मालाला खर्चावर आधारित भाव मिळावा यासंबंधी प्रस्ताव मांडला आहे. त्या प्रस्तावामध्ये वीज नसल्यामुळे शेती उत्पन्नावर परिणाम होतो असा देखील उल्लेख करण्यात आलेला आहे.याबाबतीत सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम ,दिवाकर रावते, जयंत प्र.पाटील आणि इतरही सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी असे सागितले की, राज्यामध्ये 2 लाख 88 हजार शेतक-यांच्या कृषी पंपासाठी वीज कनेक्शन देण्याचे प्रलंबित आहे. या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, 2 लाख 88 हजार 201 शेतक-यांचे अर्ज प्रलंबित होते ही गोष्ट खरी आहे. त्यापैकी 1 लाख 77 हजार 51 अर्जदार आवश्यक रक्कमेचा भरणा करुन प्रतीक्षा यादीवर होते, त्यापैकी 1लाख 5 हजार 669 अर्जदारांनी कृषी मोटार पंप संचाचा चाचणी अहवाल सादर केलेला आहे. 2 लाख 88 हजार अर्जापैकी 2009-2010 सालामध्ये आतापर्यंत 1 लाख 54 हजार 415 कृषी पंपाना कनेक्शन जोडण्यात आलेले आहे एका शेतक-याच्या एका कृषी पंपाच्या जोडणीसाठी 1 लाख 7 हजार रुपये खर्च येत असतो. या वर्षी 1 लाख 7 हजार कृषी पंप जोडण्यासाठी 1200 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे त्यातील .250 ते 300 कोटी रुपयांचे अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाते. या वर्षी त्याप्रमाणे अनुदान उपलब्ध करुन दिलेले आहे. 940 कोटी रुपयांचा उर्वरित निधी लागणार आहे . ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाकडून कर्जाऊ अर्थसहाय्य घेऊन महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी हा खर्च भागवणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुडकर आणि श्री.दिवाकर रावते यांनी 2007च्या सुमारास वीज पुरवठा न केल्यामुळे शामराव तुळशीराम मते याने आत्महत्या केली होती असा प्रश्न उपस्थित केला होता. या बाबतीत एक लक्षवेधी सूचना देखील मांडण्यात आली होती त्यावेळी निवेदन करीत असतांना सर्व वस्तुस्थिती सांगितली होती. सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी सांगितले की, "दोन दोन वर्षे वीज कनेक्शन न मिळाल्यामुळे शेतक-यांना आत्महत्या करावी लागते ही वस्तुस्थिती सभागृहासमोर मांडणे हे माझे कर्तव्य समजतो"..

.

नंतर श्री.सरफरे

अस्पष्ट प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार...

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अंजनगाव तालुक्यातील शिरपूर येथील शेतकरी श्री. शामराव तुळशीराम मते यांनी केलेल्या आत्महत्त्येच्या संदर्भात याठिकाणी मुद्दा मांडला होता. त्या संदर्भात मी याठिकाणी सांगू इच्छितो की, मौजा नवापूर या गावामध्ये डीपी क्र. 2 मधून अवैधरित्या वीजेचे कनेक्शन घेऊन 10/12 विद्युत पंप सुरु आहेत, अशा प्रकारची तक्रार दि.10.1.2007 व दि.16.1.2007 रोजी शेतकऱ्यांकडून प्राप्त झाली. त्यामुळे त्याबाबत पहाणी करण्यासाठी सहाय्यक अभियंता श्री. एन.यू. उईके आणि कनिष्ठ अभियंता श्री. डी.एच.राजपूत हे तपासणीसाठी त्या गावाला गेले. त्यावेळी तपासणी करीत असतांना काही ग्राहक आकडे टाकून वीज चोरी करीत असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर आणखी 3 ग्राहक अनधिकृतरित्या विजेचा वापर करीत असल्याचे आढळले. त्यांची नावे श्री. शामराव तुळशीराम मते, श्रीमती शांताबाई तुळशीराम मते, श्री. गजाननराव शंकरराव टेकाडे अशी आहेत. या नावांचा उल्लेख माननीय सदस्य सर्वश्री. रामदास कदम, दिवाकर रावते यांनी याठिकाणी केला होता. त्या लोकांनी आपल्या विहिरीसाठी जुने कनेक्शन घेतले होते. त्याचबरोबर त्यांनी अवैधरित्या नवीन कूपनलिका मारली होती, त्यासाठी त्यांनी अवैधरित्या विजेचे कनेक्शन जोडले होते. त्याबाबत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सन 2007 मध्ये लक्षवेधी सूचना दिली होती. अशाप्रकारे अवैधरित्या विजेची जोडणी केल्यामुळे विद्युत अधिनियम 2003 अन्वये त्यांच्यावर कारवाई केली होती. त्यानुसार त्यांना 3 हजार 38 रुपयांचा दंड ठोठाविण्यात आला होता. त्यांच्याकडे दंडाची रक्कम भरण्याकरिता अनेक वेळा मागणी करुनही त्यांनी ती रक्कम भरली नाही. आणि म्हणून त्यांचा विद्युतपुरवठा खंडीत केल्यामुळे श्री. शामराव तुळशीराम मते यांनी विद्युत मंडळाच्या वीज केंद्राच्या ठिकाणी जाऊन आत्महत्त्या केली. याबाबत निपक्षपातीपणे चौकशी करण्याकरिता श्री. राजपूत आणि श्री. उईके या दोन अधिकाऱ्यांना निलंबित केले होते. त्या अधिकाऱ्यांचा दोष नसतांनाही त्यांना निलंबित करण्यात आले होते. त्यावेळी अमरावतीचे पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या विनंतीनुसार सन 2007 मध्ये श्री. मते यांना विजेचे कनेक्शन जोडून देण्यात आले. श्री. मते यांना यापूर्वी दिलेले विजेचे कनेक्शन नंतर खंडीत करण्यात आले होते, ते पुन्हा जोडून देण्यात आले. माननीय विरोधी पक्षनेते यांनी प्रश्न उपस्थित केला होता म्हणून मी सांगू इच्छितो की, त्यांनी कृषी पंपाला अवैधरितीने विजेचे कनेक्शन जोडून घेतले होते. ते कनेक्शन तोडल्यानंतर त्यांनी आत्महत्त्या केली होती.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री. विजय वडेट्टीवार...

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी दुसरा प्रश्न उपस्थित केला होता. त्यांनी सांगितले की, कोकणामध्ये 1 टक्का सिंचन झाले आहे. मला आपल्या लक्षात आणून दिले पाहिजे की, कोकणामध्ये संपूर्ण लागवडीखालील क्षेत्र 15 लाख हेक्टर आहे. आपल्याला कोकणची भौगोलिक परिस्थिती माहीत आहे. सिंचनाखाली येणारे एकूण क्षेत्र 3 लाख 67 हजार हेक्टर आहे, त्यापैकी आतापर्यंत 1 लाख 4 हजार हेक्टरमध्ये सिंचन निर्मिती करण्यात आली आहे. अशापरिस्थितीत आपण कोकणामध्ये 1 टक्का सिंचन झाले आहे असे म्हणत आहात. त्या अनुषंगाने मी याठिकाणी वस्तुस्थिती सादर करीत आहे. शेतकऱ्यांच्या कृषी पंपाला कमी पैशामध्ये वीज उपलब्ध करुन दिली पाहिजे, त्यांना स्वस्तात वीज उपलब्ध करुन दिली पाहिजे यासाठी राज्य सरकारने प्रयत्न केले. शेतकऱ्यांच्या कृषी पंपाला विजेचे कनेक्शन देतांना 3 हॉर्स पॉवर्सपर्यंत...

(अपूर्ण - यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून माननीय मंत्री महोदयांनी कोकणामध्ये किती टक्के सिंचन झालेले आहे, ते मला सांगावे. जेणेकरुन मला पुढे ते सोयीचे होईल.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी सांगितले की, कोकणातील लागवडीलायक जे क्षेत्र . . . ..

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी कोकणामध्ये किती टक्के सिंचन झाले आहे असे विचारले आहे आणि माननीय मंत्री महोदय वेगळे उत्तर देत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये किती लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे ? कोकणातील किती लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे ? तर त्याबाबतीत मी एक टक्का असे म्हटलेले आहे. मात्र माननीय मंत्री महोदयांनी कोकणात किती टक्के सिंचन झाले आहे ते सांगावे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.रामदासजी कदमसाहेब यांना सांगू इच्छितो की, लागवडीलायक क्षेत्र हे 15 लक्ष हेक्टर इतके आहे. कोकणामध्ये सिंचना खाली येणारे क्षेत्र 3 लाख 67 हजार हेक्टर आहे, म्हणजे जेथे आपण पाणी देऊ शकतो, सिंचन उपलब्ध करु शकतो, जेथे सिंचनासाठी विविध उपाययोजना करु शकतो तेवढे क्षेत्र हे मघाशी सांगितल्याप्रमाणे 3 लाख 67 हजार हजार हेक्टर इतके आहे. आपल्याला तेथील भौगोलिक परिस्थिती माहिती आहे. 3 लाख 67 हजार हेक्टरपैकी आपण तेथे 1 लाख 4 हजार हेक्टर सिंचन निर्मिती केलेली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी काल जे बोललो आहे ते मला अजूनही आठवत आहे. संपूर्ण देशामध्ये सिंचन व्यवस्था 52 टक्के आहे. स्वातंत्र्यांनंतर महाराष्ट्रामध्ये सिंचन व्यवस्था फक्त 18 टक्के आहे आणि त्यापैकी माझ्या कोकणामध्ये फक्त 1 टक्के सिंचन व्यवस्था झालेली आहे असे मी म्हटलेले आहे आणि मी हे जबाबदारीने बोलतो. काल रात्री जे बोललो, तेच पुन्हा आता बोलत आहे. म्हणून कोकणामध्ये किती टक्के सिंचन व्यवस्था झालेली आहे तेवढे मला माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी माननीय सदस्य श्री.रामदासजी कदम यांना तेच सांगू इच्छितो की, लागवडीलायक क्षेत्राचा हिशोब काढला तर ते प्रमाण 28 टक्के आहे. सिंचनाखाली येणारे जेवढे क्षेत्र आहे, त्याची टक्केवारी काढली तर हे प्रमाण 28 टक्के आहे.ओव्हर

. . . .3 एच-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार . . . .

ऑल टक्केवारी काढली तर आपण साडेतीन टक्क्यामध्ये आहोत ही वस्तुस्थिती आहे. म्हणून . . .

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा सांगतो. माझ्याकडे शासनाची जी आकडेवारी आहे, त्यानुसार कोकणामध्ये सिंचन 2 टक्के आहे, ते साडेतीन टक्के इतके नाही. मी काल जबाबदारीने सांगितले की, देशामध्ये सिंचन व्यवस्था 52 टक्के, राज्यामध्ये 18 टक्के आणि कोकणामध्ये 1 टक्के आहे अशी मी देश, राज्य आणि माझा जिल्हा याबाबत माहिती दिली आहे. परंतु माननीय मंत्री महोदय कोकणातील सिंचन क्षेत्र साडेतीन टक्के आहे असे जर म्हणत असतील, तर ती माहिती चुकीची आहे. यानंतर माझा कोकणाच्या संदर्भात एक प्रस्ताव आहे आणि त्यावेळी मी याबाबत बोलणार आहे. माझ्याकडे याबाबत सगळी आकडेवारी आहे आणि ती मी पुन्हा येथे मांडेन. मग त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, याबाबतीत जी वास्तविकता आहे, ती माहिती मी सांगितली आहे. खरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.रामदासजी कदम यांचा अशासकीय ठराव आहे, त्यावेळी परत आपले विचार मांडता येतील. त्यांनी जो प्रश्न विचारला होता, त्याबाबतीत मी उत्तर दिलेले आहे आणि ते अधिकृत शासनाच्यावतीने दिलेले उत्तर आहे.

सभापती महोदय, याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतला आहे. विशेष करुन विदर्भातील वीज पंपाच्या बॅकलॉग बाबत मुद्दा मांडण्यात आला. त्याठिकाणी विजेची जी मागणी आहे, त्याच्या तुलनेमध्ये दरवर्षी विजेचे कनेक्शन देण्याचे काम करण्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच राज्यातील वीज पंपाच्या बाबतीत सांगावयाचे तर शेतकऱ्यांच्या वीज पंपाची कनेक्शन उशीरा जोडली जातात. याबाबतीत मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, पुढील वर्षामध्ये जून 2010 पर्यंत वीज कनेक्शनच्या बाबतीतील जी प्रलंबित प्रकरणे आहेत, ती निकाली काढण्यासाठी आमच्या संबंधित विभागाला सूचना दिलेल्या आहेत आणि तेथील सर्व विजेची कनेक्शन जोडून देण्याची कार्यवाही केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, तुम्ही वीज देणार हे आम्हाला मान्य आहे. पण यासाठी वीज कुठून आणणार आहात ? ते सांगत नाहीत. कारण 2012 मध्ये आपण लोडशेडींग मुक्त होणार आहोत.

-----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, या सदनाचे आदरणीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी याठिकाणी महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये काल शेतकरी आणि त्यांच्या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी आदरणीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावतेसाहेब, जयंत प्र.पाटील, सय्यद जमासाहेब, सय्यद पाशासाहेब, माननीय श्री.रामदासजी कदमसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकरसाहेब, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे अशा अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये सहभाग घेतला.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके .....

आणि अतिशय चांगली चर्चा याठिकाणी घडवून आणली त्याबद्दल मी शासनाच्या वतीने सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो. सभापती महोदय, याठिकाणी थोडया वेळा पूर्वीच कृषी खात्याचे मंत्री माननीय बाळासाहेब थोरात यांनी या चर्चेला अतिशय सविस्तर असे उत्तर त्यांच्या भाषणातून दिलेले आहे. या चर्चेच्या निमित्ताने इतर चर्चा याठिकाणी उपस्थित करण्यात आलेली आहे. त्यामध्ये प्राधान्याने विदर्भातील शेतकऱ्यांच्या विशेषत: अमरावती विभागात होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि त्यासंदर्भात ज्या काही विविध उपाययोजना राज्य शासनाने केलेल्या आहेत त्यामध्ये राज्य शासनाच्या वतीने 1075 कोटी रुपयाचे पॅकेज देण्यात आले. त्याचबरोबर माननीय पंतप्रधान महोदयां वतीने 3750 कोटी रुपयाचे पॅकेज देण्यात आले. सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मला सांगावयाचे आहे की, दिनांक 28 फेब्रुवारी, 2010 अखेर अंमलबजावणीचे जे आकडे आहेत त्यामध्ये 1075 कोटी ऐवजी 1338 कोटी रुपये इतका खर्च झालेला आहे म्हणजे जवळ जवळ 124 टक्के या पॅकेजची अंमलबजावणी झालेली आहे. माननीय पंतप्रधानांच्या 3750 कोटी रुपयाच्या पॅकेजच्या अगेन्स्ट आतापर्यंत 4275 कोटी रुपये म्हणजे 14 टक्के खर्च झालेला आहे. यामधून जे साध्य झालेले नाही त्याबाबतची आकडेवारी देखील माझ्याकडे उपलब्ध आहे. विदर्भामध्ये आणि अमरावती विभागामध्ये जी परिस्थिती निर्माण झाली त्यासंदर्भात निश्चितपणाने राज्य शासनाच्या वतीने आणि केंद्र शासनाच्या वतीने या पॅकेजच्या माध्यमातून निरनिराळया योजना राबवून त्यांना मदतीचा हात देण्याचे काम झालेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकरसाहेबांनी याठिकाणी प्रश्न उपस्थित केला की, केंद्र शासनाच्या माध्यमातून किती कर्ज माफी झाली. राज्य शासनाच्या माध्यमातून किती कर्ज माफी झाली. राज्याचा जर विचार केला तर केंद्र शासनाच्या माध्यमातून या राज्यातील जवळ जवळ 34 लाख शेतकऱ्यांना 7800 कोटी रुपयाची कर्जमाफी झालेली आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून साडे सदोतीस लाख शेतकऱ्यांना 3764.36 कोटी रुपयाची कर्ज माफी झालेली आहे.

श्री. दिवाकर रावते (बसून) : हे सर्व पैसे बँकेत गेले.

श्री. प्रकाश सोळंके : आता ते पैसे बँकेत गेले का कुठे गेले माहीत नाही परंतु ते पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावरच गेले. कर्जमाफी देण्याचा उद्देशच असा होता की, शेतकरी परत कर्ज मिळण्यासाठी पात्र व्हावा. सभापती महोदय, या दोन्ही योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके...

देण्याचे काम मोठया प्रमाणात झालेले आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. पीक कर्ज वाटप ही शेतीच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक असणारी बाब आहे. मार्च, 2009- 2010 ची आकडेवारी पाहिली तर या महाराष्ट्रासाठी 13124 कोटी रुपये पीक कर्ज वाटप व्हावे असा शासनाने लक्षांक ठेवला होता त्याच्या अगेन्स्ट 10516 कोटी रुपयाचे पीक कर्ज वाटप या महाराष्ट्र राज्यात झालेले आहे. म्हणजे जवळ जवळ 80 टक्के पीक कर्ज वाटप झालेले आहे. त्यामध्ये समाधानाची गोष्ट अशी की, जिल्हा मध्यवर्ती बँकेला जो लक्षांक दिला होता तो 7854 कोटी रुपयाचा दिला होता.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ....

त्याच्या अगेंस्ट 7641 कोटी रुपये म्हणजे 97 टक्के लक्षांक पार पाडलेले आहे. ढोबळ मानाने विचार केला तर राज्यामध्ये सव्वा कोटी शेतकरी खातेदार आहेत आणि या सव्वा कोटी खातेदारांपैकी आज सहकारी सोसायट्यांचे किंवा सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य असणाऱ्यांची संख्या निश्चितपणे 1 कोटी 6 लाख इतकी आहे. त्यापैकी अंदाजे 48 लाख शेतकऱ्यांना जिल्हा मध्यवर्ती बँकेतून कर्ज पुरवठा झालेला आहे. परंतु अजूनही अनेक अल्पभूधारक शेतकरी किंवा बहुभूधारक शेतकरी कर्जापासून वंचित आहेत हे नाकारुन चालणार नाही. यामध्ये ज्या राष्ट्रीयकृत बँका आहेत किंवा ज्या ग्रामीण बँका आहेत त्यांच्याकडून म्हणावा तसा प्रतिसाद आपल्याला मिळत नाही हे नाकारुन चालणार नाही. या दृष्टीकोनातून मला या निमित्ताने सभागृहाला अवगत करावयाचे आहे की, या वर्षी माननीय केंद्रीय वित्तमंत्र्यांनी एक योजना जाहीर केलेली आहे. ग्रामीण भागामध्ये या राष्ट्रीयकृत बँका पोहोचलेल्या नाहीत त्यामुळे किमान 2 हजार लोकसंख्या असलेल्या गावामध्ये राष्ट्रीयकृत बँकेची एक तरी शाखा उघडली गेली पाहिजे असा निर्णय केंद्रीय वित्तमंत्र्यांनी घेतलेला आहे. त्यादृष्टीकोनातून नियोजन करण्याचे काम सहकार खात्याच्या माध्यमातून हाती घेतले आहे. त्या ठिकाणी त्यांना जागा उपलब्ध करुन देणे, त्या ठिकाणी बँकेचे नेटवर्किन्ग उभे करण्यासाठी जे लागणार आहे ते उपलब्ध करुन देण्याचे काम राज्य शासनाच्या सहकार खात्याने हाती घेतलेले आहे आणि येत्या वर्षभरामध्ये या राज्यातील प्रत्येक 2 हजार लोकसंख्येच्या गावामध्ये राष्ट्रीयकृत बँकेची शाखा किंवा त्यांचा एक तरी बिझनेस करस्पांडंट की ज्याच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांना कर्ज उपलब्ध होऊ शकेल अशी व्यवस्था करण्याचा प्रयत्न आहे. बिझनेस करस्पांडंस नेमणे ही पहिली स्टेज आहे आणि त्यानंतर शाखा उघडणे हा दुसरा भाग आहे. या दृष्टीकोनातून ग्रामीण बँका आणि राष्ट्रीयकृत बँका आता भविष्य काळामध्ये मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना पीक कर्ज असेल, शेतीसाठी लागणारे कर्ज असेल ते उपलब्ध करुन देऊ शकतील. सन 2012 पर्यंत सर्वच खातेदारांना सहकारी संस्थांचे सभासद करुन घेणे आणि त्यांना पीक कर्ज उपलब्ध करुन देणे हे उद्दिष्ट सहकार खात्याने ठेवलेले आहे. त्यामुळे निश्चितपणे भविष्य काळामध्ये उद्दिष्ट साध्य करता येईल. पीक कर्जावरील व्याजदराच्या बाबतीत आतापर्यंत आपण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST

श्री. प्रकाश सोळंके .....

पंजाबराव कृषी सहाय्यक योजनेच्या माध्यमातून 25 हजार रुपयांपर्यंतच्या पीक कर्जाला 2 टक्के व्याजदर आकारत होतो आणि 25 हजार रुपयांपासूनपुढे 3 लाख रुपयांपर्यंत आतापर्यंत 4 टक्के दराने पीक कर्जाचा पुरवठा केला जात होता. परंतु आता महाराष्ट्र शासनाच्या वतीने सन 2010-2011 पासून 50 हजार रुपयांपर्यंतच्या पीक कर्जाला कोणत्याही प्रकारची व्याजाची आकारणी न होता, त्याचे व्याज शेतकऱ्यांना भरावे न लागता शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन द्यावयाचे असा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. अर्थसंकल्पाच्या पुस्तकामध्ये ते दर्शविलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

सन्माननीय सदस्य असे म्हणत आहेत की, शासनाने बजेटमध्ये कर्जाची नियमित परतफेड करणारे जे शेतकरी आहेत त्यांनाच कमी दराने कर्ज मिळणार आहे असे जाहीर केले आहे. होय, शासनाचे जे धोरण आहे ते बरोबरच आहे. अशा शेतक-यांनाच कमी दराने कर्ज मिळाले पाहिजे. दोन टक्के दराने 3 लाखापर्यंत कर्ज देण्याचा एक चांगला निर्णय शासनाने घेतलेला आहे. सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी सावकारी व त्यांची कर्जे या माध्यमातून शेतक-यांची पिळवणूक होते यासंबंधी विचार मांडलेले आहेत. खाजगी सावकारीच्या संदर्भात 1946 चा अधिनियम महाराष्ट्र सावकारी विनियमन 2010 हे विधेयक विधानसभेत मांडण्यात आले आहे, तेथे मंजूर झाल्यावर ते विधानपरिषदेत येणार आहे. या कायद्यामध्ये अनेक त्रुटी आहेत त्या दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. या सभागृहात ते विधेयक येईल त्यावेळी सविस्तरपणे चर्चा करता येईल. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी ज्वारीच्या व बाजरीच्या पिकाबद्दल बोलत असताना 2500 रुपये भाव मिळाला पाहिजे, 3000 रुपये भाव मिळाला पाहिजे अशी भूमिका मांडली. महागाईच्या प्रश्नावर चर्चा करीत असताना सरकारला धारेवर धरले जाते. परंतु त्याला दुसरी बाजू असते त्याचाही विचार केला पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : दारुसाठी पीक काढा आणि जगा असा संदेश दिला जात आहे त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी असे म्हणालो नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल आणि आम्ही ज्वारी उत्पादक शेतक-यांचे प्रतिनिधी आहोत. त्यामुळे आम्हाला त्या प्रश्नांची जाण आहे. ज्वारीला 300-350 रुपये भाव मिळत नव्हता, परंतु आता त्याला पर्याय उपलब्ध झाल्यामुळे 700-800 रुपये भाव मिळत आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशींसंबंधी उल्लेख केला आहे. समन्वयक कृषी विकास प्रकल्प यासंदर्भात एक शिफारस सुचविली आहे. समग्र महाराष्ट्र कृषी विकास आराखडा यासंबंधी मुळात हेच सुचविले आहे की, नवीन योजनेऐवजी कृषी क्षेत्रात शासनामार्फत सध्या राबविण्यात येत असलेल्या सर्व योजनामध्ये समन्वय साधून कृषी विकास साधण्याचा प्रयत्न करावा अशी प्रमुख शिफारस त्यांनी केली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सन्माननीय मंत्री महोदयांनी डॉ.नरेंद्र जाधव समितीने अहवालामध्ये एकूण किती शिफारशी केल्या आहेत आणि त्यापैकी प्रमुख शिफारशी कोणत्या आहेत ते सांगावे. या समितीने 14 पानांचा त्रोटक अहवाल सादर केला आहे. मी तो अहवाल वाचला आहे, आपण त्यातील प्रमुख शिफारशी सांगाव्या.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी ज्या योजनांबद्दल माहिती देत आहे ती सन्माननीय सदस्यांनी ऐकून घ्यावी, डॉ.नरेंद्र जाधव समितीचा अहवाल मी देखील वाचलेला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सन्माननीय मंत्री महोदयांनी माझे नाव घेतले म्हणून मला बोलणे भाग आहे. नरेंद्र जाधव समितीच्या प्रमुख शिफारशी काय आहेत ?

श्री. प्रकाश सोळंके : त्या शिफारशी सांगण्याची माझी तयारी आहे. माझे भाषण पूर्ण होऊ द्यावे. इंण्टरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेण्ट (IFAD) यांच्या सहकार्याने 6-7 जिल्ह्यामध्ये आपण जो प्रकल्प राबवित आहोत त्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भूमिहीन मजूर, महिला, लहान सीमांत शेतकरी, शेतीमधून नैराश्यग्रस्त झालेले शेतकरी असे समाज घटक केन्द्रस्थानी धरुन हा प्रकल्प त्या ठिकाणी राबवायला शासनाने मान्यता दिलेली आहे. जवळ जवळ 593 कोटी रुपयाचा हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून भागीदारी निर्मिती व क्षमता विकास, शास्वत शेती व बाजार जाळे, महिला सक्षमीकरण व सुस्थितीमध्ये पुनर्स्थापित होण्याची क्षमता निर्मिती, प्रकल्प व्यवस्थापन अशा उपक्रमांचा हा प्रकल्प आहे. भारतातील सन रतन टाटा ट्रस्ट्र या एका चांगल्या एन.जी.ओ.च्या मदतीने हा प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पाचा उपयोग 6 जिल्ह्यातील शेतक-यांना निश्चितपणे होणार आहे. सन्माननीय सदस्यांनी जे विविध प्रश्न या चर्चेच्या निमित्ताने उपस्थित केले त्याना उत्तर देण्याचा प्रयत्न मी केलेला आहे.

श्री. रामदास कदम :ब्रिटीशांच्या काळामध्ये खोदलेले माजी मालगुजारी तलाव म्हणजे मामा तलावासाठी किती निधी दिलेला आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सांगितले होते की, कोकणातील सिंचनाखाली असलेल्या क्षेत्राची टक्केवारी 1.4 आहे असे सांगितले पण मी सांगू इच्छितो की, एकूण 6.80 टक्के कोकण सिंचनाखाली आलेला आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या विधवांना अंगणवाडी सेविका किंवा मदतनीस म्हणून घेण्यासंबंधीचा उल्लेख केला होता. यासंदर्भात मी अमरावती विभागाची माहिती देऊ इच्छितो. मदतनीस म्हणून 116 महिलांची निवड केलेली असून सेविका म्हणून 62 महिलांची निवड केलेली आहे. एकूण 178 महिलांना सेवेत सामावून घेतलेले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : आम्ही काही तरी केले, असे माननीय कृषी मंत्र्यांनी सांगण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद दिले. बियाणे, खते, किटकनाशके यांच्या संदर्भातील 3697 खटले प्रलंबित आहेत. ते निकालात निघत नाहीत. त्यासाठी एखादा विभाग करीत आहोत असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. तसे करु नका.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 16:35

श्री.दिवाकर रावते.....

मी सूचना करतो. काही जमते का बघा. या महाराष्ट्रामध्ये अपघात न्यायालये आहेत. धर्मादाय आयुक्त आहेत. सहकार न्यायालये आहेत. कामगार न्यायालये आहेत. म्हाडासाठी लवाद आहे, ट्रायब्यूनल आहे. तसे कृषि न्यायालय निर्माण करा. तेथे शेतकऱ्यांच्या फसवणुकीचे खटले चालावेत. 15-15, 20-20 वर्षे शेतकऱ्यांच्या फसवणुकीचे खटले रेंगाळत आहेत. संबंधितांना सजा होत नाही. कृषि क्षेत्रात फसवणूक करणाऱ्यांना शिक्षा होत नाही. म्हणून कायदा करण्यापेक्षा स्वतंत्र न्यायालय केले तर शेतकऱ्यांना न्याचय मिळेल. त्यादृष्टीने प्रयत्न करावा अशी सूचना करतो. केंद्रीय कायद्यामध्ये बदल अपेक्षित आहेत. सीड ॲक्ट, फर्टिलायझर ॲक्ट केंद्राचे आहेत. महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने त्या कायद्यामध्ये बदल करावयाचे झाले तर माननीय राष्ट्रपतींची मान्यता घेऊन त्यादृष्टीने पुढील अधिवेशनात विधेयक आणले तर उत्तम आहे. कॉटनचे बिल केले तसे नको. म्हणून मंत्रीमहोदयांना मी सगळी माहिती दिली आहे. या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रासाठी खास कायद्यात बदल करता येईल. ती अनुमती तुम्हाला मिळेल. देशामध्ये विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या गाजत असल्यामुळे केंद्राची अनुमती सहज शक्य होईल. आम्ही तुम्हाला सांगतो, तुम्ही करता आणि बोलता. दुर्दैवाने एवढा प्रचंड पैसा देऊनही तो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही अशी भूमिका सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम आणि सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी मांडली. प्रशासनावर तुमची पकड नाही. प्रशासनातील दोष तुमच्यासमोर मांडूनही त्याबद्दल कारवाई होत नाही. आम्ही मांडले, तुम्ही सांगितले. अधिकारी म्हणतात आम्ही खाल्ले ते पचले. ते पचले कसे? हे थांबवू शकलात तर सभागृहातील चर्चेला महत्व प्राप्त होईल. कापसावर लाल्या रोग आला. आता अळ्या गेल्या आणि लाल्या आला. बी.टी.कॉटनला अळ्या येत नाहीत. परंतु फवारणीचा खर्च दुप्पट झाला आहे. अळ्या परवडल्या. त्याबाबत शासन नुकसानभरपाई तरी देत होते. लाल्या रोगाबाबत नुकसानभरपाई दिली जात नाही. शेतकऱ्यांचा खर्च वाढला. अळ्या गेल्या आणि लाल्या रोगाचे प्रमाण वाढले. शेतकऱ्यांचे कर्म फुटले अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अकोल्याच्या संदर्भात जी भूमिका मांडली त्याबद्दल मी मंत्रीमहोदयांचे अभिनंदन करतो. देशोन्नतीने हा विषय लावून धरला होता. श्री.बाबाराव पाटील मृत्यूशय्येवर आहेत. आता रिकव्हरी होत आहे. त्यांनी हा प्रश्न तिथे नेला. शेतकऱ्यांसाठी 7 कोटी रुपये जाहीर केले. त्यांना पीक विमा मिळेल. केंद्रीय कृषि मूल्य

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आयोगाबद्दल तुम्ही पटकन बोललात. मी ते लिहून ठेवले. ते झोनल असावे. आपण तो आग्रह धरावा. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी मांडलेला विषय आहे. कृषि मूल्य ठरविताना, शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च ठरविताना ते हवामानानुसार ठरवावे लागेल. इस्त्रायल देशामध्ये एका एकरात 30 क्विंटल कापूस पिकतो. गुजराथमध्ये 20 क्विंटल पिकतो तर महाराष्ट्रामध्ये 7 ते 10 क्विंटल पिकतो. त्यामुळे कृषि उत्पादन खर्च आणि उत्पादकता या संदर्भात विभागवार फरक आहे. त्याप्रमाणे कृषि उत्पादनाचे भाव ठरले पाहिजेत. गव्हाचे भाव किती आहेत? आपल्याकडे रब्बीचा गहू आला. तो गहू एकरी 8 ते 10 क्विंटल येतो. पंजाबमध्ये एकरी 35 क्विंटल येतो. पंजाबच्या धर्तीवर भाव ठरविले तर या राज्यातील गहू उत्पादक शेतकरी मेला. म्हणून झोनल पध्दतीने भाव ठरविण्याबाबत तुम्ही पाठपुरावा करावा आणि झोनलप्रमाणे शेतकऱ्यांना फरक मिळेल ही भूमिका घ्यावी. ठिबक सिंचनाबाबत बोललात. मी लगेच म्हणालो की, सबसिडी वाढवा. तुम्ही म्हणालात, 75:25 करतो. शेतीच्या मातीत उभे राहून उत्तर द्या म्हणून धन्यवाद दिले. 75:25 ऐवजी 80:20 प्रमाण करा आणि लवकर निर्णय घ्या. ठिबक सिंचनामुळे भविष्यात शेतकऱ्यांना तो आधार ठरणार आहे. पाणी कमी आहे. ठिबक सिंचनाबाबत जेवढी सबसिडी वाढवाल ती महत्वाची आहे. याचा ताळमेळ घालावा लागेल. सिंचनाचा विषय काढला. सिंचनाबाबत सर्वात जास्त अनुशेष असलेला अमरावती जिल्हा महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर आहे. पश्चिम विदर्भामध्ये सिंचन हे पश्चिम महाराष्ट्रापेक्षा नगण्य आहे.

नंतर 3एन.1...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

विदर्भातील गोंदिया, भंडारा आणि चंद्रपूर या भागात सिंचन अगदीच नगण्य स्वरुपात आहे. सिंचनाच्या बाबतीत विदर्भातील अमरावती एक नंबर, वाशिम दोन नंबर, बुलडाणा तीन नंबर, अकोला आणि यवतमाळ हे अनुक्रमे चौथा आणि पाचवा नंबर अशी परिस्थिती सिंचनाची आहे. तेव्हा सिंचनासंबंधीच्या शासनाच्या ज्या उपाययोजना आहेत त्यात अनुशेषासाठी किती रुपये दिले यापेक्षा किती हेक्टर अनुशेष कमी झाला, अशा प्रकारे भौतिक स्वरुपातील अनुशेष मोजण्यापेक्षा तो हेक्टरमध्ये मोजायला हवा तरच राज्याचा अनुशेष दूर होईल ही भूमिका शासनाला पूढे घ्यावी लागणार आहे.

यानंतर माननीय उर्जा मंत्र्यांनी अमुक इतके विजेचे कनेक्शन्स दिले असे सांगितले. मी असे विचारणार आहे की, किती कनेक्शन्स दिले यापेक्षा किती कनेक्शन्स कापले हे महत्वाचे आहे. कारण हेच मुख्य कारण या आत्महत्त्यांच्या मागे आहे. मी आणि माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आम्ही दोघेही अंजनगांव-सुर्जी येथे ज्या शेतकऱ्याने आत्महत्त्या केली त्याच्या घरी गेलो होतो. त्याचे कनेक्शन आपण कापले म्हणून आत्महत्त्या केली असे आम्हाला कळले. परंतु ज्या सूचना केल्या त्यातून आपण फार थोड्यांची माहिती दिली. खरे तर मंत्री महोदयांकडून बऱ्याच गोष्टींची अपेक्षा होती परंतु दोन्ही राज्यमंत्र्यांनी ती पूर्ण केली नाही, त्यांना ते जमले नाही. माननीय महसूल राज्य मंत्र्यांनी सांगितले की, 50 हजार रुपये मदत केली परंतु वास्तविक त्यांचा पूर्ण पैसा द्यावयास पाहिजे होता. माननीय कृषी मंत्र्यांनी प्रामाणिकपणे उत्तर दिले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. शेवटी महसूल मंत्र्यांनी सांगितले की, फक्त 176 आत्महत्त्या झाल्या परंतु प्रत्यक्षात 5000 आत्महत्त्या झाल्या. शासनाने 176 लोकांनाच मदत केली, निदान त्यांच्या घरात तरी दोन घास जातील. तसेच नरेंद्र जाधवांनी आत्महत्त्यांच्या संदर्भात जो निष्कर्ष काढला की शासन जोपर्यंत दारिद्र्यरेषेखालील लोकांना सवलती देते त्या सवलती शेतकऱ्यांना देण्यात याव्यात. त्याची अमलबजावणी करण्याची घोषणा मंत्री महोदयांनी केली तर विदर्भाच्या पाच जिल्ह्यात जे 4.28 लाख शेतकरी शासनाच्या यादीत आहेत ते आत्महत्त्येपपासून दूर होतील, याचाही शासनाने विचार करावा. तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी 302 कलम लावण्याबाबत सूचना केली त्याऐवजी हे कलम अमलात आणले तर शेतकरी जगू शकेल असे मला वाटते. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

-----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल : महोदय, शासनाने पीक कर्ज वाटल्याचे बरेच आकडे दिलेले आहेत. मला अशी विनंती करावयाची आहे की, जे पीक कर्ज आपण शेतकऱ्यांना देतो ते सध्याच्या बदलत्या परिस्थितीत अत्यंत तुटपुंजे आहे. त्यात वाढ करण्याची गरज आहे. कारण आता बैलाचा वापर कोणीच करीत नाही, सर्व शेतकरी ट्रॅक्टरनेच जमीन करतात. अशा सर्व गोष्टींचा विचार करता पीक कर्जाच्या मर्यादेत वाढ करणे आवश्यक आहे, त्याशिवाय पर्याय नाही. उदा. आपण शहरात एखादा प्लॉट एक लाख रुपयाला विकत घेतला आणि तो विकायला काढला तर त्याची किंमत किमान 80 हजार तरी मिळते. या परिस्थितीचा विचार करता शेतकऱ्याला देण्यात येणारे पीक कर्ज 50 टक्क्यांनी तरी वाढवून मिळावे याचा विचार शासनाने करावा, अशी विनंती करतो.

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, सन्माननीय सदस्यांनी पीक कर्जाची मर्यादा वाढवून देण्याबाबत सूचना केली, त्या सुचनेचा जरुर विचार केला जाईल.

**तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे)** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

-------

यानंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.**: मुंबई प्रांतिक महानगरपालिका,नागपूर शहर महानगरपालिका महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन आणि महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LXVI OF 2009.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948, THE MAHARASHTRA MUNICIPAL CONCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965, THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975 AND THE MAHARASHTRA TAX ON BUILDINGS (WITH LARGER RESIDENTIAL PREMISES) (RE-ENACTED) ACT, 1979.)

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय,विधान सभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 66 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,1947, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,1965, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम,1975 आणि महाराष्ट्र (मोठ्या निवास जागा असलेल्या ) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) अधिनियम,1979 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 66 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,1947, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,1965, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम,1975 आणि महाराष्ट्र (मोठ्या निवास जागा असलेल्या ) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) अधिनियम,1979 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, आपल्या महाराष्ट्रामध्ये नगरपालिका,नगरपंचायती, महानगरपालिका आहेत. मुंबई महानगरपालिकेचा, नागपूर महानगरपालिकेचा, पुणे महानगरपालिकेचा कायदा वेगळा आहे आणि महाराष्ट्र नगरपंचायती नगरपरिषदा आणि ग्रामपंचायत अधिनियम 1965 चा कायदा वेगळा आहे. या कायद्यांतर्गत आपल्या ज्या नगरपालिका, नगर पंचायती, महानगरपालिका असतात यांचे सर्वात .....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे....

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, काल माननीय मुख्यमंत्र्यांच्या समोर ठरल्याप्रमाणे आपण येथे शासकीय विधेयक चर्चेसाठी घेतले आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मागच्या शुक्रवारचे अशासकीय कामकाज आपण आज घेत आहोत. मग आजचे अशासकीय कामकाज कधी करायचे.

**उपसभापती** : आता आपण कामकाज पत्रिकेप्रमाणे शासकीय विधेयक घेतले आहे. त्या प्रमाणे सन्माननीय मंत्रीमहोदयांनी विधेयक मांडायला घेतले आहे. काल जेव्हा हे विधेयक पुकारले तेव्हा माननीय मुख्यमंत्री महोदय होते. त्यावेळी मी आपल्याला विचारले होते की, हे बिल कधी काढणार. तेव्हा आपण सांगितले की, आम्ही उद्या दोन्ही बिले काढतो. कामकाज पत्रिकेप्रमाणे आता हे विधेयक आपण चर्चेसाठी घेतले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,आज अशासकीय कामकाजाचा दिवस आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मागच्या आठवड्यातील अशासकीय कामकाजातील ठराव आपण आज घेत आहोत. आजच्या दिवसाचे अशासकीय कामकाज आपण पुढच्या वेळी घ्यायचे काय ? असे जर केले तर अशासकीय कामकाज होणारच नाही. ..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आपण अशासकीय कामकाज आजच घेऊ या.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण बिलाची घाई करू नये. बिल आपण सोमवारी घेऊ शकतो.

**उपसभापती** : आज मी ऐकणार नाही. काल सभागृहात माननीय मुख्यमंत्री हजर होते. त्यांच्या देखत आपले कामकाज ठरलेले आहे. तेव्हा मी स्वत: या आसानावर बसलो होतो. ते माझ्या देखत ठरले आहे. आपल्याला हवे असल्यास व्होटींग घ्या, काहीही करा. पण आता मी विधेयक थांबविणार नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मागच्या शुक्रवारी आपण आमचा अधिकार काढून घेतला. आताही तो काढून घेणार काय ?

**उपसभापती** : मी कुणाचाही अधिकार काढून घेणार नाही. आपण अशासकीय कामकाजासाठी बसू या. आपण म्हणाल तेवढा वेळ बसू या. शेवटी आपल्या शब्दाला देखील काही किंमत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, उद्या याचा अर्थ शासकीय कामकाजाचा दिवस. आज सकाळी 10.30 वाजता आम्ही आलो आहोत.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण सर्वजण आज सकाळी 10.30वाजता आलो आहोत हे मला मान्य आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही एकही बिल थांबविलेले नाही.

**उपसभापती** : हे आपण कालही बोलला होता.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, त्याचा अर्थ आपण समजून घ्यावा. आपल्या नियमाप्रमाणे आजचा दिवस हा शासकीय कामकाजाचा नाही. उद्या याचा अर्थ शासकीय कामकाजाच्या दिवशी पहिले बिल हे घेणार.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण आमच्या अधिकारावर गदा आणणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सभागृह हे बिल 15 मिनिटांमध्ये मंजूर करणार असाल तर ताबडतोब चर्चेसाठी घ्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ही काय पद्धत आहे. चर्चेला घेण्यासाठी हे बिल दहा मिनिटात मंजूर करायचे.

ॲड.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, हे बिल यापूर्वी या सभागृहात आलेले आहे. मुंबईच्या संदर्भातील बिल संमत झाले आहे.

**उप सभापती** : आज शुक्रवार आहे आणि काल गुरूवार होता हे आपल्यालाही माहीत होते आणि मलाही माहीत होते.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, पण माझ्या अधिकारावर गदा का ? मागच्या शुक्रवारचा हा प्रस्ताव आहे.

**उप सभापती** : मी आपल्या अधिकारावर बिलकूल गदा आणत नाही. विधेयक मंजूर झाल्यावर मी अशासकीय कामकाज घेणार आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना हा विषय पूर्णपणे माहिती आहे. अशा प्रकारचे मुंबई महानगरपालिकेचे बिल आपण मंजूर केले आहे.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.भारवि 16.50

श्री भास्कर जाधव..

कॅपिटल व्हॅल्यू ॲडेड बिल येथे मांडण्यात आलेले आहे त्या संदर्भात मला सभागृहाला थोडक्यात माहिती द्यावयाची आहे.

डॉ.दीपक सावंत : त्यावर मला बोलावयाचे आहे.

श्री.रामदास कदम : आज शुक्रवार असल्यामुळे अशासकीय कामकाज घेतले पाहिजे.

**उपसभापती** : तुम्ही मला अडचणीत आणत आहात. काल मी या आसनावर बसलो होतो त्यावेळी माझ्यासमोर जे काही ठरले होते त्यापासून मला दूर कसे जाता येईल ?

डॉ.दीपक सावंत : हे विधेयक उद्या घेण्यात यावे असे काल सांगितले होते परंतु आज अशासकीय कामकाजाचा दिवस आहे ते कामकाज प्रथम घ्यावे..........

**उपसभापती** : काले जे ठरले होते त्याप्रमाणे आपण कामकाज करु या.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, नागरी विभागाच्या संदर्भात निरनिराळे चार कायदे आहेत. पूर्वी रेटेबल व्हॅल्यू आधारित कर वसुली करण्यात येत होती परंतु मुंबई महानगरपालिकेमध्ये कॅपिटल व्हॅल्यू बेसिसवर कर वसुली करण्याचा निर्णय झाला होता त्यावेळी सन्माननीय सदस्यांच्या सूचनेप्रमाणे संयुक्त चिकित्सा समितीकडे हे विधेयक दोन वर्षापूर्वी पाठविण्यात आले होते. त्या समितीच्या एकूण अकरा बैठका झाल्या होत्या आणि सन्माननीय सदस्यांच्या ज्या काही सूचना होत्या त्या सूचनांचा आदर करुन व योग्य त्या सुधारणा करुन हे विधेयक पुन्हा सभागृहासमोर आले होते. मुंबई महानगरपालिकेच्या मर्यादेपर्यतच हे विधेयक लागू झाले होते.मुंबई महानगरपालिकेने 1 एप्रिल 2010 पासून `या विधेयकाप्रमाणे अंमलबजावणी सुरु केली आहे. ज्यावेळी हे विधेयक चर्चेला आले होते त्यावेळी अशा प्रकारची भीती व्यक्त केली होती की , या विधेयकामुळे कर वसुलीमध्ये फरक पडेल, करवसुलीमध्ये अन्याय होईल. परंतु अशा प्रकारे कोणताही अन्याय होणार नाही याची खातरजमा सर्व नागरिकांना झाली आहे....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, दिनांक 9 एप्रिल 2010 रोजी जे अशासकीय कामकाज दाखविण्यात आले होते त्यामध्ये कोकणातील सिंचनासबंधी माझा अशासकीय ठराव दाखविण्यात आला होता. ते कामकाज पुढे ढकलण्यात आले असल्यामुळे आज पुन्हा दाखविण्यात आलेले आहे. आज शुक्रवार असल्यामुळे अशासकीय कामकाजाचा आजचा दिवस आहे.

2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आज सकाळी 10.30 पासून सभागृहाचे कामकाज सुरु असल्यामुळे आम्ही सकाळ पासून येथे आलो आहे त्याचबरोबर आपण देखील आलेला आहात. हे मलाही मान्य आहे परंतु शुक्रवारी अशासकीय कामकाजाचा आमचा हक्काचा दिवस असतांना आमच्यावर अन्याय का करण्यात येत आहे ? अशासकीय कामकाज प्रथम घेण्यात यावे आणि त्यानंतर विधेयक घेण्यात यावे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याबद्दल मला पूर्ण् आदर आहे. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये हे विधेयक दाखविण्यात आलेले आहे. काल ज्यावेळी हे विधेयक चर्चेसाठी येणार होते त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी सांगितले की हे विधेयक उद्या घेण्यात यावे.

श्री.रामदास कदम : हे विधेयक आज आपण घेऊ या परंतु आताच मंजूर करण्याची घाई का करण्यात येत आहे ? त्यांनी जर शब्द दिला असेल तर तो आम्ही पाळू.

डॉ.दीपक सावंत : आज अशासकीय कामकाजाचा दिवस आहे.त्यांनी जर काही शब्द दिला असेल तर तो शब्द ते पाळतील आणि आम्हीसुध्दा पाळू.

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी आतापर्यंत दिलेला शब्द पाळला नाही असे कधीही झालेले नाही.दिलेला शब्द पाळणार असा त्यांचा लौकिक आहे. त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही परंतु मला एवढेच विचारावयाचे आहे की, माझ्या जागी जर आपण येथे बसला असता तर काय केले असते ?

श्री.रामदास कदम : अशासकीय कामकाज आता घ्यावयास पाहिजे होते.

**उपसभापती** : सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री विधेयकावर बोलण्यासाठी उभे राहिलेले आहेत. हे विधेयक झाल्या नंतर मी ताबडतोब अशासकीय कामकाज घेईन.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मला सभात्याग करावा लागेल.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी सभात्याग करु नये अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री.रामदास कदम : विधेयक नंतर घ्यावे आणि आता अशासकीय ठराव घेण्यात यावा. कोकणातील सिंचन प्रकल्पासबंधीचा अशासकीय ठराव आहे तो नंतर घेतल्यामुळे माझ्यावर अन्याय

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होणार आहे तसेच कोकणावरदेखील अन्याय होणार आहे. अशा प्रकारे कोकणावर नेहमीच अन्याय होत असतो....

श्री.दिवाकर रावते : चर्चेशिवाय विधेयक मंजूर करावयाचे काय ?

श्री.भास्कर जाधव :सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांना मला असे सांगावयाचे आहे की, कामकाजपत्रिकेमध्ये विधेयकानंतर अशासकीय कामकाज दाखविण्यात आलेले आहे.........

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बोलतात )

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, आपण सर्व सन्माननीय सदस्य आता सभात्याग करुन गेला तर आजचा दिवस माझ्या आयुष्यातील सर्वात वाईट आहे असे मी समजेन. इतक्या वर्षाच्या कालावधीत माझ्यावर असा प्रसंग कधीही ओढवला नव्हता.आपण जर सभात्याग केला तर मी असे समजेन की, माझ्यामध्ये काही तरी त्रृटी आहे. काल या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते तसेच आपण देखील उपस्थित होता आपल्या सर्वाच्या संमतीने मी पुढचे कामकाज केले होते .आपल्या सर्वाच्या सहकार्यामुळे मी आतापर्यतचे कामकाज यशस्वीपणे करु शकलो .

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**...

आज असा प्रसंग माझ्यावर ओढवणार असेल तर ते मी माझे दुर्दैव समजतो...

(गोंधळ)

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, विधेयक चर्चेला घेण्याबाबत आम्ही आपल्याला शब्द दिला होता. परंतु अशासकीय कामकाज संपल्यानंतर हे विधेयक आपण चर्चेला घ्यावे...

(गोंधळ)

**उपसभापती** : या संदर्भात माझ्या दालनामध्ये चर्चा करण्याकरिता आपण दालनामध्ये यावे. तोपर्यंत मी सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाचे कामकाज 4.55 ते 5.05 पर्यंत स्थगित करण्यात आले.)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**<u>सभापतीस्थानी - माननीय उप सभापती</u>**

**पृ.शी.**: मुंबई प्रांतिक महानगरपालिका,नागपूर शहर महानगरपालिका, महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी,महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे)झाडांचे संरक्षण व जतन आणि महाराष्ट्र (मोठया निवासी जागा असलेल्या)इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमित केलेला) (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. LXVI OF 2009.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948, THE MAHARASHTRA MUNICIPAL CONCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965, THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975 AND THE MAHARASHTRA TAX ON BUILDINGS (WITH LARGER RESIDENTIAL PREMISES) (RE-ENACTED) ACT, 1979.)

(चर्चा पुढे सुरु)

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आता हे विधेयक मुंबई महानगरपालिकेमध्ये लागू झ ाालेले आहे. हे विधेयक मुंबई महानगरपालिकेमध्ये लागू करण्यापूर्वी यावर खूप मोठी चर्चा झाली आहे, चिकित्सा झाली आह आणि मग हे विधेयक संयुक्त समितीसमोर गेले. त्या समितीसमोर हे विधेयक दोन वर्षे विचारार्थ होते. दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीमध्ये या विधेयकाच्या संबंधात जवळजवळ 11 बैठका घेण्यात आल्या. आता हे विधेयक दि.1 एप्रिल 2010 पासून मुंबई महानगरपालिकेने लागू करण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. मी यातील केवळ तीन-चार बाबी आपल्या सर्वांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, या बिलाच्या बाबतीत अशी भीती निर्माण केली जात आहे की, हे विधेयक

. . . .3 आर-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

खूप मोठ्या प्रमाणात टॅक्सेशन वाढविणारे आणि ते सर्वसामान्य माणसाला न परवडणारे असे आहे.परंतु हा विषय तसा नाही. यापूर्वीची पध्दत अशी होती की, कर आकारणी करीत असताना अधिकाऱ्यांना जे वाटेल ते भाडे किंवा मालक सांगेल ते भाडे यामध्ये बरीच तफावत असावयाची. कधी-कधी असे व्हावयाचे की, अधिकारी आपल्या सोयीनुसार किंवा . . ..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदय हे बिल मांडत आहेत. याबाबतीत आम्हाला त्यांच्या भाषणाचा एक अनुभव आलेला आहे आणि आता दुसरे काय सांगतात ते ऐकावयाचे आहे. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांचे या विषयावरील भाषण आता येथेच थांबवून, जर ते भाषण सोमवारी पुन्हा सुरु केले तर आम्हाला ते आणखी 15-20 मिनिटे व्यवस्थित ऐकता येईल आणि त्यानुसार आम्हाला भाषण करता येईल अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, असे केले तर मग ते विधेयक सदनासमोर मांडल्यासारखे होणार नाही. जोपर्यंत माननीय सभापती महोदय,"विधेयक मांडण्यात आले" असे म्हणत नाहीत, तोपर्यंत ते विधेयक सदनासमोर मांडल्यासारखे कसे होईल.

श्री.रामदास कदम (खाली बसून) : आम्ही सांगतो की विधेयक मांडले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, यासंबंधातील प्रोसेस पूर्ण झाल्याशिवाय विधेयक मांडल्यासारखे होणार नाही. माननीय सभापती जोपर्यंत हे विधेयक मांडण्यात आले आहे असे म्हणत नाही, तोपर्यंत हे विधेयक मांडलेले आहे असे कसे म्हणता येईल ? म्हणून सभापती महोदय, या विषयाच्या बाबतीत सांगावयाचे तर घरभाड्यावरील आकार आणि घरभाड्यावरील आकारणी सरसकट दहा टक्के वजा करुन केली जात होती. मग त्यासंबंधात अनेक दावे, प्रतिदावे,कोर्टामध्ये केसेस झाल्या, याबाबत मतभेद निर्माण झाले. यामध्ये तीन-चार गोष्टी आहेत. पहिली गोष्ट म्हणजे ज्यांचे घर 500 स्वे.फू.आहे त्यातील लोकांना आता हा टॅक्स लागू रहाणार नाही. 500 स्वे.फूटाच्या वर हा टॅक्स लागू राहील आणि कमीतकमी .1 आणि जास्तीतजास्त 1 टक्का यापेक्षा याबाबत कर आकारणी करता येणार नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

अधुदित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

याच्यामध्ये त्याचा कन्स्ट्रक्शनचा दर्जा बघितला जाईल. चटईक्षेत्र बघितले जाईल. घर बसल्या प्रत्येक माणसाला त्याच्या घराची किती घरपट्टी येईल हे बसून सांगता येण्याइतपत आश्वासक असे सूत्र या विधेयकात देण्यात आलेले आहे. सभापती महोदय, माझी यासंदर्भातील अधिकची माहिती देण्याची सुध्दा इच्छा आहे. परंतु सभापती महोदय, वेळे अभावी आपण सांगत आहात म्हणून माझे भाषण आटोपते घेतले पाहिजे. सभापती महोदय, या विधेयकात प्रत्येक छोटया-छोटया गोष्टींचा खुलासा केलेला आहे. हे विधेयक सक्तीचे नाही. उद्या एखाद्या नगरपालिकेला असे वाटले की, आम्हाला या विधेयकाची अंमलबजावणी करावयाची नाही.आम्हाला जुन्याच पध्दतीने कर वसुली करावयाची आहे तर ते जुन्या पध्दतीने कर वसुली करु शकतात. नवीन पध्दतीने जर कर वसुली करावयाची असेल तर एकाएकी कर वाढविल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेचे जे पदाधिकारी आहेत त्यांच्यावर खूप मोठया प्रकारचे दडपण येते. कारण त्यांनी हे कर वाढविले म्हणून त्यांना तेथे निवडणुकीला सामोरे जाताना खूप अडचणी येतात म्हणून या सरकारी सूत्रानुसार ते उद्या कर वाढवू शकतात हा ऐच्छिक अधिकार सुध्दा या विधेयकामध्ये देण्यात आलेला आहे. अशा अनेक गोष्टींचा सारासार विचार करुन या विधेयकामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, माझी या सभागृहाला विनंती आहे की, खालच्या विधानसभा सभागृहात सुध्दा या विधेयकावर खूप विस्ताराने खूप चांगल्या प्रकारे चर्चा करुन व अनेक प्रकारची प्रश्नोत्तरे होऊन हे विधेयक मंजूर करण्यात आलेले आहे. म्हणून या सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे, अशा प्रकारची सभापती महोदय, मी आपल्या मार्फत या सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उपसभापती** : या विधेयकावरील चर्चा येथेच थांबविण्यात येत आहे. या विधेयकावरील उर्वरित चर्चा सोमवारी घेण्यात येईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शासकीय कामकाज -- विधेयके**

**पृ. शी.** :(नागरी क्षेत्र) इलेक्ट्रॉनिक कचरा (नियमन,नियंत्रण आणि विल्हेवाट) विधेयक.

L.C. BILL NO. II OF 2010

(A BILL TO PROVIDE FOR REGULATION AND CONTROL AND SYSTEMS FOR DISPOSAL OF ELECTRONIC WASTE BY MAKING THEIR REGISTRATION COMPULSORY WITH AN APPROPRIATE AUTHORITY AND PRESCRIBING NORMS AND STANDARDS FOR E-WASTE GENERATORS AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO IN THE STATE OF MAHARASHTRA)

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन 2010 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 2. समुचित प्राधिकरणाकडे नोंदणी अनिवार्य करुन ई-कचरा निर्माण करणाऱ्यांसाठी प्रमाणके आणि मानके विहित करुन इलेक्ट्रॉनिक कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी यंत्रणा, नियमन आणि नियंत्रण करण्यासाठी आणि तत्संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 2 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय कामकाज**

**अशासकीय ठराव**

**पृ.शी.**: कोकणाची सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करणे.

**मु.शी.**: कोकणाची सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करणे या विषयावरील श्री. रामदास कदम वि.प.स. यांचा ठराव.

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

"कोकणात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन कोकणाची सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, प्रथमत: हा अशासकीय ठराव कोकणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असल्यामुळे आणि आपण मला आज तो याठिकाणी मांडायला संधी दिल्यामुळे मी आपले आभार मानतो व आपल्याला धन्यवाद देखील देतो.

सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या प्रश्नावर मी या ठरावाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. सभापती महोदय, मी जवळ जवळ 20 वर्षे खालीच्या विधानसभा सभागृहात सदस्य म्हणून काम केलेले आहे. या 20 वर्षामध्ये मी अनेक वेळा या कोकणाच्या सिंचनाबाबतच्या आमच्या भावना व्यक्त केल्या आहेत. एक गोष्ट मला प्रथमत: सांगावयाची आहे की, संबंध महाराष्ट्रात जेवढा पाऊस पडतो त्यापैकी 40 टक्के पाऊस हा एकटया कोकणात पडतो. सगळयात जास्त पाऊस कोकणात पडतो आणि सगळयात कमी पाणी अडविण्याचे काम देखील कोकणातच झालेले आहे. सभापती महोदय, स्वातंत्र्यानंतर सगळया भागाला काही अंशी न्याय मिळाला.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ......

परंतु आमचे कोकण पश्चिम महाराष्ट्राला जोडलेले असल्यामुळे पाटबंधाऱ्यांसाठी येणारा सगळा पैसा पश्चिम महाराष्ट्रामध्ये जातो. कोकणाच्या वाट्याला भोपळा मिळतो. जेवढा पाऊस कोकणामध्ये पडतो तेवढा पश्चिम महाराष्ट्रामध्ये पडला असता तर त्या ठिकाणी पावसाच्या पाण्याचा थेंब न थेंब वाचविला असता, एक थेंब सुध्दा वाया जाऊ दिला नसता. कारण जिसकी लाठी, ऊसकी भैंस.

सभापती महोदय, कोकणात पडणारे पावसाचे सगळे पाणी समुद्राला जाऊन मिळते. शेवटी कोकणाच्या नशिबात पुन्हा टँकर आणि डोक्यावरुन पाणी वाहून नेणे हे कायम पहावयास मिळते. सगळ्यात पहिली गोष्ट मला या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, अनेक वर्षानंतर यावेळी कोकणाला कॅबिनेट मंत्री मिळाला. माननीय मंत्रिमहोदय श्री. सुनील तटकरे साहेब आता या ठिकाणी जर उपस्थित असते, माननीय मुख्यमंत्री जर यावेळी सभागृहात उपस्थित असते तर समाधान वाटले असते. परंतु कोकणाच्या नशिबात आज राज्यमंत्री उत्तर देण्यासाठी मिळालेले आहेत. सभापती महोदय, कोयनेचे जे पाणी समुद्राला जाऊन मिळते त्यामध्ये जवळजवळ 67.50 टीएमसी पाणी समुद्राला जाऊन मिळते. गेल्या दहा वर्षापासून सन्माननीय पाटबंधारे मंत्री माननीय श्री. अजितदादा पवार यांच्याकडे मी आणि कोकणातील आमदार आमच्या 5 बैठका झाल्या. शेवटी त्यांनी कबूल केले की, किमान राज्यपालांना भेटून 1 हजार कोटी रुपये तसेच कोयनेचे जे 67 टीएमसी पाणी आहे त्यामध्ये पहिल्यांदा चिपळूण, खेड आणि संगमेश्वरचा काही भाग या ठिकाणी पाणी उचलून किमान त्या ठिकाणची पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवू अशा पध्दतीचा निर्णय झाला होता. माझ्यासोबत संबंधित अधिकाऱ्यांना पाहणी करण्यासाठी पाठविले. कोकणातील मतदारसंघातील सर्व आमदार आणि अधिकाऱ्यांनी सोबत पाहणी केली. त्याबाबत सर्व्हे झाला. माझ्या माहितीप्रमाणे सर्व्हे करण्यासाठी सव्वा कोटी रुपये दिले. पण आज देखील आम्हाला त्या अनुषंगाने न्याय मिळालेला नाही. मला कल्पना आहे की, माननीय राज्यमंत्री याबाबतीत निर्णय षेऊ शकणार नाहीत. माननीय मंत्रिमहोदय श्री. सुनील तटकरे साहेब आता सभागृहात उपस्थित असते तर मी वेगळ्या पध्दतीने बोलू शकलो असतो. परंतु आमच्या कोकणाला आता वाली कोण आहे ? या 67 टीएमसी पाण्यापैकी शेतीसाठी 27

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

टीएमसी पाणी आपण वापरु शकतो. या 27 टीएमसी पाण्यामधून सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड या तीनही जिल्ह्यामधील 70 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आणू शकतो. पण दुर्दैवाने आमच्या नशिबामध्ये ते नाही. आपण बघतो की, सर्व पाणी समुद्रामध्ये वाहून जाते. पण हे पाणी उचलून कोकणाला देण्यासाठी आखणी किती वर्षे लागणार आहेत ? मघाशी माननीय मंत्रिमहोदयांना टक्केवारी सांगण्यासाठी दोन तीनदा उठून उभे राहून सांगावे लागले. एकदा त्यांनी साडेतीन टक्के सांगितले आणि परत एकदा 6.80 टक्के सांगितले. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पडणाऱ्या एकूण पावसापैकी 40 टक्के पाऊस कोकणात पडत असताना कोकणाची अशी अवस्था कोणामुळे झाली ?

आम्ही कोकणासाठी वैधानिक विकास मंडळ मागतो. विधानसभेत हा ठराव मी मांडला होता आणि तो एकमताने पास केला.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

मी जबाबदारीने बोलत आहे. तो ठराव केंद्र सरकारने नाकारला आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे इतक्या तत्परतेने उभे राहून मध्येच बोलत आहेत, तेवढयाच तत्परतेने दिल्लीमध्ये जाऊन तुमच्या नेत्यांना सांगून तो प्रस्ताव मंजूर करुन घ्यावा. केंद्र सरकारकडून राज्यातील सर्व मंडळांना मंजुरी मिळते, परंतु कोकणाच्या मंडळाला मिळत नाही, आम्ही कोणाचे घोडे मारले आहेत ?

सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत शासनाकडे मागणी आहे की, कोयनेचे पाणी उचलण्यासाठी किती निधी व कधी देणार आहात ? कोयनेचे केवळ 27 टीएमसी पाणी उचलले तर त्यातून 70 हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येऊ शकते. परंतु त्या अनुषंगाने शासनाची योजना आहे का ? त्याची किती दिवसात अंमलबजावणी करणार आहात ते उत्तराच्या भाषणातून सांगितले तर बरे होईल. सन्माननीय सदस्यांनी मघाशी विदर्भातील सिंचन क्षमतेचा उल्लेख केला आहे. विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या थांबल्या पाहिजेत असे मी काल देखील बोललो आहे. विदर्भासाठी आता निधी दिला जात आहे. विदर्भामध्ये 11 टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे आणि कोकणामध्ये केवळ 2.25 टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. त्याबाबतची आकडेवारी माझ्याजवळ आहे. महाराष्ट्रामध्ये सगळयात जास्त पाऊस कोकणात पडतो तेथे सिंचन क्षमता केवळ 2.25 टक्के इतकी आहे. सभापती महोदय, विदर्भाला सन 2004-05 मध्ये 2628 रुपये सिंचनासाठी दिले आहेत. सन 2005-06 मध्ये 1168 कोटी, सन 2006-07 मध्ये 1500 कोटी, सन 2007-08 मध्ये 2155 कोटी आणि सन 2008-09 मध्ये 2658 कोटी रुपये दिले आहेत. परंतु आमचे काय ? आमच्याकडे जास्त पाऊस पडतो म्हणून आमच्यावर अन्याय केला जातो काय, आम्ही काय पाप केले आहे ? स्वातंत्र्याला 60 वर्षे झाली आहेत, आज सुध्दा माझ्या मायभगिनींना डोक्यावरुन 3-3, 5-5 कि.मी.अंतरावरुन पाणी आणावे लागते. आमच्या हातामध्ये सत्ता नाही म्हणून ही आमच्यावर वेळ आली आहे का ? कोकणातील श्री.मनोहर जोशी आणि श्री.नारायण राणे यांच्याकडे मुख्यमंत्री पद आले होते. आमच्याकडे सत्ता आली होती. त्यावेळी कोकणातील 35 पाटबंधारे प्रकल्प मंजूर झाले होते. त्यावेळी प्रामाणिकपणे न्याय देण्याचा प्रयत्न झाला. शिवशाहीच्या काळात 35 पाटबंधारे प्रकल्प मंजूर झाले त्यापैकी मागील 15 वर्षात किती प्रकल्प

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.रामदास कदम....

पूर्ण केले त्याचे उत्तर द्यावे. परंतु मंत्री महोदय, आपण उत्तर देऊ शकणार नाही. माझ्या खेड मतदार संघातील 7 प्रकल्प मंजूर झाले होते, परंतु त्यापैकी एकाही प्रकल्पाला पैसा दिला नाही. शिवशाहीचे शासन गेल्यानंतर मागील 15 वर्षात या प्रकल्पांना एकही पैसा दिला जात नाही. आमची काय चूक आहे ? सिंचनाच्या बाबतीत कोकणाला का सापत्नभावाची वागणूक दिली जाते ? कशाला आम्हाला आकडेवारी सांगता ? विदर्भाला न्याय मिळाला पाहिजे. त्यांना अधिक पैसा मिळाला पाहिजे, आत्महत्या थांबल्या पाहिजेत, याबद्दल दुमत नाही. परंतु कोकणातील मायभगिनींनी किती वर्षे डोक्यावरुन पाणी आणावयाचे ? आजही तेथे शाळेतील मुले एक हंडा, कळशीने 5-5 कि.मी.डोंगर वर चढून पाणी आणतात. म्हणून कोकणासंबंधी शासन निर्णय घेणार आहे की नाही ? 35 पाटबंधारे प्रकल्पासंबंधी काय निर्णय घेणार आहे ? कोकणातील पाटबंधारे प्रकल्पांसाठी मापदंड बदलावे यासाठी मी विधानसभेत दोन वेळा लक्षवेधी सूचना मांडल्या होत्या. सन्माननीय पाटबंधारे मंत्री श्री.अजित पवार यांच्याबरोबर 6 बैठका झाल्या होत्या. त्यांनी सभागृहात शब्द दिला की, निकष वाढवून देऊ.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामदास कदम...

कोकणामध्ये मिटींग झाली त्यावेळी 40 टक्के निकष वाढवले. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, माझ्याकडे यादी आहे. आपण आवाक होऊन जाल. या पूर्वी जर कोकणाला मापदंड वाढवून मिळाले असते तर किमान 91 लघुपाटबंधा-याची कामे पूर्ण झाली असती आणि 10 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली असती. परंतु तसे झाले नाही. अनेक संसदीय आयुधांच्या माध्यमातून हा प्रश्न सातत्याने उपस्थित केल्यानंतर कोकणासाठी 40 टक्के मापदंड वाढवून मिळाले. परंतु हे मापदंड वाढवून फायदा काय ? पैसाच उपलब्ध होत नाही. सगळी सोंगे करता येतात, परंतु पैशाचे सोंग करता येत नाही. सिंधुदुर्गचे भौगोलिक क्षेत्र 5 लाख हेक्टर आहे त्यातील 1 लाख 83 हजार 714 हेक्टर क्षेत्र शेतीखाली येऊ शकते. आता पर्यन्त महाराष्ट्रामध्ये 43 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. सन 2008 पर्यन्त कोकणामध्ये 90 हजार हेक्टर इतके क्षेत्र ओलिताखाली आलेले आहे. हे प्रमाण 2.8 टक्के इतके होते. मघाशी मंत्री महोदयांनी हे प्रमाण 6.5 इतके सांगितले. परंतु तेवढे ते होत नाही. मी जबाबदारीने बोलतोय. सभापती महोदय, आम्ही आणखी किती वाट पहायची ? निवडणुका आल्या की आश्वासने दिली जातात. अंमलबजावणी काही केली जात नाही. म्हणून आम्ही स्वतंत्र कोकण विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी करीत आहोत. 1978 पासून कोकणाला आलेला निधी 3286 कोटी रु., हाती घेण्यात आलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लागणारा निधी 4947 कोटी रु., रत्नागिरी जिल्ह्यातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लागणारा निधी 1163 कोटी रु., उत्तर कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 1428 कोटी रु., कोकणातील सर्व चालू प्रकल्प, मोठे 8, मध्यम 22, लघु 161, भविष्यकालीन प्रकल्प मोठे 1, मध्यम 6, लघु 52, चालू प्रकल्पामधून निर्माण होणारी सिंचन क्षमता 2306 हेक्टर, भविष्यकालीन प्रकल्पातून निर्माण होणारी सिंचन क्षमता 27,717 हेक्टर आणि एकूण सिंचन क्षमता 2,93,365 हेक्टर इतकी आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील चालू प्रकल्पाची सिंचन क्षमता 34297 हेक्टर इतकी आहे. एकंदरीत राज्यात निर्माण झालेली सिंचन क्षमता 43 लाख 31 हजार हेक्टर इतकी आहे. कोकणात निर्माण झालेली सिंचन क्षमता 90,449 हेक्टर इतकी आहे, म्हणजे 2.8 टक्के आहे. ही माझ्या कोकणाची अवस्था आहे. मी माननीय मंत्री महोदयांना एक लहानसा प्रश्न विचारु इच्छितो. मागील 10 वर्षामध्ये कोकणामध्ये

..2..

(श्री. रामदास कदम....

किती पाझर तलाव झाले ? या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदय देऊ शकणार नाहीत. कारण एकही पाझर तलाव झालेला नाही. आम्ही काय पाप केले, काय घोडे मारले, कोकणाचे लोकप्रतिनिधी म्हणवून घ्यायला आम्हाला लाज वाटते. ही आमची अवस्था. कशासाठी ? कारण कोकणासाठी वेगळे विकास महामंडळ नाही. आम्हाला उर्वरित महाराष्ट्राच्या नावाखाली पश्चिम महाराष्ट्राला जोडले. सर्व येणारा पैसा तिकडे जातो. मागच्या वर्षी आम्हाला किती पैसे मिळाले ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम......

किती पैसा कोकणाला मिळाला? 100 कोटी रुपये देतो म्हणून सांगितले. ते 100 कोटी रुपये देखील मिळाले नाहीत. अशी आमची अवस्था आहे. म्हणजे कसे फसवायचे? निवडणुकांच्या काळात फसव्या घोषणा करुन मते मागायची. कोकणाला पॅकेज दिले. त्या कोकण पॅकेजमध्ये आम्हाला सांगितले की, यावर्षी 764.49 कोटी रुपये देऊ. तीन वर्षात 1792 कोटी रुपये देऊ. एक पैसा तरी दिला का? नाही. निवडणुकांच्या काळात फसव्या घोषणा द्यायच्या. निवडणुका झ ााल्या की, जनतेच्या तोंडाला पाने पुसायची. किती वर्षे हे चालणार? कधी थांबणार हे? एका बाजूला मोठया प्रमाणात कोकणात पाऊस पडतो आणि दुसऱ्या बाजूला पाणी असून देखील ते पाणी अडविण्यासाठी पैसा नाही अशा अवस्थेतून आम्ही चाललो आहोत. माझी आपल्याला विनंती आहे की, किमान यावर्षी कोकण पॅकेजमध्ये 325 कोटी रुपये देऊ असे सांगितले तेवढा तरी निधी देणार की नाही? ठेकेदार अधिकाऱ्यांच्या कार्यालयात येऊन बसले आहेत. कामे पूर्ण झाली. परंतु पैसा देऊ म्हणून सांगूनही पैसा दिला नाही. ठेकेदार त्यांनी केलेल्या कामाच्या पैशाबद्दल तगादा लावत आहेत. जी कामे पूर्ण झाली तेवढी तरी रक्कम द्या. कोकणातील कोयनेच्या पाण्याबाबत 27 हजार कोटी रुपये लागणार आहेत. इतका निधी आम्हाला मिळू शकणार नाही याची मला जाणीव आहे. परंतु टप्प्याटप्प्याने हा निधी देणार आहात की नाही? मुंबईला हवे तेवढे पाणी आणा. परंतु 27 टीएमसी पाणी आमच्या कोकणाला दिले पाहिजे. 27 टीएमसी पाणी कोकणातील शेतीला मिळाले तर कोकण सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही. कोकणामध्ये सिंचनाची व्यवस्था झाली, पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडविला आणि प्रत्येक वाडीला पाणी दिले तर कोकणातील माणूस पोट भरण्यासाठी, नोकरी करण्यासाठी, चाकरी करण्यासाठी मुंबईत येणार नाही. बागायती होऊ शकते. दुबार-तिबार पिके घेता येतील. अनेक गोष्टी होऊ शकतात. परंतु पाणी नाही. पाण्यासाठी आम्हाला वाट पहावी लागत आहे. नजरेसमोर पाणी असताना ते समुद्राला जाऊन मिळते. ते पाणी कोकणातील शेतीला उपलब्ध होऊ शकत नाही. हेच पाणी पश्चिम महाराष्ट्रात असते, विदर्भात असते तर असे झाले असते का? आमचा वाली कोण? म्हणून माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, आपण तातडीने कोकणाकडे लक्ष द्यावे. एक दिवस असा येईल, शेवटी सहनशक्तीला अंत असतो, आपण अशाच पध्दतीने डोंगरातील गरीब माणसाला पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवणार असाल, समोर पाणी असताना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ SBT/ ST/ 17:25

श्री.रामदास कदम......

आम्ही केवळ पाण्याकडे बघत आहोत परंतु आम्हाला पाणी मिळत नसल्यामुळे अशाच पध्दतीने कोकणावर अन्याय करणार असाल तर या शासनकर्त्यांची लाल दिव्याची एकही गाडी कोकणातील रस्त्यावर येऊ देणार नाही. हा शासनाला इशारा देत आहोत. आमच्या सहनशक्तीला अंत आहे. किती वाट बघायची? आमच्यावर प्रचंड अन्याय होत आहे. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राला आणखी निधी द्या. परंतु आम्ही तुमचे काय घोडे मारले? कशाला आमच्यावर अन्याय करीत आहात? कोकणाच्या दृष्टीने वैधानिक विकास मंडळाला मान्यता कशी द्यायची याचा जरुर विचार व्हावा. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, कोकणातील सर्व लोकप्रतिनिधी मिळून आपण माननीय मुख्यमंत्र्यांनी भेट घेऊ. पक्ष बाजूला ठेवून जाऊ. कोणत्याही परिस्थितीत कोकणात सिंचनाची व्यवस्था झाली पाहिजे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाली पाहिजे. फक्त कोकणचा कॅलिफोर्निया करण्याची घोषणा केली जाते. जे पाणी उपलब्ध आहे ते तरी द्या. आज कोकणाचा वाळवंट झाला आहे. कोयनेचे पाणी कशा पध्दतीने उचलून आणायचे त्याचा विचार जरुर करा. परंतु कोकणाला 27 टीएमसी पाणी देणार आहात, त्यासाठी किती निधी दिला जाणार आहे? तीन जिल्हयांमध्ये या निधीची कशी विभागणी करणार आहात? 27 टीएमसी पाणी वगळून शिल्लक पाणी मुंबईला आणा. मुंबईचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल. जोपर्यंत कोयनेचे पाणी सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्हयाला मिळत नाही तोपर्यंत आम्ही कोकणातील पाण्याचा एकही थेंब मुंबईला येऊ देणार नाही.

नंतर 3एक्स.1..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ........

अन्यथा आपण म्हणणार की कोकणातील पाणी उचलून मुंबईला आणू, पश्चिम महाराष्ट्रात आणू, हे होऊ देणार नाही. मुंबईचा प्रश्न सोडवा, त्याला आमचा आक्षेप नाही पण अगोदर कोकणचा प्रश्न सोडविला पाहिजे. कोकणासाठी जे 1.25 कोटी सर्व्हे करण्यासाठी देण्याचे ठरविले तेवढे देऊन चालणार नाही, अशा प्रकारे तोंडाला पाने पुसण्याचे काम चालले ते थांबवावे आणि कोकणाला न्याय देण्यासाठी अधिकचा निधी द्यावा अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

ठराव प्रस्तुत झाला.

-----

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्य मंत्री) : महोदय, कोकणाचे नेते आणि माजी विधानसभा विरोधी पक्षनेते श्री. रामदास कदम यांनी अत्यंत पोटतिडीकीने कोकणाच्या बाबतीतील आपले विचार येथे मांडले आहेत. मला या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की, कोकणाचीच सत्ता सन 1995 मध्ये या राज्यात होती त्यावेळेस जास्तीत जास्त लाल दिव्याच्या गाड्या कोकणातच फिरत होत्या. कोकणातील दोन दोन मुख्यमंत्री त्यावेळेस या राज्यात होते. मी त्या काळात कोकणाला काय दिले यासंबंधीची आकडेवारी देताना असे सांगू इच्छितो की, सन 1995-96 मध्ये 49.70 कोटी, सन 1996-97 मध्ये 80.37 कोटी, सन 1997-98 मध्ये 80.39 कोटी, सन 1998-99 मध्ये 92.19 कोटी असे एकूण 432 कोटी रुपये सन 1999 अखेर कोकणाला देण्यात आले होते. त्यानंतरच्या काळात म्हणजे सन 2001 पासूनचा विचार केला तर त्या रकमेत वाढ झालेली आहे. सन 2001-02 मध्ये 182.32 कोटी, सन 2002-03 मध्ये 229.22 कोटी, सन 2003-04 मध्ये 197.37 कोटी, सन 2004-05 मध्ये 237.68 कोटी, सन 2005-06 मध्ये 274.52 कोटी, सन 2006-07 मध्ये 389.17 कोटी आणि सन 2007-08 मध्ये 348.55 कोटी एवढी रक्कम देण्यात आली.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार....

सन 2008-2009 मध्ये रूपये 556.87 कोटी व सन 2009-2010 रूपये 470.00 कोटी रूपये देण्यात आले. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे आपल्या भाषणातून नेहमी "बोलाची कढी बोलाचाच भात" असा उल्लेख करतात. हे कोणाला लागू होते हा देखील संशोधनाचा भाग आहे. याच्या तपशीलात मला जायचे नाही. काही गोष्टी राहिल्या आहेत हे मी मान्य करतो. मागील दहा वर्षामध्ये म्हणजे 1999 ते 2010 या कालावधीमध्ये कोकणाला 3373 कोटी रूपये सिंचन प्रकल्पासाठी दिलेले आहेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, दहा वर्षानंतर प्रकल्पाच्या किंमती चौप्पट वाढल्या आहेत. तेव्हा आपण काय बोलतो आहेत याचे भान ठेवावे. ज्यावेळी एका प्रकल्पाची किंमत दहा कोटी होती ती दहा वर्षानंतर, 20 वर्षानंतर 40 कोटी झालेली आहे, हे देखील त्यांनी लक्षात ठेवावे. मी त्यांना हे विचारले की, शिवशाहीच्या काळात 35 पाटबंधारे प्रकल्प मंजूर केले होते त्यातील किती प्रकल्प पूर्ण केले ? त्यासंबंधी काहीही उत्तर नाही. राजकीय भाषण करावयाचे असेल तर मी इथून निघून जाईन. मला ते ऐकण्याची आवश्यकता नाही. आपण काय न्याय देणार आहात ते सांगावे. माझ्याकडे देखील आकडे आहेत. वेळ कमी असल्यामुळे मी त्या खोलात गेलो नाही. लघुपाटबंधरे प्रकल्पाची किंमती किती पटीने वाढली, पाटबंधाऱ्याची किंमती किती पटीने वाढली यासंबंधातील माहिती माझ्याकडे आहे. पिंपळवाडीचे धरण पाच कोटीचे होते. आज त्याची किंमत 100 कोटीच्या वर गेली आहे. या गोष्टी आपण समजून घ्याव्यात. अजून आपल्याला अभ्यास करायला पुष्कळ वेळ आहे. आपण एवढी घाई करू नये. माझ्याकडे लघुपाटबंधारे प्रकल्पांची यादी आहे. ती मी मुद्दाम वाचली नाही. आम्हाला जर आधीच न्याय मिळाला असता तर कित्येक हेक्टर जमीन ओलिताखाली आली असती. तेव्हा आपण राजकीय भाषण करू नये. आपण न्याय कसा देणार ते सांगावे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, माझे उत्तर ऐकून न घेणे हे चुकीचे आहे. आपल्या भावना समजूनच मी उत्तर देत आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, न्याय देणार असाल तर तसे सांगा. पैसे नसतील तर तसे सांगा. कोकण पॅकेजमध्ये 700 कोटी रूपये देतो असे सांगितले. पण एकही पैसा दिलेला नाही. येथे चुकीचे रेकॉर्डवर राहू नये असे माझे म्हणणे आहे. तसेच राजकीय भाषण देखील येथे करू नये. ते मला देखील करता येते. ...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, चुकीचे म्हणजे काय ? आपण बोलला ते सगळे खरे आणि आम्ही म्हटले ते खोटे. असे होत नाही. ज्या गोष्टी घडल्या आहेत त्या सांगितल्या पाहिजेत. मी येथे चुकीचे काहीही सांगत नाही. युतीच्या काळात 35 प्रकल्प हाती घेण्यात आले होते. त्यापैकी 10 प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. त्यांची नावे देखील माझ्याकडे आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी कोयनेसंदर्भात मुख्य मुद्दा मांडला होता. कोयनेच्या पाण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी देखील आज चर्चा उपस्थित केली होती. कोयना अवजल योजनेतून आपल्याला 67.50 टीएमसी पाणी घेता येऊ शकते. ते पाणी समुद्राला वाहून जाते. त्यातील 27.8 टीएमसी पाण्याचा वापर करून 70 हजार हेक्टर क्षेत्र आपण ओलिताखाली आणू शकतो, ही वस्तुस्थिती आहे. हा प्रकल्प पूर्ण करायचा असेल तर त्याला निश्चितपणे काही कालावधी लागणार आहे. या प्रकल्पाचे सर्वेक्षण करण्यासाठी आपण एक कोटी रूपये दिले आहेत. हा पायलट प्रकल्प आहे. उपसा योजनेद्वारे रत्नागिरी जिल्ह्यातील खेड, चिपळूण या तालुक्यांना त्याचा फायदा होणार आहे. या तालुक्यातील 11031 हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे प्रकल्प अहवाल करण्याची कारवाई सुरू केलेली आहे. हा प्रकल्प अहवाल तातडीने पूर्ण करण्याचे काम करू.

यानंतन श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार ...

महाराष्ट्रातील सर्वात जास्त पाऊस पडणारा भाग मात्र उपेक्षित राहता कामा नये याची शासनाला जाणीव आहे.महाराष्ट्रामध्ये जो पाऊस पडतो त्यापैकी 40 ते 42 टक्के पाऊस कोकणात पडत असतो . पाण्याच्या संदर्भात कोकणातील लोकांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत याची जाणीव शासनकर्ते म्हणून आम्हाला आहे. पूर्वीचे सिंचनाचे जे अपूर्ण प्रकल्प होते त्यातील काही प्रकल्प पूर्ण झालेले आहेत त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय कोकण पॅकेजमध्ये शासनाने घेतला होता. त्याचाच भाग म्हणून येत्या तीन वर्षात कोकण पॅकेज अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याचे शासनाने ठरविलेले आहे परंतु आमच्या विभागाला सिंचनासाठी निधी देण्यामध्ये काही बंधने आहेत. अमरावती विभाग अनेक वर्षापासून आर्थिक आणि भौतिक अनुशेषाखाली. आहे.

श्री.रामदास कदम (बसून) : रत्नागिरी देखील आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : अनुशेषामध्ये रत्नागिरीसुध्दा आहे. यावेळी माननीय राज्यपालांनी रत्नागिरीसाठीसुध्दा पैशाची तरतूद केली आहे......................

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : मराठवाडा आणि विदर्भाचा जो आर्थिक अनुशेष आहे तो भरला गेला आहे परंतु त्या ठिकाणी भौतिक अनुशेष आहे हा भौतिक अनुशेष फक्त मराठवाडा आणि विदर्भातच आहे अशातला भाग नाही तर तो अनुशेष कोकणामध्येसुध्दा आहे त्यामुळे चुकीची माहिती रेकॉर्डवर आणता कामा नये.

श्री.दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांनी जे काही सांगितले आहे ते चुकीचे असून ते रेकॉर्डवर आणू नका असे आपण कसे म्हणता ? उद्या त्यासंदर्भात चर्चा होणार आहे त्यावेळी आपण सविस्तर बोलू शकतो.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : कोकणासाठी जास्त पैसे दिले पाहिजेत आणि ते पैसे दुसरीकडे खर्च होता कामा नये.

श्री.दिवाकर रावते : माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाप्रमाणे एका विभागाचा पैसा दुस-या विभागात जाऊ शकत नाही. त्या विभागाचे पैसे लॅप्स होतील परंतु दुस-या विभागासाठी खर्च होणार नाहीत असे माननीय राज्यपालांनी निदेशच दिलेले आहेत. त्यामुळे कोकणातील पैसे इतर ठिकाणी जाणार नाहीत आणि गेले तर पश्चिम महाराष्ट्रासाठी वा खानदेशासाठी जातील परंतु कोकणातील पैसे विदर्भ आणि मराठवाडयासाठी दिले जाणार नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सागितले की , माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणेच राज्यातील विविध सिंचन प्रकल्पासाठी निधीचे वाटप करण्यात येत असते त्यामुळे त्या त्या जिल्हयांच्या वाटयाला जो काही निधी येत असतो तो माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणें येत असतो.जोपर्यत आर्थिक अनुशेषाची पूर्तता होत नाहीत तो पर्यत त्याभागाला पैसे देण्यात यावेत असे माननीय राज्यपालांचे निदेश आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.अनिल परब)**

सभापती महोदय, 2010-11 सालाकरिता कोकणासाठी 335 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ए.आय.बी.पी.चे पैसे धरुन या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये कोकणासाठी 487 कोटी रुपये ठेवण्यात आलेले आहेत.

सभापती महोदय, कोयनेचे पाणी समुद्राला मिळते व ते वाया जाते ते पाणी मुंबईला आणावे असे सन्माननीय सदस्य श्री राजन तेली यांनी सागितले होते.मी त्यांना सांगू इच्छितो की,यासबंधीचा प्राथमिक अहवाल तयार करण्यात आला आहे. कोयनेचे पाणी मुंबईला आणण्यासाठी 42 हजार कोटी रुपयाचा खर्च अपेक्षित आहे .हे पाणी मुंबईला आणण्यासाठी एक लिटरला एक रुपया इतका खर्च येईल अशी प्राथमिक माहिती या अहवालातून प्राप्त झालेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की युतीच्या काळात 32 प्रकल्प पूर्ण झाले आहे परंतु आपण किती प्रकल्प पूर्ण केले आहेत ? त्या बाबतीत मी सन्माननीय सदस्यांना माहिती देऊ इच्छितो की,ठाणे जिल्हयातील धसाई, रत्नागिरी जिल्हयातील पन्नेरी, पंचनदी,दिवाळवाडी, कोंढळे, अनवे, खोपड, पिंपळ, पिठवली .........

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार...

या प्रकल्पांना पैसे उपलब्ध करुन दिले. ज्यावेळी आपण प्रकल्पाची कामे मंजूर केली होती. त्यापैकी काही प्रकल्पांची कामे बाकी आहेत. त्यामधील कालव्यांच्या कामासाठी आवश्यक असेल तर पुढील वर्षी निधी उपलब्ध करुन देऊन कालव्याच्या कामांना गती देण्याचे काम केल्याशिवाय राहणार नाही. सभापती महोदय, कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग या दोन जिल्हयांना सर्वात जास्त निधी देण्यात आला आहे. बाकीच्या जिल्हयांना कमी निधीची गरज आहे. तरीसुध्दा त्या भागातील प्रकल्प पूर्ण होण्यासाठी राज्य सरकारने सकारात्मक दृष्टीकोन ठेवण्याचे काम केले आहे. माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये प्रस्तावावर बोलतांना जे विचार व्यक्त केले. त्याबाबत मी जबाबदारीने सांगू इच्छितो की, कोकणामध्ये अडीच टक्के सिंचन झाले आहे. याबाबतची वस्तुस्थिती माझ्‍ याजवळ आहे. या सदनामध्ये माननीय सदस्यांना आपले म्हणणे मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे. मी त्यावेळी भाषण करीत असतांना सांगितले आहे की, कोकणामधील लागवडीलायक क्षेत्र 15 लाख हेक्टर आहे, आणि सिंचनाखाली येणारे क्षेत्र 3 लाख 67 हजार हेक्टर आहे. कोकणातील दऱ्या, डोंगरी भागाची भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन सिंचनाखाली आलेले क्षेत्र आयडेंटिफाय केले आहे. आणि त्या तुलनेमध्ये 1 लाख 4 हजार हेक्टर सिंचन निर्मिती झालेली आहे...

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी याठिकाणी जी टक्केवारी मांडलेली आहे, ती महाराष्ट्र राज्यामध्ये जेवढे क्षेत्र आहे त्यापैकी किती हेक्टर सिंचन झ ाले त्याची टक्केवारी मांडली होती.आपण याठिकाणी कोकणातील सिंचनाची टक्केवारी काढीत असतांना चुकीचा अर्थ लावीत आहात. महाराष्ट्रामध्ये एकूण 43 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आहे त्यापैकी फक्त 1 लाख हेक्टर जमीन कोकणातील आहे.आणि आपण काढलेली टक्केवारी अडीच टक्के आहे...

श्री.विजय वडेट्टीवार : आपण काय म्हणालात ते मला समजले, आपण म्हणालात ते बरोबर आहे....

श्री. रामदास कदम : परंतु आपण काय म्हणत आहात ते मला समजत नाही. मी याठिकाणी पुन्हा पुन्हा सांगतो की, महाराष्ट्रातील एकूण सिंचनाखालील क्षेत्र आहे त्या तुलनेत कोकणातील सिंचनाखालील क्षेत्राची टक्केवारी सांगितली. आणि आपण कोकणातील सिंचनाखालील एकूण क्षेत्र किती आणि त्यापैकी किती टक्के सिंचन झाले आहे ते सांगत आहात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्रिमहोदयांनी कोकणातील सिंचनासाठी 392 कोटी रुपये खर्च होणार असल्याचे सांगितले. परंतु ही रक्कम ठेकेदारांची देणी देण्यासाठी खर्च होणार असेल तर अडचण आहे. कोकणासारख्या, मराठवाडयासारख्या, विदर्भासारख्या मागासलेल्या भागाची ही फसवणूक होणार आहे. हे 392 कोटी रुपये कशासाठी खर्च होणार आहेत? हे आपण आम्हाला समजावून सांगावे. आपण कोकणासारख्या मागासलेल्या भागाला अंत:करणापासून,पोटतिडिकीने, मोकळया हाताने निधी द्यावा अशी मी विनंती करतो.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, यामध्ये मध्यम आणि मोठे प्रकल्प यांसाठी 3.75 कोटी, लघू पाटबंधारे प्रकल्पांसाठी 135 कोटी, प्रकल्प विस्तार आणि सुधारणेसाठी 16.52 कोटी असे एकूण 487.15 कोटी कोकणाला मिळणार आहेत. आपण जर जिल्हानिहाय आकडेवारी पाहिलीतर सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्हयांना अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्याचे काम झाले आहे.माननीय सदस्य श्री. राजन तेली यांना सांगू इच्छितो की, जिल्हानिहाय व प्रकल्पनिहाय तरतुदीच्या बाबतीत कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचा तिल्हारी हा एक मेजर प्रकल्प आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार . . .

त्याला या वर्षाची तरतूद केली आहे. याबाबतीत वर्षनिहाय माहिती देऊ काय ?

श्री.राजन तेली :सभापती महोदय, तिल्लारी हा आंतरराज्य प्रकल्प आहे आणि तो 1982 पासून सुरु आहे.आपण मघाशी जी मोठी रक्कम सांगितली, ती तिल्लारीच्या संबंधातील रक्कम आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय,मी आता प्रकल्पवाईज माहिती देतो. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, तो इकडचा प्रकल्प आहे, तिकडचा प्रकल्प आहे वगैरे. सुरुवातीला मी कोकणासाठी जी तरतूद आहे ती जिल्हावाईज् सांगतो. ठाणे जिल्ह्यासाठी 2 कोटी 10 लाख,रायगड जिल्ह्यासाठी 60 लाख, रत्नागिरी जिल्ह्यासाठी 129 कोटी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मोठया प्रकल्पांसाठी 70.80 कोटी रुपये आणि मध्यम प्रकल्पामध्ये अरुणा प्रकल्पासाठी 55 कोटी, देवगड प्रकल्पासाठी 5 कोटी, नरवडे प्रकल्पासाठी 55 कोटी, कोलेसातोंडी प्रकल्पासाठी 8 कोटी आणि सरभा प्रकल्पासाठी 10 कोटी अशा प्रकारे हा निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

श्री.रामदास कदम (खाली बसून) : कोयना प्रकल्पासाठी काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी सन्माननीय श्री.रामदास कदमसाहेब यांना सांगू इच्छितो की, आता त्याबाबत प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु आहे.आपले असे म्हणणे आहे की, कोयनेचे पाणी अडविले पाहिजे हे खरे आहे. सध्या कोयनेचे 65 टीएमसी पाणी समुद्रामध्ये वाहून जात आहे आणि ते पाणी जर उद्या कोकणाला मिळाले तर निश्चितपणे सिंचनामध्ये वाढ होईल आणि त्या भागातील लोकांना देखील न्याय मिळू शकेल. यासाठी सुध्दा भविष्यामध्ये शासन प्रकल्प अहवाल प्राथमिक स्वरुपामध्ये आहे.तो पूर्ण झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेप्रमाणे यासाठी आवश्यक असलेला निधी कोकणासाठी उपलब्ध करुन देण्याचे काम शासन केल्याशिवाय रहाणार नाही आणि त्या भागातील सिंचनाच्या योजना पूर्ण करण्यासाठी सरकार कुठेही कमी पडणार नाही हा विश्वास मी देऊ इच्छितो.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय,माझा हरकतीचा मुद्दा आहे.माननीय मंत्री महोदयांनी सिंधुदुर्ग जिल्ह्याबाबत सांगितलेले आहे. त्यामध्ये केंद्र शासनाकडून आलेला निधी किती आहे? याचेही विश्लेषण करण्यात यावे. कारण सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अरुणा व टाळंबा या दोन प्रकल्पांसाठी 45 कोटी व 45 कोटी असे मिळून 90 कोटी रुपये केंद्र शासनाकडून आलेले आहेत

. . . .4 बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर. . . .

श्री.विजय वडेट्टीवार :सभापती महोदय,राज्य शासन आणि केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध उपलब्ध होत असतो. तिल्लारी प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून 15 कोटी रुपये मिळालेले आहेत. अर्जूनासाठी 16 कोटी 25 लाख रुपये,नरवळे प्रकल्पासाठी 11 कोटी 25 लाख रुपये, अरुणासाठी 13.75 लाख आणि गडनदीसाठी 7 कोटी 25 लाख असे एकूण सिंधुदूर्ग मधील प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून 63 कोटी 50 लाख रुपये आलेले आहेत.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी अतिशय चांगला विषय सदनामध्ये मांडला. मी देखील कोयनेच्या संबंधात गेली दोन वर्षे प्रस्ताव आणत आहे, परंतु आपल्याला त्यावरील चर्चेसाठी वेळ नाही. परंतु याठिकाणी सुरुवातीच्या काळामध्ये 94 प्रकल्प झाले होते आणि सध्या ते अर्धवट अवस्थेमध्ये आहेत. आपण आज कबूल केले की, एकंदर 367 कोटी रुपये देतो, तसेच 492 कोटी रुपयांची ठेकेदारांची जुनी देणी आहेत. माननीय मंत्री महोदयांनी पहिल्या दहा वषार्तील आणि त्यानंतरच्या दहा वर्षाची आकडेवारी सांगितली. टाळंबा हा प्रकल्प 300 कोटी रुपयांचा होता,परंतु तो आता 829 कोटी रुपयांचा झालेला आहे. तसेच शासनाने आंतरराज्य तिल्लारी प्रकल्प आहे, त्याची जास्तीतजास्त किंमत वाढवून दाखविली. माझा स्पेसिफीक प्रश्न एकच आहे की, सध्या कोकणातील अधर्वट अवस्थेमध्ये जे प्रकल्प आहेत मग शिरशिंगी असेल, नरडवे असेल किंवा काळंबाच्या कामाला सुरुवात झाली आहे, हे प्रकल्प लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून किती वषार्मध्ये पूर्ण निधी देणार आहात ? तसेच हे सर्व प्रकल्प किती वषार्मध्ये पूर्ण होणार आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय,मी सांगितले की,आता निधीचे वाटप राज्य शासनाच्या अधिकारात नाही.माननीय राज्यपाल महोदय ज्याप्रमाणे निदेश देतात,त्याप्रमाणे जिल्हानिहाय ॲलोकेशन केले जाते.तसेच ज्या-ज्या वेळेस आवश्यक ते प्रकल्प पूर्ण होण्यासाठी भविष्यामध्ये प्रयत्न करु.आज आपण जवळपास आथिर्क अनुशेष पूर्ण केला आहे आणि भौतिक अनुशेषाच्या संबंधात मागच्या वेळी सभागृहामध्ये माननीय श्री.नारायण राणे यांनी परवा सांगितले की,आपण आता भौतिक अनुशेष अपडेट करीत आहोत.जसतशी आवश्यकता भासेल तेवढा निधी .. आहे. परंतु आमच्यावर बंधने आहेत आणि माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे जिल्हावाईज निधीचे वाटप होत असते. म्हणून . . . .

(सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

श्री.विजय वडेट्टीवार . . . .

सभापती महोदय,साहेब, असे बोलून चालणार नाही. सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्यांना सूचना द्याव्यात. माझे उत्तर तरी पूर्ण होऊ द्यावे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**तालिका सभापती** :सन्माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यावर मी सर्वांना प्रश्न विचारण्यासाठी संधी देतो.

श्री.विजय वडेट्टीवार : एकेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावेत. दोघजण एकदम प्रश्न विचारु लागले तर कसे होईल. हे बरोबर नाही. सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. हे बरोबर नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार....

कोकणातील लघु पाटबंधारे योजनांच्या संदर्भात आर्थिक मापदंडाचा प्रश्न याठिकाणी विचारण्यात आला होता हे मापदंड आपण वाढवून घेतलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम साहेबांनी याठिकाणी ठराव मांडून चर्चा केलेली आहे. ही चर्चा खऱ्या अर्थाने कोकणातील शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात यासाठी उपस्थित केली आहे. त्या भागातील प्रश्न सुटावेत यासाठी कोकणातील अनेक नेते आग्रही भूमिका घेत असतात. राज्य सरकार म्हणून जी जबाबदारी पार पाडावयाची आहे किंवा जे निधीचे वाटप करावयाचे आहे ते कोकणाला न्याय देण्याच्या दृष्टीने राज्य सरकार निश्चितपणे भविष्यात करील, आजही करीत आहे आणि उद्याही करणार आहे.

सभापती महोदय, अनेक गोष्टींचा उल्लेख सन्मानीय सदस्य श्री. कदम साहेबांनी केला आहे. तसेच काही प्रश्नाच्या उत्तराची शासनाकडून अपेक्षा देखील केलेली आहे, त्या प्रश्नांचे उत्तर देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. मी थोडयावेळापूर्वीच संगितले की, कोयनेचे पाणी वाहून जाते. त्या संदर्भात आज एक कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. याबाबतचे सर्वेक्षण पूर्ण झालेले आहे. त्यासंबंधीचा सविस्तर अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर कोयनेचे पाणी थांबविण्यासाठी सरकारला भविष्यात ज्या गोष्टीची आवश्यकता पडेल, निधीची आवश्यकता पडेल तो निधी माननीय राज्यपालांच्या निदेशाच्या आधीन राहून उपलब्ध करुन देण्याची मी याठिकाणी ग्वाही देतो. सभापती महोदय, या ठिकाणी ही एक चांगली चर्चा उपस्थित केलेली आहे आणि यानिमित्ताने चांगले प्रश्न याठिकाणी मांडलेले आहेत. तसेच कोकणाला न्याय देण्याची भूमिका सर्व सन्माननीय सदस्यांनी स्वीकारलेली आहे. या चर्चेमध्ये सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी याठिकाणी कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याच्या बाबतीतील मुद्दा उपस्थित केला होता, त्याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले नाही. जोपर्यंत कोकणाला स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ मिळणार नाही, तोपर्यंत कोकणासाठी पैसाच मिळणार नाही. कारण कोकण हा पश्चिम महाराष्ट्राला जोडलेला असल्यामुळे सगळा पैसा पश्चिम महाराष्ट्राला जातो. म्हणून आपण कितीही प्रयत्न केले तरी माननीय राज्यपालांच्या आदेशानुसार जो पैसा येतो त्यातून कोकणाला टक्केवारीनुसार पैसा दिला जातो. जोपर्यंत कोकणाला स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ मिळणार नाही तोपर्यंत आमचा प्रश्न कधीच सुटणार नाही. स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाच्या बाबतीत शासनाची काय भूमिका आहे? याबाबतीत याठिकाणी स्पष्टपणे सांगावयास पाहिजे होते. माननीय मुख्यमंत्र्यांना बरोबर घेऊन आम्ही पुन्हा दिल्लीला जाऊन माननीय पंतप्रधानांना भेटतो असे सांगावयास पाहिजे होते. परंतू अशा प्रकारचे कोणतेही आश्वासन याठिकाणी देण्यात आलेले नाही. सभापती महोदय, कोकण पॅकेज देण्यात आले, त्याबाबतीत अनेक आश्वासने देण्यात आली. पण प्रत्यक्षात एक पैसाही दिलेला नाही आणि आता याठिकाणी सांगण्यात आले की, 350 कोटी रुपये देण्यात येतील. पहिलेच 492 कोटी रुपयाचे देणे बाकी आहे. म्हणजे शासनाने जे पॅकेज दिले होते ते किती फसवे होते हे याठिकाणी कबूल करण्यात येत आहे. ते पॅकेज केवळ मतांसाठी होते, हे माननीय मंत्रिमहोदयांच्या भाषणातून स्पष्ट होत आहे.

सभापती महोदय, मी याठिकाणी कोयनेच्या पाण्याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी पहिला टप्पा एक हजार कोटी, दोन हजार कोटी, तीन हजार कोटी रुपयाचा देण्यात येईल असे काही तरी सांगावे. किमान तीन ते सहा महिन्यात कामाला सुरुवात करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन देण्यात यावे, ही अपेक्षा घेऊन मी याठिकाणी हा ठराव मांडलेला आहे.याबाबतीत कुठलेही आश्वासन न दिल्यामुळे ही चर्चा वांझोटी झाली तर तिचा काय उपयोग ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, कोकणाचा स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळाचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे दिल्लीला पाठविण्यात आलेला आहे.

श्री. रामदास कदम (बसून) : केंद्र सरकारने तो प्रस्ताव नाकारलेला आहे.

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, केंद्र सरकारने तो प्रस्ताव नाकारला आहे पण यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर पुन्हा कोकणातील काही प्रमुख सदस्यांची बैठक घेण्यात येईल आणि हा प्रस्ताव पुन्हा केंद्र सरकारकडे पाठविण्याची कार्यवाही राज्य सरकार करील. एका महिन्याच्या आत ही बैठक घेण्यात येईल आणि हा प्रस्ताव पुन्हा केंद्र शासनाकडे पाठविण्याची कार्यवाही निश्चितपणे पार पाडण्याची भूमिका राज्य शासन घेईल. कोयनेच्या संदर्भात पहिल्यांदा प्रकल्प अहवाल तयार व्हावयाचा आहे. या संदर्भातील काही गोष्टी अजून प्राथमिक अवस्थेत आहेत.

यानंतर श्री. बरवड...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार ....

तो आल्यानंतर त्यावर सविस्तर अभ्यास करु. निधीच्या उपलब्धतेबाबत राज्य सरकार पॉझिटिव्ह आहे. कोयनेच्या संदर्भात त्या ठिकाण्ी प्रकल्पाची आवश्यकता आहे. डोळ्यादेखत पाणी वाहून जाते. त्यासाठी त्या प्रकल्पाचा संपूर्ण अभ्यास करावा लागेल. या वर्षात प्रकल्पनिहाय निधीची तरतूद केलेली आहे. माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार प्रकल्पनिहाय तरतूद करतो. यासाठी लागणारा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासन प्रयत्न करील असा विश्वास मी सन्माननीय सदस्यांना देतो आणि त्यांनी मांडलेला ठराव मागे घ्यावा अशी त्यांना विनंती करतो.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझी माननीय मंत्रिमहोदयांना पुन्हा विनंती आहे की, शासनाने जे कोकण पॅकेज जाहीर केलेले आहे तेवढे पैसे तरी द्यावेत. मागच्या वर्षी कबूल केले होते ते पैसे तरी द्यावेत. माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार जे द्यावयाचे ते बाजूला राहू द्या पण कोकण पॅकेज जाहीर केले तेवढे तरी देणार की नाही ? 1800 कोटी रुपये देऊ असे सांगावे.

श्री. विजय वडेट्टीवार : कोकण पॅकेजचे पैसे तीन वर्षामध्ये पूर्णपणे दिले जातील.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, पहिल्या वर्षी 764 कोटी रुपये देऊ असे आश्वासन दिलेले होते. तेवढा निधी तरी पहिल्या वर्षी द्यावा. कोकण पॅकेजमध्ये तीन वर्षात कशा पध्दतीने नियी देणार हे आपण सांगितले. पहिल्या वर्षीचा जेवढा हप्ता होता तेवढा निधी तरी द्यावा.

श्री. विजय वडेट्टीवार : पहिल्या वर्षीचा हप्ता या वर्षामध्ये आणि पुढच्या वर्षामध्ये देण्याचे काम होईल. तीन वर्षाचे पॅकेज आहे. तीन वर्षामध्ये कोकणासाठी असलेले पूर्ण पैसे उपलब्ध करुन दिले जातील.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, हे शासन कोकणाची फसवणूक करीत आहे. हे शासन असत्य बोलत आहे, दिलेला शब्द पाळत नाही. दिलेल्या आश्वासनाला हरताळ फासत आहे त्यामुळे मी कोकणवासीयांच्या वतीने या शासनाचा निषेध करतो. काही सन्माननीय सदस्य हा ठराव मागे घ्यावा असे सांगत आहेत त्यामुळे मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS/

**पृ. शी.** : राज्यातील शिक्षण क्षेत्रात वाढत चाललेल्या भ्रष्टाचाराला व गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : राज्यातील शिक्षण क्षेत्रात वाढत चाललेल्या भ्रष्टाचाराला व गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता या विषयावरील श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांचा ठराव

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

" राज्यातील शिक्षण क्षेत्रात वाढत चाललेल्या भ्रष्टाचाराला व गेरप्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने त्वरित उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे."

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्राशी संबंधित असलेला अशासकीय ठराव मी आणलेला आहे. या सभागृहामध्ये शिक्षकांच्या वेगवेगळया समस्या, शिक्षण क्षेत्रातील समस्या, विद्यार्थ्यांच्या समस्या, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसंबंधी जे काय करावयास पाहिजे ते सांगितलेले आहे. त्यासाठी वेगवेगळया आयुधांचा वापर करुन चर्चा उपस्थित केलेली आहे. आज या ठरावाच्या माध्यमातून या शिक्षण क्षेत्रामध्ये विशिष्ट गोष्टींचा, विशिष्ट प्रकारचा आम्हाला त्रास होत आहे ते सांगण्याचा मी प्रयत्न करणारक आहे. या शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी असतील, मुख्याध्यापक, संस्थाचालक असतील या सगळयांचे शोषण होत आहे. त्यांचा छळ होत आहे, त्यादृष्टीकोनातून हा विषय ठरावाच्या माध्यमातून मांडणार आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार होत आहे, देशातील सर्व विभागातील भ्रष्टाचार आपण थांबवू शकत नाही ही वस्तुस्थिती असली तरी शिक्षणासारख्या महत्वाच्या विभागामध्ये आणि तोही ज्यांच्यावर शिक्षणाची जबाबदारी आहे त्यांच्याकडून या क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार होणे, त्यांच्याकडून या क्षेत्रामध्ये गैरव्यवहार होणे बरोबर नाही. हा भ्रष्टाचार पूर्णपणे थांबवू शकलो नाही तरी त्याला आळा घालण्यासाठी त्याची कारणे शोधून काढून शासनाच्या माध्यमातून काही तरी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. म्हणून मी दावा करणार नाही की, आज सभागृहात हा विषय मांडल्यानंतर किंवा मी जी प्रकरणे मांडणार आहे ती मांडल्यावर तो थांबेल असे नाही. या राज्यातील वेगवेगळया जिल्हयातील वेगवेगळया विभागातील अधिका-यांच्या भ्रष्टाचाराची माहिती मला सांगता येणार नाही, मांडता येणार नाही कारण तेवढा वेळ नाही. परंतु मी काही उदाहरणे देणार आहे, माहिती देणार आहे किंवा उपाययोजना सुचविणार आहे. या क्षेत्रात जो गैरप्रकार होत आहे. तो थांबविण्यासाठी मनापासून मानसिकता असावयास पाहिजे. परंतु चर्चा झाल्यानंतर त्याला उत्तर दिले आणि चर्चा संपली असे समजले तर काही होणार नाही. म्हणून ख-या अर्थाने या क्षेत्रासाठी काही तरी करावयाचे असेल तर त्यासंबंधी गांभीर्याने विचार करुन उपाययोजना कराव्या लागतील, ठोस निर्णय घ्यावे लागतील.

सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, शाळांना एकदा मान्यता दिल्यानंतर त्यांच्याकडून शासकीय नियमाप्रमाणे कामकाज होणे आवश्यक आहे. काही शाळांचे कामकाज

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

श्री.रामनाथ मोते....

नियमाप्रमाणे होत नाही, त्यामुळे त्या शाळांना कारणे दाखवा नोटीस दिली जाते. त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली जाते. मग त्यांचे म्हणणे ऐकून झाल्यावर त्या शाळेची मान्यता काढून घ्यावयाची की नाही हे अधिका-यांमार्फत ठरविले जाते. जे अधिकार या अधिका-यांना मिळाले आहेत त्याचा सध्या दुरुपयोग होत आहे. केवळ पैसा मिळविण्यासाठी भ्रष्टाचार करण्यासाठी अनेक शाळांना छोटया छोटया कारणांसाठी नोटीस दिल्या जातात, कारणे दाखवा नोटीस दिल्या जातात. आपल्या शाळेची मान्यता का काढून घेऊ नये अशाप्रकारची नोटीस दिल्यानंतर त्या शाळेचे व्यवस्थापन, त्या शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक घाबरतात. अडचणीमध्ये येतात.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते...

**(सभापतीस्थानी तालिकासभापती श्री. रमेश शेंडगे)**

आपली शाळा बंद पडते की काय ? त्या बाबतीत आपल्याला जबाबदार धरले जाईल की काय ? शिक्षकांना जबाबदार धरले तर आमचे समायोजन होईल की काय ? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्या शब्दात सांगायचे तर लक्ष्मीदर्शन झाले की तडजोड होते.

सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, गेल्या 5 वर्षात नागपूर विभागामध्ये किती शाळांना, आपली शाळा बंद का करण्यात येऊ नये अशा प्रकारच्या नोटीसा देण्यात आल्या ? किती शाळांना कारणे दाखवा नोटीसा आणि उत्तरे देण्यात आली ? किती शाळांच्या मान्यता काढून घेतल्या आणि किती शाळांच्या मान्यता पुढे चालू ठेवल्या? याचा अर्थ संस्थेला कारणे दाखवा नोटीस द्यायची आणि तडजोड करुन लक्ष्मीदर्शन झाले की नोटीस रद्द करायची असे प्रकार केले जातात. अधिका-यांचा हा एक धंदा झालेला होता. आपण 5 वर्षाची माहिती घेतली तर या ठिकाणी खरोखरच काही तरी गडबड झालेली आहे हे आपल्या लक्षात येईल. आज राज्यामध्ये अनुदानित शाळा, विनाअनुदानित शाळा आणि अनुदानित शाळांची संच मान्यता आणि अनुदानित शाळामध्ये काम करणारे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांची वैयक्तिक मान्यता घेणे बंधनकारक आहे. मान्यतेसाठी संबधित शिक्षणाधिका-याकडे प्रस्ताव द्यावा लागतो, त्याची मान्यता घ्यावी लागते. ही मान्यता घेताना शासनाने निर्देश दिलेले आहेत की, ही मान्यता देताना तुमच्या मर्जीला येईल तेव्हा मान्यता देता येणार नाही. या संबंधात टाईम टेबल तयार केले पाहिजे. आपण कॅम्पस् घेतले पाहिजेत, शिबिरे घेतली पाहिजे. याबाबतीत स्पेसिफिक ऑडर्स आहेत. साधारणत: शिबिराच्या स्थळी 48 तासाच्या आत जो काही निर्णय असेल - एक तर त्या प्रस्तावाला मान्यता देणे किंवा नकार देणे- तो निर्णय शिबिराच्या स्थळी 24 तासाच्या आत आपल्याला द्यावयाचा आहे. पण संच मान्यता देताना त्यासंबंधीचा निर्णय आम्हाला मिळत नाही. वर्षानुवर्षे निर्णय मिळत नाही. मग ते माणूस कधी येतोय याची वाट बघत असतात. ठाणे जिल्ह्याचे काय झाले ? आता तेथे भागवत नावाचे नवीन अधिकारी आलेले आहेत. त्यांनी अजून शिंगे दाखविली नाहीत. अजूनपर्यन्त ते बरे आहेत. सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यामध्ये पूर्वीच्या शिक्षणाधिका-यांनी अक्षरश: धुमाकूळ घातला होता. या शिक्षणाधिका-यांच्या मालमत्तेची चौकशी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते...

केली तर किमान 50 कोटीची मालमत्ता सापडेल. 2 लाखापेक्षा अधिक रक्कम ते घेऊन जात होते. किती तक्रारी केल्या ? संच मान्यता द्यायची नाही, वैयक्तिक मान्यता द्यायची नाही, फाईल्स अडवून ठेवायची असे प्रकार होत होते. आता इन्स्टण्टचा जमाना आल्यामुळे मशिनमध्ये कॉईन टाकल्यानंतर जसे वजनाचे टिकीट बाहेर येते त्याप्रमाणे फाईल दिल्या नंतर लगेच ती मान्य झाली पाहिजे असे शिक्षकांना वाटते. शासनाचे आदेश मिळत नव्हते. दोन-दोन, तीन-तीन, चार-चार महिने मान्यता मिळत नव्हती आणि आजही ती मिळत नाही. शिक्षक, संबंधित मुख्याध्यायपक मान्यता कधी मिळेल याची वाट पहात असतात. पण लक्ष्मीदर्शन झाले की ही मान्यता मिळते. माननीय मंत्री महोदया, श्रीमती फौजिया खान या शिक्षण क्षेत्रात काम करीत आहेत. या क्षेत्रातील रेट एक-एक लाखापेक्षा कमी नाही. पैसे दिले की संबंधित शिक्षकाला मान्यता देण्याचे काम होते. आर्डरवर मागील तारीख टाकली जाते. सभापती महोदय, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये पेपर आता येताना इनवर्ड नंबरची नोंद होते आणि बाहेर जाताना आऊटवर्ड नंबरची नोंद केली जाते. पण मागील 3 वर्षातील मान्यतेच्या ऑर्डस् पहा. एकाही मान्यतेच्या ऑर्डरवर आऊटवर्ड नंबर नाही. हे शिक्षणाधिकारी निलंबित झाल्यानंतर मागील तारखा टाकून त्यांनी ॲडव्हान्स घेतलेले होते, त्याच्या ऑडर्स काढल्या.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ ST/ 18:20

श्री.रामनाथ मोते.....

आऊटवर्ड नंबर नाही. तीन वर्षामध्ये त्यांनी जे काही प्रकार केले असे प्रकार सर्वच ठिकाणी कमी जास्त प्रमाणात सुरु झाले. संच मान्यता घेऊन, वैयक्तिक मान्यता घेऊन ज्या पध्दतीने शिक्षकांची अडवणूक केली जाते त्याबाबत शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. ही संपूर्ण पध्दत बदलण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत ही पध्दत बदलत नाही तोपर्यंत ख-या अर्थाने रिझल्ट मिळणार नाही. सभापती महोदय, आमच्या शिक्षकांची वेगवेगळी कामे असतात. सुरुवातीला नव्याने नेमणूक झाल्यानंतर त्या पदाला मान्यता घेणे आवश्यक असते. तीन वर्षे शिक्षण सेवक म्हणून तो काम करतो. तीन वर्षानंतर नियमित शिक्षक म्हणून त्याला वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरते. ज्या माणसाने तीन वर्षे कामकाज केले आहे, जो तीन वर्षानंतर पहिल्या दिवशी सेवेत हजर आहे त्याचे काम समाधानकारकच आहे ना? त्याला संस्थेने सेवेत ठेवले आहे, शाळेने सेवेत ठेवले आहे. त्याला पुन्हा मान्यता घ्यायची? सभापती महोदय, मी माननीय शिक्षणमंत्र्यांना या संदर्भात विनंती करु इच्छितो. ही पध्दत आपल्याला बदलावी लागेल. नव्याने नेमणूक होताना, पूर्वी मान्यता दिलेली असताना पुन्हा मान्यता घेण्याची आवश्यकता काय? तीन वर्षे सेवा पूर्ण झाली. मान्यता मिळाली आहे. तीन वर्षानंतर समाधानकारक सेवा असेल आणि मुख्याध्यापकांनी लिहिले तर तुमचा प्रश्न मिटला. पुन्हा प्रस्ताव द्या, पुन्हा मान्यता घ्या. मग सहा-सहा महिने, आठ-आठ महिने, वर्ष वर्ष शिक्षकांना मान्यता मिळत नाही. तीन वर्षे सेवा पूर्ण होऊन सुध्दा संबंधित शिक्षकाला मान्यता मिळत नाही.

सभापती महोदय, मी परवा सुट्टी असल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयात गेलो होतो. वेतोरे येथे वेंगुर्ला एज्युकेशन सोसायटीची शाळा आहे. वेतोरेजवळील मठ या गावामध्ये ती शाळा आहे. त्याठिकाणी आमचे श्री.सुनील आत्माराम जाधव नावाचे मागासवर्गीय शिक्षक आहेत. परवा परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती होती. एका मागासवर्गीय शिक्षकाला गेल्या दहा महिन्यापासून तीन वर्षे सेवा पूर्ण होऊन सुध्दा मान्यता दिलेली नाही. त्याच्याकडे पैसे मागितले. सहा शिक्षकांची एकाच दिवशी नेमणूक झाली. सहापैकी पाच शिक्षकांचे प्रस्ताव पाठविले. या सहाव्या शिक्षकाचा प्रस्ताव पाठविला नाही. केवळ मागासवर्गीय आहे म्हणून प्रस्ताव पाठविला नाही. तो पैसे देऊ शकला नाही म्हणून दहा महिन्यापासून त्याला मानधन मिळत नाही. नियमित वेतनश्रेणी मिळत नाही. शिक्षणाधिकारी म्हणतात, आमच्याकडे प्रस्ताव येत नाही तोपर्यंत मान्यता

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ ST/ 18:20

श्री.रामनाथ मोते.....

देऊ शकत नाही. कशासाठी असा प्रस्ताव हवा? अशाप्रकारे शिक्षणाधिकाऱ्यांकडून, संस्था चालकांकडून आमच्या शिक्षकांची पिळवणूक होत असेल, शिक्षकांचे शोषण होत असेल तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. मी स्वत: जाऊन त्या शिक्षकाला आश्वासन देऊन आलो. त्याला सांगितले, उद्या सभागृहात या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांशी मी बोलणार आहे. चर्चा करणार आहे. या शिक्षकाला न्याय मिळवून देण्याच्या संदर्भात, मान्यता मिळविण्याच्या संदर्भात मी स्वत: माननीय मंत्रीमहोदयांशी बोलेन. शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र देईन. सेवा तीन वर्षे पूर्ण झाली. नेमणुकीला मान्यता मिळाली असेल तर शिक्षकाला नियमित वेतनश्रेणीची मान्यता मिळाली पाहिजे. एक नया पैसा देण्याची आवश्यकता नाही. अशाप्रकारचे आश्वासन मी त्याला दिले. आंबेडकर जयंतीच्या दिवशी एका शिक्षकाने त्यांच्या फोटोसमोर शाळेच्या आवारामध्ये उपोषण करणे बरोबर नाही. त्याचे उपोषण मी सोडवून आलो. या संदर्भात त्वरित दखल घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पाचवा वेतन आयोग आला, सहावा वेतन आयोग आला. ज्या ज्यावेळी वेतन आयोग लागू झाला त्या त्यावेळी वेतन निश्चिती करताना सर्वात जास्त उखळ पांढरे कोणी केले? सिनियर ऑडिटर यांनी. दहा वर्षात जेवढा पगार आणि कमाई झाली नसेल तेवढी कमाई तीन महिन्यात केली. प्रत्येक शिक्षकामागे 1000 ते 500 रुपये घेण्यात आले. माझी एका लेखाधिकाऱ्यांबरोबर झालेली चर्चा माझ्या फोनवर रेकॉर्ड केलेली आहे. माझ्या शाळेची वेतन निश्चिती करणार का? ते म्हणाले, नक्की करणार. केव्हा घेऊन येऊ. ते म्हणाले, उद्या या. मी म्हटले, सहज होईल ना? ते म्हणाले, सहज कसे होईल, पैसे दिल्याशिवाय होईल का काम? मी म्हटले, यापूर्वी कसे केले? ते म्हणाले, मागच्या वेळी कमी पैसे दिले, आता किती देणार? मी म्हटले, वेतननिश्चिती तुम्ही करणार म्हणजे तुम्ही सांगा?

नंतर 4एच.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ......

मागील वेळेत कमी रकमेत काम झाले होते आता वाढलेले दिसतात. तो म्हणाला होय, 1200 रुपये प्रमाणे पैसे घेऊन या आणि येताना एकटेच या. इकडे आल्यानंतर फक्त माझ्याकडेच पैसे द्यावयाचे, अन्य कोणाकडेही देऊ नका. मी म्हटले लिपीकाला बरोबर आणले तर चालेल काय, त्यावर तो म्हणाला की, चालेल पण त्याला बाहेरच थांबवा. मी म्हणालो काम झाले पाहिजे, मला परत पाठवू नका, तर तो म्हणाला की, तुम्ही तयारीनिशी या, अजिबात परत पाठविणार नाही, हे सर्व माझ्याकडे रेकॉर्डेड आहे. अशा प्रकारे शिक्षकांना लुटणे, प्रत्येक गोष्टीसाठी शिक्षकाची अडवणूक करणे आणि पैसे मिळविणे असे प्रकार सुरु आहेत. हा केवळ एकाच जिल्ह्याचा प्रश्न नाही तर संपूर्ण राज्यात कमी जास्त प्रमाणात अशीच स्थिती आहे. त्याचबरोबर लेखाधिकाऱ्यांनी तर करोडो रुपयांची कमाई केली आहे. या अनुषंगाने मी लेखी पत्र संबंधित विभागाच्या सचिवांना दिले होते. सहा महिन्यात त्याचे साधे उत्तर देखील मिळाले नाही. असे असेल तर आम्ही काय अपेक्षा करावयाची, कोणाकडे तक्रार करावी आणि न्याय कोणाकडे मागावा याचाही विचार होणे आवश्यक आहे. मी पत्र पाठविले परंतु उत्तरही देता आले नाही त्यामुळे अशा लोकांवर जरब बसत नाही, त्यांच्यावर चाप लावण्याची गरज आहे, ही सिस्टम बदलण्याची गरज आहे. दुसरे म्हणजे ज्यावेळेस शिक्षणाधिकारी आपले काम करतात त्यावेळेस आपण त्यांच्या संपत्तीची माहिती घेतो. परंतु एवढेच पुरेसे नाही तर त्यांच्या नातेवाईकांची सुध्दा माहिती घ्यावी लागेल. ती म्हणजे त्यांना भाऊ-बहिणी, मावसभाऊ-मावसबहिणी, मावशी वगैरे नातेवाईक किती आहेत याचीही माहिती घेण्यात यावी. याचा अर्थ मी असे म्हणणार नाही की अशा अधिकाऱ्यांच्या पाल्यांना नोकरी मिळू नये, पण ती वशिल्याने मिळू नये असा माझा मुद्दा आहे. कारण नोकरीच्या स्पर्धेत उतरण्याचा त्याचा हक्क असतो तो त्यांना मिळालाच पाहिजे. परंतु अशा पध्दतीने जे सुरु आहे की, माझा नातेवाईक आहे, माझ्या मामाचा मुलगा आहे ही कारणे सांगून ठाणे जिल्ह्यात दहा-पाच माणसे शिक्षणाधिकाऱ्यांनी आपली भरली. त्यातल्या एकाला मी विचारले तर मला सांगितले की, मी तीन लाख भरले, एक सांगतो मी पाच लाख भरले. हा काय प्रकार आहे मला कळत नाही. मग त्या संस्था चालकांना दम दिला जातो की जर तुम्ही माझा माणूस घेतला नाही तर तुमच्या दोन शिक्षकांना मान्यता मिळणार नाही. शेवटी संस्था चालक म्हणतात की, जाऊ द्या त्यांचा एक माणूस

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

घेऊन टाकू, आपल्या दोन शिक्षकांची मान्यता तरी मिळेल, अशा पध्दतीने हे अधिकारी भ्रष्टाचार करीत आहेत. तसेच हा गैरव्यवहार ते स्वत: करीत नाहीत तर त्यांचे एजंट शाळा-शाळांमध्ये जातात आणि त्यांच्या माध्यमातून हे लोक पैसे गोळा करतात. खरे म्हणजे विना अनुदानित तुकड्या अथवा विना अनुदानित शाळा असतील तर त्यांना वैयक्तिक मान्यता अथवा संच मान्यता देता पाच सहा वर्षानंतर जेव्हा त्या 20 टक्के अनुदानावर येतात तेव्हा शिक्षणाधिकाऱ्यांचा फतवा येतो की, आपल्याला आता मान्यता घ्यावी लागेल. म्हणजे पुन्हा मान्यता घ्या आणि ही मान्यता घेताना प्रत्येक शिक्षकासाठीचे 20-20 हजार रुपये द्यावे लागतात. मुळात मान्यताच उशिरा मिळते आणि त्यातही 20 टक्के पगार मिळतो अशी परिस्थिती आहे. त्यानंतर पुन्हा पुढच्या टप्प्यासाठी फतवा येतो की, आपल्या पुढील टप्प्यासाठी मान्यता घ्यावी लागेल म्हणून पुन्हा 20 हजार प्रत्येक शिक्षकाचे मिळून पैसे द्यावे लागतात. त्यानंतर पुढील 60 टक्क्याचा टप्पा, 80 टक्क्याचा टप्पा आणि शेवटचा 100 टक्क्याचा टप्पा अशा प्रत्येक टप्प्यासाठी पैसे द्यावे लागतात व शिक्षकांना लुटले जाते. याला आळा घालणार की नाही हा महत्वाचा भाग आहे. या शासकीय प्रकियेतील अधिकाऱ्यांना पैसे गोळा करण्याचे माध्यमच उपलब्ध करुन दिले जाते की काय अशी शंका येते. प्राथमिक शाळेतील कायम शिक्षकांना सुध्दा आता दरवर्षी मान्यता घ्यावी लागते. जे शिक्षक अनुदानित शाळांमध्ये काम करतात, दोन वर्षे झाली तरी देखील नगरपालिका, जिल्हा परिषद, महापालिकेतील प्रशासकीय अधिकारी दरवर्षी मान्यता घेण्यास सांगतात आणि त्यातून पैसे जमा करण्याचे काम करतातात, असा जो भ्रष्टाचार सुरु आहे तो रोखणे आवश्यक आहे...

यानंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

सभापती महोदय, शाळेच्याबाबतीत सुद्धा तोच प्रकार सुरू आहे. आमचे अधिकाऱ्यांकडून शोषण होत आहे. पालकांचे आणि विद्यार्थ्यांचे शाळांकडून शोषण होत आहे. विनाअनुदानित शाळांसंबंधी आपण खबरदारी घेण्याची, उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. काही ठोस निर्णय घेण्याची, त्यांच्यावर अंकुश ठेवण्याची आवश्यकता आहे. स्वीमिंगपूलच्या नावाखाली, बस सर्व्हीसच्या नावाखाली अन्य सुविधा देण्याच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून फार मोठ्या प्रमाणावर फी आकारली जाते. ती फी न भरल्यास विद्यार्थ्यांना त्रास दिला जातो. त्याकडेही शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आज मुंबई आणि अन्य परिसरामध्ये जागेचे भाव गगनाला भिडलेले आहेत. आज अनेक संस्था चालक शाळा बंद करून ती जागा मॉलसाठी देत आहेत. त्यामुळे मी विनंती करणार आहे की, या राज्यातील एकाही शाळेची इमारत शाळा बंद करून मॉलसाठी दिली जाणार नाही, तेथे गैरव्यवहार होणार नाही, भ्रष्टाचार होणार नाही अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

बंद पडलेल्या तुकडयांचे समायोजन करण्याच्या संबंधी मध्यंतरी शासनाने खूप चांगला निर्णय घेतला. बंद पडलेल्या तुकड्या 100 टक्के अनुदानावर असतील तर त्या तुकड्या त्या संस्थेतील अन्य शाळेत किंवा दुसऱ्या एखाद्या संस्थेच्या शाळेत समायोजन करण्याचे आदेश शासनाने दिले. यामुळे शासनाने चांगली सुविधा निर्माण केली. एक चांगला धोरणात्मक निर्णय घेतला. यामुळे आमच्या शिक्षकांना संरक्षण मिळाले. बंद पडलेल्या तुकड्या संस्थेमध्ये सुरू होत नसतील, जिल्ह्यातील अन्य संस्थेच्या शाळांमध्ये तुकड्याचे वाटप करायचे असेल तर ते करताना सुद्धा फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. यात आपण बदल करणार आहात की नाही. आमच्या ठाणे जिल्ह्यात बंद पडलेल्या तुकड्यांचे समायोजन ज्या पद्धतीने केले आहे ते काढा. विद्यार्थी संख्येच्या निकषानुसार, गुणवत्तेनुसार ज्यांना तुकड्या मिळायला पाहिजे होत्या त्या त्यांना मिळालेल्या नाहीत. श्री.कपिल पाटील यांच्या शाळेला तुकड्या मिळायला पाहिजे होत्या त्या मिळाल्या नाहीत. त्या श्री.संजय केळकर यांच्या शाळेला मिळाल्या. हे मी एक उदाहरण दिले आहे. म्हणजे ज्याला तुकडी मिळायला पाहिजे होती ती त्याला मिळाली नाही. मात्र, ज्याने लक्ष्मीदर्शन घडविले त्याला तुकड्या मिळाल्या. या बंद पडलेल्या तुकड्यांचे समायोजन करताना

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झालेला आहे. इतर जिल्ह्यामध्ये काय झाले ते मला माहित नाही. ते आपण शोधावे. किती तुकड्या बंद पडल्या आहेत,किती तुकड्याचे कुठे समायोजन झाले हे कोणालाही माहिती नाही. ज्या शाळांकडे गुणवत्ता होती, विद्यार्थ्यांची संख्या भरपूर होती त्यांना तुकडी मिळाली नाही. जिथे हा प्रकार उघडकीस आला तिथे वाद निर्माण झाले आहेत. मग नंतर लक्षात आले की, 2-2, 3-3 लाख रूपये घेऊन तुकड्यांचे समायोजन केले. ही अत्यंत गंभीर स्वरूपाची बाब आहे. तेव्हा आपण ठाणे जिल्ह्यातील तुकड्यांचे समायोजन कसे झाले हे बघावे. अन्य जिल्ह्यात देखील योग्य पद्धतीने समायोजन झाले आहे किंवा नाही हे देखील बघावे. तेव्हा समायोजन करण्याचे अधिकार ज्यांना दिले आहेत त्याचा विचार करण्याची आता वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, या नंतर मी वैद्यकीय बिलासंबंधी बोलणार आहे. वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना शासनाने दिली आहे. बिल आम्ही सादर करतो. शिक्षण अधिकारी मंजूर करतात. अर्थात त्याच्या अगोदर सिव्हील सर्जनची मान्यता लागते. तेथे 3 टक्के पावतीने द्यावे लागतात. 7 टक्के ऑन द्यावे लागतात. तेव्हा कुठे आमच्या बिलाला परवानगी मिळते. इ.ओ.स्तरावर बिल मंजूर होते म्हणून 100 चकरा माराव्या लागतात. पैसे दिल्या शिवाय इ.ओ.स्तरावर बिल मंजूर होत नाही. मंजूर झालेले बिल शाळेकडे आल्यानंतर वेतन पथकाकडे जाण्यापूर्वी ठराव लागतो.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ......

हे बिल मंजूर करण्यात आलेले आहे परंतु ते वेतन पथकाकडे जाण्यापूर्वी, हे बिल मंजूर करीत आहोत असा संस्थेचा ठराव लागतो. एकदा बिल मंजूर झाल्यानंतर पुन्हा संस्थेच्या ठरावाची काहीही आवश्यकता नाही. शासनाने जर बिल मंजूर केले असेल तर पुन्हा संस्थेच्या ठरावाची आवश्यकता का भासते ? ओपन हार्ट सर्जरी, एंजोप्लास्टी किंवा एजोग्राफी, कीडनी प्लॅन्टेशन इत्यादी गंभीर आजारासाठी शिक्षकाचे लाखो रुपये खर्च होत असतात आणि शासनाच्या चांगल्या निर्णयामुळे शिक्षकांना त्याची प्रतिपूर्ती मिळत असते. परंतु ही रक्कम मिळत असतान शासनाने जे पैसे मजूर केलेले असतात त्यातील काही टक्के त्यांना हवे असतात जोपर्यत शिक्षक त्या संस्थेला पैसे देत नाहीत तोपर्यत त्या संस्थेकडून ठराव केला जात नाही. एकदा बिले मंजूर केल्यानंतर पुन्हा संस्थेच्या ठरावाची आवश्यकता का आहे याबाबातीत आम्हाला एकदा सांगण्यात यावे. संस्थेच्या ठरावाची आवश्यकता नाही असे ठरविल्यानंतर भ्रष्टाचार होणार नाही तेव्हा याबाबतीत देखील माननीय मंत्रीमहोदयांनी विचार करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, भिवंडी येथे नगरपालिका असून त्या ठिकाणी एखाद्याची मक्तेदारी निर्माण झालेली आहे तेव्हा एकाच व्यक्तिची मक्तेदारी निर्माण होऊ देऊ नका. एखादी व्यक्ती एखाद्या ठिकाणी दोन चार वर्षापासून रुळली असेल तर त्यांना असे वाटते की, आता माझी येथून दुसरीकडे बदली होणार नाही आणि जरी बदली झाली तरी ती मी रद्द करीन. जर शासनाला भ्रष्टाचार थांबवावयाचा असेल तर एखादा अधिकारी एखाद्या ठिकाणी दोन वा तीन वर्षापासून काम करीत असेल तर त्यांची नियमाप्रमाणे तेथून दुसरीकडे बदली करण्यात यावी. अशा प्रकारे दोन तीन वर्षापासून जे अधिकारी एकाच ठिकाणी काम करतात व भ्रष्टाचार करतात त्यांच्यावर काही तरी कारवाई होण्याची आवश्यकता आहे. भ्रष्टाचारामध्ये जे अधिकारी पकडले गेले होते त्यांच्यावर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली आहे?भ्रष्टाचार केल्याबद्दल ज्यांना पकडण्यात आले होते त्यापैकी एका तरी व्यक्तीला सेवेतून बडतर्फ केल्याचे आपण मला सांगा. एकाही व्यक्तीला सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले नाही उलट त्याला पदोन्नती देण्यात आलेली आहे. आमच्या अवतीभोवती जी माणसे फिरतांना दिसतात त्यातील एका व्यक्तीला 70 हजार रुपयांची लाच घेतांना ॲटी करप्शन विभागाने पकडले तर दुस-या व्यक्तीला 50 हजार रुपयाची लाच घेतांना पकडले होते परंतु ती

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ......

माणसे अजूनही सेवेमध्ये आहेत इतकेच नव्हे तर त्यांना पदोन्नती देखील देण्यात आलेली आहे. एका बाजूला भ्रष्टाचार थांबवा असे सागितले जाते आणि दुसा-या बाजूला शासन भ्रष्टाचाराला प्रमोट करते की काय अशा प्रकारची भावना शिक्षकांच्या मनात निर्माण होत असते.

सभापती महोदय, श्री.शेख नावाचे एक प्रशासन अधिकारी आहेत. त्यांच्या बाबतीत कोणती कारवाई करण्यात आली आहे ? त्यांच्यावर कारवाई करावी यासबंधी मी आठ महिन्यापूर्वी माननीय मंत्र्यांना पत्र पाठविले होते. संबंधित नगरसेवकांने, पालकांनी, शिक्षकांनी श्री.शेख यांच्याविरुध्द तक्रारी केल्या होत्या त्या बाबतीत शासनाने कोणती कारवाई केली ? त्याच्याविरुध्द आजपर्यत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. एखाद्या शिक्षकाला वेतनश्रेणी द्यावयाची असेल, वरिष्ठ श्रेणी द्यावयाची असेल, निवड श्रेणी द्यावयाची असेल तर दोन दोन हजार रुपये घेतल्याशिवाय हा अधिकारी पुढे कोणतीही कार्यवाही करीत नाही. शाळांसाठी संगणकाची खरेदी करण्यात आली होती 23 हजार रुपयांचा संगणक 49 हजार रुपयास घेण्यात आला होता. श्री.शेख यांच्याच दुकानातून संगणकाचे कोटेशन देण्यात आले होते. अशा प्रकारे त्याने भ्रष्टाचार केला असल्याचे आम्ही शासनाच्या निदर्शनास आणले परंतु त्याच्याविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. गोरगरीब विद्यार्थ्यांना, नगरपालिकेतील शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे संगणकीय शिक्षण मिळावे यासाठी शासनाने पैसे खर्च केले आहेत परंतु त्यामध्ये देखील भ्रष्टाचार झालेला आहे तेव्हा जे अधिकारी भ्रष्टाचार करतात त्यांच्याविरुध्द तातडीने कारवाई करण्यात आली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो

सभापती महोदय, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये 1 कोटी 5 लाख रुपयांचा भ्रष्टाचार झ ााला होता त्याबाबातीत शासनाने कोणती कारवाई केली ? पार्श्वनाथ महाविद्यालयाच्या संदर्भात शासनाने कोणती कारवाई केली ? अकोला जिल्हा परिषदेमध्ये आदिवासींच्या जागेवर बनावट दाखल्यांच्या आधारे शिक्षकांच्या नियुक्त्या केल्या त्यामध्ये 1 कोटी 46 लाख रुपयांचा भ्रष्टाचार सबंधित अधिका-याने केला होता त्या बाबतीत शासनाने कोणती कारवाई केली होती ? सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये 71 शिक्षकांना नियमबाहय मान्यता देण्यात आल्या होत्या डिसेंबर 2009 मध्ये ही बाब

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ......

निदर्शनास आली तेव्हा अशा प्रकारे नियमबाहय मान्यता देणा-या अधिका-याविरुध्द आपण कोणती कारवाई करणार आहात ? कोल्हापूर पंचायत समितीमध्ये सर्व शिक्षा अभियानाचे 40 लाख रुपये बॅकेतून काढण्यात आले होते. सर्व शिक्षा अभियान हा तर संशोधनाचा एक विषय आहे. अनेक लोकांनी मला असे सागितले की सर्व शिक्षा अभियानाबद्दल तुम्ही बोलू नका.

नंतर श्री.सरफरे`

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

ज्या भ्रष्ट मोठ मोठया प्रकरणासंबंधी चर्चा होते त्यापैकी हे एक प्रकरण आहे. आपण सर्व शिक्षा अभियानाबाबत बोलत आहात. याठिकाणी सर्व शिक्षा अभियानाचे 40 लाख रुपये त्या अधिकाऱ्याने काढले ते कुणाच्याही लक्षात आले नाही? त्या अधिकाऱ्याने ते पैसे काढले, खाल्ले. ते सर्व अधिकारी गायब आहेत, ते रेकॉर्ड घेऊन पळून गेले, त्याच्याविरुध्द शासनाने काय केले? अशा भ्रष्ट अधिकाऱ्याविरुध्द आपण काय करणार आहात?

सभापती महोदय, बालभारतीच्या 200 कोटींच्या कागद खरेदीच्या संदर्भातील विषय रोज वर्तमानपत्रामध्ये गाजत आहे. या शिक्षण विभागामध्ये काम करणारे अधिकारी, शिक्षण विभागाच्या ध्येय धोरणांबाबत लोकांपर्यंत चांगली ओळख, चांगली कल्पना किंवा त्या विभागाबद्दल चांगले मत निर्माण होणे आवश्यक आहे. आज या अधिकाऱ्याने भ्रष्टाचार केला, उद्या त्या अधिकाऱ्याने भ्रष्टाचार केला अशाप्रकारे सर्व शिक्षा अभियानाच्या भ्रष्टाचाराबाबत वर्तमानपत्रामध्ये दररोज छापून येते. 200 कोटींच्या कागद खरेदीतील भ्रष्टाचार असेल, यवतमाळ जिल्हयातील 289 शिक्षण सेवकांच्या भरतीमधील भ्रष्टाचाराचे प्रकरण असेल. औरंगाबादमध्ये अधिकाऱ्यांनी मुलांना चित्रपट न दाखविता 12 लाख रुपये खाऊन टाकले. आणि सर्व पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांकडून मुलांना चित्रपट दाखविल्याबाबतची प्रमाणपत्रे त्या अधिकाऱ्यांनी घेतली. अशाप्रकारचे अनेक गंभीर स्वरुपाचे विषय या क्षेत्रामध्ये आहेत. याठिकाणी सर्वच विषय मांडता येणे शक्य नाही आणि आवश्यकताही नाही. हा भ्रष्टाचार कशापध्दतीने चालू आहे याचा फक्त नमुना मी आपल्याला सांगितला. मंत्रिमहोदयांना विनंती करतो की, या सर्व प्रकरणांची चौकशी करुन या दोषी व्यक्तिंवर कारवाई करावी, जेणेकरुन लोकांपर्यंत याबाबतचा संदेश जाण्याची आवश्यकता आहे. या क्षेत्रामध्ये गैरकारभार करणाऱ्याची, भ्रष्टाचार करणाऱ्याची गय केली जात नाही, त्यांच्यावर कारवाई होते, असा मेसेज जाण्याची आवश्यकता आहे. ती कारवाई काय होते? हे सर्वांच्या निदर्शनास आले पाहिजे. एकूण हा आपल्या सिस्टीमचा दोष आहे ती बदलण्यासाठी आपण काय करणार आहात? त्यासाठी आपण काय उपाय योजना करणार आहात. त्यासंबंधीचा खुलासा आपल्या भाषणामधून याठिकाणी व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करतो. आणि या ठरावाच्या संदर्भात वेळेचे बंधन पाळून मी माझे भाषण संपवितो.

ठराव प्रस्तूत झाला.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचारासंदर्भात माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते सरांनी मांडलेल्या अशासकीय ठरावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

शिक्षण क्षेत्राला "भ्रष्टाचार" हा शब्द नवा नाही. परंतु त्याचे सार्वत्रिक स्वरुप आणि मोठे स्वरुप कधी निर्माण झाले? ज्या दिवशी या राज्यामध्ये विना अनुदान तत्वाचे धोरण प्राथमिक शिक्षणाला व माध्यमिक शिक्षणाला लावण्यात आले त्या दिवशी या सरकारने भ्रष्टाचाराला मान्यता दिली. आपल्याला आतापर्यंत बदल्यांमधील भ्रष्टाचार माहीत होता. परंतु शिक्षकांच्या नेमणुकीमधील भ्रष्टाचार सुरु करण्यासाठी शासनानेच पुढाकार घेतला. शासनानेच त्याला मान्यता दिली. राज्यामध्ये विना अनुदान तत्वाचे धोरण ज्या दिवशी राज्यामध्ये सुरु झाले तेव्हापासून त्याला गती आली. शिक्षकांच्या नेमणुकीसाठी पैसे घेतले गेले तर त्याच्या गुणवत्तेचा पहिल्यांदा मुडदा पडतो. बोली लावून शिक्षक शाळेमध्ये लावले गेले.विना अनुदान तत्वावरील शाळेतील शिक्षकांना पाच ते सहा वर्षे पगार मिळत नाही. याबाबत मी अनेक जिल्हयामध्ये जाऊन पाहिले व प्रत्यक्ष अनुभवले आहे. 5 ते 7 लाख रुपये दिल्यानंतर त्या शिक्षकाला नोकरीवर लावले जाते. संस्था चालकांना भ्रष्टाचार करण्यास तुम्ही भाग पाडले. यापूर्वी या संस्थांना कधीही भ्रष्टाचार माहीत नव्हता, त्या कधीही भ्रष्टाचार करीत नव्हत्या. शाळेला अनुदान मिळणार नाही, शाळा शून्यातून उभी करायची. आणि शिक्षकांना पगार कसा द्यायचा? त्यासाठी अगोदरच त्यांच्याकडून 7 लाख रुपये घेऊन दर महिन्याला त्यांना 1 ते 2 हजार रुपये द्यायचे अशी वाईट सवय आपण लावली. कायम विना अनुदानित यामधील "कायम" हा शब्द काढला, परंतु त्यांना अनुदान देण्याची नियत या सरकारमध्ये नाही. जोपर्यंत तुम्ही त्यांना अनुदान देत नाही, जोपर्यंत त्यांना चेकने पगार देत नाही तोपर्यंत भ्रष्टाचार जीवंत राहणार. तुम्ही त्या भ्रष्टाचाराला जीवंत केले आहे हे मला याठिकाणी पहिल्यांदा नमूद करावेसे वाटते. महाराष्ट्र राज्यामध्ये कशा कशामध्ये भ्रष्टाचार नाही? या राज्यामध्ये जे पुरस्कार दिले जातात त्यामध्येही भ्रष्टाचार आहे. फाईली कशा बनतात? किती पैसे दिले जातात? आपण काही चांगले पुरस्कार दिले आहेत हे मला मान्य आहे. त्याला काही अपवाद आहे.परंतु बहुसंख्य पुरस्कार हे याच पध्दतीने दिले आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 18:45

श्री. कपिल पाटील . . . .

अधिकाऱ्यांच्या बदलीच्या बाबतीत जर तुम्ही पैसे खाल्लेत तर ते योग्य नाही. नाहीतर तुम्ही शिक्षकांकडून, संस्था चालकांच्या कडून पैसे घेणार, बदलीमध्ये भ्रष्टाचार करणार.बदलीसाठी होणारा भ्रष्टाचार रोखला पाहिजे.मग आपोआप खालच्या स्तरावरील भ्रष्टाचार रोखला जाईल.पण तसे होत नाही. मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे की,संस्था चालकांकडून पैसे घ्यावयाचे आणि मग त्यांनी शिक्षकांकडून पैसे घ्यावयाचे असा प्रकार सर्रास सुरु आहे. मुंबईतील अनुभव मला माहित आहेत.सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या ज्या कथा आहे, त्या पूर्वी मुंबई मध्येही होत होत्या.पण मुंबईमधून निवडून आल्यानंतर मी एक काम केले आणि तीनही निरीक्षकांना बोलावून सांगितले की, जर यापुढे मला पैसे खाताना कोणी दिसले तर गाठ माझ्याशी आहे. मी कोणालाही सोडणार नाही. मग एका अधिकाऱ्याला घरी पाठविले आणि तेव्हा पासून यामुंबईतील 90 टक्के भ्रष्टाचार संपविण्यामध्ये मला यश मिळाले हे मी अभिमानपूर्वक सांगू शकतो.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : ते काम मीच केले आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, होय, बरोबर आहे. त्यावेळी माननीय श्री.राधाकृष्ण विखे पाटीलसाहेब, हे शिक्षण मंत्री होते. त्यामुळे त्यांनाच याचे श्रेय दिले पाहिजे की, संबंधित अधिकाऱ्याला घरी पाठविण्यात आले आणि त्यांना त्याचे श्रेय दिले पाहिजे. आता जे अधिकारी आहेत, त्याबाबतीत मी अभिमानाने सांगू शकतो की, ते असे प्रकार करणार नाहीत. पे-फिक्सेशन साठी सुध्दा पैसे घेतले जातात. त्यावर मी म्हटले की, 500 रुपये द्यायला ही सत्यनारायणाच्या पूजेची वर्गणी वगैरे आहे काय? मराठी शाळेमध्ये पैसे घेण्याचे पूर्णपणे बंद केले आहे. मग मायनॉरिटीच्या, इंग्रजी शाळांमध्ये जाऊन पैसे घेण्याचे प्रकार सुरु केले. त्यांना असे वाटते की, इतरांना काही कळत नाही, ते कुठे जात नाहीत. पण ते प्रकारही बंद करावयास लावले. आपण पैसे द्यावयाचे बंद केल्यावर भ्रष्टाचार आपोआप बंद होतो. त्यासाठी थोडी कळ सोसावी लागते. मला अनेक शिक्षक येऊन सांगत होते की, पे-फिक्सेशन होणार नाही. सहा-सहा महिने वाट पहावी लागेल. मी म्हटले की, मग वाट बधा, काही बिघडत नाही. पण ज्यादिवशी तुम्ही पैसे देण्याची सवय लावाल, त्यादिवशी ते तुम्हाला लुटणार. सहा महिन्यांनी पे-फिक्सेशन झाले तरी हरकत नाही. आपला सहा महिन्यांचा पगार बुडत नाही. तो सगळया शिक्षकांना मिळणार आहे आणि त्यासाठी मी मेळावे घेतले आणि लोकांना सांगितले की, त्यांना एक रुपया सुध्दा द्यावयाचा नाही.

. . . .4 एल-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील . . . .

याचा परिणाम असा झाला की भ्रष्टाचार कमी होण्यास मदत झाली. पूर्वी मेडिकलच्या बिलासाठी सुध्दा पैसे द्यावे लागत होते. खरे म्हणजे मेडिकलचे बिल हे त्याच्या हक्काचे बिल आहे आणि तो खर्च मेडिकलसाठी झालेला आहे. परंतु ते बिल पास करण्यासाठी सुध्दा पैसे दिले जात असत, आता तेही बंद झाले आहे. पण सगळयात वाईट प्रकार हा बोर्डाच्या नेमणुकांच्या संदर्भातील आहे. आपण जर वशिल्याने आणि भ्रष्टाचाराने बोर्डामधील नेमणुका करु लागलो तर या शिक्षणाचा बट्टयाबोळ झाल्याशिवाय रहाणार नाही. कारण ज्याठिकाणी अभ्यासक्रम आखला जातो, शिक्षणाचा आराखडा जेथे आखला जातो, तेथेच जर तुम्ही अशा प्रकारचे अधिकारी, कर्मचारी नेमले तर योग्य नाही. सभापती महोदय, आपल्याला आश्चर्य वाटेल की, पाठ्यपुस्तकामध्ये माझी कविता छापून येण्यासाठी सुध्दा मला पैसे द्यावे लागतात. अशी उदाहरणे या राज्यामध्ये घडलेली आहे.जर पैसे देऊन कविता छापून आली तर तो उघड भ्रष्टाचार आहे.म्हणजे अभ्यासक्रमामध्ये सुध्दा इतका भ्रष्टाचार होत आहे. माझे लेख, माझ्या कथा छापून आणण्यासाठी सुध्दा भ्रष्टाचार होत असतो. हे प्रकार बंद व्हावे असे वाटत असेल तर किमान वशिलेबाजी टाळावी आणि बोडार्मध्ये चांगली माणसे नेमण्यात यावीत. कृपा करुन वशिल्याने आणलेल्या माणसांना तेथे घेऊ नका. कारण हा राज्यातील दीड कोटी विद्यार्थ्यांच्या उद्याच्या भविष्याचा प्रश्न आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराचे प्रकार रोखण्यासाठी आपल्याला ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय. दुसरा एक भ्रष्टाचाराचा मुद्दा आहे. जर एखादा अधिकारी वषार्नुवर्षे त्याच जागेवर काम करीत असेल तर ते बरोबर नाही. तीन वषार्नंतर तो बदलीस पात्र आहे. पण शासन त्याची बदली करीत नाही आणि त्याला पुन्हा मुदतवाढ मिळते. पण किमान सहा वषार्नंतर एकही अधिकारी एकाच पदावर असता कामा नये. शासनाने एवढी तरी व्यवस्था केली तरी सुधारणा होईल. माननीय मंत्री महोदयांनी शिक्षण क्षेत्रातील सर्व अधिकाऱ्यांची पहाणी करावी आणि जे लोक गेली सहा वर्षे एकाच जागेवर काम करीत आहेत, त्यांची ताबडतोब बदली करण्यात यावी. जे त्या विभागामध्ये सहा वषार्पेक्षा अधिक काळ आहेत,त्यांना बाहेर पाठवून द्यावे.ज्यांच्याबद्दल तक्रारी आहेत,त्यांना गडचिरोली येथे पाठवावे. जर माननीय मंत्री महोदयांनी हे उपाय केले नाहीत, त्यांना धाक दाखविला नाही तर अशा लोकांना असे वाटते की, आम्हाला पोचविणारा कोणी नाही. पण आम्ही सर्वांना पोचवितो असे ते हिंमतीने बोलतात. ज्याच्यामध्ये वरिष्ठांचा सहभाग नसतो. म्हणून माझी विनंती आहे की, तुम्ही अधिकाऱ्यांच्या पातळीवर ताबडतोब कार्यवाही करावी.

श्री.कपिल पाटील . . . .

सभापती महोदय,या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, आपल्या राज्यातील शिक्षकांचे पगार गेले तीन महिने झालेले नाहीत. दरवर्षी मार्च-एप्रिल महिन्यातील ही नेहमीची रडकथा आहे. बजेटच्या वेळेला पगार लांबतात. आज अशी स्थिती आहे की, शिक्षकांचा मार्चमधील पगार झालेला नाही.अनेक ठिकाणी फेब्रुवारीचा पगार मिळालेला नाही. एप्रिलचा पगार झालेला नाही आणि मे महिन्याचा पगार होण्याची शक्यता नाही अशी स्थिती आहे. मग शिक्षकांनी तीन-तीन महिने काय करावयाचे. त्यामुळे आपण आजच्याआज निर्णय घ्यावा आणि किमान उणे बिलातून पगार करण्याची व्यवस्था करावी. मी स्वतः राज्याच्या संचालकांना लिहीले होते की, शिक्षकांच्या पगारासाठी उणे बिलातून पगार देण्याची व्यवस्था करा. गेल्या वर्षी आपण शेवटच्या दिवशी ती व्यवस्था केली. आता 1 मे येईल आणि आपण त्यादिवशी "महाराष्ट्र दिन" साजरा करुन रजेवर जाऊ. पण शिक्षकांना दोन-तीन महिने पगार मिळाला नाही तर ते काय करणार ? मग त्याच्या कुटुंबांतील माणसे काय खाणार आहेत. मग यामधून भ्रष्टाचाराला तोंड फुटते. तेव्हा माननीय मंत्री महोदया, आपण शिक्षकांच्या पगाराच्या संदर्भात ताबडतोब अधिकाऱ्यांना आदेश द्यावेत ही विनंती. धन्यवाद.

-----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, माझ्या अगोदरच्या दोन सदस्यांनी मांडलेल्या सूचनां व्यतिरिक्त काही मुद्यांकडे मी शासनाचे लक्ष वेधणार आहे. त्याशिवाय काही भ्रष्टाचाराची केंद्रे आहेत त्याकडेही शासनाचे लक्ष वेधणे मला आवश्यक वाटते.

सभापती महोदय, सेवा निवृत्तीचे प्रस्ताव मंजूर करण्यासाठी सुध्दा पैसे घेण्यात येत आहेत. सेवा निवृत्तीचा प्रस्ताव नीटपणाने घेतला जात नाही. शालेय पोषण आहार सुध्दा भ्रष्टाचाराचे भयानक मोठे केंद्र झालेले आहे. शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना मग ती शाळा अनुदानित असो अथवा विनाअनुदानित असो, अनुदानित शाळांना वेतनेत्तर अनुदान मिळत नाही. या सबबीखाली फी घेण्यात येते. म्हणजे शाहू, फुले, आंबेडकर यांच्या या महाराष्ट्रामध्ये सर्वांना मोफत शिक्षण देण्याची घोषणा आम्ही करीत आहोत परंतु प्रत्यक्षात ते शिक्षण सर्वांपर्यंत पोहचते काय? याचे उत्तर मात्र दुर्दैवाने नकारात्मक आहे. येथे सुध्दा प्रचंड प्रमाणात फी घेतली जात आहे. शिक्षणाचा लाभार्थी हा विद्यार्थी आहे. पण त्या विद्यार्थ्यांना प्रवेशच नाकारला जात आहे कारण त्याच्यांकडे पैसा नाही. शाळेला मान्यता देण्यासाठी काही दलालांच्या टोळया कार्यरत आहेत. या दलालांच्या टोळया एक लाख रुपयापासून पाच लाख ते दहा लाख रुपयांपर्यंत मागणी करतात. जो गुंतवणूक म्हणून शिक्षण क्षेत्राकडे बघतो तो शाहू,फुले,आंबेडकर यांचा विचार सोडून संस्था काढतो आणि जो व्यापारी पध्दतीने संस्था काढतो तो शिक्षक नेमताना पैसे घेणार, विद्यार्थ्यांना प्रवेश देताना पैसे घेणार आणि प्रत्येक ठिकाणी भ्रष्टाचार करणार हे स्वाभाविक आहे. सभापती महोदय, मी असे म्हणेन की, सर्वात जास्त काळा बाजार आणि भ्रष्टाचार कुठे चालत असेल तर दुर्दैवाने आणि खेदाने म्हणावे लागेल की, तो शिक्षणाच्या क्षेत्रात चालू आहे, याकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, आम्ही लोकप्रतिनिधींनी ज्या भावना मांडल्या आहेत, याबाबतीत खूप बोलता येण्यासारखे आहे पण वेळे अभावी मी मर्यादित बोलत आहे. मी शासनाला अशी विनंती करणार आहे की, या सभागृहातील सात शिक्षक आमदारांना सुध्दा शासनाने कधी विश्वासात घेतलेले नाही. शासनाच्या शिक्षण मंत्र्यांनी आम्हाला कधी विश्वासात घेतले नाही. मी या सभागृहात दोन वर्षापासून बसत आहे. या दोन वर्षामध्ये एकाही शिक्षण मंत्र्यांना कधी असे वाटले नाही की, या शिक्षक प्रतिनिधींबरोबर दोन तास चर्चा करावी. त्यांच्या

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे...

भावना समजून घ्याव्यात. सभापती महोदय, आम्ही सरकारचे काय घोडे मारले आहे? हेच मला कळत नाही. आम्हला विश्वासात घेतले जात नाही. आम्ही एक लाख मतदारातून निवडून येतो पण याठिकाणी आमची दखल घेतली जात नाही. मी शासनाला अशी विनंती करतो की, आता पर्यंत चाललेल्या सगळया घडामोडींवर आम्ही या शासनाला चांगल्या उपाययोजना सांगू शकतो. त्यातून शिक्षणाच्या क्षेत्रात चांगल्या प्रकारचे वातावरण तयार करता येईल. याबाबतीत दोन प्रकारे उपाययोजना करता येतील. आतापर्यंत जे काही अनिष्ट प्रकार घडले आहेत त्यावर एक चांगला आसूड उगारावा लागणार आहे जेणे करुन यापुढे कोणी अशा प्रकारचे धाडस करणार नाही. मग भलेही काही अधिकाऱ्यांच्या संपत्ती जप्त कराव्या लागतील. काहींना पदावनत करावे लागेल तर काहींना बडतर्फ करावे लागेल हे जे-जे काय करावे लागेल ते एका बाजूने करावे आणि दुसऱ्या बाजूने प्रिव्हेन्टीव्ह मेजर्स म्हणून प्रशासनामध्ये जे लॅक्युनाज, लूपहोल्स ठेवलेले आहेत त्या बाबतीत सगळी बांधबंदिस्ती करुन भ्रष्टाचार करायला कुठेही संधी रहाणार नाही, अशी दुसरी यंत्रणा तयार करण्यासाठी आपल्याला हातात हात घालून काम करावे लागेल एवढेच या निमित्ताने सांगून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय, उत्तर देतांना भ्रष्टाचाराच्या संदर्भात सांगणार आहेत म्हणून भ्रष्टाचाराच्या संदर्भातील एका मुद्याच्या संदर्भात मला याठिकाणी उल्लेख करावयाचा आहे. राणीसावरगावचे एसएससी बोर्डाचे केंद्र बंद झाले आहे. परंतु ते सरळसरळ बंद झालेले नाही तर आर्थिक गैरव्यवहारातून हे एसएससीचे केंद्र बंद झालेले आहे. यासंदर्भात शासनामार्फत काय कार्यवाही करण्यात येणार आहे? ती ठोस कार्यवाही आम्हाला माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरामध्ये अपेक्षित आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास मोते यांना मी धन्यवाद देते. त्यांनी एक अत्यंत महत्वाचा आणि तीव्र प्रश्न या सभागृहात उपस्थित केलेला आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जे सांगितलेले आहे ते नाकरण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही. कारण ती वस्तुस्थिती आहे. भ्रष्टाचार ही आपल्या समाजाला लागलेली कीड आहे. तो एक कॅन्सर आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराबाबत या ठिकाणी सांगितलेले आहे. पे-फिक्सेशनमध्ये भ्रष्टाचार होतो. बदल्यांमध्ये, ॲडमिशनमध्ये भ्रष्टाचार होतो, अधिकारी व कर्मचारी भ्रष्टाचार करीत आहेत. मॅनेजमेंटमध्ये व पालकांमध्ये भ्रष्टाचार आहे. ऑडिटर्समध्ये व पुरस्कारात सुध्दा भ्रष्टाचार आहे. आज भ्रष्टाचार सर्व क्षेत्रात पसरलेला आहे हे आपल्याला नाकारता येत नाही.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान .....

शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचार होणे ही खूप दुर्भाग्याची गोष्ट आहे. समाजामध्ये कोणते क्षेत्र असे आहे की ज्या ठिकाणी भ्रष्टाचार नाही ? म्हणूनच आज या सभागृहामध्ये चर्चा करीत असताना आपण वेगवेगळ्या क्षेत्रांबद्दल प्रश्न उपस्थित करतो. पोलिस क्षेत्रामध्ये, आरोग्य क्षेत्रामध्ये, मदतकार्यामध्ये, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार बघावयास मिळतो. सेवानिवृत्ती घेताना तसेच शवपेटी खरेदीमध्ये सुध्दा भ्रष्टाचार झाल्याची उदाहरणे आपल्याकडे बघण्यात आलेली आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी कोठे कोठे भ्रष्टाचार होतो याबाबत स्पेसिफिक उदाहरणे देऊन सांगितले. अधिकाऱ्यांनी काय केले तसेच बाकीच्यांनी काय केले याबाबत सांगितले. आपण सांगितले ते खरे आहे की, यामध्ये आपल्याला दोन प्रकारची ॲक्शन घेणे आवश्यक आहे. एक तर आपल्याला सिस्टीम इम्प्रूव्हमेंट करणे खूप आवश्यक आहे.

सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेबांनी सांगितले की, आदरणीय श्री. विखे-पाटील शिक्षण मंत्री असताना त्यांनी एका अधिकाऱ्याला घरी पाठविले. आपण किती अधिकाऱ्यांना घरी पाठविणार ? त्यांना घरी पाठविल्यानंतर आपला कारभार कसा चालणार ? हा एक मोठा सागर आहे आणि सागराला आपण एका कलशात बंद करु शकत नाही. त्यांनी जे केले ते अत्यंत चांगले केले. ते केलेच पाहिजे. ते केल्याशिवाय डिटरंट सुध्दा होऊ शकत नाही. ते करणे आवश्यक आहे आणि त्यासाठीच कायदे आणि नियम असतात. पण तो माझा मुद्दा नाही. पण हे सगळे करीत असताना आपल्याला आपल्या विचारामध्ये, आपल्या सिस्टिमध्ये आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. कारण शिक्षणासारख्या क्षेत्रामध्ये जर इतक्या मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार असेल तर ते योग्य नाही. आपण राईट टू एज्युकेशनचा ऐतिहासिक कायदा पारित केलेला आहे. फंडामेंटल राईटचा कायदा आपण 6 ते 14 वर्षे वयोगटासाठी केलेला आहे. या शासनाच्या इच्छाशक्तीची ही गोष्ट साक्ष आहे की, आपल्याला सर्व मुलांना शिक्षण द्यावयाचे आहे. परंतु हे सगळे देत असताना आज जी परिस्थिती आहे त्यावर सुध्दा आपल्याला विचार करणे गरजेचे आहे. त्यामुळे आज आपण जी चर्चा उपस्थित केली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद दिले.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

प्रा. फौजिया खान .....

आजच्या शिक्षण क्षेत्रामध्ये जी सिस्टिम आहे त्यामध्ये हे सगळे प्रिव्हेंट करण्यासाठी आपण वेगवेगळे नियम आणि रेग्युलेशन्स, कार्यक्रम ठरवून दिलेले आहेत. आपल्याकडे सेवाशर्ती नियम आहेत. आपल्याकडे खाजगी शिकवणुकीचे वर्ग चालवित असतील तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे. तक्रार समिती आहे. तपासण्या आहेत.

श्री. भगवान साळुंखे : खाजगी क्लासेस हा मोठा कॅन्सर आहे.

प्रा. फोजिया खान : त्यामुळेच मी त्याचा उल्लेख करीत आहे. आपल्याकडे मान्यता काढून घेण्याची तरतूद आहे. पुष्कळ कायदेकानून, नियम सगळे आपल्याकडे आहेत. परंतु मला या ठिकाणी एकच सांगावयाचे आहे की, प्रत्येक क्षेत्रामध्ये आपण नियम केलेले आहेत. ज्या ज्या ठिकाणी आपण उल्लेख केला, कोठे कोठे भ्रष्टाचार होत आहे याबाबत आपण उल्लेख केला त्याचा जर आपण बारकाईने विचार केला तर शिक्षकांबद्दल सुध्दा बोलले जाते. शिक्षक हे व्हिक्टीम आणि अधिकारी हे एक्स्प्लॉयटर आहेत अशा प्रकारची चर्चा आपण या ठिकाणी केली. मला सांगावयाचे आहे की, शिक्षकांमध्ये सुध्दा भ्रष्टाचार आहे. शिक्षक भ्रष्टाचार करीत नाहीत असे नाही किंवा दुसरे कर्मचारी भ्रष्टाचार करीत नाही असे नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मला आपण परवानगी द्यावी.

**तालिका सभापती ( श्री.रमेश शेंडगे )** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, हा प्रस्ताव आपल्याला वेळेत संपवावयाचा आहे. आपण कृपया खाली बसावे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी काही चुकीचे बोलत नाही, मी जे बोलत आहे ते कोणीही नाकारणार नाही.

श्री.कपिल पाटील : शिक्षक कोणत्या प्रकारचा भ्रष्टाचार करतात हे सांगितले तर आमचे प्रबोधन होईल.

प्रा.फौजिया खान : शिक्षक कॉपी करण्यामध्ये मदत करतात, अनधिकृतपणे खाजगी क्लासेस घेतात हे सर्वांना माहीत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती** : आपल्याला ठराविक वेळेत हा ठराव संपवावयाचा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी उत्तरामध्ये अडथळा आणू नये.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. त्यानंतर आपण बोलावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, कोणते शिक्षक कॉपी करण्याला वाव देतात, पैसा कोण देतो, ही व्यवस्था कोणी केली, हे पाप शासनाचे आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आपल्याला संकुचितपणे विचार करुनही चालणार नाही. सन्माननीय सदस्यांनी संपूर्ण उत्तर ऐकून घेणे गरजेचे आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, उत्तर पूर्ण होऊ द्यावे, सन्माननीय सदस्यांना नंतर बोलण्याची संधी आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी आपले भाषण ऐकले आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्र्यांचे कौतुक केलेले देखील त्यांना चांगले वाटले नाही.

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांनी आपल्याला पाहिजे तेच बोलले पाहिजे असे नाही. आपले म्हणणे त्यांनी ऐकून घेतले आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सर्वच शिक्षकांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे योग्य नाही.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचार आहे, हे कोणी नाकारु शकत नाही. त्यावर उपाय शोधणे आवश्यक आहे. त्यामुळे संकुचित विचार करता येणार नाही. समाजामध्ये पसरलेला रोग आहे आणि त्याचे निवारण करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी आपण येथे बसलेलो आहोत. जेथे जेथे हयूमन इन्टर्वेन्शन आहे, मग शाळेत प्रवेश घ्यावयाचा असो आणखी काही असो, जेथे माणसाचा संबंध आला तेथे तेथे हा त्रास होणार आहे. कारण हा रोग समाजात पसरलेला आहे. म्हणून यासाठी एक वेब बेस्ट फ्रेमवर्क करणे आवश्यक आहे. या संपूर्ण प्रकारामध्ये हळूहळू बदल करु शकतो. विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, पालकांना पारदर्शक सुविधा मिळाव्या यासाठी वेब फ्रेमवर्क करणे हा उपाय होऊ शकतो. कारण त्यामुळे वेळेची बचत होईल, कमी पैशात काम होईल, डेटा बेसमुळे शिक्षकांची जात काय आहे, शिक्षकांची काय आहे ते समजू शकेल आणि तो सगळयांना एक सपोर्ट देवू शकतो. त्याची सुरुवात केलेली आहे. परंतु ती व्यवस्था आणखी मजबूत केली पाहिजे तरच यातून मार्ग निघू शकतो.

सभापती महोदय, तत्कालीन शिक्षण मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी ऑनलाईनद्वारे अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरु केली. यावर्षी त्यात सुधारणा आणून ही प्रक्रिया यावर्षी लागू केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. फौजिया खान..

बाकीच्या महानगरपालिका क्षेत्रामध्येही सेंट्रलाईज ऑन लाईन ॲडमिशन प्रोसेस सुरु करण्याचा विचार आपण करु शकतो. शिक्षण क्षेत्रामध्ये ऑन लाईन ॲसेसमेण्ट आणि ग्रेडेशन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. माध्यमिक शाळांचे ॲसेसमेण्ट ऑन लाईन पध्दतीने करीत आहोत. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, शासकीय,निमशासकीय, अनुदानित शाळा, विना अनुदानित शाळा, अशा प्रत्येक शाळेसाठी ही पध्दत मॅण्डेटरी करुन याच माध्यमातून एक इम्प्रुव्हमेण्ट करणे शक्य आहे. सर्व डाटा आपल्याकडे आल्यानंतर तो ॲनलाईज करता येईल. शासनाने आणखी एक निर्णय घेतलेला आहे. आज आपल्याला वाटते तेथे शाळा पाहिजे असते. याबाबतीत शासनाने इण्टीग्रेटेड पर्स्पेक्टीव्ह प्लॅन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. एका प्रोफेशनल एजन्सीकडून हा प्लॅन घ्यायचा आहे...(अडथळा).. हा इण्टिग्रेटेड पर्सस्पेक्टिव्ह प्लॅन, शाळा कोठे असाली पाहिजे यासाठी डिस्टण्ट इण्डेक्स, पॉप्युलेशन इण्डेक्स, लिंग्विस्टिक ग्रपू इण्डेक्स करीत आहोत. या नुसार एक चांगला पर्सस्पेक्टिव्ह प्लॅन जी.आय.एस. मॅपिंग करुन करता येईल. हा इण्टिग्रेटेड प्लॅन झ ााल्यानंतर ऑन लाईनद्वारे मान्यता, ऑन लाईनद्वारे अन्य प्रक्रिया सुरु करण्याचा विचार करीत आहोत. हा रॅण्डम विचार आहे. या वर निर्णय घेतलेला नाही. शासनाने याची सुरुवात केलेली आहे. पुढे सिस्टिममध्ये कसा बदल होऊ शकतो हे मी आपल्यापुढे मांडत आहे. या मध्ये शाळेच्या मान्यतेपासून तुकड्यांची मान्यता, अनुदान प्रक्रिया या गोष्टी संगणकाच्या माध्यमातून ऑन लाईन होत आहेत. यामध्ये असेसमेण्ट, ग्रेडेशन, मूल्यांकन इत्यादी ऑन लाईन होणार आहे. मी हे इन्फ्रास्टक्चर फोकस याकरिता करते की, त्यामुळे क्वॉलिटी ऑफ एज्युकेशन निर्माण करता येते. या पध्दतीमुळे प्रत्येक संस्थेचे रेग्युलर व्हॅल्यूएशन होऊ शकेल. जर याचा आपण वापर केला तर फी आकारण्याची प्रक्रिया सुध्दा निश्चित करता येईल. आज फीच्या संदर्भातील परिस्थिती आवाक्या बाहेरची आहे. याचे योग्य नियमन या सिस्टिमच्या माध्यमातून होऊ शकेल. तसेच डिसिजन सपोर्ट मॅकॅनिझम निर्माण करता येणे शक्य आहे. याबाबतीत राज्य शासनाने टीसीआय सोबत एमओयू केलेला आहे. प्रत्येक गावामध्ये कॉमन सर्व्हीस सेंटर निर्माण करण्यासाठी पाऊल उचलेले आहे. त्यासाठी एमओयू करुन काम सुरु झालेले आहे. जर आपल्याला शाळांचा डाटा निर्माण करता आला तर ह्यूमन इंण्टरव्हेन्शनवर नियंत्रण आणता येऊ शकते. हा सर्व विचार करताना आपल्याला आवश्यकता असल्यास शुल्क निधारणही करता येऊ शकेल. आज कॅपिटेशन फीच्या माध्यमातून ...

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान........

भरमसाठ पैसे घेतले जातात, त्याबाबत सुध्दा आपल्याला या सभागृहात एक सर्वसमावेशक कायदा आणण्याचा विचार करता येईल हे या ठरावाच्या निमित्ताने मी सांगू इच्छिते.

दुसरे एक क्षेत्र आहे ज्याचा उल्लेख आपण केलेला नाही. मला याठिकाणी सांगितले पाहिजे की, पूर्व प्राथमिक शिक्षणाची आज दशा अशी आहे की, त्यावर कोणाचेच नियंत्रण नाही. कोणी किती डोनेशन घ्यायचे, किती कॅपिटेशन फी घेतात, काय शिकवितात, कुठेही सुरु करतात यावर सुध्दा नियंत्रण असण्याची आवश्यकता आहे. याबद्दल सुध्दा आपल्याला नियम, कायदा करण्याचा विचार करता येऊ शकतो. सभापती महोदय, खाजगी शिक्षण वर्ग चालतात. त्या खाजगी शिक्षण वर्गाची सुध्दा प्रचंड संख्या आहे हे आपल्याला नाकारता येणार नाही. हे खरे आहे की, शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण मिळाले तर खाजगी शिक्षण वर्ग चालणार नाहीत. शाळेमध्ये शिकवायचे नाही आणि खाजगी टयुशन्स घ्यायच्या या बाबतीत सुध्दा लेजिस्लेशन करण्याचा विचार करता येईल. मला याठिकाणी सांगावयाचे आहे की, आपल्याकडे शिक्षण विभागाच्या माध्यमातून अनेक योजना राबविल्या जात आहेत. या सगळ्या योजना ॲप्रोप्रिएट आहेत का याचा सुध्दा विचार करण्याची गरज आहे. कारण हे ईरेलेव्हंट झाले नाही ना याचा विचार केला पाहिजे. उदाहरण द्यायचे झाले तर आपण उपस्थिती भत्ता एक रुपया देतो. एका रुपयाचे आकर्षण राहणार का हे तपासून घेतले पाहिजे. कारण जोपर्यंत या सर्व बाबींवर आमुलाग्र बदल करण्याचा विचार होत नाही तोपर्यंत हा संकुचित विचार राहणार आहे. सर्वसमावेशक विचार राहणार नाही. यासाठी मी या सर्व बाबींचा उल्लेख करीत आहे. जसे मी संगणकीकरणाच्या संदर्भात, वेब बेसचा उल्लेख केला. आदरणीय ग्रामविकास मंत्री श्री.जयंत पाटील यांनी ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून घोषणा केली. त्या अंतर्गत सर्व जिल्हा परिषदांच्या शाळा येतात. त्या शाळांमध्ये बायोमेट्रीक अटेंडन्स सिस्टीम सर्व मुलांसाठी व शिक्षकांसाठी करणार आहोत. सन्माननीय सदस्यांनी पगाराबद्दल उल्लेख केला. इसीएसद्वारे त्यांच्या बँक खात्यामध्ये डायरेक्ट पगार जमा करणे योग्य होईल असे मला वाटते.

श्री.कपिल पाटील : इसीएसद्वारे अद्याप पगार जमा होत नाही? वेळेवर पगार देणार का?

प्रा.फौजिया खान : आपल्यासमोर अन्य बदल काय करता येतील, काय विचार होईल हे सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे. परंतु याठिकाणी राजकारण करु नका.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : पगाराबाबत राजकारण कोणते? मंत्रीमहोदयांना कोणते अधिकारी ब्रिफिंग करतात माहिती नाही. इसीएसद्वारे पगार देण्याचे अर्थमंत्र्यांनी दोन वर्षापूर्वी आश्वासन दिले, ते आश्वासन कुठे पूर्ण केले?

प्रा.फौजिया खान : आपल्याला ऐकायचे नसेल तर मी उत्तराचे भाषण संपविते. सन्माननीय सदस्यांना त्यांचा ठराव मागे घेण्याची विनंती करते. माझ्याकडून आपल्याला पाहिजे तसेच उत्तर अपेक्षित आहे. मी उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहे परंतु माझे उत्तर पूर्ण होऊ देत नाही.

श्री.कपिल पाटील : तीन महिन्याचा पगार देणार की नाही हे सांगावे.

नंतर 4आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील पगाराबद्दल बोलत आहेत. पण आपण ज्यावेळी हक्काबद्दल बोलतो तेव्हा दर्जेदार शिक्षणाचाही विचार केला पाहिजे. तसे केले नाही तर संपूर्ण समाजव्यवस्थाच ढासळून जाण्याची शक्यता असते. हे करीत असताना आरोप-प्रत्यारोपांना अर्थ नसतो. जो विद्यार्थी उद्याचे भविष्य आहे त्याची काळजी आपल्याला घेणे आवश्यक आहे त्यांच्या बाबतीतील चर्चा करण्यास आम्ही केव्हाही तयार आहोत. मी या मानसिकतेत आमुलाग्र बदल करण्याच्या अनुषंगानेच येथे बोलत आहे. We are not joking. शेवटी मी एवढेच सांगणार आहे की, हे सर्व करीत असताना आपल्याला जो न्युक्लिअस आहे, जो विद्यार्थी आहे, जो शिक्षक आहे त्याकडे लक्ष दिले पाहिजे. असे केले नाही तर शिक्षकांमध्ये डेडिकेशनची भावना राहत नाही. ज्याप्रमाणे आई मुलांची काळजी घेते व त्यासाठी तिला पगाराची अपेक्षा नसते. परंतु जीवनात जगण्यासाठी पगार आवश्यक असतो, फॅसिलिटीज आवश्यक असतात हे मी कधीच नाकारणार नाही. तरी सुध्दा शिक्षकांमध्ये जी भावना पाहिजे, जी मातृत्वाची भावना आवश्यक असते ती निर्माण करणे हेच शासनाचे कर्तव्य आहे. जर यावर भर दिला तर समाजव्यवस्था सुधारेल आणि भ्रष्टाचारालाही आळा घालता येईल. विद्यार्थ्यांवर जो अन्याय होत आहे तो देखील दूर करता येईल. असा अन्याय दूर केला नाही तर त्याचे पातक आपणा सर्वांवरच येईल. म्हणून शिक्षण खात्यातील भ्रष्टाचार कसा थांबविणार याचा विचार करणे महत्वाचे आहे. या निमित्ताने मी एक शेर सांगते....अडथळा.....सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आपणच सभागृह चालविता असेच मला वाटते. कृपया मला एकच शेवटचा मुद्दा पूर्ण करु द्यावा.....अडथळा.....शिक्षकांच्या पगाराबद्दल शासनाकडून कोणतीही त्रुटी राहणार नाही ही कमिटमेंट मी या निमित्ताने देत आहे.

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)** : ठराव शिक्षणातील भ्रष्टाचाराबाबतचा आहे, पगाराविषयीचा नाही, त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी तसा आग्रह धरु नये.

श्रीमती फौजिया खान : महोदय, मला एक-दोन सुधारणा अजून सांगावयाच्या आहेत. शिक्षकांच्या पगारासंबंधीची बाब तपासून लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : तीन महिन्याचा पगार शिक्षकांना मिळाला नाही तर त्यांनी काम कसे करावे ?

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : शिक्षण विभागातील भ्रष्टाचाराबाबतचा ठराव आहे, येथे पगाराचा काय संबंध आहे, माननीय मंत्री महोदयांना त्यांचे उत्तर अगोदर पूर्ण करु द्यावे अशी मी विनंती करतो.

श्रीमती फौजिया खान : महोदय, सन्माननीय सदस्यांनी पगारासंबंधीचा वेगळा ठराव आणावा, त्यावेळेस मी उत्तर देणार आहे. आज मी शिक्षणातील भ्रष्टाचारासंबंधीचे उत्तर देत आहे. तसेच शिक्षकांनाही या शेरच्या माध्यमातून आश्वासन देऊ इच्छिते की,

"यूं भी होता है कभी जुल्म के पत्थर का जवाब
क्या आईना टूट कर खंजर में बदल जाता है"

सभापती महोदय, आपल्याला या देशात सायंटिस्ट निर्माण करावयाचे आहेत, या देशात चांगले अधिकारी निर्माण करावयाचे आहेत, नक्षलवादी किंवा आतंकवादी निर्माण करावयाचे नाहीत. अशा वेळेस आपली ही जबाबदारी आहे की, आपण मुलांना व्यवस्थित शिक्षण देण्याबाबतची जबाबदारी आपणा सर्वांचीच आहे. त्यात मग शासन असो, मॅनेजमेंट असो, शिक्षक असोत, आमदार अथवा मंत्री असोत ही सर्वांचीच सामूहिक जबाबदारी आहे. भ्रष्टाचाराला तोंड देणे हे आपले काम आहे व त्यासाठी आपणा सर्वांना मिळून काम करावे लागणार आहे.

यानंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MMP/ SBT/ खर्चे ..... 19:20

प्रा.फौजिया खान...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसबंधी मुद्दा उपस्थित केला होता. 40 हजार पेक्षा जास्त बिल असेल तर ते मंजूर करण्यासाठी चार टप्पे पूर्ण करावे लागतात. एज्युकेशन ऑफिसर बिल डेप्युटी डायरेक्टरला पाठवतात, डेप्युटी डायरेक्टर, डायरेक्टरला बिल पाठवतात व डायरेक्टर शासनाला बिल पाठवतो. हे टप्पे कमी करण्याचा विचार करण्यात येईल. एज्युकेशन ऑफिसर कडून डायरेक्ट शासनाकडे बिल पाठविण्यासंबंधी विचार करता येईल, हे मी या निमित्ताने सांगते आणि पुन्हा मी एकदा विनंती करते की, आपण सर्वसमावेशक विचार करावा. एवढे सांगून मी सन्माननीय सदस्यांना आपला ठराव सभागृहाच्या अनुमतीने मागे घ्यावा अशी विनंती करते. ...(अडथळा) ....

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ठरावासाठी किती वेळ असतां हे आपणा सर्वांना माहिती आहे. सन्माननीय सदय श्री.विक्रम काळे यांना मी सांगू इच्छितो की, आपली अर्धा तास चर्चा आहे. त्यावेळी आपण आपले मुद्दे मांडावेत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सुधारणा करू असे आश्वासित केल्याबद्दल आम्ही त्यांचे स्वागत करतो. परंतु, गेल्या एक वर्षापासून शिक्षकांचे पगार उशिरा होत आहेत. सहा सहा महिन्यांनी शिक्षकांचे पगार होत आहेत. विनाअनुदानाचे तर सोडून द्यावे. ते तर लांब आहेत. वर्षाला किती बजेट लागते हे अधिकाऱ्यांना माहित नसते काय ? याचे नियोजन आपल्याकडे नाही काय ? मंत्रालयात बसून अधिकारी काय करतात ? शिक्षकांना 4 महिने पगार मिळालेला नाही. त्यांचे वेतन शासन किती दिवसामध्ये अदा करणार आहे ? असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, भ्रष्टाचाराचा ठराव असला तरी मी येथे असे सांगू इच्छिते की, जे काही असेल ते तपासून सगळे प्रकरण एक महिन्याच्या आम्ही मार्गी लावू.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, अजून एक महिन्याचा कालावधी कशासाठी पाहिजे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मग आता सभागृहात उभे राहून पगार मंजूर करायचा काय ?

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, आपण अशासकीय ठरावावर चर्चा करीत आहोत. येथे जे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत त्याला सन्माननीय मंत्रिमहोदयांनी स्पेसिफिक उत्तरे दिलेली आहेत. मंत्रिमहोदयांनी राज्याचे धोरण काय आहे यासंबंधातील सविस्तर माहिती दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी वेगळ्या आयुधाचा वापर करून आपला मुद्दा उपस्थित करावा. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांचा ठराव जो काही भ्रष्टाचार होतो, अनियमितता होते यासंबंधातील होता. त्यास माननीय राज्य मंत्र्यांनी अतिशय समर्पक उत्तरे दिलेली आहेत. या ठरावावर विस्ताराने चर्चा झालेली असून मंत्रिमहोदयांनी अतिशय विस्ताराने उत्तरे दिलेली आहेत. त्यामुळे आपण पुढचे कामकाज घ्यावे अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आपला ठराव मागे घ्यावयाचा आहे का ? आपल्याला अजून बरेच कामकाज पूर्ण करायचे आहे. यानंतर आपल्याला 9 अर्धा तास चर्चा घ्यायच्या आहेत. 12.00 वाजेपर्यंत सभागृह आपल्याला चालवायचे आहे काय ?

श्री.भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, आतापर्यंत झालेल्या भ्रष्टाचारासंबंधी शासनातर्फे कोणती उपाययोजना केली जाणार आहे ? या माझ्या प्रश्नाचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रात वेगवेगळ्या स्तरावर होणारा भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार यासंबंधी मी अशासकीय ठराव आणला होता. त्यावर आम्ही सर्व सन्माननीय सदस्यांनी चर्चा केलेली आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ...

सभापती महोदय, शिक्षकांच्या पगारासबंधी सन्माननीय सदस्यांच्या भावना अतिशय तीव्र आहेत. हा अशासकीय ठरावाचा विषय नसला तरी मी सांगू इच्छितो की, आम्ही देखील शिक्षकांना जबाबदार आहोत. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराचा प्रश्न जितका महत्वाचा आहे तितकाच शिक्षकांच्या वेतनासंबंधीचा विषय देखील महत्वाचा आहे.

सभापती महोदय, शासनाच्या काही अडचणी असल्या तरी सुध्दा अनुदानित संस्थेमधील शिक्षकांना तीन चार महिने पगारापासून वचित ठेवणे योग्य होणार नाही. या निमित्ताने मला माननीय मंत्री महोदयांना एक विनंती करावयाची आहे की, एक मे नंतर शिक्षकांना सुट्टया लागणार आहेत तेव्हा या सुट्टया लागण्यापूर्वी त्यांचे थकीत वेतन देण्यात यावे. त्या शिक्षकांचे जे थकीत वेतन आहे ते वेतन सुट्टीपूर्वी मिळावे अशा प्रकारची अपेक्षा जर त्यांनी ठेवली तर त्यात काही वावगे होणार नाही. काम केल्यानंतर मोबदला मिळण्याचा शिक्षकांना अधिकार आहे. म्हणून सुट्टीला जाण्यापूर्वी शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी लावावा अशी मी माननीय मंत्री महोदयाना विनंती करतो.

सभापती महोदय, या ठरावाच्या निमित्ताने मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. आतापर्यत वेगवेगळे विषय या सभागृहात माडले आहेत. आम्ही शिक्षक प्रतिनिधी असून शिक्षण क्षेत्रात आम्ही काम केलेले आहे त्यामुळे शिक्षकांचे हक्क आणि कर्तव्य त्याचबरोबर शिक्षकांच्या जबाबदा-या आम्ही पूर्णपणे पार पाडल्या आहेत आणि आता देखील पार पाडीत आहोत. आमचे सर्व शिक्षक अत्यंत समर्पित भावनेने काम करणारे आहेत, स्वत:ला झोकून देऊन काम करणारे आहेत शिक्षकाची तळमळ आणि मेहनत यामुळेच आजची शिक्षण व्यवस्था योग्य त्या पध्दतीने चालू आहे. अर्थात एखादा शिक्षक काही तरी करीत असेल याचा अर्थ राज्यातील सर्वच शिक्षक कर्तव्यापासून दूर जात आहेत आणि पाटया टाकण्याचे काम करीत आहेत असे म्हणणे योग्य ठरणार नाही. एका शिक्षकामुळे सर्व शिक्षकांना व सर्व शिक्षक समाजाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणें योग्य होणार नाही व तसे करण्यात येऊ नये अशी मला माननीय मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ...

सभापती महोदय, यानंतर मला शेवटचा एक मुद्दा येथे मांडावयाचा आहे. हा अशासकीय ठराव मांडण्याचे कारण असे की शिक्षक यामध्ये होरपळत आहेत. त्याला चटके बसत आहेत. शिक्षकांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षकांच्या वेदना सभागृहात या निमित्ताने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या शिक्षकांनी काम केले पाहिजे, अमुक केले पाहिजे, तमुक केले पाहिजे असे जरुर सांगावे. शिक्षकाच्या कर्तव्याची जाणीव त्यांना आहे आणि ती कर्तव्ये शिक्षक निश्चितपणे पार पाडत आहेत आणि येथून पुढच्या काळातसुध्दा पार पाडणार आहेत याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की सर्वच अधिकारी भ्रष्टाचार करतात असे नाही परंतु जे कोणी भ्रष्टाचार करतात त्यांच्यापर्यंत एक संदेश जाण्याची आवश्यकता आहे. जसे शिक्षकाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी सागितले त्याप्रमाणे अधिका-यापर्यंत असा संदेश गेला पाहिजे की आपण जर भ्रष्टाचार केला, गैरव्यवहार केला, नियमबाहय पध्दतीने वागलो तर त्याचे परिणाम भोगावे लागतील. अशा प्रकारचा संदेश या चर्चेच्या माध्यमातून त्यांच्यापर्यंत जाण्याची आवश्यकता आहे. तेव्हा याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा केल्यानंतर हा अशासकीय ठराव मागे घेण्यासबंधी मी सभागृहाला विनंती करीन.

-----

...3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केला होता त्याबाबतीत मला खुलासा करावयाचा होता परंतु चर्चेला वेगळेच वळण लागल्यामुळे मला त्यासबंधी विचार मांडता आले नाही. भ्रष्टाचाराच्या ज्या प्रकरणांचा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला होता त्या सर्व भ्रष्टाचाराचा प्रकरणांचा आढावा घेण्यात येईल आणि त्यासबंधीची कारवाई लवकरात लवकर करण्यात येईल. त्याचबरोबर मला एका गोष्टीचा खुलासा करावयाचा आहे की, अधिका-यांच्या भ्रष्टाचारासबंधी सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला होता सर्वच अधिकारी भ्रष्टाचार करतात असे सांगण्याचा आपला उद्देश नव्हता तसेच जेव्हा मी शिक्षकांच्या भ्रष्टाचारासंधी उल्लेख केला होता तेव्हा सर्वच शिक्षक भ्रष्टाचार करतात आणि सर्वच शिक्षक आरोपीच्या पिंज-यात उभे आहेत असे सांगण्याचा माझा देखील उद्देश नव्हता.

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

परंतु आपण सर्वांनी याबाबत ब्रॉड माईंडेडली विचार करणे आवश्यक आहे म्हणून मी सांगितले. आपण आपल्या मनामधून ते काढून टाकावे. भ्रष्टाचाराला आळा बसावा यासाठी शासनातर्फे कडक कारवाई जरुर केली जाईल. आणि म्हणून यामध्ये पॉझिटीव्ह चेंज आणण्याची शासनाची इच्छा आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रामध्ये काम करीत असतांना शिक्षकांचा प्रतिनिधी म्हणून माननीय मंत्रिमहोदयांनी जे आश्वासन दिले आहे. त्यामुळे मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी नंतर उत्तर दिले आहे. परंतु शिक्षकांच्या संदर्भात त्यांनी काढलेले उद्‌गार मागे घेतलेले नाहीत. पगाराच्या संदर्भात त्यांनी एक महिन्याचा वायदा दिला आहे. या दोन्ही गोष्टींचा निषेध करुन मी सभात्याग करीत आहे.

(माननीय सदस्य सभात्याग करतात.)

----

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय ठराव क्रमांक 67 संबंधी

**तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे)** : आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमातील अशासकीय ठराव क्रमांक 67 पुढे ढकलण्यात आला आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अर्धातास चर्चेसंबंधी

**तालिका सभापती** : आता अर्धा तास चर्चेला सुरुवात होत आहे. माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य श्री. विक्रम काळे....

श्री. राधाकृष्ण विखे पाटील (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, आता फक्त माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांची एकच अर्धा तास चर्चेची सूचना घेण्यात यावी. बाकीच्या अर्धा तास चर्चा सोमवारी घेण्यात याव्यात अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : कार्यक्रम पत्रिकेवरील सर्व अर्धा तास चर्चेच्या सूचना घेण्यात याव्यात असे माननीय सभापतींनी कळविले आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांच्या अर्धा तास चर्चेच्या पूर्वी मला अर्धा तास चर्चा उपस्थित करण्याची परवानगी मिळावी ही विनंती.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, आपण माझे नाव पुकारले आहे. परंतु माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांच्यानंतर माझी अर्धा तास चर्चा घेण्यात यावी ही विनंती.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्य परिवहन महामंडळाच्या जनसंपर्क अधिकारी पदावर कनिष्ठ कर्मचाऱ्यास बढती देणे

मु.शी.: राज्य परिवहन महामंडळाच्या जनसंपर्क अधिकारी पदावर कनिष्ठ कर्मचाऱ्यास बढती देणे यासंबंधी श्री. संजय केळकर यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"राज्य परिवहन महामंडळाच्या जनसंपर्क अधिकारी या पदावर पदवीधर नसलेला व पत्रकारीतेची कोणतीही पदविका नसलेला कनिष्ठ कर्मचारी महामंडळाच्या प्रतिष्ठेच्या अशा पदावर कार्यरत असणे त्यामुळे महामंडळाच्या प्रतिष्ठेला बाधा पोहचणे. राज्य परिवहन महामंडळाने कनिष्ठ कर्मचाऱ्यास तात्पुरती बढती देताना महामंडळाच्या त्रैमासिक परिवहन पत्रिकेच्या छपाईचे महत्व व तातडी टिप्पणी मध्ये सादर केली. प्रत्यक्षात २००७ पासून आजपावेतो परिवहन पथिक हे प्रसिध्द झालेले नाही. परिवहन पथिक छपाईचे काम देण्यात आलेल्या मे.क्रिएटिव्ह आर्ट प्रिंटर्स यांना २ वर्ष छपाईचे काम न दिल्यामुळे त्यांनी निविदेपोटी ठेवलेली अनामत रक्कम त्यांनी परत मागितल्यानुसार त्यांना विनाविलंब देण्यात आली. त्याची जबाबदारी मात्र तथाकथित नियुक्त असलेला जनसंपर्क अधिकाऱ्यावर ठेवलेली नाही. कनिष्ठ कर्मचाऱ्यास पदोन्नती देताना महामंडळाच्या सामान्य स्थायी आदेश क्र.५०३ चे उल्लंघन करण्यात आले. या बाबत राज्य परिवहन महामंडळाकडे केलेल्या तक्रारी बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, राज्य परिवहन महामंडळाच्या शाखेमध्ये कशापध्दतीने नियम धाब्यावर बसवून अधिकारी बेकायदेशीरपणे काम करीत आहेत त्याचा याठिकाणी नमुना दिला आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या शाखेमध्ये जन संपर्क अधिकारी या महत्वाच्या पदावर दि.२७.११.२००७ पासून एका कनिष्ठ कारकूनाची नियुक्ती करण्यात आलेली नाही. दि.२७.११.२००७ पासून जनसंपर्क अधिकारी हे पद रिक्त असल्यामुळे महामंडळाच्या महाव्यवस्थापकांनी बेकायदेशीरपणे एका कनिष्ठ कर्मचाऱ्याची त्याठिकाणी नियुक्ती केली. अशाप्रकारे जनसंपर्क अधिकारी या पदाकरिता आवश्यक ती पात्रता नसलेल्या, पदवीधर नसलेल्या कर्मचाऱ्याची तात्पुरती नियुक्ती केली, व अजून ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

कायम आहे. या महामंडळामध्ये श्री. धस नावाचे कारकून आहेत त्यांच्याकडे शैक्षणिक अर्हता नसतांना त्यांना तात्पुरती तीन महिन्यांकरिता जनसंपर्क अधिकारी म्हणून बढती दिली. केवळ तीन महिन्यांकरिता तात्पुरती दिलेली ही बढती तीन वर्षापर्यंत सुरु राहिली आहे. या पदाकरिता महामंडळाच्या इतर ११ सक्षम अधिकाऱ्यांनी अर्ज केले होते. परंतु त्यांना डावलून एका कनिष्ठ कर्मचाऱ्याची नियुक्ती केल्यामुळे त्यांच्यावर एकप्रकारे अन्याय झाला आहे. अशाप्रकारे नियम धाब्यावर बसवून, नियम डावलून प्रशासनाने, महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी काम केले आहे. विशेष करुन राज्य परिवहन महामंडळाच्या महाव्यवस्थापकांनी व अन्य अधिकाऱ्यांनी अयोग्य पध्दतीने हे काम केले आहे. त्यामुळे ज्या ११ सक्षम अधिकाऱ्यांनी या पदासाठी अर्ज केले होते त्यांना संधी मिळू शकली नाही. महामंडळाचे इतर कर्मचारी व अधिकाऱ्यांचे हक्क डावलून याठिकाणी देण्यात आलेली बढती ही अनुचित असून ती कामगार कायद्यानुसार दिली गेलेली नाही याबाबत प्रशासनाबरोबर वारंवार पत्र व्यवहार करण्यात आला. त्यामुळे एका कनिष्ठ कर्मचाऱ्याला जनसंपर्क अधिकारी म्हणून दिलेली बढती तात्काळ रद्द केली पाहिजे अशाप्रकारची मागणी मी याठिकाणी करीत आहे. यानिमित्ताने मी याठिकाणी दोन मागण्या करीत आहे. एक म्हणजे ज्यांना जनसंपर्क अधिकारी या पदावर नेमले आहे त्यांना ताबडतोब पदावनत करुन त्या पदावर दुसऱ्या सक्षम अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. दुसरी मागणी अशी की, या कर्मचाऱ्याला जनसंपर्क अधिकारी म्हणून बढती देणारे महाव्यवस्थापक कोण आहेत? दुसरे सक्षम अधिकारी महामंडळामध्ये असतांना त्यांना डावलून त्याठिकाणी श्री. धस यांना बेकायदेशीरपणे बसविण्यात आले आहे. ज्यांनी हे काम केले आहे त्यांनी नियमाचा भंग करुन, नियम धाब्यावर बसवून, नियम डावलून काम केले आहे. त्यांच्यावर आपण कोणत्या प्रकारची प्रशासकीय कारवाई करणार आहात? याचे स्पष्टीकरण करावे. अशाप्रकारचे दोन विषय मी याठिकाणी मांडीत आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 19:35

श्री.संजय केळकर . . . .

ज्यांना या पदावर नियुक्त करण्यात आले, त्यांना ताबडतोब या पदावरुन पदावनत करुन त्यांच्या जागेवर दुसरा सक्षम अधिकारी नेमण्यात यावा आणि ज्यांनी संबंधितांची नेमणूक केली, दिशाभूल करुन अशा प्रकारचे काम केले, त्यांच्यावर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात येणार आहे ? याची माहिती द्यावी.

-----

. . . .4 व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे पाटील (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी जनसंपर्क अधिकाऱ्यांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे. खरे म्हणजे त्या पदावर पूर्वी श्रीमती अस्थाना-पाटील या अधिकारी कार्यरत होत्या. यांनी 2007 मध्ये जनसंपर्क अधिकारी या पदाचा राजीनामा दिला. तद्‌नंतर महामंडळाची एकूण कामाची व्याप्ती लक्षात घेता, त्याठिकाणी श्री.धस यांची प्रभारी जनसंपर्क अधिकारी म्हणून 2007 मध्ये नेमणूक करण्यात आली. ही गोष्ट मान्य केली पाहिजे की, याबाबतीत महामंडळाने आवश्यक ती उपाययोजना करावयास पाहिजे होती आणि तेथे सेवा ज्येष्ठतेप्रमाणे जे अगोदरचे अधिकारी होते, त्यांच्याकडे हा कार्यभार सोपवावयास हवा होता. या संदर्भात जी त्रुटी राहून गेली आहे, त्याबाबतीतील खुलासा महामंडळाचे कार्यकारी संचालक तथा उपाध्यक्ष यांच्याकडून मागविण्यात आलेला आहे. तसेच आता श्री.धस यांच्याकडून हा कार्यभार काढून घेण्यात आलेला आहे आणि आता हा कार्यभार श्री.भांडारकर, मुख्य सांख्यिका म्हणजे चीफ स्टॅटीस्टीशन आहेत त्यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे. खरे म्हणजे हे पद आता जाहिरातीव्दारेच भरावयास पाहिजे. कारण महामंडळाची एकंदर व्याप्ती लक्षात घेता, आतापर्यंत महामंडळ त्रैमासिक काढत होते, ते सुध्दा आता गेले दोन वर्षे निघत नाही. वास्तविक पाहता त्या महामंडळाच्या कामकाजाची अधिक माहिती जनतेला व्हावी अशा प्रकारचा प्रयत्न असावयास पाहिजे. म्हणून मासिकाच्या बाबतीत पुनर्रचना करण्यासाठी महामंडळ पावले उचलत आहे. आता तात्पुरत्या स्वरुपाचा कार्यभार आपण त्या अधिकाऱ्याकडे दिलेला आहे. तसेच यासाठी जे पद भरावयाचे आहे, ते पद जाहिरात देऊन लगेच भरण्याच्या संबंधातील सूचना देण्यात आलेल्या आहेत एवढेच मला सांगावयाचे आहे.

----

. . . .4 व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ KGS/ ST/ 19:35

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ज्यांनी ही भरती केली, त्यांना यासंबधातील नियमावली काय आहे हे माहिती होते. त्यांच्याकडे सक्षम अधिकारी होते.परंतु असे असूनही संबंधितांची नेमणूक जाणीवपूर्वक करण्यात आली आणि अशा प्रकारचे काम हे या माध्यमातून अनेक वेळा झालेले आहे. त्यामुळे याबाबतीत सुध्दा कारवाई केली पाहिजे आणि त्याप्रमाणे आपण त्यांना ताबडतोब पदवनत करण्याबाबत जो निर्णय घेतलेला आहे,तसेच आता या पदासाठी जाहिरात देऊन सक्षम अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे या निर्णयाचे मी निश्चितपणे स्वागत करतो.पण याबाबतीत ज्यांची जबाबदारी होती, मग ती जबाबदारी महाव्यवस्थापकांची असेल किंवा इतर कोणाची असेल, परंतु त्यांच्यावर देखील कारवाई करणे आवश्यक आहे. तशी ती करणार आहात काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, वस्तुस्थिती अशी होती की, ज्यावेळी पूर्वीच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर श्री.धस हे काही काळ तेथील कामकाज पहात होते. त्यामुळे त्यांना अनुभव होता. ते कनिष्ठ लिपीक होते आणि यामध्ये थोडी अनियमितता झ ााल्याचे दिसते हे तर मी मान्यच केलेले आहे. याबाबतीत महामंडळाकडून खुलासा मागविण्यात आलेला आहे. परंतु याबाबतीत पुनरावृत्ती होऊ नये म्हणून जरुर त्यादृष्टीने काळजी घेतली जाईल. आपण आता ती चूक दुरुस्त केलेली आहे. आता त्याठिकाणी जाहिरात देऊन अधिकारी नेमण्याच्या बाबतीत सूचना दिलेल्या आहेत. यासंबंधात जी त्रुटी राहिलेली आहे किंवा जी अनियमितता झालेली आहे, त्याबाबतीत खुलासा मागविण्यात आलेला आहे आणि याबाबतीतील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

----

. . . . 4 व्ही-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान

(आय.टी.) विषयाच्या शिक्षकांच्या पदांना मान्यता व वेतनाबाबत

**मु.शी.**: राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) विषयाच्या शिक्षकांच्या पदांना मान्यता व वेतनाबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 1415 ला दिनांक 15 डिसेंबर 2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.विक्रम काळे वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, "राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) विषयाच्या शिक्षकांच्या पदांना मान्यता व वेतनाबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 1415 ला दिनांक 15 डिसेंबर 2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, नुकतीच परवा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 119 वी जयंती संपूर्ण भारतभर व संपूर्ण महाराष्ट्रभर मोठया उत्साहाने साजरी करण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आम्हाला संदेश देऊन गेले आणि शिक्षणाचे महत्व पटवून देताना त्यांनी सांगितले की, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो पिणार तो गुरगुरल्याशिवाय रहाणार नाही. म्हणून खऱ्या अर्थाने सगळया विकासाचा पाया कोणता असेल तर ते शिक्षण आहे. जो शिकेल तो टिकेल असे म्हटलेले आहे. आपण 21 व्या शतकात प्रवेश करणार आहोत. एक काळ असा होता की, ज्याला लिहीता-वाचता येते, त्याला साक्षर म्हटले जात असे. आता 21 व्या शतकात पदार्पण करीत असताना, ज्याला कॉम्प्युटर चालविता येतो, त्याला खऱ्या अर्थाने साक्षर म्हटले जाते.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ KGS/ प्रथम सौ. रणदिवे..... 19:40

श्री. विक्रम काळे....

म्हणून प्रत्येक व्यक्तिला आणि प्रत्येक विद्यार्थ्याला संगणकाचा वापर करता आला पाहिजे. त्याला संगणकाचे ज्ञान प्राप्त झाले पाहिजे. यासाठी संगणकाचे अधिकाधिक शिक्षण देण्याकडे शासनाचा ओढा आहे. परंतू शासनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान मिळण्याच्या दृष्टिकोनातून किती तोकडे प्रयत्न होत आहेत हे या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सभापती महोदय, नुकतेच या अधिवेशनाच्या सुरुवातीला माननीय राज्यपाला महोदयांचे अभिभाषण झाले. या अभिभाषणामध्ये असा उल्लेख केलेला आहे की, "भविष्यात माझे सरकार या राज्यातील सगळया शाळांना संगणक पुरविणार आहे आणि सगळया विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करणार आहे". त्याप्रमाणे शासनाने टप्प्याटप्प्याने या महाराष्ट्रातील सगळया शाळांना संगणक देण्याच्या दृष्टीने दर वर्षी एका शाळेला दहा संगणक देण्याची योजना आखलेली आहे व योजनेच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने महाराष्ट्रातील सगळया शाळांना संगणक देण्याचे काम होणार आहे. परंतु हे संगणक दिल्यानंतर या संगणकाचा उपयोग कसा करायचा? विद्यार्थ्यांना या संगणकाचे काय ज्ञान द्यायचे? ते कोण देणार? याचे कुठलेही प्रयोजन, कुठलीही व्यवस्था शासनाकडून झालेली नाही, हे मला याठिकाणी खेदाने नमूद करावेसे वाटते. संगणक, माहिती व तंत्रज्ञान, आय.टी. या विषयांचा इयत्ता अकरावी व बारावीच्या अभ्यासक्रमात समावेश केलेला आहे. इयत्ता आठवीपासून पुढे हा विषय सुरु करण्यात आलेला आहे. परंतु हा विषय ऐच्छिक ठेवलेला आहे. हा विषय सुरु करीत असताना शासनाने या महत्वाच्या विषयासाठी कुठल्याही पध्दतीचे अनुदान दिलेले नाही. दिनांक 15 डिसेंबर, 2009 च्या अधिवेशनामध्ये याबाबात मी प्रश्न विचारला होता त्यावेळी असे उत्तर देण्यात आले की, हा विषय शिकविणाऱ्या तज्ञ शिक्षकाला वेतन देण्याची जबाबदारी ही त्या संस्थेची आहे. खरे तर संगणकासारखा हा महत्वाचा विषय आहे. यासाठी तज्ञ शिक्षक असल्याशिवाय ते तांत्रिक ज्ञान त्या विद्यार्थ्यापर्यंत पोहचवता येणार नाही. शहरामध्ये अशा प्रकारचे संगणक तज्ञ शिक्षक मिळू शकतात परंतु खऱ्या अर्थाने ग्रामीण भागामध्ये वाडया-वस्तीमध्ये ज्यांनी संगणकाचे ज्ञान प्राप्त केले आहे, संगणकाची डिग्री घेतलेली आहे असा ट्रेंड शिक्षक मिळू शकत नाही. आणि मिळाले तरी संस्था किंवा शाळा संगणक तज्ञ शिक्षकाला अतिशय त्रोटक वेतन देतात. अनुदानित शाळेमध्ये सुध्दा संबंधित संस्था या संगणक तज्ञ शिक्षकाला वेतन देऊ शकत नाहीत. कारण ग्रामीण भागातील विद्यार्थी संगणक शिक्षणाची फी देऊ शकत नाहीत. शहरी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे....

विद्यार्थी फी देऊ शकतात. मजुरी करणाऱ्या शेतकरी आपल्या पाल्याची फी कुठून देणार आहे? हा महत्वाचा प्रश्न आहे आणि जर शाळांकडे फीच येत नसेल तर शाळांनी कुठून वेतन द्यायचे? हा महत्वाचा प्रश्न आहे. सभापती महोदय, इयत्ता अकरावी आणि बारावीसाठी संगणक हा विषय सुरु केलेला आहे. तेव्हा या संगणक या विषयासाठी अनुदान देण्याची आवश्यकता आहे. तसेच त्यासाठी जे शिक्षक कार्यरत रहातील त्यांच्या पदांना मान्यता देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, यासाठी हा प्रश्न आम्ही गेल्या दोन-तीन अधिवेशनापासून या सभागृहामध्ये सातत्याने उपस्थित करीत आहोत. परंतु याबाबतीत शासन उदासिन दिसते. शासन संगणकावर लाखो रुपये खर्च करीत आहे. या राज्यातील जवळपास तीन ते चार हजार शाळांना संगणक देण्याचे काम शासनाच्या वतीने झालेले आहे. एका शाळेत दहा संगणकाची प्रयोग शाळा स्थापन करण्यात येत आहे. त्यावर आज लाखो रुपये खर्च होत आहेत. हा खर्च होत असातना किमान एक जरी संगणक शिक्षक नेमण्यात आला आणि त्याला शासनाच्या अनुदानातून वेतन दिले तर मला वाटते ज्या उद्देशाने ही संगणक प्रयोगशाळा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना साक्षर करण्यासाठी दिलेली आहे तो उद्देश खऱ्या अर्थाने साध्य होईल.

सभापती महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. परंतु माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, ज्या शाळांच्या माध्यमातून, कनिष्ठ महाविद्यालयांच्या माध्यमातून हा संगणक, आय.टी. विषय शिकविला जातो, हा विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या पदांना मान्यता द्यायला शासनाला काय पैसे लागतात? पदांना मान्यता द्यायला कुठलेही अनुदान लागत नाही. शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देण्यासाठी कुठलेही अनुदान लागत नाही परंतु आज सुध्दा जे शिक्षक आठ-आठ वर्षापासून संगणक शिकविण्याचे काम करीत आहेत, त्यांच्या पदांना कोणत्याही प्रकारची मान्यता नाही. ना त्यांना वैयक्तिक मान्यता दिली जाते. भविष्यामध्ये अनुदान मिळेल या आशेवर हे शिक्षक त्या ठिकाणी उपाशी पोटी काम करीत असतात परंतु आज त्यांच्या पदांनाच मान्यता नसेल तर......

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ...

त्यांचे कोणते भवितव्य त्यांच्या हातामध्ये राहणार आहे ? म्हणून या अनुषंगाने माझ्या दोन मागण्या आहेत. एक म्हणजे संगणक या विषयावर काम करणारी राज्यातील जेवढी कनिष्ठ महाविद्यालये असतील, त्या ठिकाणी काम करणारे जे शिक्षक आहेत त्यांना वैयक्तिक मान्यता शासन स्पेशल ड्राईव्ह घेऊन किती दिवसात देणार तसेच या पदांना किती दिवसात मान्यता देणार ? कारण त्यासाठी शासनाला एक पैसा सुध्दा लागणार नाही. खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील, खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांच्या, दिनदुबळ्यांच्या, दलितांच्या मुलांपर्यंत संगणकाचे ज्ञान पोहोचवावयाचे असेल तर या संगणक विषयाला अनुदान कधी देणार ? मी विचारलेल्या दोन प्रश्नांबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे अशी मी विनंती करतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

प्रा. फौजिया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2001-2002 पासून प्लस 2 स्तरावर इयत्ता अकरावी आणि बारावीमध्ये तंत्रज्ञान विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे आणि त्याच वर्षापासून कायम विनाअनुदानित तत्वावर शासनाने ते धोरण अमलात आणले आहे. हा विषय कायम विनाअनुदानित तत्वावर असल्याने शिक्षकांना वेतन देण्यात आलेले नाही आणि आजच्या परिस्थितीमध्ये ते देता येणार नाही. वेतनावरील खर्च संस्थेने करावयाचा आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांकडून 1200 रुपये शुल्क आकारण्यात येत आहे. राज्यात 1516 कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये हा विषय शिकविला जातो. शिक्षकांना मान्यता देण्याबाबत जी नियमित पध्दत आहे त्या पध्दतीने मान्यता प्राप्त करुन देण्याचे काम करीत आहोत. एकूण 809 शिक्षक अस्तित्वात आहेत आणि त्यापैकी 650 शिक्षक पूर्णवेळ असून 159 शिक्षक अर्धवेळ आहेत. ज्या शिक्षकांनी प्रस्ताव सादर केलेला आहे त्यांना मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु प्रस्तावच सादर केला नसेल तर तो प्रश्न कसा सुटेल ? जसजसे शिक्षक प्रस्ताव सादर करतील तसतशी त्यांना मान्यता देण्याचे काम जलद गतीने होईल. त्यांच्या पगाराबद्दल सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला. खरे तर हे कायम विनाअनुदानित तत्वावर होते. आता सगळ्याच बाबतीत कायम विनाअनुदानितमधून कायम शब्द काढून टाकला आहे. त्यासाठी कॅबिनेट सबकमिटीमध्ये निकष ठरत आहेत. या विषयाबद्दल लोकप्रतिनिधींनी आग्रह धरला असल्यामुळे त्याचा सर्व हिशेब करुन आपण वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. वित्त विभागाने मान्यता दिली तर हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, ही जी सगळी प्रकरणे आपल्या कार्यालयाकडे दाखल झालेली आहेत त्यांना किती दिवसात मान्यता देण्याचे काम करणार तसेच इयत्ता अकरावी आणि बारावीच्या संकणक विषयाला अनुदान देण्याच्या प्रस्ताव शिक्षण विभागाकडून वित्त विभागाकडे गेलेला आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी सांगितले की, शिक्षण विभागाकडून वित्त विभागाकडे प्रस्ताव गेलेला आहे. मान्यतेच्या संदर्भात मी सांगितले की, जसेजसे त्यांचे प्रस्ताव येतील तसतशी मान्यता देण्यात येईल.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलतीच्या योजनांचा आढावा घेण्याबाबत

**मु. शी.** : शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलतीच्या योजनांचा आढावा घेण्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 1292 ला दिनांक 15 डिसेंबर, 2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, "शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक सवलतीच्या योजनांचा आढावा घेण्याबाबत " या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 1292 ला दिनांक 15 डिसेंबर, 2009 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणार शैक्षणिक सवलतीच्या योजनांचा आढावा घेण्याबाबत आम्ही गेल्या अधिवेशनामध्ये प्रश्न दिलेला होता. शालेय शिक्षण विभागामार्फत गेल्या अनेक वर्षापासून राज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी, विद्यार्थ्यांच्या हितासाठी योजना राबविल्या जातात. विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिले जाते. त्यांच्यासाठी मोफत पुस्तक योजना सुरु केलेली आहे त्याचबरोबर ई.बी.सी. फी ची प्रतिपूर्ती शासनामार्फत केली जाते. त्याचबरोबर शिक्षकांच्या आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या मोफत शिक्षणाची सुध्दा व्यवस्था राज्य शासनाने केलेली आहे. या सगळ्या योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र शासनाच्या वतीने आणि शिक्षण विभागाच्या वतीने केली जाते.

यानंतर श्री. खंदारे.....

...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

अंमलबजावणी होत असताना शेवटच्या घटकापर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत योजना पोहोचते किंवा नाही त्याचा सातत्याने आढावा घेणे गरजेचे आहे. शासनाने पुस्तक योजना सुरु केली होती ती योजना स्वागतार्ह आहे. कारण गोरगरीब पालकांची मुले महागडी पुस्तके विकत घेऊ शकत नाहीत. त्यामुळे शासनाने ही पुस्तक योजना सुरु केली. परंतु या योजनेमध्ये भेदभाव करण्यात आला. महाराष्ट्रात जेवढया शाळा आहेत त्या शाळांमध्ये शिकणा-या सर्व विद्यार्थ्यांना ही पुस्तक योजना लागू करणे आवश्यक होती. परंतु विना अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना देणार नाही आणि अनुदानित शाळेतील मुलांना देणार हा कोणता न्याय आहे ? शाळांबाबत, संस्थांबाबत अनुदानित शाळा किंवा विना अनुदानित शाळा यासंबंधी जरुर धोरण आखावे. परंतु विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव न करता सर्व विद्यार्थ्यांना समान न्याय दिला पाहिजे. वास्तविक विना अनुदानित शाळेतील मुले गरीब असतात त्यामुळे त्यांना पुस्तके दिली पाहिजेत असे माझे मत आहे.

सभापती महोदय, शिक्षण विभागामार्फत मध्यान्ह भोजन योजना अंतर्गत विद्यार्थ्यांना खिचडी दिली जाते. या योजनेंतर्गत पूर्वी 3 किलो तांदूळ दिला जात होता. ही योजना लागू करण्याचा उद्देश असा होता की, विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये आले पाहिजे, शाळा सुरु झाल्यापासून ते संपेपर्यंत शाळेत उपस्थित राहिले पाहिजे. विद्यार्थ्यांना तांदूळ देण्याची योजना सुरु केली होती त्याचा उद्देश कितपत साध्य झाला ते पाहिले पाहिजे. त्यावेळी तांदूळ योजनेंतर्गत विद्यार्थी शाळेत येवो अगर न येवो पण तांदूळ मात्र दिला जात होता. काही पालक तर हाताच्या बाहया वर करुन बोलत असत की, तुमचे काय जात आहे ? असे सांगून 3 किलो तांदूळ घेऊन जात होते. त्यामुळे ज्या उद्देशाने ही योजना आणली होती तो उद्देश बाजूलाच राहिला. त्यामुळे तांदूळ वाटप योजना बंद झाली. आता सुधारित योजनेनुसार खिचडीचे वाटप केले जाते. शिक्षकांना आता स्वयंपाकी बनविले आहे. ज्या शाळेत 4-4 हजार विद्यार्थ्यांची संख्या आहे तेवढया विद्यार्थ्यांना खिचडी शिजवून द्यावयाची म्हटले तर गाव जेवण देण्यासारखे होते. इतक्या मोठया प्रमाणात शिक्षकांना खिचडी तयार करण्याचे काम करावे लागते. मग त्या शिक्षकांनी खिचडी शिजवावयाची की अध्यापनाचे कार्य करावयाचे अशी डोकेदुखी निर्माण झाली आहे. मुलांनी खिचडी खाण्यापासून ते दुस-या दिवशी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

श्री.विक्रम काळे....

शाळेत परत येण्यापर्यंत शिक्षकांना चिंता असते. कारण काही विघ्नसंतोषी माणसे सगळीकडे असतात, त्यांच्यापासून सुध्दा सावध राहून हे कार्य शिक्षकांना करावे लागते. ज्या उद्देशाने खिचडी देण्याचे सुरु केले आहे तो उद्देश सफल होत नाही. त्यामुळे ही योजनाही बंद करावी. त्यामुळे शिक्षकांना पूर्ण वेळ शिकविण्याचे कार्य करता येईल. सभापती महोदय, खिचडी देण्याची योजना डोंगराळ भागात, आदिवासी भागात ज्याठिकाणी कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे त्याठिकाणच्या विद्यार्थ्यांसाठी सुरु ठेवली तर ते योग्य होईल. मुंबई, पुणे या भागातील विद्यार्थी खिचडी खातात काय असा सवाल मला मंत्री महोदयांना करावयाचा आहे. मग कशासाठी कोटयवधी रुपये त्यासाठी वाया घालविले जातात ? शासनाने या योजनेचा आढावा घेतला आहे काय ? सभापती महोदय, माझ ी यानिमित्ताने शासनाला सूचना आहे की, खिचडीसाठी जेवढा खर्च येतो तेवढयाच पैशातून मुलांना पाठ्यपुस्तके द्यावीत, वहया द्याव्यात, गणवेष द्यावा. जर काही विद्यार्थी लांबून येत असतील तर अशा विद्यार्थ्यांना सायकल देण्याची व्यवस्था करावी. शासनाने या मध्यान्ह भोजन व्यवस्थेचा पुनर्विचार करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या फीची प्रतिपूर्ती केली जाते. त्यासंबंधी शासनाने 1995 साली जी.आर.काढला आहे. त्यावेळी फीचे दर कमी होते. आज शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची मुले इंजिनिअरिंग किंवा वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. मागील काळात शासनाने शिक्षण शुल्क समिती गठित केली आहे. त्यांनी ती फी ठरविलेली आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 19:55

(श्री. विक्रम काळे....

त्या दराने फी ची प्रतिपूर्ती झाली पाहिजे. 4 हजार रुपये फी आणि ती देखील वेळेवर मिळत नाही. अर्ज दाखल करुन घेतले जातात पण दरवर्षी सांगितले जाते की बजेट येत नाही. मंत्रालयात गेल्यानंतर एवढे एवढे बजेट आहे असे सांगितले जाते. मग पैसे जातात कुठे ? मघाशी भ्रष्टाचाराचा उल्लेख झाला. हा देखील त्यातील एक भाग आहे. या योजनेसाठी दरवर्षी बजेट येत असेल तर ते जाते कुठे ? कोणत्या विद्यार्थ्यांना आणि पालकांना याचा लाभ मिळतो हेही तपासले पाहिजे. या विषयी पालक हायकोर्टामध्ये गेले होते. माननीय मंत्रीमहोदय, आपण परभणी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी असल्यामुळे तेथील पालक आपल्याकडे आले होते. त्या पालाकंनी कोर्टामध्ये याचिका दाखल केली की,शुल्क रचना समितीने मेडिकल, इंजिनिअरिंग आणि व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी जी फी ठरविलेली आहे त्याप्रमाणे प्रतिपूर्ती दिली पाहिजे. या संदर्भात शिक्षण सचिवांनी कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट दाखल केले की आमचा प्रस्ताव गेलेला आहे, फी वाढवून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. सभापती महोदय, किती वर्षे प्रस्ताव लोटत राहाणार ? सरकार विचार कधी पूर्ण करणार ? वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे असे म्हणता. मग तो प्रस्ताव कधी मंजूर होणार ? शुल्क निर्धारण समितीने मेडिकल, इंजिनिअरिंग किंवा व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी जी फी निर्धारित केलेली आहे त्या फीच्या प्रतिपूर्तीचा निर्णय किती दिवसात शासन करणार, असा माझा शासनाला सवाल आहे ?

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून 7 शैक्षणिक सवलती देण्यात येत आहेत. मागील हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. मागील तीन-चार वर्षापासून यासाठी सप्लिमेण्टरी डिमांड सादर करीत आहोत. वित्त विभागाचा नेहमी हाच अभिप्राय येतो की ह्या सवलती रिस्ट्रक्चर करा, त्यामध्ये बदल करा. या सवलती इर्रिलेव्हण्ट झालेल्या आहेत. त्या रिलेव्हण्ट करा. यासाठी एससीआरटी समिती स्थापन केलेली आहे. त्या समितीने रिपोर्ट तयार करुन काही शिफारशी प्रस्तावित केलेल्या आहेत. पहिल्यांदा 10वी पर्यन्त सर्वांना मोफत शिक्षण होते. ती सवलत तशीच ठेवण्यात आलेली आहे. पूर्वी मुलींसाठी 11वी आणि 12वी पर्यन्त मोफत शिक्षण होते. या समितीने अशी सुधारणा सुचविलेली आहे की, सर्वांसाठी 12वी पर्यन्तचे शिक्षण मोफत करावे. ही प्रमुख सुधारणा केलेली आहे. शिक्षकांच्या पाल्यांचा या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. तर त्यांच्यासाठी देखील 12वी पर्यन्तचे शिक्षण मोफत होणार आहे. आधी 12वी नंतर पदवीपर्यन्तच्या शिक्षणासाठी सवलत मिळत होती. ही मदत खूप कमी आहे हे खरे आहे. परंतु ही सवलत समितीने बंद करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. ही सवलत बंद करण्याचे कारण असे सांगण्यात येते की, आता मेडिकल आणि इंजिनिअरिंग अभ्यासक्रमाची फी खूप वाढलेली आहे. खाजगी विद्यालयांमध्ये तर प्रचंड फी आहे. या फीची प्रतिपूर्ती शासनाकडून होणे शक्य नाही. म्हणून ही सवलत बंद करण्याचा प्रस्ताव समितीच्या माध्यमातून आलेला आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीची नोंद होऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, औरंगाबाद हायकोर्टामध्ये शिक्षण विभागाच्या सचिवांनी असे ॲफिडेव्हिट केलेले आहे की, आम्ही या योजनेचा आढावा घेत आहोत, शुल्क रचना समितीने दर ठरविलेले आहेत त्यानुसार प्रतिपूर्ती करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठवित आहोत. या बाबत मंत्री महोदयांनी माहिती घ्यावी.

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे ही बाब तपासून पाहिली जाईल.

----

..3..



MSS/ ST/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 19:55

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आदिवासी क्षेत्रातील अनुदानास पात्र वर्गांना द्यावयाचे अनुदान

**मु. शी.** : आदिवासी क्षेत्रातील अनुदानास पात्र वर्गांना द्यावयाचे अनुदान यासंबंधी श्री.रामनाथ मोते,वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"शालेय शिक्षण विभागाने आदिवासी क्षेत्रातील विनाअनुदानित वर्ग / तुकडयांना मूल्यांकनानुसार अनुदानास पात्र असल्याचे दिनांक २९ मे, २००९ च्या शासन निर्णयानुसार घोषित करणे, आदिवासी क्षेत्रातील अनुदानास पात्र वर्ग / तुकडयांना आदिवासी विभागाने अनुदान उपलब्ध करुन देणे आवश्यक असणे, अनुदानास पात्र घोषित ४५ वर्ग तुकडयांपैकी केवळ नंदूरबार जिल्ह्यातील १८ तुकडयांना अनुदान उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु होणे, उर्वरित तुकडयांना अनुदान उपलब्ध न झाल्याने अनुदानास पात्र असून अनुदान न मिळणे, आदिवासी विभागाकडून सातत्याने आदिवासी क्षेत्रातील शाळांना अनुदान मिळण्यास विलंब होणे, पात्र घोषित तुकडयांना तातडीने अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, आदिवासी क्षेत्रातील विनाअनुदानित वर्गांना अनुदान देण्यासंदर्भातील ही अर्धातास चर्चा. आता शिक्षण विभाग काय उत्तर देणार हे आता आम्ही ऐकलेले आहे.

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते......

आम्ही सातत्याने मंत्रालयात जातो, अधिकाऱ्यांना भेटतो, उत्तर काय मिळणार? सभापती महोदय, त्यांचे उत्तर हवे तर मीच सांगतो. विषय तो नाही. माझी स्पेसिफिक अर्धातास चर्चा ही आदिवासी विकास विभागासाठी दिलेली होती. माझ्या चर्चेचे प्रारुप आपण लक्षात घेतले तर शालेय शिक्षण विभागाकडून उत्तर नको. शालेय शिक्षण विभागाने आम्हाला सांगितले की, आदिवासी विकास विभागाकडून जोपर्यंत निधी मिळत नाही तोपर्यंत आम्ही कुठून देणार? विषयाचे उत्तर आदिवासी विकास विभागाकडून हवे आहे.

**तालिका सभापती** (श्री.रमेश शेंडगे) : ही सूचना शालेय शिक्षण विभागास अनुलक्षून विचारलेली आहे.

श्री.रामनाथ मोते : माझ्याकडे अर्धातास चर्चेची मूळ प्रत उपलब्ध आहे. आदिवासी विकास विभागास मार्क केलेली आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, चर्चेमध्ये वेळ वाया न घालविता मी एक पर्याय सुचवू इच्छिते. वित्त विभागाचे सचिव, आदिवासी विकास विभागाचे सचिव व शालेय शिक्षण विभागाचे सचिव यांची संयुक्त बैठक घेऊ. या बैठकीमध्ये या प्रश्नावर मार्ग काढू. त्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी संयुक्त बैठक आवश्यक आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ही बैठक होईल, चर्चा होईल. विषय असा आहे की, गेल्या एक वर्षापूर्वी शासनाने निर्णय घेतला. अनुदानास पात्र असणाऱ्या शाळांची यादी घोषित केली, तुकड्यांची यादी घोषित केली. शालेय शिक्षण विभागाने त्यांच्या निकषानुसार 50 टक्क्यापेक्षा जास्त आदिवासी क्षेत्रातील विद्यार्थी संख्या असल्यामुळे त्या तुकड्यांना 100 टक्के अनुदान मंजूर केले. तसा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर केला. याठिकाणी अडचण निर्माण करणारा आदिवासी विकास विभाग आहे. शालेय शिक्षण विभागास आदिवासी विकास विभागाकडून अनुदान येणे आवश्यक आहे. तो विभाग शालेय शिक्षण विभागाला अनुदान देत नाही. एकूण 45 तुकड्यांपैकी 18 तुकड्यांना अनुदान देण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. बाकीच्या तुकड्यांचे काय? सन्माननीय सचिवांची संयुक्त बैठक आपण घेऊ. आदिवासी आणि शालेय शिक्षण विभागाच्या सचिवांना बैठकीसाठी बोलवावे. परंतु माझी विनंती अशी आहे की, या विषयाला न्याय तेव्हाच मिळेल जेव्हा सभापती महोदयांच्या दालनामध्ये या दोन्ही सचिवांची मंत्रीमहोदयांसमवेत बैठक

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

होईल. तरच या विषयाला न्याय मिळेल. सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये आदिवासी व शालेय शिक्षण विभागाचे सचिव आणि मंत्रीमहोदय यांना बैठकीसाठी बोलवावे. तरच हा विषय मार्गी लागेल. चर्चेच्या निमित्ताने आपण मान्य करावे अशी माझी विनंती आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, बैठक घेण्यास माझी हरकत नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये ही बैठक घेण्यात यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे. माननीय सभापतींच्या दालनामध्ये बैठक घेण्यात येईल.

--------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक निवृत्ती वेतनापासून वंचित असणे

**मु. शी.** : अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक निवृत्ती वेतनापासून वंचित असणे यासंबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतरांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवानिवृत्ती वेतन योजना लागू असणे, सेवानिवृत्तीपूर्वी किमान सहा महिने अगोदर निवृत्तीवेतनाची प्रक्रिया सुरु करण्याचे बंधन असणे, अनेक शाळांच्या मुख्याध्यापकांच्या व संस्था चालकांच्या अडवणुकीच्या धोरणामुळे वेळेवर प्रस्ताव सादर न होणे व परिणामत: संबंधितांस वेळेवर पेन्शन न मिळणे, सेवानिवृत्त होऊन 4-5 वर्षे होऊनही निवृत्तीवेतन न मिळणे, सेवानिवृत्त होणाऱ्यांना वेळेवर पेन्शन मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, या राज्यातील अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये काम करणारे आमचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांना निवृत्त झाल्यानंतर त्यांची अर्हताकारी सेवा पेन्शन मिळण्याइतपत झाली असेल तर त्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवानिवृत्तीचे लाभ मिळत आहेत. अर्धातास चर्चेचा विषय असा आहे की, सेवानिवृत्त झाल्यानंतर सहा-सहा महिने, एक-एक वर्ष, दोन-दोन वर्षे होऊनही अनेक शिक्षकांना निवृत्तीवेतन मिळालेले नाही. हा अर्धातास चर्चेचा मूळ गाभा आहे. त्यांना वेळेवर पेन्शन मिळावे म्हणून शासनाने 1 जुलै, 1985 रोजी जी.आर.काढला. त्यानुसार जे कर्मचारी सेवानिवृत्ती नियमानुसार निवृत्तीवेतनास पात्र असतील त्यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी एक वर्ष अगोदर नाव, पत्ता, वैयक्तिक माहिती या संदर्भातील प्रक्रिया पूर्ण करावी. वेळेवर प्रक्रिया न करण्यास जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई किंवा शिस्तभंगाची कारवाई करावी किंवा ते जबाबदार असल्यामुळे विलंबाने जर पेन्शन देय ठरत असेल तर व्याजाची रक्कम देण्याबाबत सुध्दा त्यांनाच जबाबदार धरुन जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

नंतर 5बी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .......

अशा प्रकारचा जी.आर. आहे. त्यानंतर 3 सप्टेबर, 1993 ला शासनाने सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनानिदेश दिलेले आहेत की, कोणत्याही प्रकारे सेवानिवृत्तीनंतरची प्रकरणे विहित कालावधीत पूर्ण करावी व त्याचा आढावा घेण्यात यावा. त्यानंतर 25 नोव्हेंबर, 1994 रोजी तर अत्यंत स्पष्ट शब्दात सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार जे क्षेत्रीय अधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, शाळा व्यवस्थापन यांच्यापैकी ज्यांच्याकडून निवृत्तीच्या प्रकरणांचे काम वेळेत पूर्ण झाले नाही तर त्यांसाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा नियम, शिस्त व अपिल नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, असे शासनाने आदेश दिलेले आहेत. मघाशी मी उल्लेख केला त्यानुसार निवृत्त झाल्यानंतर सहा-सहा वर्षे होऊन गेली तरी देखील पेन्शन मिळत नाही त्यांच्या बाबतीत कोणताच विचार केला जात नाही. वास्तविक जे शिक्षक निवृत्त होतात अथवा ज्यांचे निधन होते त्यांच्या कुटुंबाला वेळेवर पेन्शन मिळाले नाही तर वृध्दापकाळात त्यांना सांभाळणारे सुध्दा कोणी नसते अशा परिस्थितीत त्यांचे हाल होतात. वास्तविक पेन्शन मिळण्याबाबतचा त्यांचा हक्क असतो, त्यांनी शासनाची सेवा केलेली असते तसेच शासनाने देखील ही योजना लागू केलेली असते. त्यात शासनाचा दोष नसतो पण संबंधित कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुर्ततेसह ए.जी.कडे जाणे आवश्यक असते. उदा. आमच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव मुख्याध्यापकांमार्फत पाठविले जातात. माध्यमिक शाळांमधील प्रस्ताव संस्था चालकांमार्फत शिक्षणाधिकाऱ्यांकडे, उच्च माध्यमिक शाळांचे प्रस्ताव असतील तर ते डीन मार्फत पाठविले जातात. हा विषय उपस्थित करण्याचे कारण म्हणजे असे अनेक शिक्षक आहेत की, जे सेवानिवृत्त होऊन बरीच वर्षे झाली, अनेक पत्रव्यवहार करुन, शासनाचे यासंदर्भातील आदेश स्पष्ट असताना, संचालक आणि उपसंचालकांचेही आदेश असताना अद्यापही निवृत्त झालेल्या अनेक शिक्षकांना पेन्शन मिळाले नाही. उदा. नागनाथ विद्यालय, मोहोळ या विद्यालयाचे प्रकरण तर मी आमदार झाल्यापासून सतत सभागृहात मांडत आहे. आता माझी टर्म संपायला काही महिनेच उरले आहेत तरी देखील हे प्रकरण निकाली निघालेले नाही. मी तेथील स्थानिक पुढाऱ्याला सुध्दा भेटलो तरी देखील हे काम झालेले नाही. अनेक तक्रारी करुन शेवटी या प्रकरणात असा निर्णय झाला की त्या शाळेची मान्यता काढून घ्यावी काय ? वेतनेत्तर अनुदान



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

अद्याप या शाळेला मिळत नाही पण ते मिळाल्यानंतर त्यात 25 टक्के कपात करावी की काय असाही प्रयत्न झाला परंतु या संस्थेच्या पाठीशी एक वजनदार व्यक्तिमत्व असल्यामुळे ते आदेश सुध्दा त्या व्यक्तिने स्थगित करायला लावले व कोणतीच कारवाई झाली नाही. माझी विनंती आहे की, हे सेवानिवृत्त शिक्षक श्री. गरड यांना ताबडतोब पेन्शन लागू करण्यासंबंधीची प्रोसिजर पूर्ण करण्याचे आदेश संबंधितांना मंत्री महोदयांनी द्यावेत. त्यानंतर श्री. आर.के.भाटकर हायस्कूल, वेंगुर्ले येथील शिक्षक सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना सुध्दा पेन्शन सुरु झालेले नाही. वास्तविक शासनाचे आदेश असताना एखादा शिक्षक सेवानिवृत्त होण्याची वाट न पाहता तो 58 व्या वर्षी निवृत्त झाल्यानंतर अथवा एखादा शिपाई 60 व्या वर्षी निवृत्त होण्यापूर्वी सहा महिने अगोदरच सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन प्रकरण अे.जी. कडे पाठवावयाचे असते. ज्या दिवशी ती व्यक्ती सेवानिवृत्त होते त्याच्या निरोप समारंभाच्याच दिवशी त्याला पीपीओ ची ऑर्डर मिळू शकते. पण हे का होऊ शकत नाही याचा विचार करण्याची गरज आहे. अशा सर्व प्रलंबित प्रकरणांमध्ये जे अधिकारी वा कर्मचारी जबाबदार असतील त्यांच्यावर कडक कारवाई मंत्री महोदय करणार काय ? हा माझा प्रश्न आहे. कारण यासंबंधीची तरतूद संबंधित कायद्यामध्ये नाही म्हणून अशी काही उपाययोजना करावी की प्रकरण प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यालाच जबाबदार धरुन ही कारवाई करावी आणि पाटकर हायस्कूलचे श्री. जोशी सर यांना पेन्शन लागू करावे. संस्थेत काही वाद असतील पण त्याचा पेन्शनच्या प्रकरणाशी काही संबंध नाही. म्हणून मी ज्या ज्या शाळांचा उल्लेख केला त्या शाळांमधील शिक्षक तसेच मुख्याध्यापकांना पेन्शन ताबडतोब मिळेल याकडे लक्ष द्यावे अशीही विनंती करतो. त्यानंतर सांडवे हायस्कूल, देवगड या शाळेतील श्री. हरिश्चंद्र चिंदरकर या शिक्षकाला निवृत्त होऊन एक वर्ष होऊन गेले तरी देखील त्यांना पेन्शन मिळाले नाही.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ...

आमचे श्री.गरज सर 6 वर्षापूर्वी निवृत्त झाले पण त्यांना पेन्शन मिळाले नाही. मेहता, दोशी आणि अस्मिता पटेल गुजराती हायस्कूल, पनवेल यांची तर फार मोठी फाईल झाली आहे. आमचे शिक्षणाधिकारी आणि शिक्षण उपसंचालक यांनी दखल घेऊन पत्रव्यवहार केला. परंतु, पत्रव्यवहार करून करून ते देखील थकले. आता काय करावे हा देखील आमच्यासमोर प्रश्न आहे. आता यांना पेन्शन कसे मिळणार असे ते म्हणतात. श्री. दिवाकर केशव राऊत यांचे तर निधन झाले. पण त्यांना शेवट पर्यंत पेन्शन मिळाले नाही. त्यांच्या घरामध्ये कुणी नाही. फक्त त्यांची पत्नी आहे. त्यांना मुल नाही. ज्यांचे यजमान शिक्षक होते, ज्यांना पेन्शन मिळण्याचा अधिकार होता, त्यांना अजून पर्यंत पेन्शन मिळालेले नाही. अशी अनेक उदाहरणे आहेत. मी आपल्याला वानगी दाखल पाच नावे सांगितली. अशा प्रकारचे अनेक शिक्षक आज पेन्शनपासून वंचित आहेत. भविष्यातही अशा घटना घडत राहतील. म्हणून आमचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पेन्शनचे पेपर वेळेवर जावेत, सेवा निवृत्तीपूर्वी सहा महिने अगोदर जावे अशी मी विनंती करीत आहे. सेवानिवृत्त होताना किमान पीपीओ ऑर्डर मिळेल या दृष्टीकोनातून उपाययोजना होण्याची आवश्यकता आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मी ज्या नावांचा उल्लेख केला आहे, त्यांची प्रकरण एक दोन महिन्यामध्ये निकाली निघाली तर खऱ्या माझ्या ह्या चर्चेला अर्थ प्राप्त होईल. म्हणून मी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो की, त्यांनी यासंबंधी उपाययोजना करावी. अशा प्रकारची प्रकरणे युद्ध पातळीवर लवकरात लवकर निकाली काढण्यसंबंधी कार्यवाही करावी. भविष्यात असे काही होऊ म्हणून ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे ती आपण विचार करून करावी अशी माझी विनंती आहे.

......



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांना, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पेन्शन वेळेवर मिळाले पाहिजे अशा आशयाची अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. पेन्शन वेळेवर मिळणे खरोखर गरजेचे आहे. कारण जे जीवनभर सेवा करतात त्यांना पेन्शन वेळेवर मिळाले नाही तर ती एक शोकांतिका आहे. पेन्शन वेळेवर न मिळण्यास वेगवेगळी कारणे देखील आहेत. ती कारणे आपल्याला येथे कुठेही पीन-पाईंट करता येणार नाही. एक तर शाळेमध्ये वाद असू शकतो. शाळेच्या मुख्याध्यापकाने सेवानिवृत्त होण्याच्या आधी सहा महिने पेन्शनचे कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. पण ते करत नाही, ही वस्तुस्थिती आहे. कधी कधी मॅनेजमेंटमध्ये भांडण असते. तसेच शिक्षक देखील आपली कागदपत्र वेळेवर बघत नाही.  अशा प्रकारची वेगवेगळी कारणे आहेत. त्यामुळे या प्रक्रियेमध्ये विलंब होतो. मी येथे लांबलचक भाषण करणार नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, वेळेवर कागदपत्र सादर केले तर वेळेवर पेन्शनची कार्यवाही होऊ शकते. मुख्याध्यापकाने,संस्थाचालकाने जाणूनबुजून विलंब केला तर त्यांच्यावर कारवाई करण्याचा विचार होऊ शकतो. मी येथे असे सांगू इच्छिते की, ही प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीने शासन जरूर विचार करील. सन्माननीय सदस्यांनी येथे काही नावांचा उल्लेख केला. श्री.गरड सरांचे  प्रकरण येथे सांगितले आहे. या प्रकरणात  कागदपत्र सादर करण्यात येत नव्हते. पण आता कागदपत्र सादर करण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या पेन्शनची कार्यवाही लवकरात लवकर होईल. छाननीमध्ये त्रुटी आढळून आल्या तर कदाचित पेच निर्माण होऊ शकतो. पण आज किमान त्यांचे कागदपत्र सादर झालेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी अन्य प्रकरणे देखील निदर्शनास आणली आहेत. त्याबाबत देखील हेच बघणे आवश्यक आहे. आज चॅरिटी कमिशनरकडे प्रचंड प्रमाणात मॅनेजमेंट बरोबर वाद असल्याची प्रकरणे प्रलंबित आहेत.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ..

माननीय विधी व न्याय मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील या ठिकाणी उपस्थित आहेत मला त्यांना असे सांगावयाचे आहे की,या प्रकरणांचा जर लवकर निपटारा केला नाही तर डिसप्युटमुळे विद्यार्थ्यांचे तसेच शिक्षकांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत असते. चॅरिटी कमिशनर कार्यालयाने वेगवेगळया भागामध्ये कॅम्प आयोजित करुन लवकरात लवकर प्रकरणांचा निपटारा करावा अशा प्रकारचा निर्णय आपण शालेय शिक्षण मंत्री असतांना घेतला होता.तसे करणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे त्याप्रमाणे आतासुध्दा करावे असे मला आपणास सांगावयाचे आहे. राज्यामध्ये अशा प्रकारची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत तेव्हा त्याचा निपटारा करण्यासाठी जॉईन्टली कार्यक्रम घेतला तर त्वरित प्रकरणाचा निपटारा होऊ शकतो.

सभापती महोदय, ही अर्धा तास चर्चा उपस्थित करीत असतांना काही प्रकरणांमध्ये भ्रष्टाचार असू शकतो असेही सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे.तेव्हा काही ठिकाणी भ्रष्टाचार असू शकतो हे नाकारुन चालणार नाही. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी राणीसावरगावचा उल्लेख केला होता. त्याबद्दल मी आपल्याला सांगू इच्छिते की, त्या ठिकाणी इतक्या मोठया प्रमाणावर कॉपी चालते की ते मास कॉपिगचे सेंटर झाले असून जिल्हाधिका-यांनी आणि विभागीय आयुक्तांनी बोर्डाकडे असे कळविले होते की या सेंटरवर मोठया प्रमाणावर कॉपी होत असते.असे असतांनासुध्दा तेथील शिक्षणाधिका-याच्या नातेवाईकाची ती शाळा असल्यामुळे जिल्हा परिषदच्या शाळेत परीक्षा केन्द्र ठेवण्या ऐवजी त्या शाळेत परीक्षा केन्द्र ठेवण्यात आले होते.अशा
अधिका-याविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल आणि गडचिरोली येथे त्यांची बदली करण्यात येईल. अर्थात वरिष्ठ अधिका-यांचा देखील यामध्ये सहभाग आहे.राणीसावरगाव येथे ज्यावेळी बोर्डाचा प्रतिनिधी गेला होता तेव्हा त्याला असे विचारण्यात आले होते की, जिल्हा परिषदेचे परीक्षा केन्द्र चांगले असतांना दुस-या ठिकाणी परीक्षा केन्द्र कशासाठी देण्यात आले आहे.? तेव्हा यामध्ये जे कोणी अधिकारी दोषी आढळून येतील त्यांच्यावरही कारवाई करण्यात येईल एखादा मोठा अधिकारी जरी यामध्ये दोषी आढळून आला तर भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी त्याच्याविरुध्दसुध्दा निश्चितपणे कारवाई करण्यात येईल एवढेच मी या निमित्ताने आपल्याला सांगून माझे भाषण संपविते.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री रमेश शेंडगे** ) : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 19 एप्रिल 2010 रोजी दुपारी 12.00 ते 1.00 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक होईल या बैठकीत नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1 वाजून 15 मिनिटांनी पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 17 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 19 एप्रिल 2010 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही